
जीवन-गंगा
रघुवीर सामंत

— रघुवीर सामंत संपादित —

अमर ज्योति वाङ्मय

अद्यतन पद्धति ★ आकर्षक
तज्ज्ञ योजना ★ कलात्मक
पुरोगामी दृष्टी ★ उद्बोधक

चोखंदळपणें आपल्या बाळांच्या हातीं द्या !

## येत्या दिवाळींत

[ धनत्रयोदशी १८६९ ते ५ डिसेंबर १९४७ च्या दरम्यान ]

सुमारें २४ ते ३६ [ छोटीं-मोठीं, विविध ] आकर्षक कला-सुमनें आपल्या वाढत्या बाळांच्या अंजलींत शोभतील !

[ अमर ज्योति वाङ्मय ]

बाल-शिशूंसाठीं —

आकाशांतले राक्षस

पाताळांतल्या पऱ्या

सागराचीं पिलें

मायावी वनदेवी

अनोळखी दादाताई

बडबड-कथा-१-२

बंबाळ-गीतें-१-२

दीपक-प्रकाश

जुन्या सोन्याचे दागिने

★

चालक :—

सौ. स्नेहल सामंत, बी. ए.

१४ बी, हरजीवनदास एस्टेट,

१५९-६० व्हीन्सेंट रोड,

मुंबई १४

[ अमर

बाल-शि

आकाश

पाताळ

सागरा

मायाचं

अनोळ

वडवड

बंबाळ

दीपक-

जुन्या

सौ. स्ने

१४ बी,

१५९-

# जीवन-झंझा

[काहूर]

[ एक स्वतंत्र, सामाजिक, मनोविश्लेषक कादंबरी ]

★

## रघुवीर सामंत

◆

पारिजात प्रकाशन

— प्रकाशक —
**प्रभाकर शांताराम वर्टी**, बी.ए. (ऑ.)
यांनी
'पारिजात प्रकाशन' साठीं
प्रसिद्ध केलें.

# जीवन-गंगा [ काहूर ]

★ कथानकाचा स्थूल आराखडा
सप्टेंबर १९३९.

★ पात्र-प्रसंग जुळवाजुळव
एप्रिल-मे १९४०.

★ लेखनास प्रारंभ—
डिसेंबर १९४०

★ तपशील-रचना व लेखन—
जुलै-ऑगस्ट १९४२; मे १९४५

★ पुनर्रचना, पुनर्लेखन, परिणति—
३० डिसें. १९४६ ते ८ जाने. १९४७

★ मुद्रण—निर्मिती—प्रसिद्धि—
१९४७.

**श्री. शं. वा. कुळकर्णी**
सागर साहित्य छापखाना,
त्रिभुवन रोड, मुंबई. ४
**— मुद्रक —**

**प्रथमावृत्ति**

जूलै १९४७

चित्रीकरण, नाट्यीकरण, ध्वनि-मुद्रण, ध्वनिक्षेपन, पुनर्मुद्रण, उध्दृतीकरण, जाहीरवाचन, इत्यादि व इतर सर्व बाबतचे सर्व हक्क ग्रंथकर्त्याकडे.

पृष्ठें २१६

**मूल्य रु. साडेचार**

या कठोर यांत्रिक जीवनांत, क्षणोक्षण, परिस्थितीचे प्रचंड जीवन-कल्लोळ
उठतात;—तरीहि, –जे आदर्श नि खऱ्या मानवी जीवनाचीच जाणीव
उरीं ठेऊन–आपल्याला लाभलेल्या भल्या–बुऱ्या गृहमंदिरांत व
मानस-मंदिरांत प्रत्यह समाधानानेंच प्रवेश करतात;.. त्या आपल्या
छकुल्या जगांतल्या साऱ्या जीवांची, आपल्या अबोल
प्रेमाच्या मखमली पेटींत सदैव जपणूक करतात;— नि
अशाप्रकारें, आपल्या जीवनगंगेचा ओघ अखेरपर्यंत
अविरत उत्साहानें अखंड खळखळत ठेऊन, ऐल-
पैल-तीरीं सुखद हिरवळच कायम राहील
अशी पराकाष्ठा करतात;— अशा–
मला परिचित–अपरिचित सर्व
मुग्ध प्रेमळ जीवांना—
— अशा —
**सर्व समंजस सहिष्णु जोडप्यांना**
ही
'जीवन–गंगा'
सा द र
समर्पण
|
★
**रघुवीर सामंत.**
(पाडवा १८६९.)

# " जीवन-गंगे "त तो

" हें पहा !-मी कांहीं लोखंडी यंत्र नव्हे !-मीहि एक हाडामांसाचा माणूस आहें !-मी एकटा ?-छेः, आपण सारे !-साऱ्यांसाठीं साऱ्यांनीं जगायचं;...हो, स्वैर मन मारून,...मनाचा पुरा निर्धार करून !-तसं जिवंत लोकांचं काम कधींच संपत नसतं !-समाजांतल्या लोकांचे...साऱ्या जगांतलेच —विविध रोग घालवण्यासाठीं अहोरात्र झटणं...हेंच आपलं सर्वांचं काम !-त्यासाठीं आधीं-शरिराला विसरा नि विसरवा !-मग तत्काळ शरीर बरं होतं !-

मला तरी पटलंय्...आपल्या हातानें आपलं आयुष्य तयार करणाऱ्या कर्तव्यकठोर माणसाला मृदु भावनांनीं अलीपलीकडे वाहून जातां येत नाहीं !-दृष्टि होकायंत्राची नि मन पोलादाचं हवं, तिथं !!-कुणाला-अगदीं कुणालाहि वेळ नसतो जगांत इथं,...तुमच्याकडे, तुमच्या परिस्थितीकडे...नि तुमच्या केवळ भावनांकडे सहानुभूतीनें पाहायला !-तुमच्या कर्तृत्वानें त्यांचे डोळे दिपतील तेव्हांच सारे तुमच्या पायावर लोळण घेतील !-तोंपर्यंत तुमच्या डोक्यावरच साऱ्यांच्या लाथा !!—

...माझं जीवन !-वर वर निर्विकार; पण तरी अगदीं विविध घटना-गजबजींनीं तुडुंब भरलेलं !-तरी पण, आयुष्याच्या वाटचालीशेवटीं आजहि वाटतं...'माझं जग हें नव्हे !-तें तिकडलं...बाहेरचं !-ती खरी माझी जीवन-गंगा !!'...तसा केवळ एक कार्यव्यग्र, बुद्धिजीवी, महत्वाकांक्षी रांगडा शिपाईगडी मी !—म्हणूनच...कोणाच्याहि...अगदीं कोणाच्याहि खाजगी सहवासाशिवाय....शेवटपर्यंत...अगदीं स्वयंपूर्णपणें जगूं शकेन मी !!..."



# " जीवन-गंगे "त ती

" आम्ही माणसं-स्त्री...पुरुष...बालकं-सारींच...आंधळ्यांची एक लांबच लांब माळ आहों ! ...एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला-शाहणा-वेडा, पापी-पुण्यवान्, चांगलं-वाईट म्हणतो...नि केवळ आत्मगौरव मानतो, एवढंच...

स्त्री !...पुरुष!.. स्त्री-पुरुषांच्या मनाचे खेळ !!-अगम्य,...अफाट,...गूढ गूढ !!-मला वाटतं...पुरुषाचं प्रेम असतं जीवनावर,...स्त्रीचं जीवनच असतं प्रेमावर !—

माझी आई मला म्हणाली होती—" पोरी, स्वावलंबी स्वतंत्र जीवन जगतां येईल अशी धमक अंगांत आण !...पुरुषांच्या टाटाखालचं मांजर होऊं नकोस कधीं !...पुरुष म्हटला, कीं ताबा आला; ताबा म्हटला, कीं धोका आलाच !-"-आणि खरंच तें !-हाडाची अस्सल नागीण, भोंवतालच्या परिस्थितीच्या माऱ्यानें गोगलगायहि बनते !-पुरुष नैसर्गिकपणेंच तटकन् तोडूं पाहातो;...पण स्त्री...शक्य तों, शक्य तिथं,...तुटणारं जें जें,...तें तें हलुवारपणें जोडून घेते !...निसर्गानें असंच बनवलं आहे आम्हां स्त्रियांना ! कसलाहि त्याग आम्ही नेहमीं असा हसत हसतच करतों !!—

...बाह्य परिस्थितींत नव्हे,...आपल्या उत्कट भावना-साम्राज्यांतच स्त्री जगत असते !...पुरुषाबद्दल तिला वाटणारं प्रेम...हाच तिच्या चैतन्याचा झरा !-त्याच्या डोळ्याच्या दारामधूनच ती त्याच्या मनाच्या मंदिरांत प्रवेश करते !-पण स्त्रीचं उत्कट प्रेम एकूण मुग्धच !-तिच्या रसरशीत मनाला बाहेर उघडणारे दरवाजेच नसतात !!—

शिक्षण ?-कसलं आमचं शिक्षण ?...आम्ही स्त्रिया त्या स्त्रियाच ! मला तरी वाटतं, माझ्या कर्तृत्वाचा उगम माझ्या डोक्यांत नव्हता;...तो माझ्या

जिवंत हृदयांत होता !-आणि मग विचारांतीं फिरफिरून वाटतं...कोणतीहि प्रामाणिक सुशिक्षित विवाहित स्त्री...तिचं आयुष्य...बहुधा कृत्रिमच !—स्त्रीचं मन नि पुरुषाची महत्वाकांक्षा...दोन्ही...एकाच वेळीं, एकाच शरिरांत,...झगडल्याशिवाय राहाणार तरी कशी ?-मनांतील तसल्या भयंकर झुंजीमुळेंच, विफलतेची दाट अभ्रं तिच्या मनाला झांकळून टाकतात ! —

नाहीतरी आम्ही अलीकडलीं शिकलेलीं जोडपीं...लग्नामधून फारच आदर्श गोष्टींची अपेक्षा करतों !-मोठ्या अगम्य अप्रत्यक्ष दिव्यत्वाची जाळीं मनानेंच स्वतःभोंवती उभीं करतों !-नि त्या स्वतःच्या जाळ्यांतच कोळ्या प्रमाणें स्वतःला गुरफटवून टाकतों !...पण विचारी स्त्रीला खरंखुरं गृहदेवता व्हायचं असेल, तर तिनें आपल्या जगांतलं सुख टिकवून नको का धरायला ? ...प्रेम !...विवाह !...प्रेम-विवाह !...पण असं पहा-प्रेमी जोडपं म्हणजे केवळ संसाराच्या झाडावर बसून राहिलेली, गुलगुलत्या बुलबुलपक्षांची जोडी नव्हे !—त्यांचं प्रेम म्हणजे—घराच्या उतरत्या कौलांवरल्या कबुतरांच्या जोडप्यांचं स्वैर घुमणं, नि डोळे मिटून जवळजवळ बसून राहणंहि नव्हे !—समाजांतलं जोडपं समाजासाठींच असतं, नव्हे कां ?...

हो,...अशाच वेळीं, परस्परसमानतेची ती स्वाभिमानी जाणीव होते; त्यामुळेंच, सुसंस्कृत, सुशिक्षित जोडप्याचं संसार-सुख, हें असं...सौम्य, सापेक्ष, पण स्थिर असतं !-दोघांच्या एकत्र जिवनाच्या एकाच ताटांतून त्यांना सुख वाढून घेतां येतं !—

आणि मग वाटतं...तोकडंच असलं तरी मानवी जीवन कसं अगदीं अमृतानें तुडुंब भरलेलं आहे !-त्यांचं दिव्यत्व तसं मनाला पटकन् पटून, मग फिरफिरून वाटतं...'जगावं ?...जगावं !...जेवढं जमेल तेवढा काळ या जगांत जगावं !..."

## रघुवीर सामंत

[ परिचय ]

[ रघुनाथ जगन्नाथ सामंत, बी. ए. बी. टी.; जन्म-२४ डिसें. १९०९ ] बालपणापासून लेखनाची हौस; १९२९-३० मध्यें, सुप्रसिद्ध 'प्रगति' साप्ताहिकांत 'कुमार रघुवीर' या नांवानें प्रथमच प्रामुख्यानें चमकले; 'महान् आशा' या लेखमालेच्या व त्या पुढीलही कित्येक लेखांच्या रूपानें, 'शब्दचित्र' या स्वतंत्र नवीन वाङ्मय प्रकाराला रूढ व स्थिर करण्याचें श्रेय त्यांना लाभलें. पहिलाच शब्दचित्र-कथा-संग्रह-- 'हृदय' (डिसें. १९३२) रसिकमान्य होऊन, त्याचें फार स्वागत झालें. ('अप्पांची बैलांची जोडी,' 'सुभान्या' इ. अनेक शब्दचित्रें तत्काळ शालेय पाठ्यपुस्तकांतहि शिरलीं.)

डिसें. १९३३ ते मार्च १९३५ दरम्यान, अव्वल दर्जाच्या रसिक 'पारिजात' मासिकाचें संपादन-प्रकाशन; त्यानंतर कांहीं काळ 'भा. गौ. ग्रंथमालेशीं संबंध; १९३८ पासून पुढें शिक्षकाचा पेशा; शिवाय, लेखन, प्रकाशन, संपादन इ. व्यवसाय; नभो-नाट्य, काव्य-गायन, ध्वनिमुद्रित-गायन, अध्यापन इ. बाबतचे हौसेचे प्रयोग. डिसेंबर १९३९ ते जून १९४१ या दरम्यान 'ज्योति' मासिकाचें संपादन-प्रकाशन. मार्च १९४१ ते एप्रिल १९४२ दरम्यान चित्रपट-लेखन-दिग्दर्शन-निर्मिती-कार्यांशीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध; डिसेंबर १९४४ पासून, अभिनव बालवाङ्मय प्रकाशनासाठीं, 'अमर ज्योति वाङ्मय' संस्थेची स्थापना. (याच सुमारास, 'हृदय' व 'वाळूंतील पावलें' हीं दोन पुस्तकें विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत, आणि 'पणत्या' व 'मासलेवाईक प्राणी' हीं पुस्तकें शाळांच्या पुरवणी-वाचनांत शिरलीं.) यांचें सारें वाङ्मय सोज्वळ, जिव्हाळ्याचें, वास्तववादी, कलात्मक पण अनभिनिवेशी असें आहे. भाव-विचारांची सांगड घालणारी मेनाभूमिका, व्यापक जीवनानुभवाचा पाया, सूक्ष्म निरीक्षण, सखोल व्यक्तिदर्शन, निर्दोष आकर्षक रचना-मांडणी, हुबेहूब वर्णनशैली, साधी सूचक ओघवती भाषाशैली, अर्थव्यक्तीसाठीं विरामचिन्हांचा (क्वचित् फाजील वाटणारा) उपयोग, इत्यादि गोष्टी सामंत-वाङ्मयाचे बरेवाईट विशेष म्हणून दाखवतां येतील. शब्दचित्र, लघुनिबंध ('चित्र-बंध'?) लघुकथा, काव्य (सांघिक), कादंबरी, चरित्र, नभो-नाट्य, बालवाङ्मय इत्यादि विविध ललित वाङ्मय-प्रकार व काव्य-गायन, ध्वनिमुद्रित-गायन वगैरे कलापूर्ण गोष्टी त्यांनी यशस्वी रीतीनें हाताळलेल्या आहेत.

K. G. K.

## ❋ सामंत वाङ्मय ❋

### प्रकाशित कलाकृती

* १ हृदय [शब्दचित्रें-कथा; डिसेंबर १९३२]

× २ वाळूंतील पाउलें [कथा; डिसेंबर १९३४]

३ सुरंगीची वेणी [रूपांतरित कथा; डिसें. १९३५]

* ४ २ पणत्या [लघुनिबंध; ऑक्टो. १९३८]

* ५ मासलेवाईक प्राणी [स्वभाव चित्रें; ऑक्टो. १९४०]

६ आजची गाणीं [सांघिक गीतें ऑग. १९३९]

७ तारांगण [चित्रबंध; ऑक्टो. १९४०]

८ रजःकण [कथा-निबंध; डिसेंबर १९४०]

९ आदर्श कृषीवल [चरित्र; डिसें. १९४५]

१० तांडा [कथा; डिसें. १९४६]

### ❋ उपकारी माणसें ❋

[ खंड १-४ ]

एकूण सुमारें हजार पृष्ठें; हळुवार हातानें लिहिलेली प्रदीर्घ सामाजिक कादंबरी

११ [खंड १] प्रवासांतील सोबती [पत्रात्मक; मार्च १९३८]

१२ [खंड २] अभ्र-पटल [कथनात्मक; जून १९३८]

१३ [खंड ३] आकाश-गंगा [मिश्र; डिसें. १९३८]

१४ [खंड ४] घरोघरच्या देवी [नाट्यात्मक; डिसें. १९४४]

१५. जीवन-गंगा (काहूर)
[ कांदबरी; एप्रिल १९४७ ]

* दुसरी आवृत्ति प्रकाशन-मार्गावर : × दु. आवृत्ति संपत आली.

### — अप्रकाशित कलकृती —

* १६ रक्त नि शाई [काव्य]

* १७ पाण्यावरल्या रेघा [कथा]

* १८ स्वल्प-विराम [चित्र-बंध]

१९ चिमण्या जगाचे नेते [कादंबरी]

२० आम्हांला जगायचं आहे ! [कादंबरी]

२१ जिवंत माणूस. [कादंबरी]

* हीं पुस्तकें छापावयास तयार आहेत. *

'पारिजात प्रकाशन' १५९-६०, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४.

# जीवन-गंगा

[काहूर]

१ जीवन-कल्लोळ
२ मंदिर नि मानस-मंदिर
३ मानस-मंदिरांतले जीव
४ प्रेमाची मखमली पेटी
५ जीवनाची जाणीव
६ 'गंगा' कांठची हिरवळ

—पात्रें, प्रसंग, स्थळें इ. सर्व काल्पनिक—

जीवन-गंगा

[ काहूर ]

१

# जीवन-कल्लोळ

जीवन–गंगा

# जीवन–कल्लोळ १

## १

एखादा कुशल चित्रकार, काळ्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगानें एक एक वस्तू जशी हळूहळू रंगवीत सुस्पष्ट करील, तसाच...काळोखांतून समुद्राजवळचा एकएक भाग सूर्यराज नकळत प्रकट करीत होता—

मानवी कोलाहलांतहि निसर्गाच्या सुखद सौंदर्याची मोहक चुणुक दाखवणारी ती मलबार-हिल; तेथले कोंवळे रविकिरण नि लांबलांब सांवल्या; मानवी वस्तीचा नि श्रीमंतीचा पुरावा पुढें करणारं-एखाद्या उंचउंच इमारतीचं सूर्यालाहि परावर्तित करूनखालीं जमिनीवर पाडणारं-रंगीबेरंगी चकाकतं तावदान; समोरच्या सागराच्या, अस्पष्ट होत होत–लांब लांब अगदीं क्षितिजापर्यंत-हेलावत गेल्यासारख्या वाटणाऱ्या...अफाट लाटा; त्यांचा तो कांहीसा फेसाळता-खवळता रौद्र नाच; नि अकाशांतल्या काळवंडलेल्या पावसाळी ढगांवर, सुवर्ण कण लेवून स्वैरपणें उडणारे ते कोंवळे किरण—

हातांतील काठीवर भार टाकून, त्या मिश्र देखाव्याकडे त्यानें कितीतरी वेळ अनिमिष नेत्रांनीं पाहिलं; किंचित् दचकून भानावर येऊन, आपल्या मनगटी घड्याळाकडेही त्यानं पाहिलं. यंत्रांची ती टिक टिक नि 'सेंटर सेकंड'ची ती ठराविक वर्तुळांतील हालचाल; पाठीमागच्या मानवी वस्तीची त्याला आठवण करून द्यायला ती पुरेशा होती. पण त्या क्षणींच्या तसल्या एकांतशील, व्यक्तिगत,... रेंगाळल्या हालचालींपेक्षां, त्याच्या हातून घडणाऱ्या सामाजिक हालचालींवरच, कितीतरी दुर्दैवी, दुःखीकष्टी जीवांची-क्षणोक्षणीं आटूं पाहाणारी, खडकांतून प्रयासानें मार्ग काढणारी-जीवन–गंगा अवलंबून होती;... याचीच त्याला तत्काळ जाणीव झाली.



त्यामुळेंच किंचित् दचकून, त्यानें आपली भिरभिरती दृष्टि चौफेर फिरवून, शेवटीं आपल्या पायाकडे वळवली—

उचंबळणाऱ्या फोंफावत्या लाटा पायाजवळ येऊन फुटत, मागें जात; पायापासची दमसर वाळू तत्क्षण झरूं लागे;... क्षणभर, कोण हलत आहे याचाच मनाला संशय वाटे.

...ती प्रत्यक्ष परिस्थिति नि त्यावेळची त्याची मनःस्थिति, या दोहोंत तसं आतोनात साम्य दिसत होतं त्याला !

चौपाटीवरल्या गर्दीचा तो वेळच नव्हता; तरी समुद्रकिनाऱ्यावर अंतरा–अंतरावरून मधूनच तीं हलतीं–बोलतीं-चालतीं माणसं नि वरच्या फुटपाथवरूनची त्यांची ती तुरळक ये-जा...

निमिषार्धांत आपल्या एकलकोंड्या मनाला त्यानें सांवरलं; क्षणभरच त्याला भास झाला... 'आपल्या भोंवतीं हजारों मानवांचा गराडा पडला आहे ! तीं सारीं तारस्वरांत ओरडून आपल्याला कांहींतरीं विनवून विनवून सांगत आहेत...'

अगदीं झोपेंतून जागं व्हावं तस्सं दचकून व आपल्या घड्याळांत पुन्हा पाहून चालूं लागत, तो स्वतःशींच पुटपुटला, "बापरे ! अर्धा तास उशीर !... आज कसा वेळ गेला पहा ! कित्येक वर्षांत एवढा वेडा नव्हतों झालों मीं !!"

## २

पायऱ्या चढून फूटपाथवर आल्यावर, हातांतील काठी आपल्या मुठींत आडवी धरून, तो रेक्लेमेशनजवळच्या फुटपाथवरून झपझप पावलं टाकूं लागला. पण पुनः कसला तरी विचार बदलून, एकदम दोन पावलांच्या झांपेंत तो धक्क्यावर चढला. उजव्या धक्क्यावर धाड धाड आपटणाऱ्या फेसाळत्या लाटांकडे खालीं पहात तो चालत होता;... तरी त्याचं लक्ष मात्र त्याच्या मनांतच डोकावलं होतं.

डाव्या बाजूची ती चर्नीरोड गार्डन, स्टेशन, गव्हर्न्मेंन्ट प्रेस, कॉलेज-जिमखाने, नव्या नव्या इमारती, सर्व त्यानें केव्हां मागें टाकलं,... तें त्याला समजलं देखील नाहीं. शेवटीं, अभावितपणें एके ठिकाणीं धक्क्यावरच थबकून, सस्मित चेहऱ्यानें तो सभोंवार पाहूं लागला. बहुतेक पांढऱ्या झालेल्या आपल्या डोकीच्या भुरभुरत्या कैंसावरून हात फिरवीत, त्यानें आपली काठी खाकेंत मारली. सुरकुतलेला स्वेटर नीट खालीं ओढला; करड्या रंगाच्या आपल्या फ्लॅनेलच्या विजारींत दोन्ही हात घातले; नि रस्त्यापलीकडे दूरवर पसरलेल्या अनेक लहानमोठ्या रंगीबेरंगी नव्या इमारतींकडे, तो उभ्या-उभ्याच कुतुहलपूर्वक निरखून पाहूं लागला.

समुद्राकडे नि त्याच्याकडे तोंड करून, समोर कितीतरी इमारती वर्तुळाकार ओळींत निश्चल उभ्या होत्या. पण त्याचं लक्ष मात्र त्यांतल्या दूर अंतरावर दिसणाऱ्या एका निंचोळ्या उंच त्रिकोणी इमारतीवर खिळलं होतं. त्याचं शरीर अजून तिथंच असलं, तरी मन मात्र भटकत भटकत पुढें जाऊन, केव्हांच त्या इमारतीभोंवतीं घिरट्या घालूं लागलं होतं. त्याच दंग मनःस्थितींत, त्याची दृष्टि त्या इमारतीच्या पायापासून वरवर चढत, थेट शिखरापर्यंत जाऊन पोहोंचली होती. ती क्षणभरच तिथं थबकल्यावेळीं, त्याच्या मनांत जे विचार पटकन् स्फुरले,... त्यामुळेंच असेल, त्याचा चेहरा अगदीं विलक्षण अभिमानानें फुललेला दिसला.

क्षणकाळ तसा गेला असेल नसेल, तोंच एखाद्या जवान तरुणाप्रमाणें, धक्क्यावरून खेळकरपणें दणकन् खालीं उडी मारून, तो आपल्याशींच सौम्य हंसला; नि शेवटीं त्या इमारतीच्या रोखानेंच दुडक्या चालीनें धावूं लागला.

त्याचा नेहमींचाच कार्यक्रम हा ! पाटांटे उठून अगदीं एकटं फिरायला जायचं; परततांना हॅंगिंग गार्डनपासून तेथपर्यंत तसं संथ चालत यायचं; नि मग त्या विशिष्ट जागेपासून पुढले तीन चार फर्लांग दुड्दुड् धांवत त्या इमारती–ती विशिष्ट त्रिकोणी इमारतच-गांठायची ! त्यामुळेंच...दिवस-



भरांतील साऱ्याच–विशेषतः फिरून परतल्यावर लागलीच त्याच्या अंगावर पडत त्या-पुढल्या नाजूक जबाबदाऱ्यांमधून पार पडतांना, त्याला पूर्णपणें उत्साह-हुरूप वाटे. जणूं, या जोरावरच, आपलं सारं काम तो एकाग्रतेनें निर्विघ्नपणें पार पाडी !

—आणि इतक्या वर्षांमध्यें, आपल्या असल्या कार्यामध्यें त्याला अपयश असं ठाऊक नव्हतं !!

३

ठराविक दीपस्तंभ येतांच तो थांबला, नि आपल्या विजारीच्या खिशांत हात घालून मंद पावलं टाकीत चालूं लागला. त्या प्रातःकाळच्या छोट्याशा सौम्य व्यायामानें, त्याचा वयस्क पण गुळगुळीत गौर चेहरा, बराच आरक्त दिसत होता. त्याच्या भव्य तुकतुकीत कपाळावर, किंचित् घामाचे थेंबहि दिसूं लागले होते. तो छोटा रस्ता मोठ्या उत्साही मनानें ओलांडून, तो त्या इमारतीच्या बाजूस आला व काठी मुठींत आडवी धरून, ती अनिर्बंधपणें हलवीत तो पुढें चालूं लागला.

त्या बाजूस फारशी दरवळ नव्हती. क्वचित्च कोणी इकडून तिकडे जात येत होतं.

तोंच,...एक पोरगेलासा तरुण समोर घुटमळतांना दिसला. आपल्या हातांतील चुरमडलेलं चिठोरं वाचीत व सभोंवार भांबावलेल्या नजरेनें पहात, तो थबकला होता. कोणीतरी सद्गृहस्थ समोरून येतांना दिसतांच तो तरूण पुढें झाला व गोंधळल्या आवाजांत म्हणाला..."प्लीज! अहोऽ, अहो मिस्टर ! 'डॉ. सुधीरांची जीवनगंगा' कुठली, ती आहे माहीत"?

"डॉ. सुधीरांची जीवनगंगा?...कोण डॉ. सुधीर ? कसली जीवनगंगा ?" डाव्या हातांतील काठी दोन बोटांच्या बेचकांत धरून, खेळकरपणें ती गरगर फिरवीत, त्या प्रातःकालच्या फिरस्त्यानें कांहींशा बेफिकीरीनं विचारलं.

"वाः ! म्हणजे ? डॉ. सुधीर माहीत नाहींत तुम्हांला ? आश्चर्य आहे.

मुंबईतले एवढे मोठे नांवाजलेले सर्जन! ' जीवनगंगा ' म्हणजे त्यांचंच हॉस्पिटल…" तो तरूण विस्मित चेहऱ्यानें त्याच्याकडे रोखून पहात म्हणाला. "इथंच आहे कीं कुठंतरी जवळपास! तासाभरांत माझ्या एका नातलग मुलीचं ऑपरेशन आहे तिथं!… मला सांपडेना,… म्हणून विचारलं तुम्हांला."

त्याच्या त्या भांबावल्या उद्गारांनी, तो वृद्ध सस्मित चेहेऱ्यानं, चालतां चालतां थांबला; नी मग आपली प्रश्नार्थक दृष्टि त्याच्याकडे रोखून, त्यानें एकदम विचारलं--" तुम्ही कोण? त्या मिस् वेलिंगपैकीं, वाटतं?"

केवढ्यानं दचकला तो तरुण, होकारार्थी मान हलवतां हलवतां—

" अस्सं ऽ ?—मग असं करा—ती दिसते आहे ना त्रिकोणी बिल्डिंग समोर?—हं तीच …तिथं जा. खालच्या चौकांत कोपऱ्यांतच लिफ्ट लागेल, दुसऱ्या मजल्यावर थांबा; ..डाव्या बाजूची, ६ नंबरची खोली…"

' क्षणापूर्वी कांही माहीत नसलेला हा तऱ्हेवाईक प्राणी! आतां आपल्याला अगदीं सहा नंबराच्या खोलीपर्यंत नेऊन सोडतो, म्हणजे काय?' या विचारानें भांबवून, ती माहिती मिळाल्यावरही तो तरुण थांबला. नि घुटमळल्या आवाजांत म्हणाला—" मेनी थँक्स्… प –पण…आपण कोण?"

" मी? तें काय तुम्हाला करायचंय्?" काठी नीट धरून पुढें चालत तो वृद्ध म्हणाला; तो तरुणहि अजून तसाच कावराबावरा होऊन, त्याच्याबरोबर चालत होता.

तेवढ्यांत तो वृद्ध हांसला; नि त्याच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे वळून म्हणाला—" बरं बरं!. मी कोण तुम्हाला हवंय्, नाही का? मीच बरं तो… डॉ. सुधीर! काळजी नका करूं तुमच्या पेशंटबद्दलची; आतां ती जीवन-गंगें'त आहे! व्हा पुढं!…मी येतोंच आहे…"

४

डॉ. सुधीरांच्या त्या तसल्या पहिल्याच अनपेक्षित भेटीनं क्षणभर दचकून, पण त्यांच्या प्रेमळ कर्तव्यदक्षतेची अजाणतां जाणीव झाल्यामुळें



समाधानहि पावून, तो तरुण त्यांच्याकडे कृतज्ञतेनं वळून पहात पुढें झाला; तेव्हां डॉक्टरहि ' जीवनगंगे 'च्या आवाराजवळ पोहोंचले होते. क्षणभरच ते पुन्हा आपल्या मनांत डोकावले; नि सहास्य मुद्रेनें स्वतःशींच पुटपुटले—" हं… एकलंस?—सगळ्यांना माहीत असलेला, नांवाजलेला सर्जन, डॉ. सुधीर!…पण स्वतःच्या दुःखावर मात्र तुला कसली शस्त्रक्रिया करतां नाही आली जन्मांत!— किती विचित्र!!—"

रोज फिरून आल्यावर तिथें थबकून, त्या त्रिकोणी पांच मजली इमारतीकडे खालपासून वरपर्यंत अगदीं अभिमानानं पहात, ते;…वर मध्यभागीं, मोठ्या काळ्या शिळेवर, पोपटी रंगाचीं भलींमोठीं थरथरतीं नागमोडीं अक्षरं खोदलीं होतीं—" जीवन-गंगा "

आजहि तसंच पाहतां पाहतां एक मंद सुस्कारा टाकून, ते स्वतःशींच पुटपुटले—" वेडा! म्हणे– ' डॉ. सुधीर यांची जीवनगंगा!' अरे पोरा, पैशाशिवाय कशाला मूर्त स्वरूप येतं का? ही ' जीवनजी गंगाराम शेठ ट्रस्ट 'वर चाललेली ' जीवन-गंगा '! हं!"

पण पुन्हा स्वतःशींच हास्यमुख होऊन, त्यांच्या मनांत एक विचारमालिका आली–" कांहीं असलं तरी हे पैसेवाले बेटे इथून तिथून सारखेच;— बेटे! नुसते आत्मकेंद्रित!! त्यावेळीं शेटजींना नि आतां त्यांच्या वारसांनाही वाटत असेल,… ' आपल्या पैशाच्या देणगीनेंच ही जीवनगंगा चाललीय्! त्या देणगीसाठींच मी तें नांव दिलं!' कोठून कां होईना, चांगली गोष्ट प्रकट झाली म्हणजे झालं! पण ही ' जीवन-गंगा ' शेटजींची? हो, तिचं पात्र त्यांचं! …पण आंतलं जीवन? तो खळखळणारा जीवन-प्रवाह? ती जीवनगंगा? ती कोणाची, म्हणावं? …वर्षानुवर्षं, अहोरात्र धडपडणाऱ्या-डोळ्यांत तेल घालून दगदगीचं जीवन जगणाऱ्या…या आत्मविश्वासी डॉ. सुधीरलाच तें अधिक माहीत आहे. ' जीवन-गंगें 'त दिसणारी गुप्त जीवन-गंगा डॉ. सुधीरचीच.!!"

डॉ. सुधीरची गुप्त जीवन-गंगा! या आपल्या शेवटच्या विचारानें

मनांत उत्पन्न झालेला अभिमान, निमिषांत झरकन् ओसरून, डॉ. सुधीरांचं मन विषण्ण विचारांनी एकदम भरून आलं..." इतरांना पुण्याईचे, .. जीवनाचे थेंब मिळवून देणारी ही 'जीवन-गंगा' तुझी खरी!—पण तुझं स्वतःचं वैयक्तिक जीवन!—व्यक्तिगत अशी तुझी जीवन-गंगा?... ती एकदां आटली! पुन्हा पाझर फुटला नाही तिला!...एक प्रकारें....मरुभूमी! हो, मरुभूमीच ठरली ती!...."

पण लागलीच त्यांनी एक दीर्घ निश्वास टाकला!—कारण, असल्या साऱ्या खाजगी विचार-मालिकेला आपल्या डोक्यांत वावरूं द्यायला, डॉक्टर सुधीरांना त्या क्षणीं तरी, जरा देखील मोकळीक नव्हती. अगदीं पांच दहा मिनिटांतच, साडेअकरा बारापर्यंत अव्याहत चालूं रहाणारा, त्यांच्या आयुष्यांतील आणखी एका नव्या दिवसाचा, जबाबदार कार्यक्रम सुरुं व्हायचा होता. आपल्या आगमनाकडे, धडधडत्या छातीनें लागून राहिलेले अनेक निस्तेज रोगट डोळे, त्याक्षणीं, त्यांच्या दृष्टीसमोर असंख्य काजव्यांप्रमाणें मंद मंद चमकत असल्यासारखे त्यांना भासत होते!—

त्याच धसक्यानें ते आपल्या 'जीवन-गंगेत' शिरले; समोरच्या त्रिकोणी चौकाच्या कोपऱ्यांत लिफ्टचा बंद दरवाजा दिसत होता. डॉ. नी बटन दाबून लिफ्ट खालीं आणलं. दार उघडून, आंत उभं राहून, त्यांनी जाळी बंद केली; नि सहाव्या मजल्यावरील टेरेसकडे जाण्यासाठीं, त्यांनी सर्वांत वरची पांढरी कळ दाबली...

पेटीचा मंद स्वर चुकून दाबला गेल्याप्रमाणें आवाज सुरुं झाला; नि लिफ्ट वर वर जाऊं लागलं!, लिफ्ट थांबेपर्यंत, डॉ. चे मनोमय विचारहि थांबले नव्हते...

५

पहिल्या मजल्याच्या लिफ्टकडील भिंतीवर लिहिलं होतं—'**जनरल वॉर्ड**'; तिकडे त्यांना नंतर जायचं होतं.



दुसऱ्या मजल्याची भिंत लिफ्ट ओलांडूं लागलं; तिथं भिंतीवर अक्षरं होतीं—'**ऑपरेशन डिपार्टमेंट**'. तासाभराच्या आंतच, त्यांना तिथं आजची एकच एक मोठी जबाबदारीची शस्त्रक्रिया उरकायची होती.

त्यावरचा तिसरा मजला, डॉ. च्या राहाण्याच्या ऐसपैस जागेचा नि स्वतंत्र लॅबोरेटरीचा! आज त्यांना उशीर झाला होता. नाहींतर, नेहमीं फिरून परतल्यावर, ते थोडा वेळ आपल्या खोलींत विसावा घेत; एखादं वर्तमानपत्र चाळत; नि मगाच वरच्या मजल्यावर जात.

पुढला चौथा मजला—'**सूतिका-गृहा**'चा; डॉ. इथं क्वचित्‌च जात. अगदीं गुंतागुंतीची केस असली किंवा नाजुक ऑपरेशनचाच प्रश्न असला, तर तसल्या निकडीच्या वेळीं तेवढंच, तिथल्या लेडी डॉक्टर्स त्यांना बोलावीत. एरवी, स्त्रियांच्या रोगचिकित्सेंत, डॉक्टर स्वतः फारसं लक्ष घालीत नसत, कीं, उत्सुकहि नसत.

पांचवा मजला ओलांडून लिफ्ट जाऊं लागलं, कीं, भिंतीवर अक्षरं दिसत—'**हेल्थ ॲण्ड लाइफ**'; वास्तविक, हा क्षयरोग्यांचा वॉर्ड! तरी पण, त्या विभागाचा त्या नांवानेंच नेहमीं उल्लेख करण्यांत—तऱ्हेवाईक म्हणावा पाहिजे तर—पण डॉक्टरांचा स्वतंत्र कल्पकपणा होता. या बाबतींतलीं डॉक्टरांचीं मतं नि एकंदर धोरणं कित्येकांना विचित्र वाटत.

कारण, ते नेहमीं म्हणत—"क्षयरोग हा निम्याहून अधिक मानसिक रोग! जन्मतःच ज्यांना सामान्य आरोग्यहि नाहीं किंवा जे पुढें नाहक बेफिकिरीनें, अव्यवस्थितपणें, बेफाट जीवन जगत येतात, जे मनानेंही निर्जीव नि दुबळे असतात,... किंवा शेवटीं परिस्थितीनें तसे होतात...तेंच लोक आपल्या नांवाला अखेर ही टी. बी. डिग्री लावून घेऊन मरतात! नाहींतर, तसं म्हटलं तर, समाजांत वावरणाऱ्या शेंकडा साडेनव्याण्णव लोकांना हा क्षयरोग असतो. तेव्हां, कल्पनेनेंच जास्त दुबळ्या झालेल्या या लोकांना, त्यांच्याकडे असलेली ही 'हेल्थ ॲंड लाईफ'ची उणीव, आम्ही आमच्याकडे पुन्हा नव्यानें भरून देतों! ...त्यांचं मनच पुन्हा जिवंत करतों, म्हणा ना!"

तसं पाहिलं तर हे विचार शास्त्रीयदृष्ट्या आत्यंतिक नि पिसाट; पण त्या रोग्यांना, सुरवातीपासून शेवटपर्यंत, डॉक्टर मुख्यतः हेंच पटवून देत. त्यांच्या मनावर तेंच बिंबवीत.

प्रातःकाळीं, ते बहुतेक रोगी, आगाशीवर सूर्याचीं कोंवळी उन्हं नि मोकळी हवा खात बसलेले असायचे. कांहीं तेथीलच जवळच्या एका खोलींत ' अल्ट्राव्हॉयलेट बाथ ' घेत असायचे.

त्यांची तिथेंच विचारपूस करण्याची डॉ. ची नेहमींची पद्धत; तेव्हां लिफ्टनें टेरेसचा सहावा मजला गांठतांच, जाळीचा दरवाजा उघडून, डॉ. बाहेर आले.

६

टेरेसमध्यें आतां भरपूर ऊन पडलं होतं. समुद्राची मोकळी हवा भरभरत होती. नव्या दिवसांच्या उत्साहाचं नवं वारंच तिथं वहात होतं.

कांहीं रोगी आरामखुर्चीवर बसले होते. कांहीं येरझारा घालीत, या टोंकापासून त्या टोंकापर्यंत फिरत होते. कांहीं प्राणायामाचे आपल्याला झेंपतील इतके प्रयत्न करीत होते. कांहीं वर्तमानपत्र वाचीत होते. कांहीं हास्यविनोदानें आनंदी वातावरण निर्माण करीत, गप्पा मारीत होते.

डॉक्टरांची ती पहिल्यापासूनच त्या सर्वांना शिकवण! ते शरिराला औषधं देत, तशींच मनालाहि औषधं तयार ठेवीत. आणि दुसऱ्या प्रकारचीं हीं औषधं, रोग्यांनीं स्वतःच तयार करावींत, असं त्यांचं स्पष्ट सांगणं ! ' शरीराला विसरा; मग तत्काळ शरीर बरं होतं !' डॉक्टर म्हणत.

पांढरे झगे घातलेल्या तीनचार नर्स, त्या सर्वांना काय हवं नको तें पहात व त्यांच्याबरोबर मित्रांप्रमाणें गप्पागोष्टी करीत, तिथं फिरतांना दिसत होत्या. टेरेसमध्यें शिरतांना दाराशेजारच्याच कांचेच्या खोलींत, एकदोन नर्स ' व्हायलेट रेज बाथ ' घेणाऱ्या एका रोग्याची शुश्रुषा करीत होत्या.

तसल्या त्या सर्वसाधारण गंभीर पण आनंदी वातावरणांत, डॉक्टरांनीं



प्रवेश करतांच, एक सूक्ष्म गजबज झाली;... जणूं काय, ती सारी मंडळी त्यांच्या येण्याचीच केव्हांपासून चातकासारखी वाट पहात होती.

आंत शिरतांच, अगदीं गोड, स्नेहाळ दृष्टीनं त्यांनीं सर्वांकडे पाहिलं. क्षणभर चौफेर पहात मोकळं हास्य करून, ते सर्वांना उद्देशून मोठयानें म्हणाले, " हॅल्लो...हॅल्लो फ्रेंडस! ...गुड मॉर्निंग...गुड् डे ...ॲंड गुड लाइफ !...हेल्थ ॲन्ड लाइफ ! वॉन्टेड शॉर्प हेल्थ ॲन्ड लाइफ !—"

सगळे हंसले...आणि त्यांच्या शेवटच्या शद्बांचा सूक्ष्म प्रतिध्वनि झाला–

मग सगळ्यांजवळून फिरत फिरत, प्रत्येकाशीं हास्यमुखानें हस्तांदोलन करीत, डॉक्टरांनी, कोणाची नाडी...कोणाची छाती...कोणाच्या डोळ्याच्या पापण्या, असं तपासत एक फेरी केली. कित्येक आपल्या तक्रारी सांगत होते; सहानुभूतीनें त्या ऐकून, डॉक्टर त्यांना धीर देत पुढें होत होते.

पण बाहेर जाण्यापूर्वी, डॉक्टर पुन्हां साऱ्यांकडे हास्यमुद्रेनं वळले. त्या साऱ्यांच्या–आपल्या दर्शनानंच जणूं–खुललेल्या चेहऱ्यांकडे पहात, डॉक्टर अगदीं खेळकर शद्बांत पुन्हां मोठयानं म्हणाले– " माईंड यू फ्रेंडस !... यू मस्ट लिव्ह ! ...ऑल ऑफ यू !...एन्जॉय माय फ्रेन्डस् ! एन्जॉय... हेल्थ ॲन्ड लाइफ ! डे बाय डे इन एव्हरी वे...ऑल दीज जॉनी वॉकर्स आर गेटिंग स्ट्रॉंग, अलाइव्ह, ॲण्ड हेल्दी !...चिअर अप बक् अप् !"

एवढं बोलून डॉक्टर पुन्हां सौम्यपणें हंसले !—डॉक्टरांकडे पाहून सारे रोगीहि हास्यमुख झाले !—डॉक्टरांचं रोज सकाळचंच हें पालुपद ! —आणि त्यामुळेंच तिथल्या त्या साऱ्या रोगजर्जर शरिरांच्या, व्यथा भोगणाऱ्या रोगट प्राण्यांची वृत्ती खेळकर रहात होती ! —त्यांना दिवसेंदिवस मरण्यापेक्षां जगण्याची, रोगापेक्षां आरोग्याचीचं अधिक आशा नि खात्री वाटूं लागली होती !...

७

डॉक्टरांचं लिफ्ट पांचव्या मजल्यावर थांबलं. तिथं उभं राहून

डॉक्टरनीं विशेष चिंताजनक केसीसबद्दल विचारपूस केली. कांहीं औषधयोजना सुचविल्या; नि ते पुन्हां लिफ्टमध्यें शिरले.

त्यांना आज वेळ फार थोडा होता. कारण, त्यांनी घड्याळांत पाहिलं तों आतां आठ वाजून दहा मिनिटं झालीं होतीं. थोडा विसांवा घ्यावा म्हटलं, तरी आतां ऑपरेशन हॉलमध्यें तयार होऊन शिरायला जेमतेम अर्धा तास उरला होता.

जनरल वॉर्डमध्यें तर–विशेष केसबद्दल आगाऊ सूचना असल्याशिवाय–ऑपरेशनपूर्वी ते कधींच जात नसत. ऑपरेशनपूर्वी, कोणत्याहि लहान मोठ्या गोष्टींचा मनावर परिणाम होणं, सहसा उपयोगी नाहीं, यावर त्यांचा विशेष कटाक्ष असे.

तेव्हां डॉक्टरनीं थोडा विसांवा घ्यावा असा विचार केला; नि लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर येतांच तें थांबवलं.

८

आपल्या त्रिकोणी हॉलमध्यें शिरतांच, हातांतली काठी स्टँडजवळ ठेवून ते कोचावर जाऊन बसले. वाटोळ्या टेबलावर पडलेल्या ताज्या वर्तमानपत्रांतील एक उचलून हातांत धरीत, त्यांनी स्वयंपाकखोलीकडे पाहून हांक मारली—" गणोबाऽ! एऽ गणू..."

चहाचा ट्रे हातांत घेऊन, डॉक्टरांकडे हंसतमुखानें पाहात पाहात, स्वयंपाक खोलींतून एक म्हातारा बाहेर पडला. डॉक्टरांनीहि त्याच्याकडे उलट स्नेहानं पाहून स्मित केलं.

स्वच्छ तलम धोतराचा काचा, अंगांत सिल्कचा झिरझिरीत सदरा, त्यावर झळकणारीं सोन्याचीं बटनं; त्याच्या त्या टापटिपीच्या साऱ्या पोषाखाला त्याच्या घोसदार पांढऱ्या मिशा अधिकच भरदारपणा आणीत होत्या. डोक्याचे लांबसडक–किंचित पोमेड लावलेले–पांढरे केंस, त्यानें मागें चापूनचोपून वळवले होते. दोन भिवयांमध्यें तांबड्या गंधाची मध्यम मोठी टिकली



चकाकत होती. ओठ पानानें किंचित् रंगलेले होते. म्हातारे डोळे अजूनहि थोडे मिस्किल नि रंगेल दिसत होते.

ट्रे राउंड टेबलावर ठेवून, कपांत चहा तयार करून, त्यानें तो डॉक्टरांच्या हातीं दिला, नि हॅट स्टॅंडजवळ जाऊन तो आदबशीरपणें उभा राहिला.

चार पांच घोंट घेऊन वर्तमानपत्राकडे पाहात डॉ.नीं विचारलं—
"आणलीस रे?—"

"नाही! दुपारीं येईल...आतांच नकोय् ना आपल्याला?" पुढं येऊन कपांत आणखी थोडा चहा ओतीत गणू म्हणाला.

"हं हं...पुरे..." कप मागें ओढून तो तोंडाला लावीत, पुन्हां एक दोन घोट घेऊन, गणूकडे हसून पहात, डॉ. म्हणाले—"तसं नाही...फार बिघडली असली, तर बदलून नवीच घ्यायची होतीस, म्हटलं!—हजार दोन हजार इकडे तिकडे..."

"छे छे...कशाला?—जरा अॅक्सलरेटरची मिस्टेक होती!— नि वायरिंगहि बदलून घेतलं!..." गणू रिकामा कप हातांत घेऊन थबकत म्हणाला—"आतां आली, कीं वर्षभर अगदीं बिनबोभाट काम देईल ती, नाना!—"

"बरं...तुला पाहिजे तसं कर!—" डॉक्टरांनी पाईप शिलगावून वर्तमानपत्र पुढें धरलं—

गणोबा त्यांचा किती तरी वर्षांचा ड्रायव्हर; पण अगदीं घरांतल्या माणसासारखा!—जणूं प्रायव्हेट सेक्रेटरीच. इतर कोणांत मिसळणार नाहीत कधीं; पण गणूशीं ऐसपैस गप्पा मारायला डॉक्टरना कधींच कसला कमीपणा वाटत नसे.

९

**डायरेक्ट अॅक्शनची पहिली सलामी!**
**'पाकिस्तानची'ची बंगाली आवृत्ति!...भीषण, राक्षसी, क्रूर कत्तल!**
**...कलकत्त्याच्या रस्त्यांत पिसाट नरपशू मोकाट सुटले!**

...कलकत्त्याच्या कत्तलीची ती भयानक बातमी, डॉक्टर धडधडत्या छातीनं वाचत होते. त्यांचं मन त्या अमानुषतेबद्दलच्या भयंकर घृणेनं जसं भरून येत होतं, तसंच, वाचतां वाचतां, तें एका भीतीनं, हुरहुरीनं नि भयंकर अज्ञात आशंकेनं भरून येत होतं !

अशीं एकदोन पानं चाळून होत आहेत नाहींत, तोंच टेलिफोनचा लांब घंटानाद झाला.

लगबगीनें पुढं होऊन, गणूनें रिसीव्हर कानाला लावला नि डॉ. कडे वळून म्हटलं–" जनरल वॉर्डकडून..."

" हॅलो !" त्यानें पुढें केलेला फोन बसल्याबसल्याच कानाला लावून, डॉ. बोलूं लागले–" अंऽ ? हो हो ! सॉरी... थोडा उशीरच झाला बुवा आज !... नाव् आय अ‍ॅम् रेडि...अंऽ ? बिलकूल नाहीं ना झोंप ?...पण सलाइन् ट्यूब ? अंऽ ? होती ना रात्रभर ?... हं हं...समजलं...अस्सं ! पण त्याला काय करणार आपण ?... तुम्हीच पहा, डॉ.,... शेवटींच आलीय आपल्या ताब्यांत ! हो ना !... मीहि तेंच म्हणतोय... मग ? ...तेंच ना... प्रथमपासूनच निग्लेक्ट केलेली केस... नो नो !... हें पहा, डॉ. ! संध्याकाळपर्यंत मुळींच नाहीं थांबतां यायचं ! अं ऽ बट् एनी वे इट् इज़् अ रिस्क ! ऑपरेशनचंः आजचं डेंजर पत्करलं... हो, लागलीच न्या; हो हो, पण हें पहा !... जरा हलक्या हातानं... अंऽ? तेंच ना ? फारच वीक् झालीय ती ! हा निघालोंच !... अं ऽ हो हो ! "

डॉक्टरनीं रिसीव्हर खालीं ठेवला. ते पटकन् उठले; पण त्यांना कसली तरी एकदम अंठरण झाल्यासारखं होऊन, ते किंचित् चमकले. त्यांचा चेहरा भयंकर त्रस्त झालेला दिसत होता.

दारांतून बाहेर पडतां पडतां, डॉ. एकदां घुटमळले. दाराजवळच उभा असलेला गणू त्यांच्या हालचाली गपचूप पहात होता.

इतक्यांत, डॉ. च गणूकडे विषण्ण हंसून म्हणाले..." आज अठरा ऑगस्ट ना रे, गणू ?...त्या तुझ्या एक ऑगस्टलाहि सात वर्षें झालीं कीं, हां



हो म्हणतो !...कसा काळ निघून जातो बघ ! अशी एखाद्या वेळीं अति तीव्र जाणीव होते मला !—भयंकर उणीव भासते त्या गोष्टीची !...नि आत्तांच तुकतं पेपरांत वाचलं, तसल्या कलकत्त्याच्या भयंकर कत्तलीपेक्षांहि निष्ठूर, क्रूर,...कत्तल करावी लागते...मला,...माझ्या उसळणाऱ्या मनाची !!—"

त्यांच्या त्या शब्दांतील अभिप्राय, साराच अर्थ, गणू पूर्णपणें जाणत होता. त्या जाणीवेनंच, त्याचा क्षणापूर्वींचा उल्हसित चेहरा कांहीसा काळवंडला होता !–पण तरी प्रयासानें तो त्यावर कांही न बोलतांच गप्प राहिला.

डॉक्टरांनी त्याची ती चलबिचल ओळखली; त्यांनी आपल्याहि मनावर ताबा मिळवला; ते गणूकडे पाहून मंद हसले; पण अगदीं कडवट हसले.

मग गणूच्या खांद्याला त्यांनी जातां जातां स्नेहानें हळूच स्पर्श केला; पुढें कांही एक न बोलतां, ते दारांतून बाहेर पडले; नि गणूनें उघडून धरलेल्या लिफ्टच्या दारांतून आंत शिरले.

१०

'जीवन गंगे' च्या त्या त्रिकोणी इमारतीची:रचना मात्र मोठी कांटकसरीची आणि कल्पक होती. जीवनजी गंगाराम शेठनीं, ती इमारत बांधतांना, डॉक्टरांच्या संपूर्ण सल्ल्यानेंच तो प्लान करवून घेतला होता. त्यांच्या मालकीच्या त्रिकोणी प्लॉटचा, पुरेपूर कल्पक नि यशस्वी उपयोग केला गेला होता.

तीन्ही बाजूंनी मोकळी हवा मिळावी, म्हणून त्रिकोणाचा पाया होणारी बाजू, समुद्राकडे तोंड करून योजली होती. तिला जोडणाऱ्या त्रिकोणाच्या दोन्ही बाजू, खिडक्या खिडक्यांच्या खोल्यांमध्यें काटकसरीनें व सोयीवार विभागल्या होत्या. समुद्रापासून अगदीं पिछाडीला असलेलं, एरवीं फुकट जाणारं त्रिकोणाचं टोंक, वरपासून खालपर्यंत, त्रिकोणी लिफ्टनें व्यापलं होतं.

लिफ्टमधून कोणी बाहेर पडलं, कीं प्रथम त्याला आडवा व चिंचोळा पॅसेज लागे. त्या पॅसेजच्या दोन्ही टोकांना अंघोळीच्या खोल्या, नळ वगैरेंची मर्यादित जागेंत व्यवस्था; पॅसेजच्या मधल्या भागांत लिफ्टसमोरच एक दरवाजा; तो आंतल्या त्रिकोणी हॉलमध्यें उघडत असे.

हॉलच्या दारांतच एका स्टूलावर शिपाई बसलेला; दाराजवळ आंतल्या बाजूस एक छोटं टेबल; त्याजवळ पहाऱ्यावरची कोणी ना कोणी नर्स चोवीस तास बसलेली; तीन्ही बाजूच्या खोल्यांचे दरवाजे या हॉलमध्यें उघडत. त्यामुळें दाराशीं आंतल्याबाजूस बसणाऱ्या नर्सचं बसल्याबसल्या सगळीकडे लक्ष जाऊं शके.

दारांबाहेरल्या बाजूस, स्टूलावर बसलेल्या शिपायाच्या डोक्यावर असलेल्या काळ्या बोर्डावर, बोलावणाऱ्या रोग्यांच्या घंटेप्रमाणें, त्या त्या खोलीचा नंबर हाले; आणि त्याप्रमाणें त्यालाहि पटकन् विचारपूस करण्यासाठीं तिकडे धांवत जातां येई.

रोग्याच्या मामुली जरूरी असल्या, तर हॉलमध्यें शिरतांच उजव्या बाजूस असलेल्या चिंचोळ्या स्टोअर रूममधून, त्या तो पुरवीं; आणि खाद्यपेयांची जरुरी असली, तर त्या खोलीजवळच्याच दुसऱ्या निरुंद किचनरूम मधून, नर्सच्या हुकुमानुसार, त्या त्या गोष्टी तो रोग्यांना नेऊन देई.

या दोन चिंचोळ्या खोल्यांसमोरच्या बाजूस, तेवढ्याच लांबीरुंदींत एक मोठी खोली होती. ती 'नर्सरूम' म्हणून वापरली जाई.

उरलेल्या जागेचीहि मोठी व्यवस्थेशीर विभागणी केलेली होती. समुद्राला समांतर असलेल्या त्रिकोणाच्या मोठ्या बाजूस एकंदर पांच खोल्या; त्यापैकीं या व त्या अशा थेट दोन टोंकांकडील दोन खोल्या साहाजिकच मोठ्या; त्यामुळें त्यांना प्रशस्त स्पेशल खोल्यांचं स्वरूप आलं होतं. या खोल्यांना हॉलमधून स्वतंत्र चिंचोळे मार्ग होते. पण इतर तीन खोल्यांना मात्र हॉल-मधून दरवाजे होते. त्रिकोणाच्या दुसऱ्या दोन बाजूंपैकीं प्रत्येक बाजूस, सुरवातीस असलेली 'किचन-स्टोअर-रूम' किंवा 'नर्स-रूम' सोडून, आणखी तीन तीन खोल्यांची सोय होता.

अशाप्रकारें प्रत्येक मजल्यावर नऊ सामान्य व दोन स्पेशल खोल्या, मिळून एकंदर अकरा खोल्यांची व्यवस्था होती. प्रत्येक सामान्य खोलीला बाहेरच्या बाजूस एक एक बाल्कनी होती. त्रिकोणाच्या समुद्राकडील बाजूस



असलेल्या दोन्ही स्पेशल खोल्यांच्या बांध्याला मात्र दोन दोन बाल्कन्या आल्या होत्या.

प्रत्येक मजल्यावर जवळजवळ याच प्रकारची व्यवस्था होती; त्याला अपवाद म्हणजे ऑपरेशन डिपार्टमेंटचा दुसरा मजला व डॉक्टरांच्या राहण्याचा तिसरा मजला.

११

ऑपरेशन डिपार्टमेंट म्हणजे तर 'जीवनगंगे'चं भूषणच !

या मजल्यावरील मधला त्रिकोणी हॉल अगदींच लहान होता. कारण या मजल्यावर, त्रिकोणाची समुद्राकडील बाजू बऱ्याच मोठ्या चतुष्कोणी ऑपरेशन हॉलनें व्यापली होती. आणि त्यांतील तीनचतुर्थांश भाग ऑपरेशन थिएटरनें व्यापला होता. दोन बाजूंच्या उरलेल्या तुकड्यांत, 'केमिकल्स् रूम' व 'इन्स्ट्रुमेंट्स् रूम' अशा दोन छोट्या चिंचोळ्या खोल्यांचा समावेश होत असे. पण या खोल्यांत फक्त हॉलमधूनच प्रवेश होता.

ऑपरेशन हॉलचा एक दरवाजा मधल्या त्रिकोणी हॉलमध्यें उघडणारा होता. तो फक्त ऑपरेशन चालू असतानांच उघडा असे. ऑपरेशन हॉलला दुसरा एकच लहानसा दरवाजा होता. पण तो फक्त डॉक्टरांच्या ऑफिस-रूममध्येंच उघडत असे. डॉक्टरांची ही खोली प्रशस्त होती. तिला मधल्या त्रिकोणी छोट्या हॉलमध्यें उघडणारा फक्त एकच दरवाजा होता.

डॉक्टरांची ती प्रशस्त हॉलवजा खोली असलेली त्रिकोणाची ही बाजू लिफ्टमधून आंत शिरतांच उजव्या हातास लागे. तिचा सुरवातीचा उरलेला भाग 'व्हिजिटर्स रूम'नें व्यापला होता. लिफ्टजवळच्या पॅसेजची इतर मजल्याप्रमाणेंच व्यवस्था होती. पण त्रिकोणाच्या दुसऱ्या म्हणजे डाव्या बाजूस ज्या दोन खोल्या होत्या, त्यांतील सुरवातीची 'नर्स कॉमन रूम' व त्यापुढील डॉक्टरांची ऑफिस रुमसमोरील खोली 'असिस्टंट डॉक्टर्स रुम' या स्वरूपानें वापरली जाई.

आंत शिरतांच लागणाऱ्या मधल्या छोट्या त्रिकोणी हॉलमध्यें सर्व दरवाजे उघडत व तिथें एक शिपाई नेहमीं बसलेला असे. या सर्व व्यवस्थेमुळें येणाऱ्या माणसांचा कधींच गोंधळ होत नसे, कीं कोणालाहि एकदम ऑपरेशन हॉल किंवा डॉक्टर यांच्याकडे पोहोंचतां येत नसे.

ऑपरेशनरूमच्या उजव्या बाजूची डॉक्टरांची खाजगी खोली, ठाकठीक फर्निचरनें सुशोभित होती. मध्यें त्यांची बसायची फिरती खुर्ची; उजव्या भिंतींतल्या कांचेरी कपाटांत शास्त्रीय पुस्तकांची लायब्ररी; डाव्या बाजूच्या भिंतींत जीवनजी गंगाराम शेठचं ओव्हल तैलचित्र; नि फिरत्या खुर्चीमागील भिंतींत एक छोटंसं विजेरी घड्याळ; तिच्यासमोरच ऑपरेशन हॉलकडे जाणारा छोटा दरवाजा. त्या दाराजवळच एक मोठं चकचकीत पांढरं वॉशबेसिन ..

१२

डॉ. लगबगीनें त्या खोलींतच शिरले;... आपल्या त्याक्षणींच्या चमत्कारिक मनःस्थितींतच, त्यांनीं एकदम शेठजींच्या ओव्हल तैलचित्राचं छोटं भिंतींतलं चोरकपाट उघडलं; कसल्या आशेनें नव्हे,.. केवळ स्मृति म्हणून ! .. आंत एक रिकामी चपटी बाटली, नि उंच बैठकीचा उपडा ग्लास होता. निमिषार्धांत विविध संमिश्र भाव त्यांच्या सस्मित खिन्न चेहऱ्यावर तरळून गेले, नि त्यांनीं ते कपाट पुन्हा बंद केलं.

तोंच, समोरच्या हॉलकडल्या दारांत उभे असलेल्या, असि. डॉ. सारंगचे शद्ब त्यांच्या कानावर एडले—" एव्हरी थिंग रेडी, डॉक्टर ! "

चमकून तिकडे वळत,. डॉ. सुधीर बळेंच हसून म्हणाले, " ओऽह्... अन्ड् आय् ॲम् रेडि टू—"

ते हॉलच्या दाराशीं आले; तिथल्या हिरव्या कांचेच्या तांब्यांतून ते प्यालाभर पाणी प्याले; नि ते आतां ऑपरेशन थिएटरकडे वळणार, तोंच, सकाळीं रस्त्यांत भेटलेला तो तरुण, पुढल्या त्रिकोणी हॉलमध्यें घुटमळत उभा



असलेला त्यांना दिसला. सकाळचं सर्व एकदम आठवून, त्यांनी त्याला सहानुभूतीनें म्हटलं—" बसा कीं, ..त्या रुममधें,...कोचावर !—"

" फारसं सीरिअस नाहीं ना, डॉक्टर ?" तो पुढें होऊन, अगदीं पडलेल्या चेहऱ्यानें, पण वरवर हास्य आणण्याचा प्रयत्न करीत म्हणाला.

" छे छे...सीरिअस हो कसलं ? पांच मिनिटांत उरकतों बघा सारं !—" डॉ. वत्सल आवाजांत, पण नाटकी बेफिकिरीनें म्हणाले—" तुम्ही इकडे थांबूं नका मात्र, बरं का ?—आपल्या माणसाचं रक्त बाहेर सांडताना पाहूं नये,—माणसानं !...अंऽ ?...जा, चला !"

पण तेवढ्यांत त्यांचं कुतूहल जागृत होऊन, त्यांनीं मागें वळून त्याला विचारलं—" बाय् द् वे, तुम्ही कोण पेशंटचे ?"

तो तरुण त्या त्यांच्या अनपेक्षीत प्रश्नानें एकदम लाजला, घुटमळला; त्याचा चेहरा आरक्त झाला; पण शेवटीं, अडखळत्या स्वरांत तो त्यांना म्हणाला—" अंऽ ?...माझंऽलग्न व्हायचंय् तिच्याशीं—लौकरच !—"

" ओ...आय् सी ! कॉंग्रॅट्स् —हार्टी कॉंग्रॅट्स !..." डॉ. हॉलकडे वळत सहानुभूतीच्या स्वरांत म्हणाले—" बरं जा आतां... काळजी नको !..."

१३

आणि त्याचवेळीं उकळत्या पाण्यांतून शस्त्रं बाहेर काढल्याचा आवाज झाला, म्हणून डॉक्टरनी पाहिलं, तों पेशंट आधींच टेबलावर ठेवलेली होती. वॉशबेसीनजवळ त्यांचे साबणानें हात धुवून होतांच, जवळच्या एका नर्सनें त्यांना रबरी हातमोजे चढवले. दुसरीनें त्यांना झगा चढवून, त्याचे बंद पाठीमागें बांधले.

डॉक्टर शरिरानें टेबलापाशीं गेले; पण त्यांचं मन, त्या क्षणीं, किंचित् विचलित झालं होतं. क्षणापूर्वींच, लाजत लाजत आपलं गुह्य मोठ्या विश्वासानें सांगणाऱ्या त्या तरुणाचा चेहरा त्यांच्या समोरून चमकून गेला; नि त्यांना शहारल्यासारखं झालं...

आणि त्याच चमत्कारिक मनःस्थितींत, त्यांनी आपल्यासमोर निश्चल-निचेष्ट पडलेल्या पेशंटकडे टक लावून दृष्टि लावली...

ती एक वीसएक वर्षांची मुलगी होती. तिचं शरीर व चेहेरा निस्तेज झाला होता. केसांच्या दोन वेण्या करून, दोन्ही खांद्यांच्या बाजूनें बिछान्यावर लोळत पडल्या होत्या. पोटांतील वेदनांमुळें, तिचा चेहेरा मधून मधून आवेगानें आंत ओढला जात होता. तिच्या भिंवया उडत होत्या. तिच्या कपाळावर आंठ्या पडत होत्या. डोळ्यांत असह्य दुःखाच्या व त्या क्षणींच्या दीन परिस्थितीच्या छटा प्रतिबिंबित होऊन जात होत्या. तोंडांतून मधून मधून अस्पष्ट व अगतिक विव्हळण्याचे स्वर बाहेर पडत होते.

पहातां पहातां डॉक्टरांची दृष्टी तिच्या दीन मुद्रेवर खिळली; आणि तिच्याजवळ जाऊन, ते अगदीं कुजबुजत्या आवाजांत म्हणाले, "अंहं ऽ, घाबरूं नको हं ! —तुला पत्ताहि लागणार नाहीं कशाचा !"

विनवणीच्या व आशा भरलेल्या नजरेनें डॉक्टरांकडे पहात, ती अगदीं निर्जीव स्मित करून गप्प पडून राहिली; आणि मग तिनें आपली मान दुसऱ्या बाजूस वळविली. तिच्या डोळ्यांत नकळत अश्रु सांचले; ते डॉक्टरांनी पाहिले.

हात फिरवतां फिरवतां, डॉ. नीं तिचं पोट हळूच औषधानं बधिर केलं; तिला कांहीं दिसूं नये म्हणून मध्यें फ्रेमवरचा कापडी पडदा ठेवला; रिफ्लेक्टर त्यांना पाहिजे तसा लावून घेतला व क्लोरोफॉर्मची नळी घेतलेल्या सिस्टरला, पेशंटच्या तोंडाजवळ उभें राहण्याची खूण केली.

हॉलमध्यें इतकीं माणसं वावरत असूनहि अगदीं शांतता होती. डॉ.-नीं आपली मान खालीं वांकवली; पेशंटच्या कानाजवळ आपलं तोंड आणलं; आणि ते तिच्या कानांत पुटपुटले, "हं मोज पाहूं...एक...दोन...तीन..."

ती मुलगी डॉक्टरांबरोबरच आंकडे मोजत होती. प्रत्येक आंकड्याला तिचा आवाज आंत ओढला जात होता. शेवटीं, ती मोजायचं थांबली; तेव्हां डॉ. नीं लागलींच शस्त्रं हातांत घेतलीं, आणि पोटाच्या उजव्या बाजूला आपल्या हातांतील 'स्कालपेल' त्यांनीं सफाईदारपणें चालूं केलं.



१४

पण डॉ. च्या मनांत मात्र, त्याचवेळीं एक चमत्कारीक विचारमालिका सुरू झाली होती. जखम उघडी करून, तिला चाप बसवतां बसवतां, डॉ. नीं आपली दृष्टी मधल्या छोट्या पडद्यावरून त्या निद्रित मुलीच्या स्वस्थ निर्विकार चेहेऱ्यावर किंचित्काळ लावली. आणि त्यांच्या डोक्यांतील चलबिचल त्यामुळें तर अधिकच वाढली.

अगदीं पहातां पहातां, डॉ. चा चेहेरा गोरामोरा झाला; कपाळ आणि मान घामानें डबडबली;...त्यांचे हात थरथर कापूं लागले; डॉ. च्या डोळ्यांत पाणीही सांचलं...

असि. डॉ. सारंग जवळच उभे होते. डॉ. सुधीरांच्या त्या साऱ्या हालचाली त्यांना अगदीं चमत्कारीकच वाटत होत्या.

डॉ. नीं शेवटीं हतांतलीं शस्त्रं तशींच बाजूस धरून मान वळवली; तेव्हां, त्या साऱ्या प्रकारानें विस्मित झालेले त्यांचे दोघेही असिस्टंट, हलक्या आवाजांत त्यांना एकदम म्हणाले, "एनिथिंग रॉंग, डॉक्टर ?"

डॉ. नीं भानावर येण्याचा अटोकाट प्रयत्न केला. कांहीं वेळ ते बोललेच नाहींत. "नाहीं ऽ" असं म्हणण्यासाठीं व भानावर येण्यासाठीं, त्यांनीं आपली मान जोरानें धक्का देऊन हलविली; पण तरीही, आपल्या डोळ्यांपुढें सारा काळोख पसरल्यासारखंच त्यांना वाटलं;...अगदीं झोंकच जाईल असं वाटल्यावर मात्र, डॉ. नीं शेवटीं स्कालपेल खालीं ठेवलं; नि एक दीर्घ निश्वास टाकला. त्यांची नेहमींची बेडर छाती, त्याक्षणीं वर खालीं होत होती..

—आज कित्येक वर्षांनी डॉ. माणूस झाले होते !—

पटकन् बाजूला होऊन, कांपऱ्या आवाजांत ते म्हणाले, "सॉरी ब्रदर्स—मला उभंही राहवत नाहीं !...यू हॅव टु प्रोसीड अलोन !—"

डॉ. बाजूला होतांना पाहून, शेजारच्या दोन्ही नर्स लगबगीनें पुढें झाल्या; आणि डॉ. नां जवळच्या आरामखुर्चीवर ऐसपैस बसवून, त्या त्यांचं कपाळ भरभर चोळूं लागल्या.

टेबलाजवळचे दोघे डॉक्टर अगदीं गोंधळले होते. त्यांना तो सारा प्रकार अगदीं अनपेक्षित होता. त्यांचं मन द्विधा होत होतं.

पण पेशंटची जखम तर उघडी केलेली! त्यांनीं एकमेकांकडे एकदां मुकाट्यानंच प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं; व मग धडधडत्या अंतःकरणानें अचानक अंगावर पडलेलं तें ऑपरेशन त्यांनी पुढें चालू केलं.

१५

चार पांच मिनिटं, डॉ. आरामखुर्चीवर विसांवा घेत पडले होते.

नर्सनें आणून दिलेला ब्रँडीचा डोस, कांहीं न बोलतांच, केवळ नाइलाज म्हणून त्यांनीं पोटांत घातल्यावर, ते थोडे भानावर आले!

तेवढ्यांतच, दुसऱ्या नर्सनें लगबगीनें अर्धा कप कॉफी आणून दिली; तिचे एकदोन घोट घेतां घेतां, ते बरेंच सावधहि झाले!—

पण डॉ. सुधीरांच्या मनांत विचारांवरून विचार तरंगत होते! आज हें असं का होत आहे, हें त्यांचं त्यांनाच स्पष्ट होत नव्हतं!—

तेवढ्यांतच, त्यांना असह्य दुःख देणारी एक भयंकर विचारसरणी, त्यांच्या मनांत विजेसारखी चमकून गेली...“आपल्या धंद्याला व अब्रूला जरा देखील शोभणार नाहीं, असल्या प्रकारचा दुबळेपणा याक्षणीं आपल्या मनांत ठाण देऊन बसला आहे!....तो आपल्यावर विक्रम गाजवीत आहे!.... आणि आपण....!”

डॉ. चं मानी मन, या विचारमालिकेमुळें मात्र, त्यांना स्वस्थ बसू देईना!...हातांतील कॉफीचा अर्धा भरलेला कप तसाच पटकन् खालीं ठेऊन, ते जागचे उठले; जवळच्या, नर्सच्या हातांत दिसणारी स्मेलिंग सॉल्टची बाटली, त्यांनीं तिच्या हतांतून जवळ जवळ हिसकावूनच घेतली; ती संबंध उघडून पटकन् एकदां जोरानें हुंगली; डोक्यांत भरलेल्या उग्र दर्पानें शहारल्यासारखं केलं;... आणि धांवतच ते वॉशबेसिनजवळ गेले.

टेबलाकडे पहात लगबगीनें हात धुवून, त्यांनीं पुन्हां नर्सच्या साहाय्यानें



रबरी हातमोजे चढविले; नि त्यांच्या तोंडाला ती पांढरा रुमाल बांधते न बांधते, तवर ते ऑपरेशन टेबलाजवळ धांवत जाऊन उभेहि राहिले!—

तोंपर्यंत, असि. डॉक्टरांनीं पोटाचे सर्व पडदे उघडून ठिकठिकाणीं चाप लावून ठेवले होते.

डॉ. सुधीरांच्या मनांतील सारा आत्मविश्वास, धीर, अनुभव,...त्यावेळीं जागा होऊन, जणू वर उसळी मारत होता;...ते झटकन् पुढें झाले; त्यांनीं हातांत शस्त्र घेतलीं; आणि मग सौम्य हंसत, आपल्या असि. डॉ. ना ते म्हणाले—“हिअर वुई बिगिन् अगेन, ...ब्रदर्स!”

त्यावेळीं, डॉ. चे मोठे डोळे आत्मविश्वासाच्या चकाकीनें चमकत होते. त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचं नवं तेज पसरलं होतं.

१६

पुढला अर्धा तास, डॉ. अतिशय तत्परतेनें आपला कुशल हलका हात वापरीत होते; शस्त्रकला व शास्त्रीय ज्ञान यांच्या सूक्ष्म धाग्यांनीं टाके मारून, त्या तरुण मुलीचा पुनर्जन्म घडवून आणण्याची शिकस्त करीत होते ते!—

—अपेंडिक्स सारखा रोग!...पण ती केस जरा चमत्कारिकच होती. डॉक्टरी भाषेंतील ती नेहमींची मामुली शस्त्रक्रिया नव्हती. महिन्यापूर्वीच, त्या रोगाच्या जबरदस्त हल्ल्यांतून, ती मृत्यूशीं टक्कर देऊन बाहेर पडली होती. वेळींच साहाय्य न मिळाल्यामुळें, डॉ. नीं शेवटीं निसर्गावर सारा भरिभार टाकला होता. आणि ऑपरेशनशिवाय इतर उपाय उपयोजूनच, त्यावेळीं तिला डॉ. नीं जिवदान दिलं होतं.

पण मनुष्य मृत्यूच्या दाढेंतून सुटला, कीं तो व त्याचे नातलग, हां हां म्हणतां बेफिकीर होतात; डॉक्टर या प्राण्याला विसरतात; त्यानें कळकळीनें सांगितलेल्या संरक्षणाच्या साऱ्या सूचना अगदीं खुंटीलाच टांगून ठेवतात.

तसंच हिचं झालं होतं. ‘ती बरी असली, तरी वीसपंचवीस दिवसांत ऑपरेशन केलंच पाहिजे!’ ही डॉ. ची सूचना, घरीं गेल्यावर त्यांना जणू

काय हास्यास्पद वाटली. डॉ. नी गंभीर मुद्रेनें जातानांच भीति दर्शविली होती; तरी रोगाच्या प्रतिहल्ला तिजवर दुप्पट जोरानें होईपर्यंत, त्या मंडळींनीं चालढकल केली होती. आणि मग तिला भीतिप्रद स्थितीनें पुन्हां पछाडल्यावर, तिला घेऊन डॉ. कडे ते लोक काल धांवले होते !

मागल्यावेळीं ती डॉ. च्या हातून ऑपरेशनशिवाय जगली होती. पण या वेळीं, ऑपरेशन म्हणजे तर तिचा साक्षात् मृत्यूच होता!... तरी डॉक्टरनीं ती केस हातांत घेतली होती. त्यांत पुन्हां, अगदीं आयत्या वेळीं, डॉ. च्या मनाचा झालेला तो आजचा विलक्षण गोंधळ !...

पण आतां नव्या धीरानें आणि शक्य तितक्या शांत, थंड वृत्तीनें, डॉ. आपलं काम चालवीत होते.

विवक्षित असा कोणताही एक भाग कापावयाचा नव्हता; अपेंडिक्स फुटून त्याचे अगदीं लहानलहान तुकडे झाले होते. आणि डॉ. आपली छोटी कातर तरीही मोठ्या सफाईनें तिच्या पोटांतून चालवीत होते !

मधूनच ते सूक्ष्म स्मित चेहऱ्यावर आणीत; मधूनच ते गंभीर होत; मधूनच पेशंटचा निद्रित फिका चेहेरा पहात, व क्वचित् एकादं वाक्य हळूच पुटपुटत; आपल्या हाताखालच्या डॉ. नां समोरील विशिष्ट शरीररचनेची अगर त्या शस्त्रक्रीयेंतील गुंतागुंतीची कल्पना आणून देत !—

लहान लहान गांठी मारीत, अतिशय काळजीपूर्वक रितीनें, तो रोगट भाग ते कापून टाकीत होते. आणि डॉ. चं कौशल्य पाहून व तसल्या गोंधळलेल्या मनःस्थितींतहि, त्यांच्या अंगीं दिसणाऱ्या त्या विलक्षण प्रसंगावधानाची जाणीव होऊन, मदत करतां करतां, त्यांचे हाताखालचे डॉ. तर आश्चर्यानें थक्क झाले होते !—

## १७

शेवटीं, तें ऑपरेशन संपलं. एकेका थराला टांके मारीत, ते अगदीं वरच्या कातडीपर्यंत आले. तिथें टांके मारून व पट्टा बांधून त्यांनीं आत्मविश्वासाचा व सुटकेचा एक दीर्घ सुस्कारा टाकला. सौम्यपणें हंसत डॉक्टर बाजूला झाले.



इतका वेळ त्यांच्या मनावर एक मोठाच मोठा ताण पडला होता; त्यामुळें आलेली थोडीशी गात्रशिथिलता दूर करण्यासाठीं ते जवळच्या आरामखुर्चीवर जाऊन ऐसपैस बसले.

पडल्या पडल्या त्यांनीं आपल्या उजव्या हातांतल्या कांचेच्या ट्यूबकडे पाहिलं. तींत त्यांनीं नुकत्याच कापून काढलेल्या रोगी भागाचे तुकडे तरंगत होते. तिकडे पहात एक सुस्कारा टाकून, ती ट्यूब त्यांनी नर्सच्या हातीं दिली: आणि त्यांनीं टेबलाकडे पाहिलं. पेशंटला हॉस्पिटलचे शिपाई उचलून घेऊन जात होते. आणि हाताखालचे डॉ. सारंग त्यांच्या समोर उभे होते.

ओझरतं हास्य चेहऱ्यावर आणून, तेवढ्यांतच डॉ. त्यांना म्हणाले, "मनुष्याला लाखों रोग असतील ! पण हा रोग, डॉक्टर, भयंकरच ! नाहीं ? किती नकली रूपं घेऊन येईल, सांगतां येणार नाहीं. कोंवळ्या पोरांपोरींपासून तों जख्खड म्हाताऱ्यांपर्यंत साऱ्यांच्या वाटेला जाईल ! साधासुधा वाटेल; पण तडकाफडकीं जीवही घेईल—"

कां कोण जाणें, तसं बोलतां बोलतां, डॉ. सुधीरांचा चेहेरा पुन्हा घामानें डबडबून आला; ऑपरेशन पुरं करण्यासाठीं मध्यंतरीं त्यांनी आणलेलं अवसान त्यांना पुन्हा सोडून जाऊं लागलं.

सारंगांनी भरून दिलेल्या ग्लासांतील पाणी ते घटघटां प्याले. मग त्यांनीं दिलेल्या पेगचा त्यांनी आढेवेढे न घेतां स्वीकार केला. तो एका घोटांत पिऊन टाकून, ते त्या रिकाम्या ग्लासाकडे क्षणभर पाहात राहिले.

हजारों विचार त्यांच्या मनांत थैमान घालीत होते. पण ते सारंगांसारख्या बरोबरीच्या डॉक्टरच्या लक्ष्यांत येऊं नयेत म्हणून पुन्हां डॉ. सुधीर म्हणाले—"कधीं कधीं नशेची चटक अशी उसळी मारते!— पाहिलंत ! सात वर्षं मन मारतोंय्—पण स्वतःला जिकतां येत नाही !— दोनतीन पेग, इतक्या वर्षांनी औषध म्हणून कां होईना, पोटांत गेले; म्हणून कुठं आतां पुन्हां ताळ्यावर आलों !"

खरं म्हणजे डॉक्टरांची ती लंगड्या सबबीची लपवाछपवी होती.

आपल्या मनांतील त्याक्षणीचं खरं काहूर सारंगांना कळूं नये, हीच त्यांची इच्छा होती. जणूं डॉ. सुधीरांना वाटत होतं—" आपल्या मनांतले वणवे आपल्या आपणच विझवण्याचं धैर्य माणसाला हवं ! आपल्या दुखाःची वाच्यता करुन दुसऱ्याला कां दुःखी करायचं ?– पुन्हां कुणी सांगावं, इतरांच्या सहानुभूतीच्या जलवृष्टीनें, तो वणवा कदाचित जास्तच भडकणार नाहीं कशावरुन ?"

आणि म्हणूनच, डॉ. सुधीर, सारंगांना आपल्याजवळ अजूनहि उभं पाहून, त्यांची हेतुपुरस्सर दिशाभूल करण्यासाठीं पुढें म्हणाले—" असं असतं पाहिलंत व्यसनाचं ! वाईटच एकूण !! —फायद्यापेक्षां तोटेच अधीक !— व्यसनामुळें माणसं स्वतः मृत्यू कवटाळतात; म्हणून त्यावर सामाजीक उपाय करायचे; पण आजचं माझंच पहाना !– एका व्यसनी माणसाच्या अनिवार पिपासेनें, दुसऱ्याच एका निष्पाप जीवाला मृत्यूचं दार सताड उघडं दिसण्याची पाळी आली होती ! माझ्या ' जीवनगंगे 'त, मी हजारों लोकांच्या शरिरांच्या नाजूक अंगांगांतून, त्यांना तारण्यासाठीं माझी शस्त्रं खेळवलीं लीलेनें ! —पण आज मात्र माझ्या दडपलेल्या व्यसनाच्या बेफाट उसळीमुळें खूनच होणार होता माझ्या हातून !—त्या कोंवळ्या गोड पोरीच्या पोटांत, शस्त्रक्रियेच्या मिषानें सुरी खुपसली गेली असती माझ्याकडून !! जगाला समजलं नसतं, तरी क्षणभर डॉ. सुधीर मेला होता !! त्याच्याऐवजी व्यसनीं, दारूडया माणूस,.. रस्त्या-रस्त्यांतून सुरे बाजी करीत फिरणारा खुनी गुन्हेगार माणूस,.. डॉ. सुधीरच्या पोषाखांत तिथं आज मोकाट सुटला होता—"

पण क्षणभरानें डॉक्टर भानावर आले; तेव्हां त्यांना सारंग अजूनहि जवळच उभे असलेले दिसले; म्हणूनच त्यांनीं त्यांना जणूं समजावण्याच्या हेतूनेंच तुटकपणें म्हटलं— " ऑल् द सेम, डॉक्टर सारंग..., थँक यू फॉर द हेल्प अँड सिंपथी ! ...जा तुमच्या कामाला...बरं वाटतंय आतां मला—"

१८

सारंग गेल्यावर, डॉ. सुधीर हॉलच्या बाजूनं बाहेर पडले. त्यांनीं संथ



गांभीर्याचं नाटक करण्याचा प्रयत्न चालवला होता. पण त्यांच्या चेहऱ्यावर शून्यता नि हास्य यांचीं मिश्र अभ्रं आलीं होतीं !—

ऑपरेशन पेशंटची नित्य प्रथेप्रमाणें विचारपूस करून जावं, म्हणून लिफ्टनें ते जनरल वॉर्डजवळ येऊन पोहोंचतात, तों दाराशींच एक नर्स तार घेऊन उभी!...त्यांना पहातांच ती आदबीनें पुढें होऊन म्हणाली— " तार आहे, डॉक्टर..."

आपल्याच मनांत चूर असलेल्या सुधीरांचं लक्षच नव्हतं तिकडं; ती त्याच्या मागोमाग चालत पुन्हां हळूच म्हणाली —" बाहेरगांवच्या कोणातरी पेशंटची तार आहे, मला वाटतं ! काय करायचं तिचं, डॉ ?"

सुधीर दचकून भानावर आले; नि विसंगतपणें म्हणाले—" अंऽ ?— —कोणाचं काय करायचं म्हणतां ?...हं...अं ऽ ? अस्सं ! काय म्हणालांत ? पेशंटची तार ? ...बस्स...कांहींएक सांगूं नका ! मी कांहीं एकटाच नाहीं आहे डॉक्टर जगामध्यें ! त्यांना काय तार पाठवायला...अंऽ? एकाच वेळीं अलम दुनियेंतल्या साऱ्यांना वांचवणं मला कांहीं शक्य नाहीं ! हें पहा...मीहि एक हाडमांसाचा माणूस आहे ! — मी कांहीं लोखंडी यंत्र नव्हे !— नुकत्याच मृत्यूच्या दाढेंतून सोडवलेल्या त्या मुलीचं आयुष्य तर मला आधीं बळकट केलं पाहिजे? केवळ संस्थानिकांच्या पडशाखोकल्यासाठीं पैशाच्या खुराकावर, मला लांबलांब धांवून जातां येणार नाहीं, म्हणावं..."

दिवसांतून पांचपंधरा तारा येणाऱ्या डॉक्टरांच्या तोंडीं शोभण्यासारखेच ते शब्द होते. आणि त्यांतून आज तर ते अगदीं त्रस्त मनानें वागत होते. पण ती नर्स मात्र बिचारी, त्या भडिमारानें भांबावून गेली होती.

डॉ. च्याहि तें लागलींच लक्षांत आलं आपण उगीचच जरा अधिक कठोरपणानें त्या नर्सबरोबर बोललों, याची त्यांना पटकन् जाणीव झाली. आणि म्हणूनच, झालं तें सारं सांवरून घेण्यासाठीं, डॉक्टर म्हणाले, " हें पहा, एखाद्या मोठ्या महत्वाच्या ऑपरेशननंतर मी दुसऱ्या कसल्याच केसचा विचार करीत नाहीं. हें ठाऊक आहे ना तुम्हाला ?— तेव्हां, आज संध्याकाळपर्यंत मी

अगदीं दुसऱ्या कशांत मन घालायला तयार नाहीं ! समजलं ? सारंगनां दाखवा ती तार, नि त्यांचं काम संपल्यावर, त्यांना सारी व्यवस्था करायला सांगा तिची ! खाजगी असली, तर गणोबाकडे देऊन ठेवा,... म्हणावं. मला कांहींच सांगायची गरज नाहीं ! अंऽऽ ?... जा ... ”

१९

समुद्राकडील खोल्यांपैकीं कोंपऱ्याच्या स्पेशल खोलींत डॉ. शिरले. तव्हां त्यांच्या डोळ्यांत, नुकत्याच ऑपरेशनच्या गंडांतरांतून सुटलेल्या पेशंटच्या प्रकृतीबद्दल वाटत असलेलं कुतूहल तरंगत होतं.

आंत सर्व बाजूंनीं खिडक्यांना हिरवे पडदे लावले होते. त्यामुळेंच हिरवट अर्धप्रकाशित झालेल्या त्या खोलींत, लांकडाच्या ठोकळ्यांनीं पाया-जवळचे दोन खूर वर केलेल्या लोखंडी कॉटवर, मधांची ती पेशंट मुलगी शांतपणें पडली होती. तिच्याजवळ तिचे इतर नातलग उभे होते. सकाळीं डॉक्टरांन भेटलेला तो उमदा तरुण, अगदीं त्रस्त चेहेरा करून, विचलित अंतःकरणानें येरझारा घालीत होता.

सर्वांकडे किंचित् हंसत मुखानें पहात, डॉ. पुढें झाले व मच्छरदाणी वर करून ते प्रेमळ दृष्टीनें खालीं पेशंटजवळ वांकले.

तिचा चेहरा सुकलेला दिसत होता. केंसं थोडे विसकटून कपाळावर आले होते. दोन वेण्या आतांही दोन्ही खांद्यावरून पांढऱ्या स्वच्छ चादरीवर पसरल्या होत्या.

डॉ. सारंग व एकदोन नर्स जवळच उभ्या होत्या. त्यांच्याकडे पहात व पेशंटच्या अजूनही झांपडणाऱ्या मिचमिच्या डोळ्यांकडे पहात, डॉ. सस्मित चेहऱ्यानें म्हणाले, “ आली ना शुद्धीवर ? फार नव्हता कांहीं क्लोरोफॉर्म दिलेला;...मॉर्फिया इंजेक्शनवरच भागवलं होतं बरंचसं....

आणि मग, तिच्या नाकाला ओझरता स्पर्श करून डॉ. प्रेमानें म्हणाले— “ जागी झलीस कां बाळ ? ”

तिनें आपल्या जड पापण्या हळूंच उघडल्या; एकदां सभोंवार झांपड-



ल्या दृष्टीनं पाहिलं; आणि मग डॉक्टरांकडे पहात, तिनें अगदीं मंद स्मित केलं. त्या तिच्या हास्यांत क्षीणता होती. जीवनमृत्यूचा तो झगडाच होता.

पण तरी ती दैववान् मुलगी, डॉ. सुधीरांच्या ‘ जीवनगंगेंत ’ नवजीवन मिळवीत पडली होती !—

तेवढ्यांतच, तिच्या पोटांतील जखमेंतून तीव्र कळा आल्या; आणि तिनें आपलं तों - बेचैन केलं; पोटाचे स्नायू ओढून धरले व कळ सोसण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला.

“ हंऽ, हं...! वाःऽग पोरी, असा त्रास करून घ्यायचा नसतो ! टांके ताजे आहेत !— सोसलं पाहिजे दोन दिंवस ...” तिच्या कपाळावरून हळुवारपणें हात फिरवीत, डॉ. म्हणाले.

तेवढ्यांत, हळूंच तिच्या मानेजवळ त्यांनीं चिमटा काढला. तिनें किंचित् दचकल्यासारखं करतांच, डॉ. हंसले; तिच्या कानाजवळ तोंड नेऊन, ते मोठ्या गोड शब्दांत तिला म्हणाले, “ पाहिलंस ना ?... हळूंच नुसता चिमटा काढला तर तूं दचकलीस !.. मग ऑपरेशन म्हणजे तर काय ?—– बाळ, तुला पत्तादेखील नव्हता; तुला जगवण्यासाठीं ... आम्ही ... मी, तुझं पोट कापलं होतं !... वरून आतां सगळं जशाच्या तसं झालं असलं, तरी आंत जखमा आहेत ना ओल्या ? ... त्या नाहींत का दुखणार ?...”

पेशंटच्या चेहऱ्यावर नवा धीर, नवी आशा दिसली. ती डॉक्टरांकडे प्रशांत, पण निस्तेज चेहऱ्यानें पहात होती.

तेवढ्यांत, डॉ. तिच्या खांद्यावर हळू हळू थोपटून म्हणाले, “ अगदीं दोन तीनच दिवस हं... घाबरायचं नाहीं मुळींच... हट्ट करूंस नको, मात्र, लहान मुलीसारखा एखाद्या !... डॉक्टर आणि सिस्टर... सांगतील तें ऐक, खा, पी ! हं ... मग हां हां म्हणतां बरी होशील ! गप्पा मारशील; ... आपल्या आवडत्या माणसाबरोबर फिरायला जाशील !... आमच्या ‘जीवनगंगेंत’ माणसं आलीं, कीं तीं साफ बरीं होऊनच परत जातात;... कोण्णाला काळजी करायचं कारण नाहीं !.. अंऽ ? ”

त्याचवेळीं अगदीं साभिप्राय नजरेनें त्या मुलीकडे, व पलीकडच्या बाजूस कॉटजवळ बावरल्या चेहऱ्यानं उभ्या असलेल्या त्या मधांच्या तरुणाकडे पहात, डॉक्टरांनी एक सहेतुक चोरटं हास्य केलं !....

— त्या दोघांच्याही चेहऱ्यावर प्रशांत स्मित झळकत होतं.

मच्छरदाणीच्या जाळींतून तिला हळूं हळूं डोळे मिटतांना पाहून, डॉ. मुकाट्यानें मागें वळले. जातां जातां त्यांनी आपल्या खिशांतून पाइप काढला व तो शिलगावला.

त्यांच्या तोंडातून धुराचे लोळ व मनांतून अनेक विचारांचे कल्लोळ धुमसत धुमसत बाहेर पडत होते !

डॉक्टरांची जीवनगंगा !– डॉक्टरांच्या मनांतला तो जीवन कल्लोळ !!–

२०

आधीं दाबलेल्या कळीच्या खटक्यानें तिसऱ्या मजल्याजवळ लिफ्ट येऊन थांबलं; भानावर येऊन, डॉ. बाहेर पडले. .आपल्या मनांत त्याक्षणीं ज्या हजारों गोष्टी खवखवत होत्या, त्यांतल्या कांहींना बोलून वाट द्यावी, अशा कांहींशा उत्सुकतेनें, आपल्या राहात्या त्रिकोणी हॉलमध्यें शिरतांच, ते मोठ्यानें म्हणाले—" गणू, ए गणोबा!...जरा बाहेर ये पाहूं .."

त्रिकोणाच्या डाव्या बाजूची पहिली शिपायांची खोली उघडीच होती. मधल्या बाथरूम पलीकडल्या स्वयंपाक खोलींतून त्यांचा स्वयंपाकी चहाचा ट्रे घेऊन बाहेर येत म्हणाला..."कुठं बाहेर गेलाय् तो...साहेब, गाडी घेऊन .."

गणू घरीं नाहीं या बातमीनें, एका दृष्टीनें, डॉ. ना मागून आलेल्या विचार–मालिकेमुळे, बरंच वाटलं. आपल्या आजच्या भावनाविवश मनःस्थितींत, आपण कदाचित् कांहींतरी गणूकडे एकदम अघळपघळ बोलून गेलों असतों नि आपल्या मनाच्या दुबळेपणाचं त्याच्यापुढं प्रदर्शन करून बसलों असतों. आतां तो नसल्यामुळें तें सर्व ओघानेंच टळलं; म्हणून सुधीरांना हायसंच वाटलं !...



ऑपरेशन हॉलजवळील डॉक्टरांच्या ऑफिसरूमच्या डोक्यावर उजव्या बाजूस जरा लहान आकाराची पाहुण्यांची खोली होती. नि तीजवळच, दुसऱ्या मजल्यावरच्या व्हिजिटर्स रूमपेक्षां मोठी अशी खोली, डॉक्टरांच्या स्वतंत्र लॅबोरेटरीनें व्यापली होती. ऑपरेशन हॉलच्याच डोक्यावर त्याहून थोड्या लहान आकाराचा डॉक्टरांचा खाजगी हॉल होता. नि केमिकल्स व इन्स्ट्रुमेन्टस खोल्यांच्याऐवजीं, हॉलला लागूनच जी ऐसपैस खोली होती, तीच त्यांची झोंपायची खाजगी खोली.

मधल्या त्रिकोणी हॉलमध्यें पडलेल्या कोच–चार खुर्च्या–राउंड टेबल, टेलिफोन स्टूल, हॅटस्टँड वरून पुढें होत, डॉक्टर हॉलच्या दाराजवळ जाऊन उभे राहिले; स्वयंपाक्याला चहाचा ट्रे घेऊन अजून उभं पहातांच, ते आंत शिरत त्याला म्हणाले—" हं ठेव ते ट्रे हॉलमध्यें...अन् हें बघ, आज जेवायचं नाहींय् मला ! कुणी, अगदीं कुण्णीहि आलं आतां, तरी घरीं नाहीं मी, म्हणून सांग ! कुण्णालाच भेटायचं नाहींय् मला आज. अं...? फोनचीहि लाइन आधीं बंद करून ठेव !"

" जी " म्हणून स्वयंपाकी परत वळला. तेवढ्यांत, डॉक्टर पुन्हा म्हणाले —' नि दुसरं असं...गणोबालाहि सांग, म्हणावं... मी बोलावल्याशिवाय तूंहि इकडे येऊं नकोस!...अंऽ ? मला पूर्ण विश्रांति घ्यायचीय् आज ! ...हं, जा आतां तूं !...नि तें दार जातांना नीट बंद करून घे...पळ !...

२१

तो निघून गेल्यावर आपल्या बंद हॉलमधल्या आरामखुर्चीवर पाइप–मधून धूर सोडीत, डॉ. कितीतरी वेळ तसेच पडून राहिले.

कांहीं वेळानें, दचकून भानावर आल्यासारखं करीत, डॉ. आपल्याशींच एकदां खिन्नपणें हंसले. कपांत चहा ओतून घेऊन त्यांत साखरेचे तीन क्यूब चिमट्यानें टाकून, त्यांनीं बाऊलमधलं दूध मिसळलं. चमच्यानें ढवळतां ढवळतां, वरवर जाणाऱ्या वाफेकडे पुन्हा त्यांची दृष्टी खिळली. बाहेरचं जगहि त्यांना बंद दारानें तात्पुरतं बंद केलं होतं.

त्या बाहेरच्या चाकोरी जगापासून लांब लांब उडत जावं; स्वतःच्या... अगदीं एकट्याच्याच जगांत...आंत आंत शिरावं; नि सैरावैरा दिलचाहेल भटकावं;...असंच अगदीं त्यांच्या आजच्या मनाला, कित्येक वर्षांनी मघांपासून राहून राहून वाटत होतं...

---

१ जीवन–गंगा १

– स्वल्पविराम –

रघुवीर सामंतांची

'उपकारी माणसें'

तुम्हाला परिचित आहेत कां?

जीवन–गंगा

[ काहूर ]

२

# मंदिर नि मानस-मंदिर

## जीवन–गंगा २ मंदिर नि मानस-मंदिर

२२

'माणसाला जगांत सारी साडेतीन हात जागा पुरते…' म्हणतात. पण… 'एका छोट्याशा खोलींत माणसाचं सारंच्या सारं जग सामावूं शकतं !' असं कुणी म्हटलं असतं, तर तें विधान सुधीरांना फारच आवडलं असतं!—

एक अत्यंत कुशल शस्त्रकलाकोविद म्हणून मुंबईत, …एकवेळचे कॉर्पोरेशनचे मेयर नि एम्. एल्. ए. म्हणून प्रांतांत, मध्यआयुष्यांतील त्यांच्या कांहीं सुधारणाविलांमुळें हिंदुस्थानांत नि त्यांच्या क्षयरोग…जंतुशास्त्रांतल्या महत्वाच्या संशोधनामुळें तर कांहीं प्रमाणांत इंग्लंड–अमेरिकेंतहि,…डॉ. सुधीर सुप्रसिद्ध होते.

पण त्यांचं वैयक्तिक जग मात्र, या एकाच छोट्या खोलींत नि तिथल्या या निश्चल–निर्जीव चार भिंतींत सामावलेलं होतं.

हो, हा हॉलच त्यांच्या खाजगी आयुष्याची एकमेव रंगभूमी झाला होता.

जवळ जवळ सव्वीस–सत्तावीस वर्षांपूर्वी, या रंगभूमीचा, सुधीरांनीं आपल्या स्वैर कल्पनेनें, प्रथमच कागदावर आराखडा काढला; पण त्यावेळीं, त्यांचं मन त्या बाबतींत पूर्ण निर्विकार होतं.

सारं बांधकाम पुरं झाल्यावर, डॉ. नीं वरपासून खालपर्यंत इमारतीची सगळी पाहणी केली. शेवटीं या रिकाम्या हॉलमध्यें ते शिरले. समुद्राकडल्या त्या बाल्कनींत जाऊन उभे राहिले.

समोरचं विस्तीर्ण जलपृष्ठ व त्यावरच्या सागराच्या त्या उसळत्या



हालचाली, त्यांचं मन आकर्षून घेत होत्या; घोंघावणाऱ्या वाऱ्यावर त्यांचे तरुण कुरळे केंस उडत होते; त्यांवरून हात फिरवीत, आपल्याबरोबर आलेल्या त्या मुख्य इंजिनिअरच्या खांद्यावर स्नेहानें थोपटत, ते त्यावेळीं हंसून म्हणाले होते—" थँक्स् माय् फ्रेंड् ! हें घर…माझं घर नाहीं कां हें ?–छान;…छान ! मला आवडेल, तुम्ही बांधून दिलेल्या या माझ्या घरांत राहायला !"

मनुष्याच्या जीवनांतील गंमत म्हणतात, ती हीच !— तो असं त्याला नकळतच जीवन जगत जातो; पण तसतसा त्याच्या आयुष्यांत अजाणतांच रंगही भरत जातो. त्याला कल्पनाहि नसतां, भोंवतालच्या अफाट, अगम्य, विस्तीर्ण जगांत, त्याचं स्वतःचं असं एक छोटंसं प्रत्यक्ष जग निर्माण होत जातं; नि मग हजारों वस्तू , अनेक व्यक्ति नि लाखों स्मृती, यांनीं त्याचं तें जग… हां हां म्हणतां गजबजतं !…

त्या दिवशीं ते प्रथमच आंत शिरले, तेव्हांचा डॉक्टरांचा हा रिकामा हॉल; नि इतक्या वर्षांनंतरचा तोच त्यांचा आजचा हा हॉल ! तो तसाच रंग पालटत गजबजत आला होता; आणि त्याबरोबरच डॉक्टरांच्या मनाचेही विविध कायापालट होत गेले होते.

२३

आजहि, त्यांच्या त्या खाजगी हॉलमध्यें, तसं कांहीं हजारों वस्तूंचं म्यूझिअम भरलं होतं, अशांतला भाग नव्हे; नि होत्या त्याहि अगदीं साध्याच वस्तू होत्या….

डोक्यावरचं चौकोनी छत पांढऱ्या शुभ्र रंगाचं; त्या चौकोनाला भिंती-जवळच्या कडांना दडिदीड वीतीचा, खाकी रंगाचा चौकोनी पट्टा; खालीं थोडा गडद नि वर जरा फिक्कया हिरव्या रंगाचा डिस्टेंपर, चारी भिंतींना; वरल्या शुभ्र छताच्या मध्यबिंदूतून अव्याहत अधांतरीं लोंबकळणारं स्प्रिंगचं वरखालीं होणारं, हिरव्या रंगाच्या शेडचं, सहा दिव्यांचं तें मोठं थोरलं झुंबर; त्या खालीं वॉलनट वॉर्निशचं चकचकीत ओव्हल टेबल;

टेबलावर, मधल्या फुलदाणीतल्या फुलांभोंवतीं पडलेलीं, कांहीं चित्रविचित्र मासिकं-नियतकालिकं; टेबलाभोंवतीं, हिरव्या मऊ गाद्या टाकलेल्या, वांकवलेल्या नळयांच्या चार किर्लोस्करी खुर्च्या; दोन कोपऱ्यांत, भिंतीजवळ पुस्तकांनीं खच्चून भरलेलीं दोन दोन फिरतीं शेल्फस्; नि त्यांवरच, कोपऱ्यांतल्या भिंतींना समोरासमोर कलते लटकवलेले दोन हिरवे फिरते पंखे; जमिनीवर, साधं आडव्याउभ्या रेघांचं डिझाइन असलेला, सौम्य रंगाचा पर्शिअन गालिचा...

म्हणजे डॉक्टरांप्रमाणेंच,...तशी साधीसुधीच... 'वेषभूषा' होती, त्यांच्या त्या हॉलची देखील...

सहसा कोणी आंत शिरूंच शकत नसे; पण कोणी आंत शिरलंच, तर समुद्राकडे पाठ करून असलेल्या थेट समोरच्या भिंतीवर, मध्यभागीं टांगलेलं, एक मोठं थोरलं लाइफसाइझ तैल-चित्र त्याला दिसलं असतं. अत्यंत सोज्वळ, सौजन्यपूर्ण चेहऱ्याच्या, एका साध्या स्त्रीच्या फोटोचं एन्लार्जमेंट होतं तें !

सुरवातीच्या त्रिकोणी हॉलकडे पाठ व समुद्राकडे तोंड केलेल्या, तिच्या समोरच्याच भिंतीवर, एक वीसतीसचं पोर्ट्रेट बसवलं होतं;...तेंहि एका स्त्रीचंच होतं.

आणि त्या दोन्ही स्त्रिया, तिथें समोरासमोर बसून, एकमेकींकडे अहोरात्र पाहातच आहेत, अशी बघणाऱ्याला पटकन् कल्पना व्हावी, इतका त्या दोन्ही चित्रांमध्यें जोरदार जिवंतपणा भरला होता.

आंत शिरतांच; दारांतून उजव्या बाजूच्या भिंतीकडे कोणाची दृष्टि वळली असती, तर एका आठ-नऊ वर्षांच्या—दोन्ही वेण्या छातीवर सोडलेल्या खेळकर मुलीचं, बारा–दहाचं रंगीत एन्लार्जमेन्ट, तिथल्या बाल्कनीच्या दारावर लटकलेलं त्याला दिसलं असतं.

उरलेल्या डावीकडच्या चौथ्या भिंतींत, मध्यभागींच डॉक्टरांच्या झोंपायच्या खोलीचं दार; विणलेल्या सुंदर हिरव्या झालरीचा त्यावर लोंबणारा



तो हिरवट पडदा; त्या दाराजवळच, छातीपर्यंत उंच असा ॲशकलरचा मोठा रेडिओग्राम;...नि त्यावर सोन्याच्या फोटोफ्रेममध्यें, डॉक्टरांचा तरुणपणीचा एक सेपिआकलर फुलसाइझ फोटो !

बसायच्या या हॉलला एकंदर तीन बाल्कन्या; समुद्राकडच्या बाजूच्या भिंतीला दोन व उजव्या बाजूच्या भिंतीला एक. प्रत्येक बाल्कनीच्या दारांत एकेक डेकचेअर टाकलेली; त्या दोन मोठ्या चित्रांखालीं, भिंतींना लागून, हिरव्या गाद्यांचा एकएक मोठा चेस्टरफील्ड कोच पडलेला...

सकाळची सर्व कामागिरी नि ऑपरेशन्स उरकल्यावर, डॉ. आपल्या या आवडत्या हॉलमध्यें शिरत; आपल्याच तंद्रींत पहा मधून मधून, धुराचे फवारे सोडीत; हाताला येईल तें वर्तमानपत्र अगर देशीपरदेशी मेडिकल डायजेस्ट-रिव्ह्यू घेऊन, तें चाळत चाळत, मन मानेल त्या बाल्कनीजवळच्या डेक-चेअरवर पडत; किंवा दोहोंपैकीं एखाद्या कोचावर पडल्या पडल्या, समोरच्या चित्राकडे टक लावून, तासतास निमूट पहात रहात.

'जीवनगंगें'तल्या आपल्या प्रत्येक रोग्याला, डॉक्टर कसलं तरी टॉनिक नेमीत असत; पण स्वतःच्या आयुष्यांत येऊन जात असलेल्या प्रत्येक कार्य-मग्न दिवसामधलं त्यांचं स्वतःचं टॉनिक, म्हणजे मात्र एकच!... दर दिवशीं नियमानें या खोलींत जाणारे,... हे त्यांचे असले एकाकी क्षण !—

२४

आज मात्र, हॉलमध्यें शिरण्यापूर्वी ते होते, त्याहून आंत शिरल्यावरच उलट डॉ. अधिक बेचैन झाले होते. कित्येक दिवसांनीं, कित्येक वर्षांनीं, कित्येक तपांनीं, .. एवढा मोठा कोलाहल, त्यांच्या मनांत हलकल्लोळ माजवीत होता !

कां बरं एवढं मोठं काहूर ?... मनांतल्या सुप्त भावनांच्या गांठींची मोठी चमत्कारिक गुंतागुंत अशी एकदम कां सुटली ?

'एवढे मोठे नांवाजलेले सर्जन–डॉ. सुधीर ! ॲपेंडिक्ससारख्या क्षुल्लक

ऑपरेशनच्या मध्यावरच ते मूर्च्छित झाले !' तें लोकांना आश्चर्य नि डॉक्टरनां भयंकर शल्य तर खरंच ! —पण एकाएकीं असं विपरीत, कधीं नाहीं तें, आजच कां घडावं ? हें तर त्याहूनही मोठंच आश्चर्य !

पण असं कोणतं भयंकर कारण, कीं, ज्यामुळें डॉक्टरांच्या मनाला एवढा मोठा वणवा एकाएकीं लागावा?...एकच कीं अनेक ??... आजच घडलेली कोणती घटना, कीं, पूर्वीची कोणती स्मृति ?—नक्की कांहींच सांगण्यासारखं नव्हतं...

तथापि, त्यांच्यापुढून सकाळचीं तीं सारासारीं दृश्यं...साऱ्या तपशीलांसह...एखाद्या तुटलेल्या चलचित्राप्रमाणें—फिरफिरून येत-जात मात्र होतीं. विशेषतः, त्या कलकत्त्याच्या कत्तलीची भयंकर बातमी;...मग ऑपरेशननंतर आशेनं फुललेला त्या तरुण पोरीचा सहास्य चेहरा; तिचा तो आनंद द्विगुणित होऊन, त्याचं तिच्या त्या तरुण प्रियकराच्या चेहऱ्यावर पडलेलं प्रशांत प्रतिबिंब. शेवटचं तें एकच एक दृश्य ! डॉ. आंत शिरल्यापासून, त्यांच्या मनःचक्षूंपुढें तें सारखं सारखं तरळून जात होतं....

रोगी अगर त्यांचे नातेवाईक त्यांच्याबरोबर समरस होऊन वागण्याची ती डॉक्टरांची पद्धत, वास्तविक नेहमींचीच ! "शास्त्रीय ज्ञान, लखलखीत तीक्ष्ण शस्त्रं, कुशल शस्त्रकला, हीं आपलीं मुख्य साधनं खरींच; पण तेवढाच-किंबहुना त्याहून अधिकच—आपल्या हळुवार हस्तस्पर्शाचा, गोड गोड आशादायी शब्दांचा, उत्तेजक गंभीर हास्याचा, त्या दुर्बल मनाच्या रोग्यावर परिणाम होतो !—त्यामुळेंच,...त्याच्या जखमा अर्ध्याअधिक भरून निघतात; अंगांत ठाण देऊन बसलेला रोग दूर दूर पळून जातो !—" असं डॉक्टरांचं अनुभवी मत होतं.

रोग्याबरोबर बोलतांना, आपल्या "जीवनगंगे"चा ते नेहमीं मोठ्या अभिमानानें उल्लेख करीत; ती केवळ जाहिरातबाजी नसे ! तसा विचार केला, तर कोणत्याहि जबाबदार माणसाची, आपण हातीं घेतलेल्या कार्यामध्यें मोठी श्रद्धा असते. ' जीवन-गंगा 'या नांवाच्या नुसत्या उच्चारानं देखील डॉक्टरांचं



अंग तसंच एकदम शहारून येई. त्या नांवात त्यांची उत्कट श्रद्धा होती; त्यात त्यांचा अढळ आत्मविश्वास होता.

म्हणूनच ते प्रत्येक रोग्याला हळुवार पण जोरदार शब्दांत सांगत—"प्रथम हें लक्षांत घ्या, कीं,.. आतां तुम्ही 'जीवन-गंगें'त प्रवेश केलाय् !... आणि आमच्या या 'जीवन-गंगें'त, एकदां एखादा रोगी शिरला, कीं, तो परत बाहेर पडतो, तो फक्त साफ बरा होऊनच !"

स्वतः डॉक्टरांचं मात्र उलट झालं होतं. ते त्यांच्या ' जीवन-गंगें 'त आले; त्यानंतरच त्यांच्या आयुष्यांत एक अदृश्य व्यथा आली; आणि ती कमी न होतां आजतागायत उत्तरोत्तर बळावतच गेली. म्हणूनच, हा नियमाचा अपवाद लक्षांत घेऊन, कधीं कधीं ते खिन्न हंसून स्वतःशींच म्हणत—" माझ्या 'जीवन-गंगें'त आलेले रोगी बरे होऊन बाहेर जातात ! —पण मी मात्र जेव्हां कधीं बाहेर जाईन तेव्हांच काय तो बरा होईन !— नाहींतर नाहीं !—"

तथापि असला खाजगी विचार अधिक काल करायलाही, डॉक्टरनां फुरसत नसे. डॉ. 'जीवन गंगे'त शिरले. त्यांच्या आयुष्यांत 'जीवन गंगा' आली. तशी ती एकदां आली मात्र; त्यानंतर, तिचा व डॉक्टरांच्या जीवन-गंगेचा प्रवाह दोन्ही सारखेच पुढें पुढें चालत आले होते. दोन्ही प्रवाहांना उसंत घ्यायला वेळ नव्हता. आणि मध्येंच अकालीं अडथळा आणण्याची—डॉक्टरांनीं म्हटलं असतं तरी—त्यांना यापुढें शक्यता उरली नव्हती.

पण डॉक्टर तसे भीरू मनाचेहि नव्हते. मातीचं मोती करणं, व्यवहारी जगांत कदाचित अशक्य नसेल; तें सोपंहि असेल !— पण टाकीनें दगडाला देव करणं,... त्यांत शेवटीं जिवंतपण, देवपण आणणं,... हें मात्र महाकर्म कठीण !—

तरी तसलाच एक चमत्कार— आपल्या आयुष्याच्या रूपानेंच —डॉक्टरांनी सर्वांना करून दाखवला होता ! .. नाही तर, आजचे हे विख्यात डॉ. सुधीर,.. जगाला लाभणार होते तरी कसे ?.

म्हणजे असं,-- ईश्वरी कोपानेंच जणूं-- सत्त्याण्णवच्या प्लेगांत, बाप-

भावंड सारींजणं, एकाएकीं आठ दिवसांत, पटापट बळी पडलीं: हो, त्याच झंझावातांत सांपडून, अगदीं प्लेगची गांठ येऊनहि,– केवळ योगायोगानें, केवळ चमत्कारानेंच जणूं, त्या कुटुंबांतला आपल्या निराश्रित मातेसह राहिलेला, नऊ दहा वर्षांचा एक पोरका, अनाथ, भंगण भिकरी पोर — तो, सुधीर!.. नि तेच आजचे हे —एवढे नांवाजलेले, 'जीवन-गंगे'चे चालक,- डॉ.सुधीर!-

—"परिस्थिति-दैवाचे बागुलबुवे कशाला?...बुद्धिमत्ता, चिकाटी आत्मविश्वास, धडाडी हवी अंगांत!—सत्प्रवृत्त माणसाला, खडकांतून देखील हवा तो मार्ग खोदून, जगतां जगतां, यशोमंदिर तयार करतां येतं!"—ओघानें कधीं आलं, कीं, डॉ. असं बोलून दाखवीत.

एखादा गरीब विद्यार्थी त्यांच्याकडे मदत मागायला आला, तर वेळांत वेळ काढून, ते त्याची भेट घेत; आणि त्यावेळीं, डॉक्टर त्याला स्पष्ट शब्दांत सुनावीत—"कठोर परिस्थिति म्हणजे आहे खरी जगांतली एक चमत्कारीक चीज!—त्यावेळीं, माणसाला फार फार वाटतं, कीं,...कसला तरी,...कोणाचा तरी...आपल्याला ओलावा-आसरा असावा!...पण इच्छिलेलं सारं मिळतं थोडंच?... तरी परिस्थितीच्या नांवानें केवळ रडूं मात्र नये!—अनोळखी आल्या-गेल्याकडे हात पसरून, तोंड तर कधींच वेंगाडूं नये!—कुणाला वेळ नसतो जगांत इथं,...तुमच्याकडे, तुमच्या परिस्थितीकडे नि तुमच्या केवळ भावनांकडे सहानुभूतीनें पाहायला!—तुमच्या कर्तृत्वानें त्यांचे डोळे दिपतील तेव्हांच तुमच्या पायांवर सारे लोळण घेतील!—तोंपर्यंत मात्र-तुमच्या डोक्यावरच साऱ्यांच्या लाथा!..."

## २६

आपल्या जखमेवर मीठ चोळल्याचा त्या भांबवल्या जीवाला भास होत आहे, तोंच, डॉ. पुढें पटकन् म्हणत—"हें कांही एक न बोलतां, एक पांचांची नोट उचलून मी तुमच्या हातावर ठेवली असती आज, तर बरं वाटलं असतं, नाही, तुम्हाला?...तरी ते जन्मभर तुम्हाला पुरणार होते थोडेच?...पण



तेच, स्वतःची तुम्ही हिंमत वाढवलीत, किंमत ठरवलीत, परिस्थितीचा होरा पेलून प्रयत्नांची शिकस्त केलीत, तर? तर . तुमचं पाऊल, तुमच्या केवळ हिंमतीवर, तुमच्या किंमतीमुळेंच पुढें पडत राहील!"

त्याची खालीं गेलेली मान, चिमणीसारखं झालेलं तोंड, सारं दुर्लक्षून डॉ. क्षणभरानें पुढें सांगत–"ज्याच्या मदतीच्या पुरेपूर अपेक्षेनें आज तुम्ही इथं आलां आहांत, तो मी—डॉ. सुधीर! तोही एकदां असाच अनाथ होता, ...हें त्याचा आजचा दिमाख नि मोठेपणा पाहून तुमच्या ध्यानींमनीं तरी आलं आहे कां? पण हीं माझीं आजचीं यशं, अहोरात्र लटपटीखटपटी करून, चिकाटीचा प्रयत्न करून, मीं अगदीं आगींतूनच ओढून काढलीं आहेत!–"

त्यांचा चेहरा क्षणकाळ अभिमानानें फुले; पण पुन्हा तत्काळ, विनम्रतेच्या ओशाळ्या स्वरांत, ते पुढें म्हणत–"म्हणजे मीच कोणी जगांतला सर्वश्रेष्ठ आदर्श पुरुष आहें, असं नाहीं! मला एवढीच विनन्ति करायचीय् तुम्हाला,...कीं, दैवपरिस्थितीवर केवळ हवाला नका टाकूं! आपल्या अंगच्या साऱ्या शक्ती एकवटा;...नि प्रयत्न करा,...अगदीं चिकाटीचा प्रयत्न करा!"

पण डॉ. सुधीर, असल्या कोरड्या उपदेशाच्या प्रवचनावरच मात्र थांबत नसत; ते चटकन् उठत नि आपल्या विजारीच्या खिशांतली एक दहाची नोट काढून त्याच्या हातीं देत; पण ती देतां देतांहि पुन्हा त्याला सांगत –"माफ करा हं .. कमीजास्त बोलल्याबद्दल!– हे घ्या– प्रयत्नमार्गानेंच मिळवलेले पैसे आहेत हे! पांच मिनिटांपूर्वीं .. माझ्या पांचच मिनिटांच्या तपासणीसाठीं, स्वखुषीनें, आदारानेंच, एका रोग्यानें मला दिलेले हे दहा रुपये! घ्या! ह्या दहाचेच तुम्हाला लाख करतां येतील! तसं करतां आलं तरच तुमचा मोठेपणा,.. नि माझं समाधान! -- आणि तसलं समाधान देण्यासाठींच, कधीं पुन्हां मिळालांत तर भेटा मला!. नाहीतर, कृपा करा;.. माझ्याकडे कांहीं पैशाचीं झाडं नाहीत!!"

असल्या त्यांच्या तडकाफडकी, किंचित् अहंमन्य वाटणाऱ्या बोलण्याचा

कित्येकांना खूपच राग येई; पण एखाद्या, आयत्या पिठावर रेघोट्या ओढणाऱ्या लक्ष्मीपुत्राची वायफळ बडबड नव्हती ती!- जात्या अबोल वृत्तीच्या डॉक्टरांच्या त्या तळमळीच्या उद्गारांत, त्यांच्या साऱ्या आयुष्याचंच सारं सार सामावलेलं होतं !

२७

मॅट्रिकच्या वेळीं, पहिल्या पांचांत येण्याचा आनंद, अनाथ सुधीरलाच जास्तींतजास्त झाला होता ; त्या घटनेनेंच त्याच्या पुढील आयुष्याला कलाटणी मिळाली; त्यामुळेंच तो मुंबईतल्या गुर्जर धर्मदाय वसतिगृहांतहि स्थिर झाला; त्याच्या बुद्धिमत्तेनें मोहून गेलेल्या युरोपिअन गुरुजींच्या साहाय्या-उत्तेजनामुळेंच मेडिकल कॉलेजांत त्यानें स्कॉलर म्हणून वर्षामागून वर्षे काढलीं. मग जीवनजी गंगाराम शेठजींशीं केवळ पोटापुरत्या नोकारीसाठींच झालेली पहिली ओळख; पण तो संबंध वाढवून, आपल्या बुद्धिमत्तेनेंच सुधीरनें शेठजींना दिपवलं; त्या जोरावरच, तो व्हिएन्ना इंग्लंडला गेला; तिथल्या साऱ्या उच्च पदव्या, एका मागून एक, त्यानें काबीज केल्या.

हा यशाच्या शिखराकडे रोखलेला रस्ता, त्या अनाथ परिस्थितींत पडलेल्या वाढलेल्या सुधीरला, दुसरं कोण शिकवायला आलं नव्हतं ! आल्या परिस्थितीशीं नेटानें झगडून, तिजवर मात करायची, एवढंच त्याला माहित!

विलायतेंतून परतल्यावरहि तसंच; जातांना केलेल्या कराराप्रमाणें, शेठजींच्या छोट्या हॉस्पिटलमध्येंच, प्रथम त्यानें नोकरी चालू केली. पण त्यानंतरच्या एकदीड ' वर्षांतच, सर्वत्र ख्याति झाली-" हें हॉस्पिटल म्हणजे मुंबईतील कुशल शस्त्रक्रियेचं केंद्र; नि त्याचा अद्वितीय कर्णधार धन्वंतरी म्हणजे डॉ. सुधीर ! "

असामान्य कौशल्य व तीव्र कर्तव्यदक्षता यामुळें, त्या छोट्याशा काळांत, डॉक्टरांचं नांव इतकं सर्वतोमुखी झालं, कीं, स्वतः शेठजींनीच त्यांना करारनाम्यांतून मोकळं करून, दुसरं मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र हॉस्पिटल काढण्याचा सल्ला



दिला. इतकंच नव्हे, तर स्वतःच्या मोठ्या देणगीनं, चोपाटीवरील त्या टोलेजंग त्रिकोणी इमारतीची व ' जीवन-गंगे 'ची मुहूर्तमेढ बांधली. हां हां म्हणतां, ती इमारत चढली-उद्घाटन-समारंभ गाजला—नि त्यानंतर आजपर्यंत,—जीवन-मृत्यूशीं निकारनें झगडणारी नि त्याच्या काळदाढेंतून हजारोंना मागें खेचून आणणारी, मुंबईतील एकमेव आदर्श जीवदात्री संस्था अशा कीर्तीनें, सुधीरांची ' जीवन-गंगा ' गाजत राहिली.

आज साऱ्यांना शीतल जीवन फिरफिरून देणारी ही भव्य 'जीवन-गंगा'!—तिचा उगम फक्त डॉक्टरांच्या जिवंत रसरशित रक्तांतच होता.

२८

' जीवनगंगे'चा पहिला वाढदिवससमारंभ संपल्यानंतरहि, सुधीर यात्र हॉलमध्यें शिरले होते;-पस्तीशी आंतबाहेरचा तो कर्तृत्ववान् शास्त्रज्ञ-शस्त्रज्ञ, त्या दिवशीं,... जनतेच्या अफाट स्तुतीला पात्र झाला होता. साऱ्या वर्तमानपत्रांत, सुधीरांच्या हातून घडलेल्या शस्त्रकला-चमत्कृतींच्या दाखल्यांचे वृत्तांत व त्यांचे फोटो आले होते.

पण आपल्या या छोट्याशा जगांत शिरतांच, कां कोण जाणे, त्या दिवशीं, सुधीरांना अगदीं कोंडल्यासारखं, एकलकोंड्यासारखं वाटलं होतं...

तसं साहजिकहि होतं; त्यांचं तोंपर्यंतचं सारं आयुष्यच एकमार्गी; आपल्या महत्वाकांक्षी मनाला, बालपणापासून त्यांनी धीरानें शिकवत आणलं होतं—" आपल्या हातानें आपलं आयुष्य तयार करणाऱ्या कर्तव्यकठोर माणसाला, मृदु भावनांनी अलीकडे पलीकडे वाहून जातां येत नाहीं. दृष्टि दीपकायंत्राची नि मन पोलादाचं हवं, तिथं ! "

—तोंपर्यंत ते एकटेएकटे राहिले; पण त्या दिवशीं मात्र त्यांना अगदीं एकलंएकलं वाटत होतं !—

२९

गणूला तर याचा चांगलाच अनुभव !

नोकरीला राहिल्या दिवसापासून, 'एकटेच आकाशांतून पडल्या-सारख्या' डॉक्टरांच्या एकलकोंड्या आयुष्याबद्दल गणूला तीव्र कुतूहल वाटू लागलं होतं; तें उत्तरोत्तर वाढतच गेलं होतं.

त्यांच्या हुकुमानें; ते बसलेली मोटार तो इकडे तिकडे फिरवी. त्यावेळीं, येतां जातां, कधीं सहजासहजीं इतरांशीं होणारे डॉक्टरांचे संवाद, गणूचे तिखट कान टिपून घेत.

कुणाशींहि वागण्याची त्यांची साधारण पद्धत अगदीं धंदेवाईक-शास्त्रीय; नवी ओळख-स्नेह, ते आपणहून कधींच वाढवीत नसत. एकवेळ गणूशीं, घरांतल्या स्वयंपाकी-गड्याशीं ते चार शब्द अघळपघळ बोलतील; पण धंद्या-निमित्त हाताखालीं आलेल्या डॉक्टर-नर्स अगर इतर नोकर मंडळीबरोबर बोलायचं झालं, कीं, सुधीर प्रत्येक शब्द, जणूं अगदीं सोन्यासारखा तराजूंत जोखून, निर्विकारपणें उच्चारणार !... हा गणूचा हमखास अनुभव...

रोगी व त्यांचे नातलग, यांच्याशीं बोलतांना मात्र डॉ. लागलीच अगदीं मधाचं मोहोळ होत ! त्यांच्यांतल्या कुणाची 'जीवन-गंगे'त कसली गैरसोय झाल्याचं त्यांना दिसलं, कीं, अगदीं हेडडॉक्टरांच्या अंगावरहि चारचौघांच्या देखत खेंकसायला सुधीर कमी करीत नसत.

अशा वेळीं त्यांच्यांत तलवारीच्या धारेसारखी कठोर शिस्त संचारे ! नर्स किंवा इतर कोणी, कोणत्याबाबतींत गाफील दिसलं, कीं, दंड ठोठावायला त्यांना मिनिटाचाहि विचार लागत नसे. त्यावेळीं, ते तापल्या तव्यासारखे लाल होऊन म्हणत –" समजतां, काय तुम्ही ?—ही 'जीवन-गंगा' काय तुमच्या—माझ्या करमणुकीचं, नाच-तमाशाचं स्थान आहे ? 'जीवन-गंगा' इथं येणाऱ्या रोग्यांची! त्यांचे नोकर म्हणून त्यांच्यासाठींच आपण !- आम्हा नोकरांच्या ऐष-आरामासाठीं नव्हेत, ते रोगी !— "

हें रोग्यांबद्दलचं प्रेम डॉक्टरांच्या रक्तांतलं,... आंत आंत भिनलेलंच होतं !– नि म्हणूनच 'ढिलाई दिसली रे दिसली, कीं, भरलीच आपली कंबख्ती!' –या पुऱ्या जाणीवेनेंच, तिथला प्रत्येक, डोळ्यांत तेल घालून, कसोशीनें आपली



'ड्यूटी' पार पाडे. सर्वांना सुधीरांचं प्रेमळ मन ठाऊक असूनहि, त्यांचा थरकाप दराराच वाटे.

३०

पण 'जीवन-गंगे'च्या चार भिंतींत आलेला एखादा रोगी एकदां पूर्ण निरोगी-जिवंत होऊन, सुखरूप बाहेर पडला, रस्त्यांत वावरूं लागला, कीं, त्याच्याकडे पाहण्याची डॉक्टरांची दृष्टि मात्र पुन्हा लागलीच बदले;.. ती एकदम बेफिकीरीची होई. त्यांच्याच कौशल्यावर जीवदान मिळवलेला, असा एखादा पूर्वीचा रोगी त्यांना भेटला, कीं, त्याला एकदम चुकल्यासारखं होई..'हे आपलेच प्रेमळ डॉ. सुधीर कां ?' असा क्षणभर त्याला संशय पडे. अशावेळीं ते एकदां ओझरतं हसल्यासारखं करीत; क्वचित् एकदोन औपचारिक कुशल प्रश्न विचारीत; नि त्याला तिथल्या तिथें तोडीत. –हें गणूनें कित्येकदां पाहिलं होतं.

पण तरीहि, जुन्या आठवणी देऊन, त्यांचा कोणी अधिक वेळ घेऊं लागला, त्यांना आपल्या घरीं यायचाहि कृतज्ञपणें आग्रह करूं लगला, तर डॉ.चा चेहरा बराच निर्विकार होई; नि ते मग म्हणत– "अहो, दिवसाचे अवघे चोवीस तास !– आपलंच घड्याळ पुढं मागं करून, ते पंचवीस झाले असते, तर किती बरं होतं ?.. नाही ? वेळ आहे कुठं कुणाला,.. तुमच्या त्या बाहेरच्या जगांत ऐसपैस वावरायला ?... त्याचा मक्ता दिलाय् आम्ही तुम्हां साऱ्यांकडं ! कामं करतां करतां, आम्हाला आमच्या 'जीवनगंगे'चं छोटसं जगच फार अफाट वाटतं !– दिवस-आठवडे-महिने-वर्षे ... कशीं क्षणासारखीं निघून जातात, पत्ताहि लागत नाही !.. हं.. असं आहे !. माफ करा स्पष्टोक्तीबद्दल— बरं... माझीं पोरं तिकडे तळमळत-रडत असतील, सगळ्या खाटाखाटांवरून ! घेऊं रजा ?.. अच्छा! हं चालव रे, गणू ."

तें सुकाऱ्यानें ऐकून, गणू आपल्याशींच हळूंच हसायचा; पण मनांत विषण्णहि व्हायचा !

३१

या असल्या त्यांच्या, वागुणकीमुळें श्रीमंतीच्या घमेंडींत धुंद असलेल्या

कित्येकांना, तें भयंकरच तिरसट वाटत; नि मग कुणी स्नेह वाढवण्याच्या भरीस पडत नसत. हॉस्पिटलमधल्या नोकरांनाहि डॉक्टरांबद्दल आपुलकी वाटे; पण ती परिचित, घरोब्याच्या स्नेह्याची नव्हे; जुन्या जमान्यांतल्या करड्या तापट बापाची !— पण मग डॉक्टरांनाही तेंच पाहिजे असे.

वर्षांतला एकच दिवस काय तो त्यांच्या दृष्टीनें अपवाद असे. तो म्हणजे,...प्रथमपासून दरवर्षी साजरा होणारा,...'जीवन-गंगे'चा वाढदिवस !

त्यावेळीं, नोकरांची सुधारणा डॉ. कडे रुजू झालेली असली, तर त्यांना दंड परत मिळे. आपल्या ड्यूटीबद्दल डॉक्टरांचं मत काय आहे, हें अप्रत्यक्षपणें समजायचा, तो एक बॅरॉमिटरच होता; त्या दिवशीं, प्रत्येकाला –त्यांच्या योग्यतेप्रमाणें, आवडीप्रमाणें—गुत बंद पाकिटांतून–पुड्यांतून 'जीवन-गंगे'ची भेट मिळे. त्यासाठीं, डॉक्टर दर वर्षी दहाबारा हजार रुपये खर्च करीत. नि 'आपल्या कर्तव्यदक्षतेवर, डॉ. सुधीरांची गुप्त, करडी पण अशी गुणग्राहक दृष्टि अहोरात्र आहे' याची,.. 'जीवन-गंगें'तल्या प्रत्येक व्यक्तीला, त्यांतूनच मनोमन जाणीव व खात्री होई. याचवेळीं, प्रत्येकाची कमीजास्त पगारवाढही होई;...असा सारा मौजेंत दिवस जाई.

पण त्या दिवशींहि, आपापल्या दोन दोन तासांच्या पाळीप्रमाणें, अगदीं नेहमींच्या करड्या शिस्तीनें, प्रत्येकाला केव्हां ना केव्हां काम हें करावंच लागे.

डॉक्टर त्या दिवशींहि मधल्या फळ्यावर लिहीत-"जिवंत लोकांचं काम कधींच संपत नसतं !-लोकांचे,...समाजांतल्या लोकांचे,साऱ्या जगांतलेच..रोग घालविण्यासाठीं अहोरात्र झटणं, हेंच आपलं सर्वांचं काम !—"

पण तो दिवस एकदां निघून गेला, कीं, लागलीच– सुधीरांनी व साऱ्यांनीच क्षणकाळ धारण केलेली– मौज करण्याची ती वृत्ति, पुन्हा एकदम पालटे !—कडक शिस्त नि करडी कर्तव्यदक्षता नेहमीप्रमाणेंच 'जीवन-गंगें'त फिरून नांदूं लागे....

३२

गणोबाच्या कांटेकोर दृष्टींतून आणखी हेंहि सुटलं नव्हतं, कीं, डॉक्टरांच्या



त्या सुरवातीच्या एकाकी आयुष्यांत,...त्यांच्या जीवनांत स्त्रीसहवासाला अगदीं औषधापुरतीहि जागा नव्हती !...

कोणाहि स्त्रीबरोबर बोलतां-वागतांना, डॉक्टर अगदीं संकोचानें वागत; एखाद्या नर्सबरोबर बोलताना देखील- एखादा सुरवाती-शेवटचा ओझरता कटाक्ष वगळला, तर—त्यांची दृष्टि आपल्या पायाजवळ, अलीकडेपलीकडे दूरवर, अशी कुठं तरी शून्यपणें रोखलेली असे.

स्त्री-रोग्यांबरोबर बोलतां-वागतांना ते आपला नेहमीच्या वृत्तीचा मोकळेपणा दाखवीत, हें खरं;- पण तरी अगदीं आवश्यक तेव्हांच त्यांचा अंगाला स्पर्श होई; स्पर्श आवश्यक होई, तेव्हां मात्र, त्यांची ही याबाबतची कांहीशी लाजाळू वृत्ति त्यांना एकदम सोडून जाई. अशावेळीं, समोरील त्या स्त्रीशरीराकडे पाहातांना, एखाद्या शास्त्रज्ञ, धन्वंतऱ्याची उत्सुक पण निर्विकार, स्वस्थ-तटस्थ, बेडर दृष्टिच एकदम डॉक्टरांच्या डोळ्यांत उत्कटतेनें तरंगूं लागे. नि मग त्यांची तासतास कसलीहि तपासणी-शस्त्रक्रिया चालत असे.

कठोर शस्त्रकलेतल्या नैपुण्यामुळें डॉक्टरांचं हृदय कांहीं दगडी झालं नव्हतं; ते माणूसघाणे होते, असंहि नव्हे. तरी पण, त्यांच्या जगांत आप्तस्वकीय म्हणून बोट दाखवण्यासारखी एकहि व्यक्ति तोंपर्यंत आली नव्हती. —कारण एवढंच, कीं, त्यांच्या तोंपर्यंतच्या एकमार्गी महत्वाकांक्षी हृदयांत, भावनाप्रधानतेचा कप्पाकोनाडा तयार झाला नव्हता; त्या एकदेशीय वाढ झालेल्या त्यांच्या मनांत फक्त कर्तव्यकठोरता, अबोल शिस्त, नेकी,...असल्या गोष्टीच नांदत होत्या.

तरी माणसाच्या मनाच्या अद्भुत हालचालींचा नवा प्रत्यय, सुधीरांना त्या प्रथम वाढदिवशीं आला होता. आपल्या साऱ्या दूरच्या महत्वाकांक्षाचं मूर्त यशस्वी स्वरूप पहाण्याचं भाग्य, त्या दिवशीं त्यांना तसं लाभतांच, ...तोंपर्यंत त्यांच्या कल्पनेतहि कधीं डोकावलं नव्हतं, असं एकटेपणाचं तीक्ष्ण शल्य डॉक्टरांच्या हृदयाला असह्यपणें बोचूं लागलं होतं !—

पण म्हणून काय झालं ? —एखादा मनुष्य मोठ्या पदाला पोहोंचतांच,

त्याच्या अगदीं निष्प्रेम आयुष्यांत हाडामांसाचे हार्दिक संबंध एकाएकीं नव्यानें निर्माण होत असतात थोडेच?

३३

योगायोग मात्र दांडगा! 'जीवन-गंगे'च्या त्या पहिल्या वाढदिवशीं सुधीर याच हॉलमध्यें तसे विषण्ण असमाधानी मनानें बसले असतां, एक चित्रकार त्यांना भेटायला आला होता. तो नुकताच डॉक्टरांच्या 'जीवन-गंगे'त साक्षात् मृत्यूशीं झगडून, त्यांच्या शस्त्राच्या प्रेमळ धारेनेंच पुनर्जन्म मिळवून बाहेर पडला होता.

आपल्या चिमुकल्या अनाथ सुधीरसह, डॉक्टरची गरीब आई, एका श्रीमंत घराण्याच्या आश्रयाला कांहीं काळ राहिली होती. त्या हौशी माणसाच्या संग्रहातल्या एका ग्रूप फोटोतून, आपल्या आईचा मुखवटा सुधीरांनी मागें प्रयासानें हस्तगत केला होता. कित्येक दिवस त्यांच्याकडे पडून असलेल्या त्याच फोटोच्या तुकड्याची— तो चित्रकार 'जीवन-गंगे'तून बाहेर पडतांना— डॉक्टरांना सहजासहजी आठवण झाली होती; त्यांनी तो विश्वासानें त्याच्या हातीं दिला होता.

आज तो चित्रकार मोठ्या आदरानें, आस्थेनें, समारंभानंतर सुधीरांना जो भेटायला आला होता, तो त्यांनें तयार केलेलं त्या फोटोचं लाइफ साइज तैलचित्र घेऊनच—

कोण तो त्यावेळचा डॉक्टरांचा आनंद!- अगदीं देवदूतच भासला तो चित्रकार त्यावेळीं, त्यांना; नि त्यांना वाटलं.. आपल्याला प्रत्यक्ष भेटायला,.. आशीर्वाद द्यायला, या मंगलदिनीं, आपली आईच समक्ष स्वर्गातून अचानक खालीं उतरली आहे...

जीवनजी गंगाराम शेठना, हॉस्पिटलला 'जीवन-गंगा' असं डॉक्टरनीं नांव सुचवलं, त्यावेळीं, कोण अभिमान वाटला होता,.. आनंद वाटला होता! पण त्याहून शतपटीनें जास्त आनंद डॉक्टरनाच मनांतल्या मनांत झाला



होता;... शेठजींना तें समजलं नाहीं— सुधीरांचा जीवन-झरा वाढून खळखळत फोफावत पुढं गेला. पण त्या जीवनाची सुरवात गंगेपासून झाली होती. आपली आई—गंगाअक्का—ते बाळपणींच गमावून बसले; पण त्या त्यांच्या हरपल्या छायावरूनच त्यांना हॉस्पिटलला तें नांव सुचलं होतं—'जीवन-गंगा'!—

त्या श्रीमंत शेठजींच्या हें लक्ष्यांत कसं यावं?—

ते दोघेहि त्या एकाच नांवानें सारखेच समाधान पावत, एवढं मात्र खरं!

तेव्हां, तें तैलचित्र त्याच दिवशीं रात्रीं भिंतीवर लटकवून, सुधीरांनी मातोश्रीला आदरानें हार घातला व स्वतःच्या हस्ताक्षरांत त्याच्या शिरोभागीं हळुवार मनानें लिहून ठेवलं —"माझी जीवन-गंगा"

३४

सुधीरांच्या त्या छोट्या खाजगी जगाच्या, तोंपर्यंत ओक्या ओक्या दिसणाऱ्या चार भिंती, त्या पहिल्या चित्रानंतरच सजत गेल्या. त्यांच्या आयुष्याला,...त्यांच्या मनोवृत्तीला, न कळतच, एक नवी कलाटणी मिळाली. त्यांच्या त्या जगांत, मग अनेक वस्तू नि व्यक्ती आल्या-गेल्या; आणि त्यांबरोबरच, डॉक्टरांच्या तोंपर्यंतच्या ओक्या ओक्या, एकलकोंड्या मनांतहि, विविध सुखद-दुःखद प्रसंगांच्या हळुवार संस्कारस्मृती घडल्या-जमत गेल्या.

त्या खोलींतल्या, वरवर निर्जीवपणें पडलेल्या त्या आज दिसणाऱ्या अनेक वस्तू—म्हणजे—त्यांच्या मनांतील पूर्व प्रसंगांच्या स्मृती, पुन्हा प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यापुढें उभ्या करणारीं, तीं प्रभावी स्मृतिचिन्हंच होतीं!.. म्हणूनच...या आपल्या छोट्या जगांत, ज्या ज्या वेळीं ते शिरत, त्या त्या वेळीं,...गतेतिहास भरलेल्या त्या 'पानापानां'तून,...त्यांच्या मनाला—अनेकदां हुरहुर लावणारी, क्वचित् त्याची जाळपोळ करणारी...पण एकंदरीत पाहतां, त्यांना बरंचसं समाधानच देणारी— एक अगदीं न्यारीच वृत्ती लाभे.

आपल्या मातोश्रीच्या तैलचित्राकडे टक लावून पाहिल्यावर, त्यांना अगदी समाधान लाभे; पण लागलीच, त्या समोरच आपल्या पाठीमागच्या भिंतीवर लावलेल्या पोर्ट्रेटकडे त्यांची दृष्टि जाई; आणि त्यावेळीं, त्यांच्या

मनांत येणाऱ्या भावना मात्र मिश्र असत. त्या चित्रांतली करारी डोळ्यांची, प्रेमळ चेहऱ्याची, त्यांच्या आईकडेच जणूं पहात बसलेली... ती स्त्री ! ती दुसरी तिसरी कोणी नव्हती; त्यांना कायमची सोडून गेलेली त्यांची पत्नीच! तरी कां कोण जाणे, आईच्या करुणरम्य डोळ्यांतून त्यांना निर्मळ वत्सल भाव हुडकतां येई. पण आपल्या पत्नीच्या चेहऱ्याकडे पाहतांनां, त्यांच्या मनांत, नितांत प्रेमाबरोबरच इतरहि अनेक मिश्र भावना विद्युत्वेगानें चमकून जात.

आणि कदाचित् त्यामुळेंच असेल, आपल्या पत्नीच्याहि त्या पोर्ट्रेटखालीं, कधींतरी अगदीं बारीक अक्षरांत त्यांनी लिहून ठेवलं होतं—" माझ्या प्रेमाचं कोडं ! "

आयुष्यांत एकमेकांना प्रत्यक्ष कधींच न पाहिलेल्या त्या सासू-सुना, डॉक्टरांच्या त्या चिमुकल्या जगांत, अगदीं अहोरात्र एकमेकींना पहात बसल्या होत्या. त्या प्रत्यक्ष दृश्याचा भास होऊन, कधींकधीं डॉक्टरांना वाटे—"दोघींनाही आवडणाऱ्या आपल्या सुधीरविषयींच, आपल्या डोळ्यांच्या भाषेनं, एकमेकांना प्रश्न विचारीत, त्या दोघी तशा तिथं शांत बसल्या आहेत !"

हो, त्या दोघींच्या सोज्वल दृष्टींच्या कमी-जास्त पखरणीतूनच, सुधीरांच्या खाजगी आयुष्यांतलीं अनेक सुखदुःखं निर्माण झालीं होतीं.

३५

आपल्या पत्नीच्या चित्राकडे पाहिल्यावर, कधीं कधीं डॉक्टरांच्या मनाला एक अज्ञात रुखरुख,' अगम्य जांचणी होऊं लागे !- पण याचा अर्थ, तिनें त्यांच्या आयुष्यांत दारुण दुःखाच्या कसल्या खाचा निर्माण केल्या होत्या, असा मात्र नव्हे. किंबहुना, तिच्याच तर सहवासांत, सुधीरांच्या साऱ्या एकमार्गी रुक्ष आयुष्यांतील , होती-नव्हती ती हिरवळ निर्माण झाली होती.

जात्याच स्वयंकेंद्रित सुधीरांचा अगर त्यांच्या पत्नीचा...कोणाचा का दोष असेल, अगर घडलेल्या चमत्कारिक घटनांचा का प्रभाव असेल, कसं का



असेना -त्यांच्या आयुष्यांत, तिच्यामुळेंच निर्माण झालेली ती हिरवळ, तिच्या जिवंतपणींच थोडीथोडी खुरटत गेली; तिचा पाचोळा झाला !... तिच्या मृत्यूनंतर तर—त्या पाचोळ्यांत एक ठिणगी पडून, डॉक्टरांच्या मनांत, एक नवा धगधगता वणवा भडकला. त्या वणव्यानेंच आपलं कर्तव्यशील आयुष्य तरी होरपळूं नये, म्हणून सुधीरांनी स्वतःला फिरून एकाकी करून घेतलं होतं. त्यांतहि आपल्याला उसंत मिळूं नये, म्हणून त्यांनी बाटलीच्या धुंदींत स्वतःला मध्यें कांहींकाळ बुडवून टाकलं होतं. अधिकाधिक कार्यबाहुल्यांतहि स्वतःला जखडून घेतलं होतं.

वर्षानुवर्ष सुधीर असेच जगले होते; पण आज सकाळीं मात्र, त्या ऑपरेशनच्या वेळीं, त्यांच्या मनानें एकाएकीं भयंकर बंड पुकारलं होतं.

आजच्या एवढ्या भयानक उल्कापाताला तात्कालिक कारण तसं काय घडलं.. हें स्वतः डॉक्टरांनाहि अजून कोडंच वाटत होतं.

ते भानावर आले, तेव्हां पाठीवर हातांत हात घालून, आपल्या पत्नीच्या फोटोसमोरच आपण उभे असल्याचं त्यांना आढळलं. एक सूक्ष्म निश्वास टाकून, जोरजोरानें येरझारा घालायला त्यांनी सुरवात केली.

पण चालतां चालतां त्यांना आठवलं-आईचा तो फोटो त्या भिंतीवर आपण लावला, त्यानंतर चार साडेचार वर्षांनीच, हा समोरचा दुसरा फोटो भिंतीवर चढला. नि त्या दरम्यानच्या काळांत, आपली पत्नी स्वतः प्रत्यक्षच या हॉस्पिटलमध्यें नि अगदीं खुद्द या खोलींतहि सजीवपणें वावरली. हो, या चार वर्षांच्या चिमुकल्या काळांतच, डॉक्टरांच्या "आयुष्याच्या अभिनव कादंबरींतलीं, मानसिक गुंतागुंतीची अनेक प्रकरणं दडलीं होतीं !— त्यांचं तें प्रेमाचं कोडं त्याच काळांत अधिकाधिक गूढ होत गेलं होतं !—

सुधीरांच्या प्रेमचं कोडं !- हो, पत्नीच्या वियोगानंतरच, त्याची खरी जाणीव झाली त्यांना. त्यामुळेंच —दुसऱ्या कोणा स्त्रीनें नव्हे —वारुणीनें मात्र त्यांच्या घरांत हळूंच चोरटं पाऊल टाकलं; त्यांना कल्पना नसतां त्यांना

कवटाळलं; त्यांच्या इतर दृष्टीनें निश्चयी मनाला, पुढें पुढें तर पुरेपूर काबीज करून, मगरमिठी घातली; तिथें सतत अंमल चालूं ठेवला आपला !–

'जीवनगंगे'ची भरभराट झाली; व्याप अतोनात वाढला; तरी त्यांतूनहि, उणीपुरी मिळणारी एकांत-विसांव्याचीं पळं, डॉक्टरांना त्रस्त करीत; आपल्या व्यक्तिगत चिमुकल्या जगांतील भकास विसांवादित्व, अगम्य व न संपणारी हुरहुर त्यांच्या मनांत भरे-- नि अशा वेळींच, आपल्या मनाच्या वेड्या भराऱ्या थांबवून, त्याचे गगनभेदी पंख कापण्यासाठीं, सुधीर सुरवातीला तोंडाला ग्लास लावूं लागले; पुढें तो कृत्रिम उपायच नैसर्गिक होऊन बसला; अगदीं मोठमोठ्या शस्त्रक्रिया करण्यापूर्वी देखील त्यांचा हात बाटलीकडे जाई.– तरी त्यांच्या अब्रूला त्या दिडितपांत एकदांहि काळिमा लागला नव्हता ! नि म्हणूनच, आपल्या त्या भयानक कृत्रिम आयुष्याची त्यांच्या कार्यव्यग्र मनाला, मधें कधीं जाणीव देखील झाली नव्हती !—

३६

पण मग, १ ऑगस्ट १९३९चा तेजस्वी दिनमणी उगवला; नि त्यानें सुधीरांच्या हृदयांत नवाच प्रकाश पाडला—

त्या दिवशीं, पुन्हां त्यांच्या आयुष्यांत, ती एक छोटी क्रांति व्हायची होती —

सँडहर्स्ट ब्रिजवरून, अगदीं दृष्टीच्या अंतापर्यंत पसरत गेलेली, ती मद्यबंदीची अभिनव मिरवणूक ! ती सुधीरांनी प्रत्यक्ष पाहिली: नि त्यांचे डोळे ओले झाले,.. कंठ गद्गदला. नगरपिता नि स्थानिक राष्ट्रीय पुढारी या नात्यानें, त्या मेळाव्यांत सामील होऊन चालतांना, त्यांच्या हृदयाला इंगळ्या डसल्या; लाजेनें त्यांची मान हळूंच खालीं गेली.

आणि सभोंवार पाहातां पाहातां, त्यांच्या त्यावेळच्या भावप्रक्षुब्ध मनांत तीव्र भावना उमटली– "पहा...प्रत्यक्ष डोळ्यानें पहा!- परतंत्र राष्ट्रांतील नव्या स्वातंत्र्य-वाऱ्याची ही झुळुक! एका ध्येयवादी प्रयोगाची ही प्रभावी प्रभा! प्रत्यक्षच



पाहून घे !– लाखो जीवांची ही ठिबक्या-ठिबक्यांची हलती मालिका पहा !– तिच्यातलेच आपण एक आहोंत !- मी एकटा ?..छे.. आपण सारे !.. साऱ्यांसाठीं साऱ्यांनी जगायचं ! आपण जगायचं तें आपल्यासाठीं नव्हे.. साऱ्यांसाठीं, मनाचा पुरा निर्धार करून, स्वैर मन मारून !– दुबळ्या नशेंत धुंद होऊन नव्हे !—"

चालतां चालतां, डॉक्टरांचं तनमन अगदीं पुलकित झालं होतं. त्याच हृदयाच्या प्रभावी परिणामानें भारले जाऊन, सुधीर घरीं परतले;.. कपडे काढून गणूकडे देतां देतां, त्यांनी सहास्य मुद्रेनें निश्चयी घोषणा केली.."गणू, बस्स, माझं ठरलं ! आजपासून माझी बाटली बंद !– आतां तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागणार !– मोह झाला, मी मागितली, अगदीं तुझ्यावर रागावलों–तरी दाद नको देऊं !– एवढं सुद्धां जमत नाही माणसाला, म्हणजे काय ?—"

सुधीरांच्या डोळ्यांत चमकणाऱ्या न्याऱ्या निश्चयानें नि तोंडच्या त्या करारी शद्बांनी, गणूला जितका अनपेक्षित आनंद झाला होता, तितकंच त्याला मनांतल्या मनांत दुःखहि वाटत होतं.

३७

तसं पाहिल्यास, स्वतः गणोबाला तर दारूचा अत्यंत तिटकारा !– किंबहुना त्याला तर तें जगांतलं सगळ्यांत मोठं पाप वाटे. त्याचा बाप त्या व्यसनांतच आकंठ बुडून मेला होता. वडिलार्जित इस्टेटीची त्या व्यसनांतच बापानें अगदीं राखरांगोळी केली होती.

गणूची प्रेमळ आई !– तिनें आपला संसार पुरा पाडायला, साऱ्या आयुष्यभर स्वतःचाच देह चंदनासारखा झिजवला होता ! पण स्वतःचा उभा संसार, स्वतःच्या डोळ्यासमोर जळत गेलेला,–त्या श्रीमंत खानदान घराण्यातल्या लेक–सुनेनें निमूट पाहिला होता; एवढंच नव्हे, तर गणोबाच्या बापानें, त्या भट्टीतच उडवलेल्या चुलीतल्या जळत्या लांकडानें, ती स्वतःहि शेवटीं भाजून निमाली होती; मरेपर्यंत हाल भोगत बिछान्यालाच खिळून पडली होती !—

एक ना दोन !- असल्या अनेक जुन्या कटुस्मृतीच गणोबाला असल्या-मुळें, दारू म्हटलं . कीं त्याच्या अंगावर भयंकर कांटाच उभा राही !—

पण इतकं होतं, तरी देखील, गणोबाला प्रामाणिकपणें वाटे-" आपल्या नानांना मात्र त्यांच्या मनःस्थितींत त्या वस्तूची जास्तींत जास्त आवश्यकता आहे !—"

मनाच्या या रस्सीखेंचीमुळें, गणू कधीं कधीं स्वतःशींच पुटपुटे -" नाना किती थोर योग्यतेचे माणूस !- पण त्यांचा संसार- तो मात्र विपरीत झाला !- आतां उताराला लागलेलं आयुष्य—पण तें सुद्धां कसं भकास !- मन जाळण्या-चाच ते निकराचा प्रयत्न करतात !—" अशी गणूला जणूं त्यांची कींव येई; नि म्हणूनच, ठरल्यावेळीं ग्लास भरून त्यांच्या पुढें करायला, त्याचा तोंपर्यंत हात होत आला होता.

— वर्षामागून वर्षे तशींच गेलीं होतीं !- मग ती ऑगस्टची एक तारीख !- सुधीरांचे ते करारी उद्गार ! गणूला आनंद झाला--- पण अतिशय दु;खहि झालं !—

आकंठ आनंद-' आपल्याला आवडतं असं कांहीं चांगलं, नाना इतक्या वर्षांनीं करताहेत-' म्हणून ! दुःसह दुःख—' नानांच्या आयुष्यांतला उरला-सुरला विरंगुळा आतां कायमचा नाहींसा झाला; तें वैराण वाळवंट पूर्वींहून अधिक रखरखीत झालं !' याचं—

पण पुढें सुधीरांच्या आणि गणोबाच्या निश्चयी कठोरपणामुळेंच,... आतां अगदीं सात वर्षे त्यांचा तो निर्धार टिकला होता !

## ३८

अगदीं योगायोगानें एकदां लाभलेला डॉक्टरांचा नोकरच—गणू !— पण त्यांना तो अगदीं आपल्या पाठच्या भावासारखा वाटे; त्याच्यावर त्यांचा व त्यांच्यावर त्याचा लोभच तसा ! त्यांच्या पत्नीच्या मृत्यूनंतर तर, एखाद्या दक्ष गृहिणीप्रमाणेंच,... तो त्यांची सारी बडदास्त राखी !



एक ब्रिटिश आय्. सी. एस्. विलायतेला परततांना, त्यानें विकायला काढलेली दीडदोन वर्षेच वापरलेली मोटर, स्वस्तांत मिळाली, म्हणून डॉक्ट-रांनी विकत घेतली. तिची अतिशय उत्तम स्थिति पाहून, डॉक्टरांनी त्याच्या-कडे समाधान व्यक्त केलं. तेव्हां हांक मारून, एका तगड्या जवानाची सुधीरांशीं सहज ओळख करून देत, तो कौतुकानें म्हणाला—" त्याचं एकमेव श्रेय.. माझ्या या ड्रायव्हरला... गणपतीला..."

"— मग कृपा करून तुमची मोटर तुमच्या ड्रायव्हरसकटच माझ्या ताब्यांत द्या !"- डॉ. देखील खेळकरपणें हसून म्हणाले होते.

तो विलक्षणच योगायोग ! असल्या क्षुल्लक घटनेच्या दारांतूनच, गणू सुधीरांच्या घरांत,...आयुष्यांत शिरला होता. पण हां हां म्हणतां त्यांच्याशीं तो एकरूपहि होत गेला होता.

पहिल्या महिन्याशेवटीं, डॉ. नी साठ रुपयांच्या नोटा गणूपुढें केल्या; त्यावेळीं त्याचा चेहरा भांबवला होता; मान खालीं घालून, लाजत-चांचरतच गणोबा त्यांना म्हणाला होता—"आपल्याकडेच असूं द्यात ना, साहेब, ते !- लागतील तेव्हां घेईन;- पगार, नोकरी...सारं हवंय् मला ! -पण त्यापेक्षां,... माझं म्हणतां येईल असं,... घर हवंय् आधीं मला !- मी अनाथ आहें, साहेब !"

त्यानंतर, आजपर्यंत जवळ जवळ दोन सव्वादोन तपं गेलीं होतीं; पण '...माझा अमका नातलग मला भेटायला आलाय्',— " चार दिवस घरीं जायला सुट्टी हवीय् मला···" ' शंभर रुपये पाठवायचें आहेत पोस्टानें—' असलं कांहीं गणोबानें कधींच म्हटल्याचं सुधीरांना स्मरत नव्हतं !... त्याचा पगार डॉक्टरनीं कधीं ठरवला नव्हता; त्यानेंही कधीं ठरवून घेतला नव्हता. इतक्या वर्षांत, गणोबानें कधीं डॉक्टरांकडून एक पैसाहि हिशेबानें मागितला नव्हता ! त्यांना उद्देशून, त्यानंतर कधीं, ' साहेब ' हा शब्दच मुळीं त्याच्या तोंडून बाहेर पडला नव्हता.

उलट, कधीकधीं गणू आपणहूनच त्यांना हळूच सांगे—"नाना, चार सिल्कचे शर्ट केलेत् मी !" —"तें कापड फार आवडलं मला ब्लेझरचं;... दोन कोट शिवायला टाकले आहेत !" "...वीस रुपये किरकोळ खर्च झाले माझ्याकडून —".

कपडयांचा भारीच नाद गणूला; पण तसला कोणताच खर्च करतांना, त्याला नानांची आगाऊ परवानगी कधीं लागत नसे !- अगदीं घरांतल्या एखाद्या मुख्त्यार माणसासारखं, आपल्याच अधिकारांत, आपल्याला हवं तें सारं तो आधीं करून टाकी; हातांत आलेल्या नानांच्या पैशांतून आपलीं बिलं परस्पर भागवी; नि मग सहज म्हणून, ओघानें केव्हां येईल तेव्हां, तें तो नानांना कळवी.

तो त्याचा स्वभाव डॉक्टरांनींहि हळूहळूं चांगला ओळखला होता !- म्हणूनच, कधीं कोणत्या बाबतींत, त्याला परवानगी देण्याघेण्याच्या भानगडींत ते कधींच पडत नसत !- सुधीरांच्या साऱ्या घरगुती व्यवहारांबाबत सुद्धां गणोबाच काय तो निर्णय घेई.—

पुढें पुढें तर डॉक्टरांच्या तिजोरीसकट साऱ्या च किल्ल्यांचा घोंस गणोबा-कडेच गेला. आपल्याला व त्याला उगीच हिशेबाची दगदग नको, म्हणून डॉक्टरांनी तीन बँकांत तीन खातीं उघडून ठेवलीं होतीं.– एक स्वतःचं; एक गणोबाचं; नि एक दोघांच्या जोड नांवाचं- घरखर्चासाठीं !—

– त्यांतलीं पहिलीं दोन खातीं मात्र गणोबाला माहीत नव्हती. गणूच्या खातेंबुकांत फक्त जमेच्चीच वर्षांनुवर्षांची यादी होती !—

—पण मग खर्चायला वेळेवर असल्यावर, पैशाच्या बाबतींतलं गणोबाचं कुतूहलच संपे !

गामा–गुंगासारखे नांवाजलेले पहिलवान कधीं मुंबईत आले, तर वेळांत वेळ काढून त्यांच्या कुस्त्या पहायच्या; कधीं कधीं फर्स्ट क्लासांत सिनेमा–नाटकाला जायचं; दिवसांतून दहाबारा वेळां पुणेरी जर्दा नि मोहिनी



घातलेलं रामटेकचं कळीदार पान खायचं; नानांचं जेवण उरकल्यावर, उरलेल्यांतलं थोडंसंच पण साजुक–मिजासदार खायचं–प्यायचं; मन मानेल त्यावेळीं, अगदीं थोडंसंच दूध घातलेला पिवळ्या लिप्टनचा किंवा दार्जिलिंग चहा कडक करून, चाखत चाखत प्यायचा; कधीं बदाम-पिस्ता नाहींतर खजूर-खारीक हौस म्हणून खायची;—याशिवाय, गणोबाला दुसरा कसला नादहि नव्हता !—तें सारं सारं त्याला मिळाल्यावर, पैशाबद्दलहि आणखी कुतूहल तरीं कां वाटावं गणोबाला ?—तो स्वभावच नव्हता त्याचा !

हें सारं कित्येक वर्षं सुधीर पहात आले होते !–मनांतल्या मनांत, त्यांना त्या प्रकाराची मोठी गंमतच वाटे. नि अशावेळीं ते स्वतःशींच म्हणत— "आमचा गणोबा एक राजयोगी ऋषीच आहे !– चाकरीच्या मिषानं एकदां माझ्या घरांत शिरलाय् !... पण निष्काम कर्ममार्गी योगसाधनाच करतोय् बेटा, इथं...!"

सुधीर जगाची नाडी नि त्याचे रोग जाणून, त्यावर उपचार करणारे जगाचे डॉक्टर होते. डॉ. सुधीरांची नाडी जाणणारा नि त्यांचे रोग शोधून त्यावर अहोरात्र उपचार करणारा व त्यांना विरंगुळा देण्याचं क्षणोक्षणीं कौशल्य चालवणारा, प्रत्यक्ष डॉ. सुधीरांचाच डॉक्टर-गणोबा!- असं स्वतः डॉक्टरांनाच अनेकदां वाटे; तो डॉक्टरांच्या घरांत होता, म्हणूनच जणूं, डॉक्टर जगांत वावरूं शकत होते. सुधीरांचं एकाकी खाजगी जीवन, गणूमुळेंच त्यांना सह्य होई; नि त्यामुळेंच त्यांची 'जीवन-गंगा' इतकी सुरळीत चाले.

१९.

त्या त्यांच्या 'जीवन-गंगे'तच आज सकाळीं घडलेला तो ऑपरेशन टेबलाजवळचा भयंकर प्रसंग; एवढ्या दीर्घ काळच्या धंदेवाईक असामान्य नावाला काळिमा आणणारी, अब्रूचा बभ्रा उडवणारी ती त्यांची घातवेळच होती ! त्या आठवणीनें, डॉक्टरांच्या मनाची आतांहि फिरून चलबिचल होऊं लागली होती.

आपल्या मनांतील त्यावेळच्या भयानक झगाड्याचा, ते जितका जितका खोल विचार करूं लागले, तितका तितका त्यांचा अधिकच गोंधळ उडत होता; फिरफिरून ते स्वतःला विचारत होता.." खरंच, असं का घडलं ? - आजच असं का घडलं ? ..."

वर्षानुवर्ष निर्धारानें दाबून ठेवलेली नशेची तीव्र इच्छा ? पण पिणं सोडल्यापासूनच्या मधल्या सात वर्षांतहि, त्यांनीं जोखमाचीं हजारों ऑपरेशन्स केली होतीं ! त्या तरुणानें ऑ. हॉलजवळ दिलेली त्याची ती गोड बातमी, कां कोण जाणें, त्यांना थरथरवून गेली होती. पण ती मुलगी तर त्यांची रक्ताची नव्हेच, पण नुसती ओळखीचीहि नव्हती. ॲपेंडिक्सचं म्हणजे तर कांहीं गुंतागुंतीचं ऑपरेशन नव्हे; आजपर्यंत त्याप्रकारचीं हजारों त्यांच्या हातून यशस्वीपणें पार पडलीं होतीं.

मग ? ? ...कां, असं कां घडलं ? नि आजच कां...??

४०

केवळ अज्ञात असा मानवी मनोधर्म !... हेंच त्यांचं थोडक्यांत उत्तर !

त्यामुळेंच, दोन विसंगत गोष्टी एकाच वेळीं एखाद्याच्या हातून, घडतात. स्वतःची इच्छाहि नसतां एकीवरून दुसरी, तिला धरून तिसरी...चौथी गोष्ट आठवते;...नि मग मन थोडं नबळं झालं,... अस्थिर, बेबंद झालं,...कीं, प्रत्यक्ष न समजतांहि, प्रत्यक्ष सृष्टि सोडून तें कुठंतरी लांब भटकत जातं;... त्याचं शरिराचं सुकाणूं भडकतं; आंत वास करणाऱ्या अगम्य चैतन्य शक्तिशीं होणाऱ्या भयानक रस्सीखेंचींत, 'ते पिळवटून निघतं;... क्षणभर तें अगदीं वितळूनच जातं !—

त्या वीशीच्या तरुण बालिकेवरून,.. त्या तिच्या तरुण प्रियकराच्या गोड कबुलीजबाबामुळें,... त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यांतील भूत व भावी अशा अनेक



-प्रत्यक्ष वा काल्पनिक-हजारों दृश्यांचीं क्षणचित्रं-चलच्चित्रं, एकाला एक चिकटून त्यांच्या डोळ्यापुढून सरकून गेलीं.

त्या क्षुब्ध मनःस्थितींतच, त्यांच्या पुढलं त्याक्षणींचं ऑपरेशन ॲपेंडिक्सचं निघालं; शस्त्रकला नैपुण्याच्या अधिकारानें तसलीं हजारों ऑपरेशन्स त्यांच्या आयुष्यांत निर्विकारपणें येऊन यशस्वी होऊन गेलीं होतीं; पण त्यांत न गणल्या गेलेल्या, दुसऱ्यांनीच केलेल्या, त्यांच्या रक्तसंबधीयांच्या दोन ॲपेंडिक्स ऑपरेशनच्या दोन कटु स्मृती, त्यांच्या मनाच्या आंतल्या आंतल्या कप्प्यांत दडी मारून होत्या. त्याच त्याक्षणीं जाग्या झाल्या; नि मग तें सर्वच एकदम प्रक्षोभकपणें वर उसळून आलं; त्यांच्या भूत-भावी व्यक्तिगत (प्रत्यक्ष नि काल्पनिक) आयुष्याचं आल्बमच, कोणा अज्ञात हातानें त्यांच्या पुढें धरावं, नि त्याचीं पानं वाऱ्यानें 'फर्रर्र' करत उडून पुढें पुढें जावींत,... तसंच डॉ. सुधीरांचं सकाळीं त्यामुळें झालं होतं !—

त्यामुळेंच, एका पेशंटचं पोट चिरून आपण ऑपरेशन टेबलाशीं उभे आहोंत, ह्या प्रत्यक्ष गोष्टीची, त्यांना कांही क्षण साफ विस्मृति झाली;... मध्यें क्षणकाळ ते अर्धवट भानावर आले, तेव्हां समोरची फिल्म पटकन् तुटून, थिएटरांत एकदम काळोख दाटावा, त्याप्रमाणें त्यांच्या मनाचा गोंधळ झाला; त्यानें तर अधिकच भांबावून त्यांचा तोल गेला; जमिनीवर निश्चेष्ट पडल्यासारखा भास झाला; अंगाचेहऱ्याला दरदरून घाम सुटला; नि शेवटीं, हतबलपणीं, ऑपरेशन अर्धवट टाकूनच ते टेबलापासून दूर सरले.

पण मनाचा हा असला खेळ मिनिटा-सेकंदाचाच असतो !... नि म्हणूनच, पुन्हा पांच मिनिटांत, ऑपरेशन पुढें चालवून पार पाडायला डॉ. सुधीर सरसावूं शकले.

त्या दिवसाची ती जबाबदारी अखेर तशी यशस्वी होऊन संपली; तीतून मुक्त होतांच, ... सुधीरांना आपल्या व्यक्तिगत गृहांत-आपल्या जीवाला सुखदुःखाच्या स्मृति सदैव सादर करणाऱ्या आपल्या गृह-मंदिरांत-शिरण्याची उत्कट इच्छा झाली.

—सुधीर आपल्या मंदिरांत शिरले;.. नि त्याबरोबरच ते आपल्या मानस-मंदिरांतहि शिरले होते; —तिथें त्यांना आपल्या मंदिरांतले सारे जीव साऱ्या भावभावनांसकट वावरतांना दिसूं लागले होते--

---

२ जीवन-गंगा २

- स्वल्पविराम -


' रघुवीर सामंत सम्पादित
नव्या दृष्टीचें, नव्या धर्तीचें, कलात्मक
=अमर ज्योति वाङ्मय=
आपल्या वाढत्या बाळांसाठीं


जीवन-गंगा

[ काहूर ]

३.

# मानस- मंदिरांतले जीव

## जीवन–गंगा ३ मानस-मंदिरांतले जीव

४१

केवळ डॉक्टर या नात्यानें त्यांना ओळखणाऱ्या कोणी, सुधीरांच्या त्य मंदिरांत आज डोकावलं असतं, तर त्याला दोनच जीव दिसते !—एक... साठीजवळपास पोहोंचलेले,... स्वतः डॉ. सुधीर !-नि दुसरा पन्नाशीचा म्हातारा... गणोबा !—त्यामुळें एखाद्याला वाटावं—"डॉक्टर एकटेच आहेत; .. आतां त्यांचं जगांत दुसरं कोणीच नाहीं !—"

पण त्यांच्या घरांतल्या त्या दुसऱ्या म्हाताऱ्याला कोणी हळूंच आस्थेवाईक-पणें विचारावं; आपले प्रेमळ डोळे त्याच्याकडे रोंखून, अनेक सुखद स्मृतींनी गोंधळल्या शद्बांत तो म्हणेल—"वाः वाः ! कोणी नाही कसं ?- नानांची एकुलती एक मुलगी—लीनीताई आहे ना !- असेल आतां चोवीसएक वर्षांची;...कलकत्त्याजवळ असते शिकायला, लहानपणापासूनच !— मोठी गोड गोड पोरगी; हुशार आहे हो फार !—यंदा आतां मला वाटतं--एम्. ए. लाहि बसायचीय्...किं बसली—"

"लहानपणापासूनच ?–नि डॉक्टरांपासून इतक्या दूर ?–म्हणजे ??"... कोणाच्या असल्या जादा, चौकसपणावर गणोबा बहुधा मुग्धच राहील;...किंवा ती वेळ मारून न्यायला म्हणेल—"अहो, त्याचं असं,—नाना आमचे रात्रंदिवस असे कामांत; घरांतहि बाई माणूस नाही कुणी !- तेव्हां तिकडल्या एका बाईच्या बोर्डींगांत, लहानपणापासून ती रुळलीय् ती रुळलीय्, झालं —"

पण खरं म्हणजे, लहानपणापासून इतक्या दूर, वर्षानुवर्षं लीनी राहिली कां, तें स्वतः गणूलाहि कायम पडून राहिलेलं मोठ्यांत मोठं कोडंच होतं !-



गणूचा सरलमनस्क जीव, आजपर्यंत अनेकदां, त्याबाबत विचार करतां करतां, पुरा भांबावतच आला होता !–

४२

भरल्या घरांतून,...भरल्या संसारांतून लीनीची आई तिला मागें टाकून निघून गेली; त्या चार वर्षांच्या पोरीला संभाळण्याचं काम त्यावेळीं गणूवरच पडलं;–पोरहि जीव लावून घेणारी;...गणूला दुःख वाटे, सुखहि वाटे. सुरवाती सुरवातीला, नानाहि त्यांच्या पोरकट खेळांत सामील होत. गणूला दुःखांत सुख वाटे !—

पण मग महिन्याभरानंतर एकाएकीं काय झालं, काय ठरलं,...कोण जाणें !...नाना एका संस्थानिकाचं ऑपरेशन संपवून, उ. हिंदुस्थानांतून आले; बरोबर एक प्रौढ प्रशांत चेहऱ्याची विधवा;...तिच्याशींच नाना बोलत होते, आल्यापासून ! गणू तर प्रथम थोडा चमकलाच !...तेवढ्यांत, तिनें लीनीला जवळ घेतलं; ती तिच्याशीं खेळली...हसली; मग सुधीरांचं–तिचं तास दोन तास कांहीं बोलणं झालं !—

शेवटीं, त्यांचं इंग्रजींत कायसं ठरलं; नि नानांनी गणूला संध्याकाळीं हांक मारून सांगितलं–"अरे गणू, या नीलादेवी चौधरी;– यांच्या बालिका-श्रमांत जायचीय् आपली लीनी, राहायला–शिकायला !– मोटरची साफसुफी, पेट्रोल, आतांच पहा;.. पाहांटेला त्या दोघांना घेऊन जायचंय् तुला कलकत्त्या-कडे !– लीनीला तिथला लळा लागे तों तूं चार सहा दिवस रहा, जरूर तर–"

त्या बातमीनें गणू दचकला; रात्रभर तळमळला. नानाहि जागेच होते ! पाहांटे, लीनी झोंपली असतांच, तिला उचलून, त्यानें मोटरकडे चालवली. नाना नाइटसूटमध्यें पटकन् पुढें आले. नीलादेवींना निरोप देऊन, पुढें मोटरकडे त्या गेल्यावर, नाना गणूजवळ आले. त्याच्या हातांवर शांत झोंपलेल्या लीनीकडे पाहून, त्यांनीं तिच्या कपाळा–ओठांचीं हळूच चुंबनं घेतलीं; तिच्या-कडे, गणूकडे एकदां पाहिलं; नि त्याला तिला घेऊन जाण्याची खूण केली. ते

हळूच म्हणाले.. 'संभाळून रे '- पण किती जड, खोल शब्द ते;—जणूं एखाद्या गुहेंतून आल्यासारखे !- गणू मग खोलीबाहेर पडला; तेव्हां त्याला नानांच्या दबलेल्या हुंदक्यांचाहि अस्पष्ट आवाज आला !—

लीनीला फसवून, गणूनें आठवड्यानें कलकत्ता सोडलं; परततांना, डोळ्यांत सारखं पाणी सांचे; म्हणून नेहमीं बेफाम हांकणाऱ्या गणूनें, येतांना मैलन् मैल,...मोटर अगदीं दुसऱ्या गिअरमधेंच चालवली होती. कित्येकदां तर नाइलाजानें एखाद्या झाडाखालीं अर्धाअर्धा तास ती थांबवूनहि ठेवली होती.

आणि त्याच वेळीं, 'जीवन-गंगे 'तून लीनी जी एकदां गेली होती, ती अगदीं आजपर्यंत; इथें कांही कधीं परतली नव्हती ! —

## ४३

त्या पहिल्या चिमुकल्या लीनीच्या स्मृतिचित्रांनंतर, सात आठ वर्षांची लीनी त्याला दिसूं लागे—तिला मुद्दाम पाहायला नाना गणूसह मोटरनें कलकत्त्याला गेले होते. मग ती बारा-तेरा वर्षांची असतांना तार आली; ती फार आजारी असल्याची !.. त्यावेळचा नानांचा तो गोंधळलेला चेहरा;. गणूनें विद्युत्वेगानें नेलेली मोटर;...तिकडच्या प्रसिद्ध सर्जननें केलेलं तिच्या पोटाचं ऑपरेशन;... स्वतः एवढे मोठे नांवाजलेले सर्जन, . नाना; पण त्यावेळीं पडद्याआड राहून, ते मुळुमुळुं अश्रू ढाळत होते !...तेंहि गणूनें पाहिलं होतं...

मग आणखी दोन वर्षांनी लीनी मॅट्रिक झाली; तेव्हां,...नाना तिला घेऊन हिंदुस्थानांत व काश्मीरांत फिरले; गणू होताच मोटरवर; तिकडून परतल्यावर, नानांचा उत्साह आठवडाभर मावळला होता !—हॉलचे दरवाजे बंद करून, आपला फावला वेळ, नेहमीपेक्षां अधिक धुंद होऊन नि सुन्न मनानें ते घालवीत !...इंटरमध्यें लानी पहिल्या वर्गांत आली; त्यावेळीं, आलेली तार घेऊन 'गणू ! गणू '...करीत, नाना स्वतः स्वयंपाकघरांत शिरले होते !... ती मग बी. ए. झाली;...तेव्हां शेवटीं न राहवून, गणूनेंच डॉ. ना आग्रह



केला—" नाना, लीनीताईंना बोलवा ना मुंबईला !—मोठेपणीं कधींच इथं आल्या नाहीत त्या !—" पण सुधीरांनी अगतिक त्रस्त चेहरा केला; ते त्यावर होय-नाही कांहीच बोलले नाहीत !—

## ४४

'लीनी !- नानांची एकुलती एक मुलगी ! पण आजपर्यंत कधींच इकडे आलीं नाहीं !—'

" हें सारं असं का ? ' गणूला कधींच उलगडत नसे तें कोडं !- त्याला वाटे-" नाना लाख माणूस !- वहिनी इतक्या प्रेमळ !- लीनी तर निष्पाप पोर !- पण मग सारं असं विपरीत व्हायला झालं तरी काय असेल ?-"

सरळ नानांनाच तें विचारण्याची तर छाती नाही !- शेवटीं, तें कोडं तसंच अर्धवट सोडून,.. घरांतल्या, आपल्या चालू घटकेच्या कार्यांत, तो पुन्हां मग्न होई.- 'कांही का असेना,.. नाना आहेत त्या स्थितींतच, ते जास्तीत जास्त सुखी कसे होतील तें पाहाणं, हेंच आपलं कर्तव्य!' असंच त्याला वाटे.

अर्धवट शिकलेल्या गणूचा सुधीरांबद्दलच्या निरपेक्ष सहानुभूतीचा हा अखंड झरा अगदीं न्यारा तर खराच !— पण मग या गणूसारख्या एखाद्या नोकराला, पाहिजे होत्या तरी कशाला या सत्रा पंचायती ?- सुधीरांच्या संसारांत समरस व्हायचं, त्यांच्या लहानमोठ्या सुखदुःखांत आपुलकीनें डुंबून, त्यांच्या-बरोबर स्वतः सुखदुःख करीत सुस्कारे टाकायचे, समाधान मानायचं,.. हें सारं सांगितलं होतं कोणीं गणोबाला ?—

आणि कोणालाहि साहजिक प्रश्न पडावा, कीं, घर सोडून गणू पोटासाठींच बाहेर पडला असेल, सुधीरांकडे चाकरीहि करीत असेल;—पण म्हणून काय त्याला त्याची माणसं नव्हतीं ?-त्याचं घर नव्हतं ?-आल्यापासून कां गेला नाही तो कधीं कुठें ?—

—पण त्यांतच तर गणू-सुधीरांच्या इतक्या आस्थेवाईक आपुलकीच्या संबंधाची सारी खरी गोम होती !—

गणूचं घर होतं;...त्याची माणसं होतीं;...पण त्या घराला, त्या माण-सांना...तीं, नि तो माणसं त्याला, मेल्यासारखींच होतीं! आपलं घर, आपली माणसं, ही कल्पना नानांकडे आल्यावरच प्रथम गणूला अनुभवायला मिळाली होती!—

४५

कोल्हापूरच्या शिर्क्यांची मूळची सधनता;...पण गणूच्या बापानें व मोठ्या भावानें...ती बापजाद्यांची वडिलोपार्जित इस्टेट, दारु-रेसबाजी वगैरे प्रकारें वितळवीत, जमिनीपर्यंत सपाट करत आणली होती.

मधल्या बऱ्याच मुलींच्या पाठीवर, उतारवयांत झालेलं शेवटचं अपत्य; म्हणून व्यसनी बापाला, तर तो दृष्टीसमोर नको!– पण उलट, आईची सर्वांत जास्त माया त्याच्यावरच!– असला आईचा लाडका नि बापाकडून दुर्लक्षिलेला, सुखवस्तू घरांतला मुलगा, गणू! वास्तविक, लहानपणींचं साफ बिघडून जायचा!—

पण घरांतल्या प्रत्यक्ष व्यसनबाजीच्या त्या दृष्यांनी, त्याच्या बालमनावर इतका भयंकर परिणाम केला, कीं, त्याला त्या वातावरणाचा मनस्वी तिटकाराच-उत्पन्न झाला!.. तो स्वतः व्यसनी, बिघडलेला होण्याऐवजीं, त्याला एक निराळंच व्यसन मात्र लागलं!– तें म्हणजे, तालिमबाजीचं;– शरीर कमावण्याचं नि खुराक खाण्याचं!– या तालमीच्या नादानेंच, शेवटीं, गणूनें इंग्रजी तिसरी-चौथीतून शाळेला कायमचा रामराम ठोकला.—

घरांतली आवक.. एकमेव झारा म्हणजे उरल्यासुरल्या टिकून राहिलेल्या तुटपुंज्या वडिलार्जित शेतवाडी उत्पन्नाचा!– पण खर्चाला तर बापाच्या नि मोठ्या लेकाच्या हजार व्यसनांच्या हजार वांटा फुटलेल्या!– त्यामुळेंच वैतागून, गणूचे व्यसनी बाप-भाऊ वड्याचं तेल वांग्यावर काढीत!–घरांतल्या टंचाईला कारण-गणू, त्याची कुस्तीबाजी, त्याचा बदाम-पिस्त्याचा नि खारकांचा खुराक, वस्तादाच्या तालमींतले त्याचे निरुद्योग्यांचे अड्डे!...असं



ठरवून, ते उठतां बसतां त्याची हजेरी घेत –त्याला अर्वाच्य शिवीगाळ करीत!...

त्या दोघांपैकीं कोणाबद्दलच, अणुभरहि आदर मनांत नसतां, प्रथम प्रथम, लहान म्हणून गणू तें निमूट ऐकून घेई;...पण शेवटीं,...एका कुस्तीवरूनच त्यानें घरांतहि दंड थोपटले!..

४६

त्या दिवशीं, गणूनें एक चुरशीची कुस्ती जिंकली. मिळालेला दहा रुपयांचा लफ्फेबाज गुलाबी फेटा बांधून, गळ्यांत दोस्तांनी घातलेल्या फुलांच्या माळा मिरवत, दोस्तांच्याच खांद्यावरून, तो वाजतगाजत घरीं आला. पण तो घरांत शिरतांच, कौतुकाऐवजीं, त्याच्या कुस्तीबाजीवरून घरांत कडाक्याचं भांडण झालं!-गणूचा पुरा विरस झाला.-—

तो एकदम तिरमिरला; नि ओरडून म्हणाला-“ तुमच्या साऱ्या व्यसनां-पेक्षां नि दारुपेक्षां, माझं थंडाईचं नि तालमीचं व्यसन बरं!–मी तुम्हाला नको असेन तर हा चाललों घरांतून!–” आणि त्या झटक्यांतच, त्यानें घराला रामराम ठोकला;.. नि तो तालमींत राहायला गेला!—

पण बिछान्यावर खिळून पडलेल्या गणूच्या आईनें, डोळ्यांत पाणी आणून, शेजाऱ्यांकरवीं त्याला निरोप पाठवला–घरीं येण्याची शपथच घातली. गणू विरघळला; आईसाठीं नाक मुठींत घेऊन परत फिरला. तरी आल्या दिवसा-पासूनच पुन्हां घरांत कुरबुर–धुसपुस सुरुं!—

घर, आई, कुस्त्या सारं एकाच वेळीं जमायचं नाही, हें त्याला कळून चुकलं!- आईवर तर गणूचं फार प्रेम.. ‘तिच्या शुश्रूषेसाठीं कांहीं झालं तरी घरीं राहायचंच!’- या विचारामुळें, भावविवशतेनें, तो आईच्या अथरुणाशीं गेला. तिचे पाय धरलेन् आणि म्हणाला-“आई.. तुझ्यासाठींच फक्त, घरांत आलोंय् मी!- माझ्यामुळेंच या साऱ्यांना नि तुला त्रास होत असेल, तर ऐक; आई... तुझ्या पायांची साक्ष,... अगदीं या क्षणापासून, कुस्ती नाही खेळणार

मी ! जन्मात कधीं–तांबड्या मातीनें अंग नाही माखवणार !––"

पण ज्या आईसाठीं, गणूनें जणूं सर्वस्वाचा त्याग केला,... असिधारा-निश्चय केला, ती आई, त्याला त्यानंतर महिना दीडमहिनाहि लाभली नाहीं !––

४७

घरांतला एकुलता एक जिव्हाळ्याचा पाश तसा एकदम नाहीसा झालेला; बाहेरचा एकुलता एक नादहि संपलेला; शाळा नाही, धंदा नाही; असा निरुद्योगी गणू घरांत !– साऱ्यांच्या, वेळीं अवेळीं टोंचक्या बोलण्याला निमूट तोंड देत, सकाळसंध्याकाळ घांस गिळायची त्याच्यावर पाळी येऊ लागली होती. पण आई गेल्यामुळें, पहिलें कांहीं दिवस सुन्नच होऊन, घरांतल्या तसल्या जळफळाटांतहि, गणू तें निमूट सहन करीत आला होता.

तरी पण, माणसाच्या सहनशक्तीलाहि मर्यादा असतात. सुरुंग खूप ठांसला गेला, कीं, स्फोटाच्या वेळीं त्याचा भयंकर धडाका उडतो.

एके दिवशीं, फारा दिवसांनीं कुस्त्यांचा जंगी सामना पाहून, गणू जरा उशीरांच घरीं पोहोंचला. बाप, भाऊ, वहिनी साऱ्यांनी त्याचं स्वागत केलं– "हं,.. हे आले मवाली, नंदीबैल !- नुसते खायाला काळ !!"

बाप तर आकंठ नशा करूनच पडला होता; मोठमोठ्यानें ओरडत होता; मोठा भाऊ धुंद मगरूरींत होता; वहिनीबाई, मधून मधून त्यांच्या बोलण्याला सांथ करून गणूला खाऊं कीं गिळूं करीत होती. नि थोडावेळ, साऱ्यांचंच निमूट ऐकत, गणू चारदोन घांस गिळण्याचा प्रयत्न करीत होता.

पण शेवटीं, तें अगदीं असह्य होऊन तिरमिरत, गणू जेवण अर्धेच टाकून ताडकन् उठला; नि कांही एक न बोलतां, आपल्या उष्ट्या हातानेंच, बडबडणाऱ्या दादाच्या श्रीमुखांत, त्यानें खाडकन् एक भडकावून दिली; कोटटोपी अंगावर चढवून, त्या जोसांतच, तो बाहेरच्या दारांत जाऊन उभा राहिला.



४८

त्या अनपेक्षित प्रकारानें मात्र, घरांतल्या साऱ्यांचीच धुंदी क्षणभर एकदम उतरली. तिथली क्षणापूर्वींची मग्रूर बडबड थंडावली; एकदम सारं सामसूम झालं !–

गणू तर रागानें कधीं नव्हता इतका लाल झाला होता. एक पाऊल बाहेर व एक पाऊल घरांत ठेऊन, तो मोठ्यानें गरजला–"झालांत ना आतां जागे, दादा ?- आतां आपल्याला अधिक कांहीं बोलण्याचं कारणच नाहीं उरलेलं !- वट कशाला हवी होती एवढी ?. मी निमूट ऐकायचा.. म्हणजे काय तुम्ही कोणी मला भीक नव्हतां घालत,... चार तुकड्यांची !– मला मारे कामधंद्यांच्या गोष्टी सुनावतां; पण तुम्ही कोणी काय केलंय् आयुष्यांत असं ?– आमच्या बापजाद्यांचीच तर सारी इस्टेट !- तुमच्या इतकाच माझाहि हक्क आहे तिच्यावर !– पण पण, हे पहा माझे पिताजी !– कसे गटारांत लोळताहेत ते ?– त्यांनीं आपल्या साऱ्या आयुष्यांत पुरुषार्थ दाखवला तो एकच !– लोकांची टवाळी करत, साऱ्या लहान मोठ्या व्यसनांत––घरापोरांचं वाटोळं करीत, आजोबा-पणजोबांनीं मिळवून ठेवलेलं वैभव, ऐदीपणें मोडून खायचं!– माझ्या साध्वी आईला मारहाण करून, हाल हाल करून, अगदीं जिवंत जाळली त्यांनीं !– जणुं बेचाळीस पिढ्यांचा असा उद्धार केला !"

गणूच्या त्या अनपेक्षित भडिमारानें बापाची तर दांतखिळीच बसली. वहिनी कोपऱ्यांत उभी राहून आपल्या नवऱ्याकडे चोरासारखी अधूनमधून पाहात होती !– गणूचा दादा खालीं मान घालून गाल चोळीत होता !–

थरथर कांपत, गणू पुन्हां संतापानं कडाडला––"आणि हे आमचे दादासाहेब !– बायले बेअक्कल कुठले ! ... आपल्या वडिलांना अगदीं शोभणारे असे त्यांचे सवाई चिरंजीवच !– त्यांची सारीं व्यसनं पचवलींत तीं पचवलींत;...नि तीं पुरी पडलीं नाहींत, ...म्हणून उरलं सुरलं रेसचंहि आणखी एक अधिक केलंत!–तेव्हां माझ्या हिश्श्यावर डोळा ठेऊन, तुम्ही नि वहिनींनी माझ्याशीं वैर कां धरूं नये ?"

त्याच्या त्या साऱ्या अचानक आवेशानें, गणूचा दादा पुरा सुन्न झाला होता; गोंधळला होता. नेहमींची दादागिरी करण्याची त्याच्यांत आज ताकदच उरली नव्हती. तरी पण तो कांहीतरी अडखळत बोलण्याचा प्रयत्न करणार—इतक्यांत गणूच पुन्हा रागानें ओरडला—"पण मग... खा ना!–खुशाल खा सारं! माझी आडकाठी नाहीं!–नाहीं तरी, या घरांतलं असलं मेलेलं मिंधं अन्न खायला, आहे कुठें हा गणू यापुढं तयार?...उरलेलं बापजाद्यांचंच स्वतःला नि बाबांना तरी पुरवा आयुष्यभर, म्हणजे झालं!– आज हा मी शद्ब देतोंय् तुम्हाला माझा, दादा! तुमच्या नात्यावर किंवा तुमच्या पै-पैशावर देखील हक्क सांगायला,...गणू पुन्हां कधींच घरीं परतणार नाही!–आई गेलीच!– आतां या साऱ्या कुटुंबाशीं पाण्याच्या घोटापुरताच नव्हे–अगदीं या खरकट्या हातावर पाणी घेण्याइतकाहि,.. संबंध ठेवायची इच्छा नाही मला, या क्षणापासून!—"

४९

तसा खरकटया हातानें, त्या दिवशीं, गणू घरातून बाहेर पडला तो पडलाच!– तें खानदान कुटुंब त्या ढबघाईतहि तसं अन्नाला महाग नव्हतं; पण त्याला तशी लाथ मारून बाहेर पडून, आपल्या रोजच्या भाकरतुकड्यासाठींहि खूपखूप वणवणायचंच गणूनें आनंदानें पत्करलं.. सत्रा धंदे, सत्रा लटपटी करून, त्यानें पोट भरलं; त्यांतच मोटरचं चाक योगायोगानें त्याच्या हातीं आलं;- आणि त्या योगायोगातूनच, शेवटीं, गणू डॉ. सुधीरांचा ड्रायव्हर झाला!—

पण तेव्हांपासूनच, प्रेमासाठीं भुकलेल्या गणूच्या मनाला, कां कोण जाणें, अगदीं नैसर्गिकपणें वाटूं लागलं—"हेच आपले खरे दादा!– हेंच आतां आपलं घर!!"

— आणि म्हणूनच, अगदीं आस्था–आपुलकीनें, गणू सुधीरांच्या आयुष्याशीं हाहां म्हणतां समरस होत गेला होता; –त्यांच्या आयुष्याचं नेहमीं सूक्ष्म निरीक्षण करीत आला होता!–

यामुळेंच, नानांबद्दल गणूला उत्कट सहानुभूती वाटे; मनांतल्या त्या



खरुखीमुळेंच, त्यानें साक्ष केलेल्या सुधीरांच्या आयुष्यांतील सुरवातीपासू-नच्या साऱ्या प्रसंगांचा, कधीं कधीं गणू मग धांवता आढावा घेई.

५०

सुधीरांबरोबरच 'जीवन-गंगे'च्या नव्या कोऱ्या इमारतींत तो शिरला होता; या हॉलमधल्या वस्तूंची पहिली मांडणी त्यांच्याच हातची. त्यावेळीं, सुधीर एकटेच नि एकाकी; त्यांना ना कसलं व्यसन, ना कसला पाश, ना कुठं जाणं येणं; केव्हांहि कुठल्या तरी वॉर्डांत, ऑ. टेबलाशीं, नाही तर आपल्या लेबॉरेटरींत ते आढळायचे; पूर्वींच्या एक–दोन रंगेल विलासी साहेबांच्या आठवणी होऊन, गणूला सुरवातीस त्यांच्याबद्दल आश्चर्यहि वाटायचं!–

मग दीडदोन वर्षांनी 'फीमेल वार्ड' झाला; एक नवी डाक्टरीण नेमली गेली. तिच्या गोड प्रेमळ स्वभावानें गणू सुखावला. आणि कां कोण जाणें, एखाद्या कादंबरीकाराप्रमाणें त्याला राहून राहून वाटूं लागलं–" हीच नानांची नायिका!– आतां तरी बदलतील का ते? पडेल का पाटल त्यांच्या एकलेपणांत?"—पण तीन वर्षं तसंच त्याच्या अंगावरून सुनं गेलं; गणू निराश झाला,

डॉ. आपल्या लॅब. मध्यें, पूर्वींपासूनच, सूक्ष्मदर्शक–यंत्रांला डोळा लावून, तासन्‌तास संशोधन करीत बसत. नवीन डॉक्टरीणबाई आल्यापासून, त्या त्यांना त्यांत मदत करीत; त्यामुळेंच त्यांचं डॉक्टरांकडे येणंजाणं!— अशा-वेळीं गणूचं हें कुतूहल पराकोटीला भिडे —त्यांत कसला छचोरपणा आचरट-पणा नसे; नानांचं एकलकोंडं आयुष्य बदलावं, तें अधिक खेळकर, आनंदी, गोड व्हावं, हीच त्याची त्यांत तीव्र इच्छा!— आणि म्हणूनच, तीं दोघं लॅबमध्यें असलीं कीं, गणू बाहेरून हळूंच दाराला कान लावून, आंतलं बोलणं उत्सुकतेनें चोरून ऐके. पण शेवटीं जाडेजुडे इंग्रजी शद्बच कानावर पडत; फटीतून गंभीर चेहेरे दिसत; नि त्याची दर खेपेला निराशाच होई. नानांच्या त्या अरसिकपणाचा गणूला मनांतून खूप संतापहि येई; नि निराश व ओशाळ्या मनानें तो मागें फिरे!—

५१

मध्यें दीड वर्ष गेलं; पण अखेर डॉ. गृहस्थाश्रमी झाले; गणूला एकदांची प्रेमळ वहिनी मिळाली.

मग सुधीर, पत्नीसह महिनाभर उ. हिंदुस्थानांत फिरले, गाडीवर गणोबाच होता. तें नवं जोडपं, रस्ता सोडून, रानावनांत, हातांत हात घालून, दूर दूर स्वैर फिरे; त्यावेळीं, मोठ्या उत्सुकतेनें, मोटरच्या पायरीवर बसल्या बसल्या, लांबूनच तें पाहात, गणूचा तासतास क्षणासारखा निघून जाई. त्या एकट्या जीवाला तेवढंच एक सुखसमाधान !–

घरांत अशी नानांची गृहदेवता आल्यावर, गणोबाला मायेचा नवा आसरा झाला; आपल्या दादावहिनींचा धिक्कार करून घराबाहेर पडल्यापासून, गणूला साऱ्या आयुष्यांत त्याच वेळीं हायसं वाटलं होतं; प्रथमच कृतकृत्य वाटलं होतं !

मग वर्षभरांत, कमलिनीचा जन्म, घरांतला नवा गोडवा !— गणूच्या प्रेमळ मनातल्या नि सुधीरांच्या घरांतल्या आनंदाचा तो अगदीं कळसच !...

पण इथूनच त्याच्या विचारांच्या गाडीला एकदम ब्रेक बसे;.. ती घसरगुंडीला लागे—

त्यानंतर, कां कोण जाणें, वातावरण हां हां म्हणतां गढूळ होत गेलं. ती मधलीं अडीच तीन वर्षे— त्याला न समजणाऱ्या— अनेक गूढ प्रसंगांनी भरलेलीं होतीं.

नवराबायको दोघंहि चांगलीं शिकलेलीं.. दोघंहि उमद्या स्वभावाचीं... नि तरी असं कां व्हावं; तें त्यामुळेंच गणूला समजत नसे !— मग वहिनींचा आजार;.. नि शेवटीं त्यांचा दुःखद मृत्यू.

गणूच्या डोळ्यांत टचकन् पाणी उभं राही. नि त्यांत त्यावेळची तीन वर्षांची लीनी दुडदुडुं धावूं लागे.

लीनी नीलादेवींकडे शिकायला गेल्यावर तर नाना पुरे एकाकी !.. गणूचा तेवढा घरांत...



नानांच्या या आयुष्यानें.. दोनदां परस्पर विरोधी कलाटणी खाल्लेली गणूनें पाहिली होती. एकदां त्यांचं लग्न झालं त्यावेळीं; नि पुन्हां वहिनींच्या मृत्यूनंतर !— पण लग्नापूर्वीचे एकलकोंडे नाना नि पत्नीच्या मृत्यूनंतरचे एकाकी नाना !— अगदीं विभिन्न व्यक्ती होत्या, त्या !— त्यांत पुन्हा सात वर्षांपूर्वी ऑगस्टमध्यें नानांनी केलेल्या त्या निर्धारानें, त्यांच्या कडवटपणांत अधिकच भर तेवढी पडली होती.

यामुळेंच, गणूचा संशय अनेकदां दाट होई–" वहिनींमुळेंच कां सुटलं हें नानांच्या आयुष्यांत वादळ ? " पण नानांच्या दुःखाला त्या कारण होतील, हें त्याला शक्य वाटत नसे !– " कमलिनीच्या जन्मानंतरच कां बरं हें भयद अभ्र-पटल यावं ? "–तिथंहि त्याची मति कुंठित होई.

वर्षानुवर्षे, त्याचे विचार इथंच येऊन थांबत; साध्या धोपटमार्गी अशिक्षित गणोबाला—त्या सुशिक्षितांच्या संसाराचं...नानांच्या आयुष्यांतलं प्रेमाचं कोडं कधींच सुटलं नव्हतं !–

५२

पण मग, स्वतः सुधीरांना तरी तें कुठें पुरं सुटलं होतं ?– तेंहि तसे त्रस्त झाले, कीं, या हॉलमधल्या वस्तूंच्या नि चित्रांच्या गराड्यांत, असेच...अर्धवट वेड्यासारखे फिरत; नि गतस्मृतींच्या आधारें खोल शिरण्याचा नवा नवा प्रयत्न करीत.

ऑपरेशननंतर हॉलमध्यें शिरल्यापासून, कमरेवर हात घेऊन पाईपमधून धुराचे फवारे सोडीत, येरझारा घालतां घालतां, आज देखील डॉक्टरांचं कितीतरी वेळ सारखं असंच चाललं होतं ! भानावर आले, तेव्हां नकळतच आपण कमलिनीच्या फोटोसमोर येऊन उभे असल्याची त्यांना जाणीव झाली—

त्या फोटोंतली, सात आठ वर्षांची दिसणारी लीनी...आतां चांगली तरुण स्त्री झाली होती; विदूषी झाली होती; तिनें ऑनर्ससह पदवी घेतली, त्याच वर्षी, सुरुं झालेल्या देशभरच्या बेचाळिशी लढ्यांमध्यें ती गुप्त झाली

होती!...आतां ती नुकती वर्षापूर्वीच काय ती पुन्हां प्रकट झाली होती;... त्या नंतरच्या तिच्या त्यांना आलेल्या पांच सहा पत्रांत आढळणारी तिची ती बुद्धीची चमक, देशप्रेमाची तळमळ;...त्यांची छाती त्या त्यावेळीं क्षणभर अभिमानानें फुलली होती.

सुधीरांचा त्यामुळेंच आज पुन्हां एक नवा गोंधळ उडाला; कारण ?– त्याच तिच्या पत्रांतला तो पुन्हा पुन्हा होत आलेला एका गोष्टीचा उल्लेख !– मनांतल्या त्या नव्या गुंतागुंतीला दडपण्यासाठीं, त्यानीं नवीन पाईप भरला, तो शिलगावला; नि ते निजायच्या खोलीजवळच्या बाल्कनीपासची डेकचेअर आपल्या खोलीच्या दाराजवळ ओढून तिच्यावर पहुडले.

त्यांच्या मनांत आज कल्लोळ चालला होता–" केवढी प्रतिष्ठा मिळवली मी बाहेर?...त्यादृष्टीनें सार्थकींच लागलं माझं आयुष्य !–पण या माझ्या छोट्या जगांत ?... कायम सुख कां लाभलं नाही मला कधींच ?– माझ्या–सारख्या क्षुल्लक व्यक्तीच्या एकाच छोट्या आयुष्यांत, सुखदुःखांनी भरलेलीं यशापयशांनी बरबटलेलीं, असलीं अगदीं परस्परविरोधी जगं, कौशल्यानें निर्माण करणारी ही अज्ञात प्रभावी शक्ती तरी कोणती ? "

५३

सुधीरांचं छोटं जग !.. त्याचं व्यक्तिगत खाजगी आयुष्य !—

हॉलच्या त्या बंद दाराकडे पहातां पहातां, त्यांच्या डोळ्यांपुढें तो पहिला प्रसंग तरळला—

मोठं गुंतागुंतीचं तीन तासाचं ऑपरेशन यशस्वी रीतीनें संपवून, अगदीं समाधानानं, ते त्या दिवशीं इथं आले होते. गणूनें आणून ठेवलेला मोठा हार त्यांनी आदरानें आईला घातला; नि त्या कोचावर बसल्याबसल्या, तिच्याकडे पाहतां पाहतां, त्यांची तंद्री लागली होती. जणूं ' शाबास बाळ ! आमचं नांव काढलंस हो !' अशी त्यांना शाबासकीच देत होते, आईचे ते बोलके डोळे.

तेवढयांत, केवढयानं दचकले ते ?.. हॉलचं दार उघडं होतं;... त्यांतून



आंत पाय टाकून, त्यांच्याकडे निश्चलपणें पहात, प्रेमा निमूट उभी होती.

आपल्या एकांतावर कुणी असा घाला घातलेला सुधीरना कधींच परवडला नसता; पण तरी सुद्धां, त्यांच्यातोंडून त्यावेळीं, चकार शब्दहि आला नाहीं !

प्रेमा पांढरं शुभ्र पातळ नेसली होती; पायांत पांढऱ्याच चपला; जरा वर मान करून सुधीरनीं पाहिलं... डोक्याचे केस सैलशा आंबाड्यांत गुंतून मानेवर लोळत होते. वाटाण्याच्या माळेचा एकच सर तिच्या श्यामल गळ्यांत रूळत होता. नि तिचा काळासांवळा चेहरा नि जरा मोठेसेच डोळे,.. सौम्य स्मितानें अगदीं प्रफुल्लित झाले होते.

डॉ. एकदम तसे दचकलेले पाहून, प्रेमा खुदकन् हंसली;... त्यावेळीं आणखी तिची शुभ्र दंतपंक्ति चमकली.

दाराच्या चौकटीला रेलून, किंचित् आंत झोंक घेत, दुसऱ्या हातानें उगीचच आपल्या गळ्यांतली माळ खेळवीत, ती उंबरठ्यावरूनच सुधीरांना म्हणाली–" डॉक्टर, तुमच्या खाजगी खोलीच्या सरहद्दींत, चुकून एक पाऊल पडलंय् ! पण मर्यादेचा उंबरठा अजून सोडलेला नाहीं मी ! अतिक्रमण नाहीं ना झालेलं माझ्या हातून ? अंऽ ? "

सुधीर अधिकच गोंधळले होते; त्यांनीं तिच्याकडे न बोलतांच एकदां नुसतं पाहिलं होतं...

" आहे ना आठवण ! तुम्हीं लॅबवर्कसाठीं बोलावलं होतंत; म्हणूनच आले मी ?– दार उघडलेलं होतं; तुमची अशी समाधी लागलेली ! परवानगी-शिवाय इथपर्यंत यायची आधींच चूक घडलेली; म्हटलं, तुम्हाला जागं करण्याचं आणखी पाप कसं घेऊं डोक्यावर ? म्हणून आपली इतका वेळ गुपचूप उभीच राहिलें दारांत, मागें ! "

" या, या ना आंत, या !" सुधीर म्हणाले; . पण त्याच वेळीं त्यांच्या लक्षांत आलं ' आपली नेहमीची करडी शिस्त त्याक्षणीं साफ बेडापार झाली आहे ! '

५४

पण प्रेमाच्या बाबतींत तरी सुधीर बरेच दुबळे होते. 'जीवन-गंगे'तल्या तिच्या वर्षभराच्या वास्तव्यांतच, तिच्या देखरेखीखालच्या नव्या 'फीमेल वॉर्ड'-मधील शुश्रुषेबद्दल, चोहोंकडे ख्याति होत गेली होती. नि त्याचं सारं श्रेय प्रेमाच्या कर्तबगारीलाच होतं !—

आणि त्या तिच्या कर्तव्यदक्ष कल्पकते-योजकतेमुळेंच, तिच्याशी वागण्याची सुधीरांची पद्धत, आपल्या हाताखालच्या इतर नोकरांहून साफ निराळी झाली होती. लॅबमधल्या प्रयोगांवेळच्या शास्त्रीय वादविवादांतहि, तिची चमकदार बुद्धिमत्ताच सुधीरांच्या अनेकदां प्रत्ययाला आली होती. डॉ. प्रेमा केवळ आपल्या 'जीवन-गंगे'तील नोकर नव्हे; अनेक दृष्टींनी, ती आपल्या बरोबरीची, आपल्या दर्जाचीच वाटे, सुधीरांना !— यामुळेंच,.. स्त्रियांबद्दलची सुधीरांच्या भीरु मनाची नेहमींची भीती...थोडथोडी कमी होऊन, वरिष्ठ-कनिष्ठपणाच्या कृत्रिम वागणुकींत बराच सैलपणाहि आला होता.

तशी प्रेमाहि पक्की चाणाक्ष !— सुधीरांना तिनें पुरेपूर ओळखलं होतं. आपल्याच कर्तबगारीच्या कैफानें धुंद असलेल्या माणसाला, खाजगी जीवनाची फारशी कदर नसते, हें तिला चांगलचं माहीत होतं.— आणि तरी देखील, अलीकडे, मधून मधून संधी मिळतांच, त्यांच्याशीं ती अशी वागत असे !—

तिच्या त्या तसल्या आगंतुक प्रवेशानें, त्या दिवशींहि, डाक्टर गोंधळले ओशाळले ! तिचा तो कायदेशीरपणा नि दिलगिरीप्रदर्शन–सारंच्या सारं लटके होतं, एवढं न समजण्याइतके ते दुधखुळे नव्हते; तरी, मन तसं विरघळून, हातानें समोरचा कोच दाखवीत, ते तिला सहास्य मुद्रेनं म्हणाले–" आंत तर आधींच आलांत ! आतां आणखी परवानगी घ्यायचं काय उरलय् ? बसा..."

तेवढ्यांत, कोचावर बसण्यापूर्वी, एकदां डोक्यावरच्या सुधीरांच्या आईच्या फोटोकडे नि मग डॉक्टरांकडे पहात, एखाद्या संशोधकाचा आव आणून, प्रेमा हसत हसत म्हणाली–"आईचाच ना तुमच्या, हा फोटो, डॉ.?



किती साम्य आहे हो तुमच्या–त्यांच्या चेहऱ्यांत !... मोठेपणाचं लक्षण असतं म्हणतात, मातृमुखी असणं हें !– त्यांच्या ऐन तरुणपणींचा दिसतोय् हा फोटो,... नाहीं ? बघा, तुमच्यासारखेच डोळे आहेत त्यांचे ?– जणूं काय, काहींतरी बोलत असल्यासारखे वाटतात ..."

सुधीर अधिकच लाजले–गोंधळले; अजूनहि उभ्याच असलेल्या प्रेमा-कडे हळूंच वळून पाहात, ते सहास्य म्हणाले– " बरं बरं !– बसा आतां; आपण भेटणार होतों, ते लॅबमधल्या स्लाइडचं पृथःकरण करायला; हॉल मधल्या फोटोचं नि डोळ्यांचं नव्हे !— "

पण त्यांच्या त्या स्वरांत—'आपलं बोलणं त्यांना अप्रिय वाटलं' असा भाव, प्रेमाला किंचित्हि भासला नाहीं. ती मोकळ्या मनानें पुन्हां मोठ्यानें हसली. नि मग बसतां बसतां म्हणाली—" सॉरी हं, डॉ. !...कधीं कधीं मला उगीचच कुतूहल वाटे;...कीं,...तुमच्या आयुष्यांत कोणत्या स्त्रीला स्थानच नसेल का ? आतां मात्र खात्री झाली माझी आज !...तुमच्या आईचा हा फोटो नि मघांचा तो समाधीचा प्रसंग !...तुमच्या आईशीं तरी बोलतां तुम्ही मोकळेपणें म्हणायचं.."

तेवढ्यांत, गणोबानें चहाचं ट्रे आणून पुढें ठेवलं; अनायासें विषय पालटला; पण म्हणून डॉक्टरांना उलट अगदीं हायसंच वाटलं !—

पण त्यानंतर किती तरी दिवस, तो प्रसंग नि प्रेमाचे ते उद्गार सुधी-रांच्या मनांत वारंवार घोळले होते; 'तुमच्या आईशीं तरी बोलतां तुम्ही मोकळे-पणें ? ' खरंच होतं तें ?– पूर्ण जाणतेपणीं जिचा त्यांना एकदांहि खरा सहवास लाभला नव्हता, तीच त्यांची आई !– तोंपर्यंतच्या त्यांच्या मनांतील सुप्त पण उत्कट भक्तीचं एकमेव प्रेमाचं ती स्थान झाली होती !

आणि पुढला हा प्रेमाचा वाढता सहवास नि स्नेह !–तो एकंदरींत सुखद होई, याचीहि डॉ. ना हळूंहळूं जाणीव होत गेली होती-

त्या विचलित मनःस्थितींत, मग ते स्वतःला हळूंच प्रश्न विचारीत—

" आतां ही आणखी एक स्त्री, आपल्याला कळूं न देतां, आपल्या मनांत शिरकाव तर करून घेत नाहीं आहे ना ? "

५५

त्यावरून सुधीरांना त्याच कालखंडातला दुसरा तो एक प्रसंग आठवला—

सुटकेच्या वेळीं, ' जीवन गंगेत ' काम करणारी एक मजूर स्त्री अडली मूर्च्छित झाली; म्हणून शेवटीं 'जीवन गंगेतल्या' शिरस्त्याप्रमाणें, डॉ. प्रेमाचं सुधीरांना बोलावणं गेलं; ते लगबगीनें तिकडे पोहोंचले.

मोठ्या कठीण प्रसंगांत होती ती बाई; दारांत लिफ्टजवळच, तिचीं तीनचार लहानमोठीं ओबडधोबड पण दणकट मुलं; नि त्यांची समजूत घालीत —पण स्वतः कावऱ्याबावऱ्या चेहऱ्यानेंच आंत पाहात—असलेला, तो मळक्या कपडयांतला त्यांचा तो मजूर पिता !—

तेवढया गडबडींत असतांहि, सुधीरांच्या बदलत्या दृष्टींतून तें करुण दृश्य सुटलं नव्हतं !—

मग आवश्यक शस्त्रक्रिया झाली;. आईला थोडा त्रास झाला; तरी मुलाचा सुखरुप जन्म झाला. कांही वेळानें, डॉ. विचारपूशीसाठीं गेले; त्यावेळीं, ती श्रांत होऊन, कॉटवर निश्चल पडली होती. कुशीजवळ तिचं नवं गोडसं तांबडंतांबडं मूल, भोंवतीं चुळबुळणारीं तिचीं इतर सांवळीं मुलं नि तो तिचा रांगडा नवरा !—

सुधीर परतायला दाराकडे वळले; ते तोंडानें डॉ. प्रेमाबरोबर त्या केसच्या पुढल्या शुश्रूषेबद्दल बोलत होते; पण त्यांचा गोंधळलेला चेहरा, नि गडबडलेले डोळे, लांबूनहि तेंच दृश्य अजून पाहात होते.

शेवटीं, त्यांना अगदीं राहवेना; डोळ्यांनीच त्या लांबच्या दृश्याकडे प्रेमाचं लक्ष वेधून, सुधीर कुजकुजले-" तें जिवंत नाटक पाहिलंत, प्रेमाबाई!- माता म्हणजे प्रत्यक्ष देवताच !— नाही ?— स्वतःचा जीव असा अगदीं मृत्यूच्या दाढेंत ढकलून आपल्या गोड बाळांना जन्म देतात !"



डॉक्टरांच्या तोंडून तसले उद्गार !.. म्हणजे नवलच होतं; प्रेमा त्यांच्याकडे आश्चर्यानें पाहातच राहिली !. तेवढयांत, ते आपल्याच तंद्रीत पुढें म्हणाले—" खरंच ?...माझ्या आईलाहि किती त्रास सोसावा लागला असेल माझ्या जन्मवेळीं ?.. पण त्यावेळचा तिचा तो त्याग आतां हवेंत विरला ! ती स्वतःच मुळीं पंचमहाभूतांना जाऊन मिळाली !... आज मी आहे.. मला तेवढे ओळखतात लोक !—माझं नांव गातात !—"

किती भाबडे.. उमदे शद्व होते ते !— प्रेमाला त्याची जाणीव झाली; पण तरी ती हळूंच हसली फक्त..

तें पाहून सुधीर किंचित् भांबावल्या स्वरांत म्हणाले—" कां हो ?. हसलांतशा ?."

प्रेमा अधिकच स्मित करून हळूंच म्हणाली—" विशेष नाही कांही!- एक आपली गंमत वाटली मला —"

' भावनेच्या भरांत, बोलतांना कांहीं चुकलं तर नाही ना आपलं ?' असं वाटून, सुधीर अधिकच गोंधळत म्हणाले—" म्हणजे ? "

" म्हणजे असं— " प्रेमा किंचित् थांबून म्हणाली" --तुमची आई, तिच्या मुलाचा जन्म,.. त्यावेळचा तिचा त्याग,... या साऱ्या कल्पना समजतात तुम्हाला !..पऽऽण.."

ती तुटकपणें मध्येंच थांबल्यामुळें सुधीर तिच्याकडे टवकारून अधिर-पणें पाहूं लागले; तेवढ्यांत प्रेमा पुढें म्हणाली—" पऽऽण.. तुमच्या मुलाची आई, त्याचा जन्म, ...असल्या कल्पना मात्र तुमच्या तरुण मनालाहि कधींच शिवत नाहीत ना, डॉ० ?.. किती एकमार्गी हो तुम्ही ??."

प्रेमानें पुन्हा स्मित केलं; म्हणून सुधीरहि हसले; पण हसतां हसतां, चटकन् ध्यानांत येऊन ते चपापले. त्यांचा चेहरा भांबावला...नि ते झटदिशीं लिफ्टमध्यें शिरले.—

फक्त त्याचवेळीं नाही, त्यानंतरहि, त्या रात्रभर, त्या प्रसंगामुळें व त्या झाल्या संवादामुळें, सुधीरांच्या मनांत एक मनस्वी कल्लोळ उडाला होता!.

त्यांनीं कधींच अनुभवल्या नव्हत्या, असल्या अगदीं नवनवीन भावना, त्यांच्या मनांत उसळत होत्या. त्यांना कधीं नव्हती असली, अगम्य हुरहूर—चुटपूटच लागली होती.

अखेर, चाणाक्ष प्रेमाचं त्यांना त्याबद्दल मनोमय कातुकच वाटलं होतं !-

## ५६

त्याच ओघांत, त्या संक्रमण–दिनानंतरच्या पंधरवड्यांतील दुसरा एक प्रसंग डॉक्टरांच्या डोळ्यांपुढें उभा राहिला.

हॉच त्यांचा हॉल; त्यावेळीं, गणोबाच तो नेहमीं आस्थापूर्वक सजवून ठेवी. पुस्तकं, फर्निचर अगदीं जिथल्या तिथं पडलेलं; मधल्या ओव्हल टेबलावर एक मोठंथोरलं सुंदर फ्लॉवरपॉट; ते नेहमींच रंगीबेरंगी टवटवित फुलांनी भरलेलं !– या टापटीपींत तो आपल्या कल्पनेंतली सारी विविधता नेहमीं आणी.

त्या दिवशीं दुपारीं, डॉ. आपली लायब्ररी साफसूफ करून लावत होते. तोंच, 'आंत येतेंय् हं मी, डॉ.!' असं आंत शिरल्यावरच उच्चारललेल्या प्रमाच्या शद्बांनीं डॉ. जागे झाले.

खोलीभर आपली तीक्ष्ण नजर फिरवीत, कोंचावर बसतां बसतां, आपल्याकडे भांबावल्या नजरेनें पाहात असलेल्या सुधीरांना प्रेमा म्हणांली–" किती सुंदर शृंगारलीय् तुमची ही खोली—"

आपला व गणूचा त्यांत गौरव झाल्यामुळें डॉ. स्मित करीत होते; तेवढ्यांत प्रेमा पुढें म्हणाली–" पण डॉ.! तरी कृत्रिमच वाटतं हो, हें सारं नाही?. भावना असलेले नि भावना खेळवणारे कितीसे जिव वावरताहेत इथं तुमच्या भोंवतीं?.. लाख्खो जिवांना जिवदान देणाऱ्या सुधीरांचीच कां ही रुक्ष खाजगी खोली?"

रोंख न समजून, तिच्याकडे सुधीर पाहात आहेत, तेवढ्यांत, प्रेमा सहास्य म्हणाली–" पाहातां काय असं? खरं तेंच बोलतेंय् मी !– इथं वावरणारे बोलके जिवंत जीव, येऊन जाऊन काय ते दोनच !– एक तुम्ही...नि दुसरे आपले गणोबा !–अय्याऽ.. नाहीं; खरंच कीं ! आणखीहि आहेत कीं ! –या तुमच्या आई...नि टेबलावर बसून गोड गोड हसणारीं तीं अबोल फुलं-!"



तें तिचं बोलणं डॉक्टरना क्षणभर अर्थशून्यंच वाटलं; तरी हसल्यासारखं करत, तिचो थट्टा करण्यासाठीं ते म्हणाले, " पुरे बरं तुमचा बोलकेपणा ! आपल्या डॉक्टरी पेशाला असं शीघ्रकाव्य करणं शोभत नाही.. नि जमायचंहि नाही तुम्हाला तें, प्रेमाबाई !—"

तरी जणुं पिच्छा पुरवायचं ठरवूनच, प्रेमा पुन्हा पटकन् म्हणाली–"मी शीघ्रकवी नाही.. नि हें काव्यहि नव्हे!. डॉक्टर असलें, तरी मी एक स्त्रीच आहें !— अगदीं वस्तुस्थिति बोलतेंय् मी, डॉ. !— तुम्हीच पहा हं हीं.. फुलं.. झाडांवरून गणोबानें उचलून आणलेलीं हीं दुसऱ्यांचीं मुलं !!– गणोबा बळेंच धरून आणतो, म्हणूनच केवळ, तीं या खोलींत येतात;. दोन दिवस निमूट एका जागेवर त्या टेबलावर तुमच्याजवळ बसतात; तुमच्याकडे थोड्या परकेपणेंच पाहून,.. बिचारीं निर्जीव हसतात; नि शेवटीं, कोमेजून जातात—कायमचीं परत जातात !—"

आतां कुठं डॉक्टरांना तिच्या बोलण्याचं धोरण समजलं होतं; तरी ते बळेंच निर्विकारपणाचा आव आणीत होते.

तेवढ्यांत, प्रेमा पुढें हलक्या आवाजात सौम्यपणें म्हणाली—" फुलांचं तें तसं!- नि एवढं मोठं घर तुमचं... पण या फोटोंतल्या आईशिवाय कोणत्या स्त्रीलाहि इथं स्थान नाही !— खरं ना, डॉ. ?"

डॉ. किंचित् दचकलेले प्रेमानें पाहिलं;.. पण तें न पाहिल्यासारखं करून, ती हंसत हंसत, हळुवार आस्थेच्या शद्बांत त्यांना म्हणाली–" कधींच का हुरहुर नाही वाटत तुमच्या मनाला डॉ., याबद्दल?.. किती दिवस चालणार हेंअसं?"

तिच्या त्या तसल्या अनपेक्षित प्रश्नानें सुधीर अतिशय भांबावले; त्यांना क्षणभर स्वतःचाच मनस्वी राग आला;' हिला आपण मर्यादेबाहेर मोकळीक

देत आलों, हें आपलंच चुकलं!' असं त्यांना त्याक्षणीं वाटत होतं!. तरी प्रेमाच्या तसल्या सलगी-आपुलकीच्या वागणुकीबद्दल तिची स्पष्ट कानउघाडणी करण्याची, तिला कोणत्याहि प्रकारें दुखाविण्याची, अलीकडे त्यांना छातीच होत नसे. किंबहुना, त्यामुळें त्यांना आपल्या एकाकी आयुष्यांत थोडं बरंहि वाटत असे!

त्या वेळच्या तिच्या त्या शब्दांतहि, आपल्या मनांत कधीं कधीं डोकावणाऱ्या विचार-भावनांचे पडसादच त्यांना ऐकूं येत होते...!

मनांतला तो सारा गोंधळ लपवण्यासाठीं, सुधीर घाईघाईनें म्हणाले—
" समाजसेवकाला खाजगी आयुष्य नसतं, प्रेमाबाई !- मग हुरहूर कुठं उरली ? माझं जग हें नव्हे;... तें तिकडलं,.. बाहेरचं !- ती खरी माझी जीवन-गंगा !"

प्रेमा त्यावर चाणाक्षपणें गप्प राहिली; पण सुधीरांनी त्यावेळीं ओढून-ताणून आणलेलं तें चंद्रबळ, तिला त्यांच्या चेहऱ्यानें विश्वासघात करून सांगितलं

५७

त्या प्रसंगानंतर, अनेक प्रकारच्या कार्यव्यग्रतेमुळें, डॉक्टरांचे कांहीं दिवस व्यापांत भराभर निघून गेले होते. पण त्यांतूनहि, लॅबवर्कसाठीं ते थोडा वेळ काढीत; नि त्यावेळीं व इतर प्रसंगीं ओझरता मिळे तो डॉ. प्रेमाचा थोडा अधिक सहवास त्यांना लाभत असे. आणि त्या त्या वेळीं, त्यांना जाणीव होत गेली होती, कीं, तोंपर्यंतच्या त्यांच्या एकलकोंड्या जविनांत, त्यांनी पूर्वी कधींहि अनुभवला नव्हता असा व इतका न्यारा असा नवा उत्साहच त्याच्यांत संचारला होता. प्रेमाच्या व्यक्तिगत विचार-भावनांशीं सुधीरांचं, त्यांना नकळतच, अगदीं निकटचं नातं जडत चाललं होतं.

आपल्यांत नकळत घडत असलेल्या या स्थित्यंतराची सुधीरांना मधून मधून जाणीव होई. पण अगदीं एकांतांत—स्वतःच्या मनाला देखील—'एका स्त्रीनेंच तें घडवून आणलंयू' असा कबूलीजबाब द्यायला, त्यांचं स्वयंनिष्ठ अभिमानी मन तयार होत नसे !—



५८

त्या काळांतल्या त्यांच्या तसल्या भांबावल्या मनस्थितींतच, एके दिवशीं एक घटना घडली.. नि सुधीरांचा एकच गोंधळ उडाला.

नेहमी वक्तशीरपणें—अगदीं सेकंदकांट्याबरोबर—कामावर दाखल होणारी प्रेमा, त्या दिवशीं आली नाही; तास, दोन तास, तीन तास,...अगदीं संध्याकाळ झाली; डॉ. बेचैन झाले; शेवटीं, तीन्ही सांजेला कोणीशी चिठी आणून दिली;—घाई घाईनें लिहिलं होतं: " आई आजारी; ...बाहेर येणं अगदीं अशक्य; शक्य होईल तेव्हांच कामावर येईन—क्षमा असावी. "

त्या तुटक चिठीनें सुधीरांचा अधिकच गोंधळ झाला ..." प्रेमाची आई आजारी ! आपल्यासारखा अगदीं निकटचा मोठा डॉक्टर—आपण स्वतः, आपले मोठमोठे डॉक्टर स्नेही,—आम्हीं यावेळीं उपचारांची शिकस्त नसती का केली ?— पुन्हां बाहेरगांवीं कीं मुंबईंतच ?...पण मुंबईंतच म्हटलं,...! तरी प्रेमाचा पत्ता काय ? "

आजपर्यंत सुधीरांनीं त्याची कधीं कदर केली नव्हती. गणोबा मात्र कधीं कधीं तिला गाडीतून रात्रीं बेरात्रीं हॉस्पिटलचं काम पडलं तर घरीं नेऊन सोडी. क्षणभरच त्यांना वाटलं " गणूला विचारावं "...

पण पुन्हां त्यांना वाटलं—" तिनें स्वतः इच्छा दाखवली नसतां, आपण पत्ता शोधून तिच्या घरीं आगंतुक जायचं; नि तिच्या आईचा आजार मामुली असायचा ! म्हणजे-प्रेमा, गणू, सारींच आपल्याला मूर्ख ठरवून हसणार ! "

तेव्हां मग, डॉक्टर, गणोबा,.. कोणीच गेलं नाही. दिवसांमागून ते दिवस उत्सुकतेंत मात्र गेले.—आणि, प्रेमाच्या सहवासाचा, नकळतच, आपल्या मनावर केवढा मोठा पगडा बसला आहे, याची, तिच्या या अकल्पित वियोगांतच, डॉक्टरांना खरीखुरी जाणीव झाली.

५९

पंधरवड्यानें, एके दिवशीं, सकाळची फेरी मारून डॉ. फीमेलवॉर्डकडे

वळले. लिफ्टमधून ते बाहेर पडले;.. दाराजवळच्या एका कॉटपाशीं, पांढरा झगा घातलेली, तेल न लावतांच केस कसे तरी गुंतून पाठीवर सोडलेली, कामांत गढलेली;... प्रेमाची पाठमोरी आकृती त्यांना एकदम दिसली.

त्यांना साश्चर्य आनंद झाला. स्वतःशींच स्मित करून, मोठ्या उत्सुकतेनें ते पुढे झाले. तेवढ्यांतच, त्यांच्या चाहुलीनें तिनेंहि मागें वळून पाहिलं..

किती चमकले डॉक्टर ? चेहऱ्यावर स्मित आणण्याचा, प्रेमा अटोकाट प्रयत्न करीत होती. तरी, सतत जाग्रणानें नि मनःस्तापानें तो अगदीं ओढलेला-सुकलेला दिसत होता. दुःखाच्या, खिन्नतेच्या दाट छाया त्याच्यावर पसरल्या होत्या. ती पूर्वीची प्रेमा उरली नव्हती !

ती कांहीं बोलली नाही. एकदां मान वळवून, तिनें सुधीरांकडे पाहिलं; आणि हातचं काम तसंच पुढें करीत राहिली. तिच्या चेहऱ्यावर एकाच वेळीं ऊन-पाऊस व काळे ढग दिसत होते.

तिच्या अबोल हालचालींतील व खिन्न चेहऱ्यावरील दारुण दुःखाच्या जाणीवेमुळेंच, सुधीरांच्या तोंडून अवाक्षरहि पडलं नाहीं. कांहीं न बोलतांच, ते माघारीं फिरले. पण त्याच वेळीं त्यांच्या मनाची खात्री झाली– ‘ ती मानी स्त्री आपलं खाजगी दुःख आपल्याला आपणहून कधींच सांगणार नाहीं,

मग आपल्या या हॉलमध्यें येतांच, त्यांनीं गणोबाला हांक मारली व एका कागदाच्या चिठोऱ्यावर खरडलं होतं,... “ तुमची ड्यूटी संपल्यावर आज माझ्याकडे जेवायला याल का ? आलांत तर आभारी होईन; आनंदहि वाटेल ! जरूर ! याच ! सबबी मुळींच नकोत; वाट पहातोंय् ! ...”

आणि मग अगदीं याच हॉलमध्यें, त्यादिवशीं, त्यानंतर घडलेल्या त्यां साऱ्या गोष्टी ! त्या प्रसंगापाठीमागें असलेल्या भावनांच्या प्रचंड लोंढ्या-मुळेंच, सुधीरांना आजहि–अगदीं बारीकसारीक तपशीलासह–त्या तें सारं आठवत होतं !—

६०

चिठीप्रमाणें प्रेमा आली खरी; पण जणूं, आपल्या आयुष्यांत, मधल्या



काळांत विशेष कांहीं घडलंच नव्हतं, अशाप्रकारें ...आपल्या हातांतल्या नवीन केसीसची शास्त्रीय चिकित्सा, उपाययोजना, ...यांच्याबद्दलच, तिचं सुरवातीचं बोलणं झालं;तें ऐकून,सुधीरांना तर अगदीं मेल्याहून मेल्यासारखं झालं.

ओशाळ्या मनानें पण आस्थेनें, शेवटीं, ते स्वतःच तिच्या घरची चौकशी करणार, तोंच.. प्रेमानें आणलेलं तें तोंपर्यंतचं उसनं अवसान एकदम कोलमंडलं; सुधीरांच्या सान्निध्याच्या संसर्गानें, मामुली गोष्टी बोलतां बोलतां, तिला एकदम एक हुंदका आला. प्रयासानें गप्प होऊन, ती खालीं पाहूं लागली; पाहतां पाहतां, तिच्या डोळ्यांतून टिपं गळूं लागलीं;.. नि शेवटीं तर, ती निःसंकोचपणें ओक्साबोक्सी रडूंहि लागली.

प्रेमा तशी रडूं लागल्यामुळें, सुधीरांना प्रथम बरंच वाटलं होतं. ‘दुःखांत बुडाली असूनहि, तिजबरोबरच्या आजपर्यंतच्या आपल्या औपचारिक वागणुकी-मुळेंच, तीहि आपल्याशीं तशी औपचारिकपणाचं अंतर कायम ठेवण्याचा कठोर लपंडाव खेळत राहिली आहे, हें सुधीर जाणत होते. आपल्या प्रत्यक्ष सहवासानें, तिचा तो निश्चय आपोआप ढळला; याचं त्यांना समाधानहि वाटलं.

पण तिला तसं समोरच रडतांना पाहून मात्र ते गोंधळले; तिचं सान्त्वन तरी कसं करायचं, हेंच त्यांच्या अनभिज्ञ मनाला समजेना—

तरी शेवटीं, अगदीं स्वतःला नकळतच ते पुढें झाले; नि तिच्या खांद्यावर सहानुभुतीचा हात ठेवून ते कुजबुजले–“ प्रेमा !...होतां कुठं तुम्हीं इतके दिवस ? झालं तरी काय ? मला का बोलावलं नाहींत ? ”

पण तिच्या अश्रुधारा नि हुंदके कांहीं वेळ अविरत चालूंच होते.

मांडीवर कोंपरं ठेऊन केलेल्या आपल्या हाताच्या बेचकांत हनुवटी टेंकून, कितीतरी वेळ, डॉ. प्रेमाजवळ मुग्धपणेंच बसून होते.

तिचा आवेग थोडा कमी झालेला पाहून, तिच्या खांद्यावर स्नेहानें हलुंच थोपटून, ते तिला मग हलकेंच म्हणाले–“ मला सांगा ना आतां सारं;... मी आहे कीं वाटेकरी तुमच्या दुःखांत ! ”

त्यांचे ते जिव्हाळ्याचे शब्द नि आतांपर्यंत कधीं न झालेला सुधीराचा तो स्नेहाळ शरीरस्पर्श !...प्रेमाचं अंग व अंतःकरण त्यामुळें अगदीं पुलकित झालं–थरारलं. त्यांच्याकडे आपुलकीनें एकदां पाहून, तिनें आपलं रडं आवरलं; रडून रडून सुजलेले डोळे पुसले; ती चटकन् बाजूला झाली; नि कोचाच्या हातावर कोंपर टेकून, त्यावर कानशील ठेवत, डॉक्टरांकडे पाहून, 'ती एकदां रडवं हसली.

– आणि त्यानंतर, त्यांच्यापुढं आपलं हृदय तिनें अगदीं मोकळं केलं होतं.. त्या दिवशीं.

६१

शिक्षण संपवून, नुकतीच कुठं आतां प्रेमा मार्गाला लागली, मिळवती झाली, तर पंचेचाळीशीच्या आंतच, तिची विधवा आई अंथरुणाला खिळली होती; शेवटीं, चार दिवसांच्या अवसरांतच, आजार अधिक वाढत जाऊन, प्रेमाला एकटी टाकून, ती निघून गेली होती-

आयुष्यभर संकटांना तोंड देत, नोकरी-काबाडकष्टांत राबत, आपल्या लाडक्या बाळेला, तिनें या पदापर्यंत पोहोचाविलं; पण त्यानेंच जणूं काय दमून-भागून, तनमनाला आतां थोडं विश्रांतिसुख लाभण्याच्या त्या दिवसांत, ती तडकाफडकी तशी उठून गेली होती.

सांगतां सांगतां, मध्यें कितीदां तरी दबले हुंदके घेत, प्रेमा थांबली होती; सुधीरांचेहि डोळे, मधून मधून, भरून येत होते. नि त्याबरोबरच, दोघांच्या आयुष्यांतील साधर्म्याची नि प्रेमाबद्दल मनांत अधिकाधिक दाटत असलेल्या सहानुभूतीची, त्यांना जाणीव होत गेली होती. त्यामुळेंच, सुधीरहि शेवटीं आपला नेहमीचा घुमा स्वभाव क्षणकाळ विसरले होते; अगदीं प्रथमच, आपल्या पूर्वायुष्यांतील अनेक गोष्टी तिच्याकडे मरमर बोलत गेले होते—

सुधीरांमधल्या त्या अकल्पित बदलामुळें, प्रेमाची वृत्ती फिरून उल्हसित झाली; तिचं दुःख हलकं झालं;... त्यांच्या आग्रहानेंच, त्या दिवशीं,



ती त्यांच्याकडे वस्तीला राहिली होती. कामाशिवाय विशेष कधीं बाहेर न पडणारे सुधीर, स्वतःच मोटर घेऊन तिच्यासह जुहूपर्यंत गेले होते; त्यानंतरचं, अर्ध्या-अधिक मुग्ध पण सुखद सहवासांतच झालेलं तें त्यांचं एकत्र जेवण; तें सारंच प्रेमाला अननुभूत होतं ! ' आपण कुठल्या तरी नव्याच जगांत येऊन वावरतों आहों ' असं प्रेमाला राहून राहून वाटलं होतं; सुधीरांनाहि भारल्यासारखं वाटत होते. नवखं समाधान लाभलं होतं.

आणि त्याच दिवशीं, डॉक्टरांचा असा खराखुरा कायाकल्प झाला !...

– एकाकी एकमार्गी डॉ. संसाराच्या कल्पनेकडे झुकले !–

६२

त्यानंतरच्या त्या विद्युत्वेगानें गेलेल्या पंधरवड्यांतला गणोबाचा एक प्रसंग आठवला डाक्टरांना—

प्रेमा–सुधीरांमध्यें घडलेला हा बदल, गणोबाच्या तीक्ष्ण दृष्टीतून सुटला नव्हता; नानांच्या सांगण्याप्रमाणें नि स्वतःच्याच आस्थेनें, तो त्यां दोघांच्या खाण्या-पिण्याची, येण्या-जाण्याची, बडदास्त राखी.

प्रेमा अजूनहि दादरलाच राही; सकाळ संध्याकाळ भेटी होऊनहि, मध्येंच एकमेकांच्या निरोपांच्या बंद चिठ्या पाठवण्याचं खात्रीचं काम गणोबावरच पडे; तोहि तें सारं आनंदानें नि मुकाट्यानें करी.

एके दिवशीं, नानांनीं तशीच एक बंद चिठी प्रेमाकडे पोहोचवायला गणूकडे दिली; ती घेऊन, दाराकडे जातां जातां, मागें वळून तो हळूंच आदबीनें म्हणाला—" नाना, प्रेमाताई आतां काय एकट्याच राहतात ! नि तिथं त्यांना करमतहि नसेल आतां; पुन्हां, त्यांच्या रोजच्या हॉस्पिटलच्या कामासाठीं खेपा आहेतच; माझीहि अशी सारखी येजा होते; मग मी म्हणतो–त्यापेक्षां महिना पंधरा दिवस इकडे आपल्याकडेच राहायला बोलवत कां नाहीं त्यांना, नाना ! "

मिस्कील गणूच्या त्या धूर्त उद्गारांत लपलेला, तो सूचक, उत्सुक प्रश्न !

तो पटकन् लक्षांत येऊन, सुधीर किंचित् चमकले होते; पण मग, न रागावतां, न लाजतां, हसस हसतच ते म्हणाले होते–" बरं बरं ... तुला नको गणू त्याची काळजी ! जा ! आठ पंधरा दिवसांत बाईंना आतां कायमचंच इथं राहायला आणायचंय् !"

६३

त्या आठवणीनें हसूं येऊन, प्रेमाच्या फोटोसमोर डॉ. उभे राहिले. तीं जणूं, समोर प्रत्यक्षच हास्यमुद्रेनें बसली आहे, असं त्यांना भासलं; नि तिच्याकडे प्रेमळ नजर लावून ते म्हणाले–"प्रेमा !–प्रेमा !– किती रम्य तो काळ !– त्या-वेळीं, माझ्या आयुष्यांत, तूं खरंच एक नंदनवनच निर्माण केलं होतंस !—"

खरं होतं तें !– पण त्या आठवणींच्या हातांत हात घालून पुढें येणाऱ्या त्या पुढल्या मिश्र घटना !– प्रेमा......प्रेम...आनंद !... लीनीचा जन्म.. तिचं कौतुक..वाढती पोरगी !- बस्स्...

ती वाढत जाऊन, तिच्या सहवासांत, दोघांना—प्रेमाच्या दुःखद मृत्यू-नंतर निदान सुधीरना तरी–आपल्याभोंवतीं एक समाधानी प्रेमपटल निर्माण करतां नसतं कां आलं ?...

पण तसं कांही घडलं नाही,... एवढं मात्र खरं !– प्रेमा गेली; मग लीनी कलकत्त्याला नीलादेवींकडे गेली;... डॉक्टरांनीच पाठवली;...मग ते पुन्हा एकटेच,.. अगदीं एकटे,- आजतागायत एकटे !—

नीलादेवी !. खानदानाची मुलगी; खानदानाची बायको; ऐन तारुण्यांत अपघातानें टिटॅनिक बोटीबरोबरच तिच्या वैयक्तिक आशांनाहि जलसमाधि मिळाली. तरी पण, नवऱ्यामागें, ती शिक्षणशास्त्राचा अभ्यास केलेली सुशिक्षित विधवा, त्याच्या श्रीमंतीचा खरा सामाजिक उपयोग करीत होती. तिच्याच हातीं लीनीला देण्यांत,सुधीरांचं कांही चुकलं नव्हतं! तिच्याबद्दल आलेल्या पुढल्या अनु-भवांवरून, त्यांनाहि वेळेवेळीं तसंच वाटलं होतं !- नीलादेवींचा सुसंस्कृतपणा, त्यांच्या स्वभावांतील, वागणुकीतील गोडवा नि नैसर्गिक जाणीव !... तें



वळण लीनीला लागणं, याहून दुसरं आणखी तें कसलं शिक्षण !—

पण...तरी सुधीरांना अनेकदां वाटे..." सारं खरं असलं, तरी आपलीच पोर, आपल्याला अगदीं बचपणापासून पारखी झाली;–तिच्या नित्य आयुष्यांतून आपण कायमचे ढळलों–"

पण त्यांतहि पुन्हां ते समाधान मानीत—" विसरेना का मला !– आतां बापाला शोभण्यासारखी तर झाली आहे ना ! ?—"

तरी कांही केल्या त्यांची ती रुखरुख नाहीशी होत नसे;...त्यांच्या मनांत येई..." आपल्याच रक्तामासाची ती गोड छबकडी ! –प्रेमा माझ्या–हातीं देऊन गेली !...नसती माझ्याच हातानें तिला वाढवतां आली, मला !...पण ..जाऊं द्या; चला !..."

६४

कमलिनीच्या बाळपणापासूनच्याच त्या ताटातुटीमागील, त्यांच्या त्या प्रचंड भावना–कल्लोळाची तीव्रता ! आतां इतक्या वर्षांनंतरहि, त्यांच्या मनांतून, ती अजून कायमची नष्ट झाली नव्हती ! तो कल्लोळ याच खोलींत, याच चार भिंतीत,...प्रेमाच्या मृत्यूनंतर....कांही आठवड्यांनी घडला होता.

प्रेमाचा मृत्यू ! त्यांना अत्यंत विषण्ण करणारा तो भयंकर धक्का !—त्यांतला त्यांचा एकुलता एक विरंगुळा म्हणजे चिमुकली लीनी !–

तिला घेऊनच, तिच्याशीं कसली तरी बालीश बडबड करीत, त्या दिवशीं, सुधीर याच खोलींत बसले होते; तीहि फिरत्या शेल्फवरचीं पुस्तकं खालीं काढ–वर ठेव असले पोरखेळ करत, जवळच हसत–खिदळत होती. सुधीरांना आठवणी होत होत्या;... त्यावरून, नुकत्याच त्यांना सोडून गेलेल्या प्रेमाबद्दलचं, त्यांच्या मनांतील उत्कट प्रेम दाटून येऊन, त्यांचा कंठ गद्‌गदित होत होता.

प्रेमा !-कमलिनी !...त्या दोघीं तर मायलेकीच; नि तींच काय तीं सुधीरांच्या जिवंत नितांत प्रेमाचीं स्थानं !...पण त्या तिघांच्या परस्पर

भावनांच्या चमत्कारिक गुंतागुंतीमुळेंच, सुधीरांच्या वैवाहिक आयुष्यांतील शेवटचीं दीड दोन वर्षे, एका भयानक झंझावातानें झांकळून गेलीं होतीं; त्यांचं मन मधून मधून हदरत गेलं होतं !—

अशाच-प्रसंगामागून घडत गेलेल्या कांही प्रसंगांनंतर, एके दिवशीं, सुधीरांच्या घरकुलांतील, 'तोंपर्यंतच्या स्फटिकवत् स्वच्छ सुखाला एक लहानसा तडा गेला; नि तसा तों एकदां गेला, तो गेलाच. कमलिनी तर अजाणच !..पण सुधीरांची, प्रेमाची,.. दोघांचीहि इच्छा असून देखील, फिरून कधींच, तो तडा त्यांना पुरा सांधतां आला नाही !–

आणि मग–प्रेमाचा चेहरा, प्रेमाची वागणूक, प्रेमाचा स्वभाव पालटला; तो खिन्न, विषण्ण झाला; प्रेमा वरवर हसली; पण प्रेमाचं–सुमनच सुकलं !— त्या सुकलेल्या फुलाला फुंकर घालण्याचा सुधीरांनी खूप प्रयत्न केला; पण एक एक करत,... त्याच्या पाकळ्या मात्र गळून पडल्या सगळ्या !—

शेवटीं तर–सुधीरांची इच्छा नसतां, त्यांच्या देखत देखत, सुधीरांच्या संसारांतील.... ती प्रेमाची मूर्तीच...प्रेमाच नाहीशी झाली !

लीनीला हृदयाशीं कवटाळून, एकदां मनसोक्त अश्रू ढाळून घेतल्यावर, त्यांनी पुन्हा आपल्या एकाकी आयुष्याला धीरानें सुरवात केली होती. लीनी हा एकटाच त्यांच्या उरल्यासुरल्या सुखा–समाधानाचा केंद्र ! तिच्याशीं खेळत–बागडत, आपलं मनोमय दारुण दुःख दडपण्याचा, ते प्रयत्न करीत असत.

छोट्या लीनीला, त्या दिवशीं तसं समोर खेळतांना पाहून, त्यांना त्या वेळीं भरून आलं होतं. तिच्याकडे नि प्रेमाच्या फोटोकडे आळीपाळीनें पाहात, ते पत्नीला उद्देशून, त्यावेळीं अगदीं आवेगानें म्हणाले होते–"प्रेमा !– तुझ्याविषयींच्या माझ्या भावना,... तुला कधींच कशा समजल्या नाहीत ग ? कां आपल्याच हातानें आपला-तुझा नि माझा भरला संसार उधळून गेलीस ? सुशिक्षितांचा संसार असाच का असावा ?—"



त्या फोटोतील प्रेमाच्या चेहऱ्यावर, अस्पष्ट मंद स्मित झळकल्याचा नि ती कांहीं तरी पुटपुटल्याचा, त्याक्षणीं, त्यांना भास झाला होता !—

तोंच–दुडुदुडू धावत लीनी त्यांच्यापाशीं आली होती; आपल्या चिमुकल्या हातांनी, नानांच्या पायांना तिनें घट्ट मिठी मारली होती; भानावर येऊन, त्यांनी खालीं पाहिलं, तेव्हां ती आपलं चिमुकलं हासरं तोंड वर करून, त्यांना म्हणत होती–"सोनं आहे, —सोनं !–घ्या–नाना, घ्या ना !...सोनंऽ..सोनंऽ !!"

केवढ्यानें दचकले होते सुधीर ! लीनीच्या हातांत कसलं तरी छोटंसं पुस्तक होतं; पण आपल्या तंद्रीतून जागे आलेल्या सुधीरांना क्षणभर वाटलं . " लीनीच्या हातानें प्रेमाच कसली तरी नवी भेट देत आहे !– तिच्या तोंडानें तीच कांही मागें राहिलेलं सांगायचा प्रयत्न करीत आहे !"

त्यांचं अंग एकदम शाहारून आलं...'सोनं ? कसलं सोनं ? '–म्हणत ते खालीं वांकले. तों काय ? त्यांनीं पूर्वी कधींच न पाहिलेली, एक छोटीशी, सोनेरी कडा असलेली,... डायरीसारखी वही होती ती !...धडधडत्या छातीनें सुधीरांनी ती फर्कन् चाळली; तेव्हां त्यांना तिचीं पानंच्या पानं, प्रेमाच्याच हस्ताक्षरानें भरलेलीं दिसलीं.—

मनांतल्या पहिल्या गोंधळावर ताबा मिळवून, सुधीरांनी हांक मारली होती एकदम—"गणोबा !–ए गणू !-"

आणि तो आल्याबरोबर, ते पटकन् तुटकपणें त्याला म्हणाले होते– "अरे, हिला तास दोन तास घेऊन जा पाहूं बाहेर ! जा, लिनी !... गणू–बरोबर मोटारींतून जा, भूऽऽ र !—हं ?"

त्यानंतरच, त्यांनी ती डायरी प्रथमच वाचली होती; अगदीं धडधडत्या अंतःकरणानें दोनदां–तिनदां वाचली होती; आंतला मजकूर नवा-जुना मिश्रच होता; पण त्यानेंच सुधीरांच्या मनांत उल्कापात केला होता !–

ते त्यानंतर सुरवातीस, एखाद्या पिसाटासारखे वागले; एकटे एकटे राहूं

लागले; कधीं नानांजवळ आलीच, तर चिमणीसारखं तोंड करून, लीनी बिचारी तास तास, हूंचूं न करतां नानांकडे बसून राही; किंवा एकदम रडूं लागल्यामुळें, गोंधळल्या चेहऱ्यानें नानांकडे पाहात, गणूच तिला उचलून नेई!-

मग सुधीरांनीच नक्कीं ठरवलं; नि पंधरवड्यांतच, छोटी लीनी त्यांना सोडून..त्यांच्यापासून दूर दूर..कलकत्त्याला राहायला गेली;..ती गेलीच!— अगदीं आजतागायत गेली! --

६६

तोच तो हॉल!...अगदीं तेंच ठिकाण!—आज सकाळच्या ऑपरेशन-नंतर, इतका वेळ दारं बंद करून, डॉ. तिथंच येरझारा घालत होते!— पटकन्, प्रेमाच्या त्या सोनेरी डायरीची फिरून त्यांना आठवण झाली!—

ती आजपर्यंत त्यांनी अनेकदां वाचली होती; पण तरीहि...ते रेडिओग्राम जवळ गेले; ..त्याच्या मागच्या चोरकप्प्यांत नेहमी लपवून ठेवलेली ती डायरी, त्यांनी बाहेर काढली.

मग तिच्यीं निरपरिचित पानं, त्यांनी एकदां 'फर्ररर्कन्', आंगठ्यानें, शेवटापासून सुरवातीपर्यंत सरकवलीं;... नि शेवटीं,... आईच्या फोटोखालीं... प्रेमाच्या फोटोसमोरच्या कोंचावर बसून, त्यांनी नव्या दृष्टीनें,...नव्यानेंच, ती आज फिरून एकदां वाचायला सुरवात केली—!

---

# ३ जीवन—गंगा ३

– स्वल्पविराम –

# जीवन—गंगा

[ काहूर ]

४

# प्रेमाची मखमली पेटी—

## जीवन–गंगा ४ प्रेमाची मखमली पेटी–

### माझी मखमली पेटी

६७

आमचा गणोबा एक औरच पात्र आहे !–लीनी दुपारीं हातपायाची सायकल फिरवीत होती; मी तिच्याशीं बोबडंबोबडं बडबडत होतें;...कोणी नाहींसं पाहून, लाजत घुटमळत पुढें होऊन गणू म्हणाला .." आज वर्ष झालं तुमच्या लग्नाला, वयनी !...तेव्हां..."

तो मधेंच थांबला, म्हणून पुढलं ऐकायला मी मान वळवली; तेवढ्यांत, मागं लपवलेला हात पुढें करून, तो लाजतच म्हणाला –" माझी गरिबाची ही भेट ठेवा;...नानांना सांगूं नका हां मात्र !..वेड्यांतच काढतील मला ते.."

मखमली बायंडिंग नि सोनेरी कडा असलेलं, कसलंसं पुस्तक त्यानें माझ्या हातीं दिलं; तें कुतूहलानें चाळायला लागतां लागतां, मी म्हणालें... "कसलं रे पुस्तक ?"

तो गोंधळून म्हणाला..." पुस्तक नाही कांहीं !–कोरी डायरी आहे ती नुसती;...पण कागद बघा ना कसा मोहरेदार आहे,...गुलाबी गुलाबी; लिहायला छान आहे, नाही ?–"

सुंदरशी ती डायरी नि त्याचे ते हळुवार शब्द !– फार गंमत वाटली मला, त्याच्या त्या भाबड्या योजकतेची; तरी हसतच मी विचारलं–" पण यांत लिहूं काय रे मी, गणू ?—"

" तें मी काय सांगूं ?– मखमली पेटी आहे ती, वयनी, मी तुम्हाला दिलेली !– हवं तें टाका तिच्यांत लिहून– "



अधिक कांही न बोलतां, लीनीला उचलून घेऊन, तो तिचे लाड करींत बाहेर निघून गेला.

अनायासेंच ती सुंदर डायरी हातीं पडली—म्हणून आश्चर्य-आनंद यांनी गोंधळून मी तिच्याकडे पहात होतें.

"मखमली पेटी !–" फारच आवडली त्याची ती कल्पना मला !—

मग वाटलं..' प्रत्येकाचं मन,..ही देखील एक मखमली पेटीच ?. तिच्याहि सोनेरी कडांच्या चौकटींत, कितीतरी गुप्त गुप्त गोष्टी लपलेल्या असतात; ती आपल्या जिवलगालाहि दिसत नाही; नि तशी ती कोणाला उघडून दाखवायचीहि नसते !—'

आस्थेनें, आपुलकीच्या लोभानें, गणूनें ही दिलीच आहे, तर आतां.. या मखमली पेटींत,.. माझ्या मनाच्या'मखमली पेटीं' तलंच कांही कांही,.. अगदीं आजच्या या क्षणापासूनच, मधून मधून लिहून टाकायचं मी ठरवलंय्.

हो, .. ठरलंच माझं !– नि ही 'मखमली पेटी' देखील,.. माझ्या मनाच्या मखमली पेटी–इतकीच,.. सगळ्यांपासून–अगदीं माझ्या जिवलग सुधीरांपासूनहि—लपवून ठेवायचं ठरवलंय् मी !—

पहायचं कसं कसं सारं जमतं तें—

### माझी आई

६८

आज बरोबर वर्ष झालं, आई मला सोडून गेल्याला !...सुधीरांच्या सहवास-प्रेमामुळेंच केवळ, तो जिव्हारीं प्रहार मला सह्य तरी झाला थोडासा !– योगायोग तरी कसा पहा !–आई गेली; तिनं प्रयासानं उभारलेलं

घरकुलहि, तिच्या पाठोपाठच मोडलं; नि त्या घटनेतूनच, मला...सुधीरांचं घर,... हें माझं घर लाभलं!...

हो, तिच्याच एका खांबावर...इतकीं वर्षांनुवर्षं तगत राहिलेल्या त्या घराच्या आसऱ्यानेंच,..मला माझं हें घर मिळालं; पण तिच्या भागल्या जीवाला नि थकलेल्या शरिराला मात्र,...माझं हें घर पाहण्याचा आनंद,... माझ्या घरांत वांवरण्याचं, जरा विसांवा घेण्याचं समाधान,...तें कांही लाभलं नाही! दुर्दैवी!

नाही तर,...इतक्या लौकर...तिनें उठून जाण्याचा का हा वेळ होता?

पण एकेकाचं नशीबच फुटकं असतं!...असं माणूस,...मनाचं नि संकटांचं ओझं वाहातच जन्म घालवणार!...कामाला सर्वांआधीं, खायला कधींकधीं, नि सुखाला मात्र कधींमधीं...किंवा अगदीं कधींच नाही!

जणू...दुसऱ्याला देणारच सगळं; कोणाकडून—अगदीं पोटच्या, स्वतः वाढवलेल्या गोळ्याकडूनहि—घेणार कांहीच नाही!

माझ्या आईचं तसंच होतं...तसंच झालं!—

आधीं मुलगी म्हणून;... मग पत्नी म्हणून;- मग विधवा म्हणून; मग माता म्हणून,..हो,.. माता..माता—ती मेली माता म्हणूनच!- मिळून आयुष्यभर धडपड, श्रम, धांपा, उसासे,.. जबाबदाऱ्या, संकटं...! तीं संकटंसुद्धां आपोआप आलेलीं थोडीं;.. सुखी करायचं ज्यांना, त्यांनीच आणलेलीं जास्त!!

## ६९

माझी आई—एका कोंकणच्या भिक्षुकाची मुलगी!- म्हणून अगदीं 'अष्टवर्षा भवेत् कन्या' म्हणत तिचं लग्न झालं; आणि पुन्हा झालं, तें एका तिजवराशीं;- गरजू भिक्षुकाला वर-धनाचं वरदान मिळालं म्हणून!..

पण नशीब चांगलं म्हणूनच जणूं, त्या म्हाताऱ्या नवऱ्याचे प्रेमचाळे, फार काळ पाहावे लागले नाहीत बिचारीला!- बापाला मात्र पांढऱ्या कपाळाच्या पोरीला घेऊन, लौकरच आपल्या घरीं परत यावं लागलं!—



तशी ती परत आली; नि-तिच्या लग्नाच्या सौद्यांत, बापानें घरीं आणलेल्या तरण्या बायकोच्या हाताखालीं-विधवा निराश्रित मुलगी म्हणून ती राबूं लागली. एक नाहीं, दोन नाहीं-चांगलीं सात वर्षं,...मोलकरणीप्रमाणं आपल्या बापाचीं तान्ही पोरं संभाळत, तिनें त्याच्या घरांत काढलीं. वपनविधि थोडा मागें पडला होता; नि तिच्यावर एकदां आलेल्या तसल्या प्रसंगीं, तिनं जीव देण्याचा प्रयत्न केला; म्हणूनच, त्या काळांतहि ती तोंपर्यंत सकेशा राहिली होती.

पण यामुळेंच, त्या भिक्षुक बापाच्या घरीं राबराबूनहि, तिचे हाल होत. -तिला त्याचा तिटकारा आला; ती कंटाळली; परंपरा-मर्यादेची तिला शेवटीं तमाच वाटेनाशी झाली!—

अशा परिस्थितींत, त्यांच्या शेजाऱ्यांकडे एक तरुण पाहुणा आला— तात्या! मुंबईत वावरलेला, कॉलेजांत शिकलेला, पुढारलेल्या मनांचा, हुशार; हिचा-त्याचा सहज संबंध आला; गुप्तपणें तो वाढत गेला; मग त्या वर्षांतल्या त्याच्या तीन्ही सुट्ट्या तिथेंच गेल्या... -शेवटीं, त्यानें केलं,-त्याच्या शतपटीचं धाडस, त्या तरुण बालविधवेनें केलं;...तात्या सत्प्रवृत्त, जबाबदार; त्यानें त्या काळांतल्या असामान्य अशा धाष्ट्यानें, आईला मुंबईला पळवलं; माझ्या आजोबांशीं अक्षरशः दोन हात करून, पुनर्विवाह केला; नि मुंबईत आपला नवा संसार थाटला. घरच फारसे बरे नसले, तरी तात्या स्वतंत्र बाण्याचे नि नोकरीवाले. त्या पुनर्विवाहाच्या 'पापाचीं भुतं', त्यामुळेंच,...फार काळ त्यांच्यापाठीं हात धुवून लागलीं नाहींत. समाज हळूहळूं तें विसरला!—

तात्यांनीं आईला फुलासारखं झेललं; त्यांच्या व्याख्यान-लेखनाच्या, नि इतर समाजसुधारक खटाटोपांतूनहि, वेळांत वेळ काढून, त्यांनीं तिला घरीं शिकवलं! आईच्या आयुष्यांतले परमोच्च सुखाच्या कळसाचे, नंदनवनाचे हेच ते दिवस! तीं पांच वर्षं हां हां म्हणतां गेलीं; दरम्यान, आई आई झाली; नि आपल्या चिमुकलीला तात्यांनीं प्रेमानें हांक मारायचं ठरवलं-'प्रेमा!'- हो, या माझ्या जन्मामुळेंच, चौथी व्हायला आईला पांच वर्षं लागलीं. मला

संभाळूनच, ती पांचवीं पास झाली. आईला तात्या घरीं इंग्रजीहि शिकवीत होते; काय तो तिचा त्या वेळचा आनंद नि आत्मविश्वास! तिच्या सुखाची ती परमावधीच!

७०

पण विधिघटना अगम्य, अतर्क्य, हेंच खरं!—

प्लेगांतहि शीरसलामत सुटलेलं तें चिमुकलं घरटं!– शेवटीं, एकाएकीं ताडकन् उध्वस्त झालं; त्याचे एकमेव आधार असे तीशी आंतबाहेरचे तात्या; केवळ सात दिवसांच्या विषमानें तडकाफडकीं उडाले!—

माझी आई, यावेळीं, आपल्या एकाच आयुष्यांत, दुसऱ्यांदा विधवा झाली; अनपेक्षित लाभलेल्या सुखाच्या उंच उंच शिखरावरून, दारूण दुःखाच्या खोल खोल काळदरींत, तिचा निष्ठुर कडेलोट करणारं, वास्तविक, हेंच होतं तिचं खरं वैधव्य!–आतां आणखी मी होतें तिच्या पदरीं एक धोंड!—

...हें कधीं आई सांगूं लागली, म्हणजे किती भकास चेहरा करायची!– तिच्या डोळ्यांतलीं टिपं तासतास थांबतच नसत!–ना कोणाचा आधार; ना मदत!– तात्यांच्या विम्याचे दोन हजार; हौशेनें पतीबरोबर जाऊन एकदोनदां पाहिलेलं, गांवचं मोडकंसं घर; ढेंगभर शेतजमीन!–तिच्या डोळ्यांसमोर नुसते काजवे चमकत होते, झोंपेंतहि!—

"हें तालुक्यांत ठिकाण; पुन्हा तुमचं घरहि आहे इथं; आम्ही आहों. तात्या गेले खरे; पण धीर सोडून कसं चालणार?– आपल्या पदरीं आहे पोर!- दुःख गिळून, हातपाय फिरून हलवले पाहिजेत.." असं आईला पत्र आलं. तात्यांच्या हयातींत, पुष्कळदां, एखाददोन दिवस मुंबईंत त्यांच्याकडे मुक्काम ठोकून घरोब्यानं पाहुणचार खाणारे, तात्यांचे शाळासोबती अप्पा इनामदार; त्यांचंच होतं तें पत्र! आईनें तें तीनचारदां वाचलं; पण तरी ती मुग्धच राहिली. शेवटीं, पंधरवड्यानें स्वतः अप्पाच आले; तेव्हां मात्र, नाइलाज होऊनच, ती आपल्या चार वर्षांच्या लेकीसह, धीरानें गांवीं आली.



आमचं घर-दार होतं खरं तिथं; पण आंत मात्र कांही नव्हतं. शेतीचंच कार्यंतें थोडं उत्पन्न; पण तरी आई माझ्यासह तिथं एकटी राहिली. आनंदाच्या वैभवाच्या दिवसांत, शिवणकाम--भरतकामादि हौसेनें मुंबईंत मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग करून, गांठची तुटपुंजी पुंजी मोडून, आई स्वतःहि पुढें शिकूं लागली. अप्पा शेजारींच रहात; तरी त्यांची ती शक्य तों ओशाळी रहात नसे. पण मग, त्यांच्या सल्ल्यानें, त्यांच्या आधारावरच तर ती त्या अनोळखी गांवांत येऊन पडली होती.

७१

अप्पांचा तो शेजार नि आधार!–तो साधासुधा नव्हता. अप्पा म्हणजे गांवचे श्रीमंत, कॉलेजांत शिकलेले, प्रतिष्ठित; लो. बोर्डाचे अध्यक्ष, पुढारलेल्या मतांचे, तरी पण स्नानसंध्या-दानधर्म करणारे; मुलींसाठीं ते स्वतंत्र शाळाहि चालवणार होते. साहवीपर्यंत आईनें पुढें शिकण्याची कल्पना त्यांचीच; आईलाहि त्या नोकरीची भावी आशा; कसा झाला तरी पदरीं पोर असलेल्या विधवा आईचाच जीव तो!—

पण अप्पांचा तो शेजार नि आधार!–तो पंकज होता.

एके दिवशीं रात्रींची गोष्ट! झांकपांक झाल्यावर, आईच्या मांडीवर डोकं टेकून पडलें होतें; हातानें विणकाम करीत ती गाणीं म्हणत होती; मी केव्हां झोंपलें, कोण जाणें; पण मग–एकदम दबल्या आवाजांतल्या आईच्या कोणाबरोबरच्या तरी बोलण्यानें, तिचं अंग हलण्यानें, नि माझं डोकं दणकन् चटईवर आदळल्यानें मी एकदम जागी झालें!–पुरी भानावर आलें,...तेव्हां पडल्या पडल्या मला दिसलं,.. अप्पासाहेब खालीं मान घालून दाराबाहेर जात होते; तिकडे रागीट चेहऱ्यानें पहात असलेल्या आईच्या थरथरत्या ओठांतलं पुटपुटणं मला ऐकूं आलं,.. 'चांडाळ!—नीच.'

—मला तो प्रसंग असा सारा आठवतोय्; पण त्यावेळीं मात्र, त्याचा अर्थ समजला नव्हता; आज मात्र जाणीव होतेय्,...आमचा तो अप्पांचा शेजार

नि आधार त्याच दिवशीं, तसा कायमचा तुटला !–मग पुढें आई पास झाली; मास्तरीण झाली; पुढें बोर्डानें तिला 'मोठ्याबाई'हि केलं; पण आईचा तो तुटलेला पहिला आधार, एखाद्या तुटलेल्या कड्यासारखा, तिला पुढली कित्येक वर्षे अप्रत्यक्षपणें जांचला !—तरी पण, त्या खंबीर बाईचा,—शाळा, शिकवण्या, शिवणकाम, शिवणकलावर्ग असल्या हजार लटपटींचा-अव्याहत कष्टांचा, रामरगाड्याचा जीवन-संग्राम, वर्षानुवर्षे, आमरण चालू राहिला !

त्या काळांतलं, तिच्या आशा-उत्साहाचं, कार्य-प्रवणतेचं, एकच एक केन्द्र होतं; तें म्हणजे-मी;...तिची,...तिच्या तात्यांची प्रेमा !—

७२

हें असं सारं आठवलं, कीं, आईच्या मृत्यूचं दुःख अगदीं असह्य होतं. खरंच, आई ! अशी कां ग एकदम रागावलीस माझ्यावर?–कशाला शिकवलंस मला, हाडांचीं काडं करून?–तुझ्या जरुरी, तुझं तन-मन मारून, पै-पैसा करून, तूं स्वतःच सांठवलेल्या-संभाळलेल्या नोटा...; त्या, माझ्या कपड्यांसाठीं, पुस्तकं-फी-हौशींसाठीं. एकदोन जिवावरच्या माझ्या आजारांसाठीं, तूं माझ्यावरून ओवाळून टाकल्यास!–कशाला हवा होता, तो ऊर फांटेपर्यंतचा खटाटोप?–असं शेवटीं, तूं एकदम निघून जायला,...अवेळीं?–उलट, मला तुझ्यासाठीं मात्र काहींच करूं दिलं नाहीस !–निदान माझं हें सुख पाहायला तरी रहायची होतीस?–माणसानं इतकं निरपेक्ष नये ग असूं!–

मला आठवतं, मी मॅट्रिक झालें तेव्हां आई किती आनंदली होती!–कशी सारखी एखाद्या पिसाटासारखी माझ्याशीं बडबडत राहिली होती;–हसली होती; रडली होती.

आणि शेवटीं, अगदीं गंभीर होऊन, मला संथ आवाजांत म्हणाली होती–"प्रेमू,...पोरी, तुझे वडील गेले,...तेव्हां कल्पनाहि नव्हती मला, माझ्या हातून इतकं सारं होईलसं !–पण त्यांच्यापाठीं, जगांत कांहींतरी केल्य सारखं,...त्यांच्याच शिकवणीचं चीज केल्यासारखं वाटतंय् मला, आज !—मी तुझी आई...पण तरी एक अज्ञानीच स्त्री; यापुढं तूं काय करावंस, हें मला काय समजणार?—माझ्यापुढें तरी अंधार आहे;. आतां शिकून-वाचून तूं शहाणी झालेली; तूंच ठरव काय तें!– पण मला सांगतांच येणार नाही, अशी कोणी तरी मोठी हो तूं!—"



आणि मग, क्षणभरानेंच, ती स्वाभिमानी शब्दांत मला म्हणाली होती—"एक मात्र सांगतें, पोरी!–स्वावलंबी, स्वतंत्र जीवन जगतां येईल, अशी धमक आण अंगांत ! कोणाच्या आहारीं जाऊं नकोस; पुरुषांच्या टाचाखालचं मांजर होऊं नकोस कधीं!—झालीस, कीं,...तू चिरडलीस. पुरुषापुरुषांत फरक असतो; पण एकंदरित, पुरुष म्हटला, कीं, ताबा आला!–ताबा म्हटला, कीं, धोका आलाच!...निदान माझ्या आयुष्यांतले तरी सारे धोके पुरुषांमुळेंच निर्माण झाले; आणि त्यांशीं झगडूनहि, जेवढं थोडं सुख मला मिळालं, तें माझं मी निर्माण केलं!!–"

माझ्या आईची चिकाटी, करारी स्वभाव, चारित्र्य, शील...सारं सारं मला त्या दिवशींच खरं समजलं,...ती हाडाची अस्सल नागीण होती; केवळ भोवतालच्या परिस्थितीच्या माऱ्यानेंच इतके दिवस गोगलगाय बनली होती!—

७३

तिच्या या स्वभावाचा, मतांचा,...साऱ्या आयुष्याचाच, माझ्यावर, तोंपर्यंत, प्रत्यक्षाप्रत्यक्ष किती तरी परिणाम झाला होता! —वेडावांकडा, भोळाभाबडा कां होईना, पण स्वतंत्र विचार करायला, मी अगदीं लहानपणापासूनच शिकलें होतें; किती तरी गंभीर वृत्तीची झालें होतें; गंभीर वागत होतें;...म्हणूनच, मला वाटतं, शाळेतल्या मैत्रिणी मला अनेकदां कुचेष्टेनं म्हणायच्या देखील..."यावं..यावं, आजीबाई ऽ!—"

त्या वेळीं, माझ्यापुढें माझ्या भवितव्याबद्दलचं सारं धुकंच पसरलं होतं; पण आईच्या त्या दिवशींच्या उद्गारांनीं नि तिनें माझ्यावरच सारं

सोंपवल्यामुळें...माझ्या मनांत एक नवखीच महत्वाकांक्षा उसळली. एक सुखस्वप्न डोळ्यापुढें वारंवार उभं राहिलं!—

तशीं सुखस्वप्नं खूप असतात प्रत्येकाला,...पण त्यांचा नि आपल्या प्रत्यक्ष परिस्थितीचा कांहीं अर्थाअर्थीं तरी संबंध असावा लागतो ना?. तरच त्या स्वप्नांना अर्थ?—

त्या दिवशीं मी सहज 'वीकली' चाळत होतें. त्यांत एका तरुणाचा फोटो दिसला; तो डॉक्टरीसाठीं परदेशीं चालला होता; मला मनांत एकदम वाटलं...'तसल्या, त्या वरच्या दर्जाच्याच पातळींत आपणहि जायचं!...'

माझ्यासारख्या गरीब विधवा मास्तरणीच्या पोरीला तें सुखस्वप्न झेंपण्यासारखं नव्हतं; पण मग वाटलं..." मी मॅट्रिक व्हावं' हें माझ्या लहानपणीं माझ्या अनाथ आईला पडलेलं सुखस्वप्न!...तिला तरी तें झेंपण्यासारखं कुठं होतं?–तरी पण, झालंच ना तें शेवटीं शक्य?—तर मग माझंहि हें स्वप्न तितकंच दूर,.. पण तितकंच जवळचंहि आहे!—"

एक तर पुढलं शिक्षण, नाहींतर माझं लग्न यासाठीं आईनें जेमतेम् दोनअडीच हजार बाजूला काढले होते; याची जाणीव व तसला विचार मनांत ठेऊन, मी आईला शेवटीं रात्रीं झोंपतांना हळूंच म्हणाले—"आईऽगऽ, ठरलं हं माझं!–मी डॉक्टरीण होणार!"

त्या माझ्या तडकाफडकी निर्णयानें आई क्षणभर आनंदित झाली; पण त्याबरोबर, ती तितकीच खिन्नहि दिसली.

७४

पुढलीं चारपांच वर्षं, आईच्या जीवाची आपल्या पडक्या घरीं व माझी मुंबईत एका बोर्डिंगांत, अगदीं कुतरओढ झाली. माझ्या मनाच्या नि बुद्धीच्या साऱ्या शक्तीच, मी त्या काळांत एकवटल्या होत्या. माझ्या आईला, मला, माझ्या भवितव्याला, एकंदर परिस्थितीलाच,... तें एक शेवटचं प्रचंड आव्हान होतं!!—



आणि त्या आत्यंतिक चुरशीच्या सामन्यामुळें, पहिल्या वर्षापासूनच, मी वर आलें! शिष्यवृत्त्या, मदती, बक्षिसं; मुंबईतला माझा कारभार, माझा मीच चालवीत गेलें. शेवटीं, शेवटच्या परीक्षेंत तर मी पहिलीच आलें. माझे परीक्षक-शिक्षक अगदीं खूष होऊन, त्यांच्याच साहाय्यानें, एका मोठ्या हॉस्पिटलमध्यें स्त्री-चिकित्सक व पॅथॉलॉजिस्ट म्हणून माझी चांगल्या पगारावर नेमणूक झाली—

कोण त्या दिवशींचा माझा आनंद; पण त्यापेक्षां माझ्या आईचाच जास्त—

मी हर्षनिर्भरपणें आईला म्हणालें-" मी डॉक्टर झालें ऽ गऽआई!– अन् मिळवती, स्वतंत्रहि झालें.–आतां किनई, पुन्हां आपल्याला दोघांना मुंबईलाच जायचं राहायला, यापुढं!—"

त्यावर आईच्या तोंडून शब्दहि बाहेर पडला नाहीं!–तिचे मंद गंभीर डोळे क्षणभर चमकन् चमकले; तिनें माझे दोन्ही गाल आपल्या थरथरत्या हातांनीं कुस्करले; माझ्या खांद्यावर आपली मान टाकली; नि रडून रडून माझा पोलका सगळा भिजवून ओलाचिंब केलान्!—

अशी माझी आई!–असं वाढवलन् तिनें मला आपल्या घरीं—

—पण आतां आपल्या लाडक्या लेकीच्या घरांत मात्र ती नाहीं आज! आई!...माझी आई!!—

## हा माझा संसार!

७५

हल्लीं एकेकदां माझं मलाच आश्चर्य वाटतं!— वयाच्या सत्तावीस वर्षीं-पर्यंत, मी चुरशीनें शिकत आलें; पुरुषसमान पदव्या, स्वातंत्र्य मिळवलं;

मिळवती झालें; जबाबदार डॉक्टरीण म्हणून मान मिळवला;... मग आतां लग्न होतांच,...अशी अगदीं एखाद्या साध्या स्त्रीसारखी, चार भिंतींत मी वागूं तरी कशी शकतेंयू?—

सुधीरांना हें आवडतं, तें आवडत नाही, असं करत, त्या तन्मयतेंतच, माझं गेलं वर्ष गेलं; आतां हा माझ्या लीनीमागें माझा दिवस जातो!—

तें तिचं हसणं-रडणं, न्हाऊं-माखूं...नि भूक-तहान !—आतां सात महिन्यांची झालीयू ती; नि तिची वाढ कशी कलेकलेनें पण भरभर होतेयू; एकेकदां तिच्याकडे पहात बसण्यांतहि आनंद वाटतो माझ्या जिवाला!-ती जवळ झोंपलेली असली, तर झोंपेतल्या तिच्या नुसत्या चुळबुळीच्या धसक्यानेंहि मी दचकून जागी होतें.—आतां सुधीरांपेक्षां लीनीनेंच माझं मन अगदीं व्यापून टाकलंयू—

त्या दिवशीं मी तिच्याशीं हुंकारी भाषेंत बोलण्यांत गुंगलें होतें; सुधीर मागून आले, नि माझ्या खांद्यावर हळूंच हात टाकून म्हणाले—"मला एकेकदां प्रश्न पडतो, प्रेमा!-दोन वर्षांपूर्वीची, 'फीमेल वॉर्ड'ची मुख्याधिकारी डॉ. प्रेमा,.. ती हीच कां?...किती तन्मय होतेस तूं, या तुझ्या साऱ्या लीनीभोंवतीच्या पिंग्यांमध्यें !—कितीहि शिकल्या, कितीहि मोठ्या झाल्या,.. मोठ्या पदवीला पोहोंचल्या,.. तरी स्त्रिया त्या स्त्रियाच!-पोरांबरोबर पोरकटपणा करत बसायचा कंटाळा न येणं,-ही देखील एक मोठी कलाच आहे!—"

सुधीर बोलत होते तीं सत्यंच होतीं; पण जरा एकांगीं अर्धसत्यं होतीं, एवढंच !—

बालकांशीं तन्मय होणं, त्यांच्या जीवापुढें आपल्या जिवाची पर्वा न करणं,... त्या वाढत्या जीवांना आवडणारा नि अंतीं त्यांना थोर करणारा पोरकटपणा—आपण आपला थोरपणा विसरून—करणं,...हें सारं आम्हां स्त्रियांच्या रक्त-स्वभावांतच भिनलेलं आहे. खरं आहे; समाजांतलं तेंहि एक श्रेष्ठ कर्तव्यच ना!-तेंच आम्हीं सांवरतों; तोच आमचा मोठा अभिमान!!—



७६

हेंच पहा! आमचं लग्न झालं; आम्हीं उत्तर हिंदुस्थानची सफर केली. त्यावेळीं; मन मोकळं हसलों...खेळलों, फिरलों;...परत फिरल्यावर, एक दोन दिवसांतच सुधीर मला म्हणाले—"आतां तुझी नोकरी नाहीं चालायची बरं कां, प्रेमा!-तूं आपली राजीनामा दे कशी!—"

कां बरं म्हणाले ते असं?-माझं शिक्षण, माझी योग्यता, तोंपर्यंतची कर्तबगारी...माझं विभिन्न व्यक्तित्व...माझ्याहि आधींच ते अशी विसरले!-कां?...खरंच कां??—

दोघांचं लग्न झालं;...एकाच वेळीं नि एकमेकांशींच झालं; मग त्या एकाच घटनेनें, माझ्याच एकटीच्या बाबतींत असा काय फरक पडला होता, कीं, मीच तेवढं माझं व्यक्तित्व विसरावं; माझ्या बाह्य कार्यक्षमतेला कर्तव्यशीलतेला,...चाट द्यावा; माझं शिक्षण, ज्ञान नि त्यामुळें मला लाभलेलं माझं स्वातंत्र्य भिरकावून द्यावं;-सुप्रसिद्ध सर्जन डॉ. सुधीर यांची पत्नी, या एकाच नात्यानें, नवीन जीवनाला सुरवात करावी; नि त्यांतच मी माझा गौरव समजून घ्यावा!-कां?-असं कां वाटलं सुधीरांना??—

कारण एकच! ते एक पुरुष आहेत!

आणि इतकी मला उमज असूनहि, त्यांच्या त्या कल्पनेला किंचित् देखील विरोध न करतां, मी शेवटीं त्या निर्णयाला मान्यता दिली, त्याचं कारणहि तेंच—!

मी सुशिक्षित, स्वतंत्र असलें, तरी शेवटीं,...मीहि एक स्त्रीच!

—आपल्या आत्मनिष्ठ स्वभावानुरूप, पुरुष,...नैसर्गिकपणेंच तटकन् तोडूं पाहतो; आपल्या नैसर्गिक व्यापक मनोभूमिकेमुळेंच, शक्य तों, शक्य तिथं,...तुटणारं जें जें, तें तें स्त्री हळुवारपणें जोडून घेते!

७७

पण मला मात्र, मी नोकरी सोडल्याबद्दल अजून तरी कधींच वाईट वाटलं नाहीं !

वॉर्डीत नाहीं तर घरांतल्या लॅबमध्यें तरी सुरवातीस मी सुधीरांच्या बरोबरीनें रिसर्च वर्क करीत होतें; त्यांच्या संशोधनाचे मधले टप्पे, त्यावेळीं तत्परतेनें तयार करून, मीच त्यांना पुरवीत होते. सुधीरांच्या कर्तृत्वाला, माझ्या कुवतीप्रमाणें, मी माझ्यापरीनें असा मनापासून हातभार लावीत होतें.

आणि एक दिवस, सुधीरहि चुकून—हो, चुकूनच म्हणायचंय मला—म्हणाले देखील मला— " किती निर्दोष पायाशुद्ध विचारसरणी असते तुझी प्रेमा ? मोठं कौतुक वाटतं !—माझं कामहि किती सोपं सुलभ होतंय् त्यामुळें; —खरंच प्रेमा, असली चिकाटी नि असली तर्कशुद्ध बुद्धी यांच्या जोरावर मनांत आणशील तर—वाटेल तें गुंतागुंतीचें संशोधन, स्वतंत्रपणें करशील तूं..."

...त्या त्यांच्या उद्गारांनीं, त्यावेळीं, मंला मूठभर मांस चढल्यासारखं झालं !-स्त्रीचा मोठेपणा पुरुष कधीं सहजासहजीं कबूल करीत नाहींत !!-तो त्यांचा स्वभावच नव्हे !—

पण तें मला नवीन का होतं?-तो आत्म-विश्वास, ती जाणीव माझ्या मनांत पुरेपूर होती;-तथापि, आतां माझ्या दृष्टीनें तें माझं मुख्य क्षेत्र उरलं नव्हतं, एवढंच !—

मला वाटलं,...'मी सुधीरांशीं जाणतेपणींच विवाहबद्ध झालें आहे; डोळे पुरे उघडे ठेऊनच, पुरुषाचं प्रेम, गृहाचे बंध, नि घरच्याचं सुख,. एका झांपेंत हस्तगत करण्यासाठीं;...मी पाऊल उचललंय् !-तेव्हां हेंच माझं कार्य-क्षेत्र;...इथं सुख निर्माण करणं, हेंच माझं कर्तृत्व आतां !—'

अगदीं मनापासूनच वाटतंय् हें मला; शिकली म्हणून, विचारी विवाहित स्त्री, याहून निराळ्या पद्धतीनें विचार करूं शकेलसं...मला तरी वाटत नाहीं.



तिला खरंखुरं गृहदेवता व्हायचं असेल, तर तिनें आपल्या जगांतलं सुख टिकवून नको का धरायला? .. त्याचीच मुख्य चिंता नको का वाहायला?... बाहेरच्या जगांतल्या व्यापक, स्वैरसंचारानें आपल्या चिमुकल्या जगांत हाः हाःकार माजला,...तर काय करायचा तो संचार?—

७८

अशा विचारांमागून मनांत अनेक विचार येतात;-वाटतं,...आमच्य शिक्षणा—पदव्यांकडे पहाण्याची आमची शिकलेल्यांची दृष्टीच चुकीची आहे. मला तरी वाटतं,...शिकलेले पुरुष नि शिकलेल्या स्त्रिया,..आपल्या शिक्षणा-कडे उगीचच घमेंडीने पाहातात.-शिकलीं तरी तीं माणसंच !-शिक्षणाच्या त्या वरवर चकाकणाऱ्या त्यांच्या पोषाखांत, जरा चार लोकांच्या दृष्टीला,..तीं सजलेलीं दिसतात, एवढंच !—

पण घराचं छत, छाया नि ऊब; स्त्री-पुरुष-सहवास-संबंधाचा रसरशित-पणा; प्रबल देह-विकार; मोहक, चटकदार विलासेच्छा!-यांची ती नवखी ओढ नि आकर्षक हुरहुर; स्पर्श--मीलनाचं आकर्षण; नि आपल्याच रक्तमांसाच्या नव्या जिवाच्या स्पर्श--चुंबनाची तीव्र इच्छा--अपेक्षा !-या साऱ्या,...मानवी मनांत उपजतच भरलेल्या नि अजाणतांच, त्याच्य मनाला कायम भारून राहणाऱ्या गोष्टी !—सुशिक्षित–अशिक्षित,...' स्त्री--पुरुष,...दोघांनाहि त्या सारख्याच वळवतात—वांकवतात!—

—मी म्हणेन, एकटी स्त्री किंवा एकटा पुरुष-एक तर देवकोटील पोहोंचेल...स्वर्ग गांठेल !-किंवा दानव होईल, पाताळांत पोहोंचेल !-पण स्त्री आणि पुरुष,-दोघं एके ठिकाणीं आलीं,... कीं,...तीं दोघं माणसं असतात, माणसं होतात, माणसंच राहतात !-तीं तशीं माणसं असणं, हेंच नैसर्गीक !-त्यामुळेंच...जग राहायचं;..जगांत माणसं राहायची;...माणसांत माणुसकी राहायची!!—

७९

सुधीर नि मी,...विवाहानंतर, कित्येक दिवस,...कित्येक महिने...असेच माणसासारखे सुखांत घालवले !—

आम्हां दोघांनाहि, आम्ही दोघं एके ठिकाणीं एकांतांत असतांना,... आमच्या शिक्षणाची,...पदव्यांची; विस्मृतिच झाली !—

—त्यावेळीं, ज्या भावना, ज्या वासना, जे विचार, ज्या हालचाली... आम्हीं उत्कटतेनें, सुखानें अनुभवल्या नि केल्या,...त्या केवळ सुशिक्षितांच्या नव्हत्या; त्या साऱ्या माणसांच्या होत्या; त्या पुरुषाच्या होत्या; स्त्रीच्या होत्या; एका मानवी जोडप्याच्या होत्या !–नि म्हणूनच, त्या नैसर्गिक, साध्यासुध्या नि मनापासूनच्या होत्या !...त्या तशा उत्कट,...उत्स्फूर्त होत्या,...म्हणूनच, आम्हीं दोघं त्या वेळीं सुखी झालों !—

तो एक प्रसंग आतां सहज आठवतोय् मला—

आम्ही दोघं लॅब-मध्यें कामांत गढलों होतों. मायक्रॉसस्कोखालीं मी स्लाइड पाहात होतें. सुधीर तिचं टिपण तयार करीत होते. तोंच, पाहतां पाहतां, मला डोळ्यापुढें काळोख दिसूं लागला; भोंवळ आली; मळमळूं लागलं. सुधीरांनीं आपल्या दंडावर मला पटकन् सांवरलं; जवळच्या स्टुलावर मी बसकण घेतली. सुधीर बावरले-घाबरले,...त्यांनी माझ्या डोळ्या-कपाळाला ओला रुमाल लावला.

ते एवढे मोठे डॉक्टर; मीहि स्त्रियांची कुशल डॉक्टरिण !–पूर्वी इतर शेंकडों स्त्रियांची आम्ही चिकित्सा केलेली. पण त्यावेळीं माझी प्रकृति तशी एकाएकी बिघडली कां, तें दोघांनाहि समजलं नाही !–दोघंहि गोंधळून एक-मेकांकडे पाहात होतों..."काय असेल कारण ?"

...पण कारण होती माझ्या पोटांतच वळणारी लीनी !–त्या पोटांतल्या किड्यासारख्या जीवानें, आपल्या अस्तित्वाची आम्हाला तशी पहिली नैसर्गिक जाणीव दिली होती. त्याक्षणीं, आमचं शास्त्रीय ज्ञान लुलं पडलं, आम्हाला



प्रथम उमगलं नाही, याचं कारण, आम्ही त्यावेळीं नुसतीं माणसं म्हणून वावरत होतों. दोघांनाहि अननुभूत असं तें सारं,...आम्हापुरतं तरी नवीन होतं !—

८०

—मग तें लक्षांत येतांचं आम्ही दोघंहि पोट धरधरून हसलों त्या दिवशीं ! —

नि त्यानंतर तरी सुधीर माझी किती काळजी घेत !–अगदीं 'वॉर्डे' मधल्या त्यांच्या एखाद्या पेशंटचीहि घेत नसतील इतकी !–कधींमधीं आमची आपसांत चुरस चालायची...'मुलगा किं मुलगी ?–' कां कोण जाणें, सुधीरांच्या तोंडून शब्द यायचे–"मुलगी–" मला वाटायचं–'मुलगा'

स्त्रीचं बाळंतपण, ही अगदीं नैसर्गिक बाब, हें शास्त्रीय ज्ञान दोघांनांहि तोंडपाठ होतं !–पण माझ्यावेळीं मात्र सुधीर किती बेचैन झाले होते !–मागून गणोबानेंच मला त्यांच्या देखत सांगून, हसत हसत त्यांची थट्टा केली; आम्ही तिघंहि हसलों त्यावर !—

लीनीच्या जन्मानें सुधीर किती आनंदले ?–माझा प्रथम किंचित हिरमोड झाला !–पण कांहीं दिवसच काय ती, ती कडवट भावना मनांत रेंगाळली. लीनी कुशींत शिरली नि मला नकळत, मी माझ्या मनच्या आवडीनिवडी पटकन् विसरलें !–लीनीच्या चिमुकल्या हस्तस्पर्शानें मला एकदम पान्हा फुटला !

८१

...आतां माझी गोड लीनी वाढतेय्; सुधीरांना आपल्याकडे नि माझ्या-कडे ओढून घेतय् !–आम्हां दोघांची तीच आतां मध्यकेंद्र झाली आहे !—

—हो, मी आज अत्यंत सुखी आहे !-डॉ. प्रेमा...आतां लीनीची माता-सुधीरांची पत्नी–म्हणूनहि सुखी, अगदीं सुखीच आहे ! !—

## भावनांची रस्सीखेंच—

८२

सुधीर घरीं नाहींत आज; कसं उघडं उघडं वाटतंय्;–सारखी सारखी त्यांचीच आठवण होतेय्...

हल्लीं एक दिवसाआड, ते वस्तीला लोणावळ्यालाच असतात; त्यांनीं एका शेठजींना गांठलंय् नि एक उंच हवेशीर नवी इमारत तिथं बांधून घेतलीय्. तिथं आतां साऱ्या नव्या साधनांसह, टी. बी. चं प्रशस्त हॉस्पिटल काढलयं. आपल्या संशोधनाच्या प्रयोगांचे उरलेसुरले धागे जुळवून, अनुभव पडताळा-पहायला चांगलंच साधन झालंय् तें त्यांना! मोटारीवर गणूच असतो; म्हणून चिंता तरी नाही वाटत मला; नाहींतर आपल्याच तारेत तहान भूकहि विसरायचे ते!—

घालमेल घालमेल नुसती!–दोन कॉलेजांतली ऑ. प्रोफेसरकी, युनिव्ह-सिटी फेलोशिप्, के. इ. एम्. वगैरे हॉस्पिटलमध्यें फ्री ऑपरेशनसाठीं जायचे आठवड्यांतले दिवस, कॉर्पोरेशनचं काम, असले अफाटच व्याप त्यांचे!–ते इथं असले, कीं, 'जीवन–गंगे'चा अष्टौप्रहर कामाचा रगाडा आहेच; शिवाय, दहा दहा रुपये हातांत घेऊन, कन्सल्टेशनसाठीं रोज संध्याकाळीं रोग्यांच्या रांगा आहेतच!–अस्से त्यांचे दिवस येतात नि जातात!!—

लीनी झाल्यापासून–आधीं पासूनच—लॅब-वर्कहि ते हल्लीं एकटेच करतात; तेवढाहि आतां उपयोग नाही माझा त्यांना. पण जीवाच्या असल्या धडपडींतहि, सगळ्याला ते एकटे पुरे पडतात!–त्यांना त्यांतच आनंदानें गर्क पाहून कौतुक वाटतं; अशावेळीं, त्यांच्याबद्दलच्या प्रेमानें माझं हृदय कसं अगदीं भरून येतं!—

कोणत्या स्त्रीला आपल्या पतीचा मोठेपणा प्रिय होणार नाहीं?



८३

पण माझ्यांतल्या डॉ. प्रेमाची मात्र, अशावेळीं, अगदीं कांतरकांपणी होते; पूर्वींसारखी मी केवळ सुधीरांची साहाय्यक असतें, तर–मी त्यांच्या त्या सगळ्या व्यापांत त्यांना त्याप्रकारची मदत नसती का केली?–पण आतां मी एक विवाहित स्त्री आहे. मी त्यांची गृहिणी–लीनीची माता आहे!—मला माझं घर आहे!—

असली ही विरोधी भावनांची रस्सीखेंच!–हळूच एक प्रश्न डोकावतो मनांत–'कां केलं मी लग्न?–कां सोडली नोकरी नि स्वतंत्र, जबाबदार, महत्वाकांक्षी आयुष्य? चूक झाली?'—पण विचार करकरूनहि, शेवटीं वाटतं "प्रथमपासूनच तें ध्येय होतं माझं..."

सुधीरांना सांगणार नाहीं मी हें कधीं; पण सांगितलं, तर ते म्हणतील–"फार तर, तूं प्रवाहपतित झालीस, तुला संसाराचं आकर्षण वाटलं, म्हणूनच शेवटीं, या निरुंद चौकटींत तूं पडलीस, असं म्हण!–पण लग्नापूर्वीं तूं जी एवढी बुद्धि नि जबाबदारीची योग्यता दाखवलीस, पदव्या नि तज्ञांची प्रशस्ती मिळवलीस,...ती काय, लग्न हेंच तुझं ध्येय होतं म्हणून?—वेडी...लबाड!—"

त्यांनीं मला मनांत दांभिक म्हटलं,.. तरी मी पुन्हां म्हणेन– "हो, तेंच माझं पूर्वींपासूनचं ध्येय होतं!–इतकंच नव्हे तर अमुकच प्रकारें अमुकच प्रकाराच्या तरुणाशीं लग्न करायचं, असंहि माझं पूर्वींपासूनच ध्येय होतं!—"

सुधीर दचकले तर मी पुढें त्यांना म्हणेन–"दचकूं नका असे, सुधीर!–पुरुषांच्या अहंमन्य, आत्मनिष्ठ, धोपटमार्गी मनाला, स्त्रियांच्या मनाची खरी कधीं कल्पनाच नसते!—"

८४

स्त्री–मन सागरासारखं; कायम भावनांची ऊब तें साठवतं फार उशीरां; पण एकदां तसं तापलं, कीं, तें निवतंहि फार मंद मंद!—

उलट, पुरुष-मन जमिनीसारखं !-तें वाटेल त्या भावनेनें झटकन् तापतं;—कोणाला वाटावं, हीच त्याची स्थिति आतां कायमची !-पण ते... नि ती त्या भावनेची प्रखरता... जमिनीसारखीच पटकन् निवते !--

पण पुन्हां वाटतं, नाहीं; -स्त्री हीच जमिनीसारखी ! —दिसायला ओबडधोबड; तिच्यांत भावना—विकार—विचारांचं बीज जरा रुजणार मंद मंदच;...पण एकदां रुजल्यावर त्यांचे महान् बळकट, स्थिर वृक्षच होणार; त्या वृक्षांची सावली, त्यांचीं फळं फुलं,...त्या जमिनीला नव्हे... सारीं दुसऱ्यांना,... भोंवतालच्यांनांच मिळायची !—

उलट, पुरुष हाच सागरासारखा !-दिसयला अगदीं अफाट !-आपल्या गांभीर्यानें, विस्तारानें,... दुसऱ्याच्या-मनांत एकदम दरारा उत्पन्न करणारा !-तरी पण, अंतर्यामीं खारटतुरट; -त्यांना महान् भावनांची बीजं आधीं रुजायचींच नाहींत; बहुतेक त्याच्या झपाट्यांत इकडे तिकडे दूरवर वाहून जातील; किंवा पृष्ठभागावरच तरंगतील, अस्थिर असतील; आणि कांहीं साधीं रुजतील, तीं केवळ शेवाळाचीं; त्यांचे वृक्ष कधीं होणार नाहीत; त्यांची पाळंमुळं सागराच्या हृदयांत खोल जाणार नाहीत; नुसती वरवर पृष्ठभागावरच, धावऱ्यां-प्रमाणें तीं चरत-वावरत जाणार;...त्यांची सावली असलीच तर ती दुसऱ्या कोणाला नाही-स्वतः सागरालाच !-किंवा त्या सागरांत गटांगळ्या खाणाऱ्या चारचौघांनाच !— त्याला फळंफुलंहि दिसणार नाहींत; नि असलींच तर त्यांचा कसला कोणाला उपयोगहि होणार नाही !—

पण याबद्दल मी पुरुषाला दोष नाहीं देत.

निसर्गानेंच त्याला तसं घडवलंय् ; त्याचं तेंच कार्य !—

स्त्रीचं कार्य निराळं; म्हणूनच तिची घडण निराळी !—

८५

एखाद्या जुन्या पद्धतीच्या अशिक्षित स्त्रीचं आपलं बरं असतं !—ती



असेल त्यांत सामावून घेते; नि एखाद्या वाक्यांतच स्वतःचं समाधान करते— 'बायकांचा जन्म हा असाच !...'

आमचं त्यानेंहि कसलं समाधान नाहीं व्हायचं; आम्ही शिकलेल्या, वाचलेल्या, विचार केलेल्या ना !-आमच्या मनाचे जे नैसर्गिक कल, त्यांना फाटे फुटलेले असतात; आम्ही लागलींच आपल्या नि दुसऱ्यांच्या आयुष्यांचीं,... त्यांतल्या घटनांचीं, त्यांतल्या सुख-दुखांचीं, असतील-नसतील तीं, सुचतील तीं... पृथःकरणं करत बसणार !—सदैव चिंतातुर जंतूच आम्ही ! आम्हाला, हस्तगत अशा 'असल्या' गोष्टींपेक्षां;...'नसल्या' गोष्टींचीच हुरहुर नि अपेक्षा जास्त!—

—पण आमचा तरी काय इलाज त्याला ?—आमच्या नैसर्गिक मनोभूमिकेची नि आमच्यावर झालेल्या शिक्षणाच्या कृत्रिम संस्कारांची-ही रस्सीखेंच !-ती अशीच कायमची चालायची ! !—

## डोळ्यांचे दरवाजे

८६

विचार करतां करतां, स्त्री--पुरुष संबंधांतील अद्भुततेची जाणीव झाली,... प्रत्यक्ष प्रचीती आली, कीं मला तरी एकेकदां गंमतच वाटते !—पुरुष स्त्रीकडे कां व कसा आकर्षिला जातो, कोण जाणें; पण स्त्रीला तरी पुरुषांकडे जी ओढ वाटते, ती केवळ त्याच्या बाह्य सौंदर्यामुळें तर खासच नव्हे !...ती त्याच्या मनांतच खोल खोल शिरूं इच्छिते; नि तसं पटकन् आंत शिरायचं तिचं पहिलं एकच एक मोठं साधन, म्हणजे...त्याचे डोळे !-हो, त्या डोळयांच्या दारांमधूनच, ती त्याच्या मनाच्या मंदिरांत

प्रवेश करते; अगदीं गाभाऱ्यांतील नंदादीपाच्या कमी जास्त स्निग्ध तेजाचीहि तिला जाणीव होते !—

निदान माझा तरी लहानपणापासूनचा तोच अनुभव आहे !--सुधीरांना हें माझं वेड्या मनाचं अद्भुत काव्य वाटलं, तरी मला तरी तें खरंच वाटतं !—

माझ्या अगदीं बालपणींहि, एका मुलाच्या बोलक्या डोळ्यांनी मी अशीच भारली गेलें, वेडावलें होतें;—ते डोळे त्यावेळीं एकदांच माझ्यासमोर उघडले; पण त्यांची स्मृति मी पुढें वर्षानुवर्षं कायम विसरूंच शकलें नाहीं !— किंबहुना, त्यांच्या त्या डोळ्यांच्या दिव्यांनींच, वेळोवेळीं, मला माझ्या आयुष्याची दिशा दाखवली, वाट दाखवली !—मधल्या काळांत, तो प्रसंग, तो अनुभव, माझ्या मनाच्या खोल खोल दऱ्यांत दडून, दबा धरून राहिला; पण तरीहि, माझ्या प्रत्यक्ष हालचालींवर, तो अजणतांच, आपला प्रभाव गाजवीत होता.

८७

सारी अकराबारा वर्षांची परकरी पोर असेन मी, त्यावेळीं—

अप्पा इनामदारांच्या लोंचटपणाचा भयद अनुभव आल्यावर, त्यांच्या आधारसंबंधांचे सारे बंध तोडून, आपल्या परिस्थितीशीं मोठ्या धीरानें एकटीच झगडत, माझी आई त्यावेळीं आपलं आयुष्य कंठीत होती. त्याचवेळचा जीव आढणारा हा प्रसंग !—

आईची तर मला अगदीं सक्त ताकीद असायची–कीं, ‘तुला काय खेळा–सवरायचं तें घरीं खेळ; उगीच कुणाकडे बसा–भटकायचं नाही !”

मुलींचा असा शेजारच नव्हता मला; म्हणून आमच्या शाळेंतल्या तिसरी-चौथींतल्या मुलींना मी घरीं गोळा करी. त्यांनाहि गौरव वाटायचा ‘मोठ्या बाईच्या घरीं जायला मिळतं !’...शनि-रवी-सुटीचे दिवस आम्ही आमच्या पडवीत बसायचं; नि तासन्‌तास गाणीं म्हणत, सागरगोटे–बुडकुल्यांनी खेळत, बाहुला-बाहुलींचीं लग्नं लावत बसायचं.



तिथून आम्हाला अप्पांच्या पडवीचा कोंपरा लांबून दिसायचा; नि त्या पड़वीच्या कोंपऱ्यांत, नेहमीं, एक मुलगा वाचत बसलेला आम्हाला दिसायचा. माझ्याकडे येणाऱ्या एका मुलीच्या शेजारच्या घरीं तो दर शुक्रवारीं जेवायला जायचा. तीच कधीं आम्हाला सांगायची–फार हुशार आहे तो..आतां साहवी झाली, कीं मॅट्रिक व्हायला मुंबईला जाणार आहे...अप्पा इनामदारच पाठवणार आहेत.’

खेळतां खेळतां, एके दिवशीं आम्ही बाहुल्यांच्या लग्नावरून, एकमेकींच्या लग्नावर आलों, नि ती एकदम म्हणाली—“हो गऽ हो !—तुला आपला बरा आहे तो नवरा !—” “कोणता गऽ?” दुसरी खिदळून म्हणाली.—तिनें अप्पांच्या पडवीकडे बोट दाखवून म्हटलं—“तो ऽ बघ !—” मी रागावून म्हणाले—“चल्–आचरट नाही तर ! तुझाच नवरा तो जा !”

पण त्यावरूनच तिनें आम्हाला त्यादिवशीं सांगितलं–कीं, “त्याचा साहवी झाल्यामुळें, आतां अप्पांच्या ओळखीनें तो मुंबईला जाणार आहे उद्यां !—नि तिथंहि असंच वारबीर लावून शिकणार आहे.—”

८८

कां कोण जाणें, मला त्यावेळीं कससंच वाटलं—

तो अनोळखी मुलगा माझ्या बालमनाला केवढा थोर वाटायचा ?— माझं कांहीं कमी पडूं न देणारी माझी आई मला होती; तरी माझं अभ्यासाकडे लक्ष कमीच. त्याची एवढी गरीबी, तो एकटा; तरी एवढा हुशार !...लांबून लांबून पाहूनहि, मला त्याच्याबद्दल नेहमीच आदर वाटायाचा !—

आणि आतां, तोच, गांव सोडून दोन दिवसांनी जाणार, हें ऐकल्यावर, मला कालवल्यासारखं झालं; आणि मग, कीं कोण जाणें, मनाला अगदीं तीव्रपणें वाटलं—“तो जाण्यापूर्वीं, त्याच्याबरोबर एकदां तरी बोलायचंच आपण !—”

पण तो तर अप्पांच्याच ओटीवर असायचा राहायला; तिथें कसं जाणार? त्या घराकडे फिरकायचीहि मला आईची मनाई!—ती स्वतः घरीं नसली, तर मला बरोबरच घेऊन जायची; अगदीं घराला मोठंथोरलं कुलूप लावून; तेव्हां आईच्या दृष्टीतून तर तें शक्यच नव्हतं!—स्वतः तोहि होता अगदीं घुम्याच; कधीं रस्त्यानें जातां येतांनाहि, तो सदा मान खालीं घालून, आपल्याच विचारांत तंद्री लागून चालणार—जाणार;—आपणहून कोणाशा बोलायचाहि नाही कधीं!—

म्हणूनच, मला अगदीं एकच एक चुटपुट लागली होती —"तो जाण्यापूर्वी मी त्याच्याशीं बोलणार तरी कशी?"

८९

पण त्याच संध्याकाळीं मला ती संधि मिळाली. आईचा एकादशीचा उपास; शेजारच्या वाण्याकडून तिनें साबूतांदूळ, मुइमूगदाणे वगैरे आणायला सांगितलं होतं मला; तें सारं घेऊन मी घराकडे परत येत होतें.

तोंच,...तोच मला समोरून येतांना दिसला; कोण आनंद झाला मला! आपल्याच विचारांत गर्क होऊन, थोड्या अंतरावरून तो चालला होता. हळूं हळूं माझ्याच बाजूस येत होता.

मी थबकलें; क्षणभर चांचरलें; ना ओळख ना परिचय; तरी मी एकदम त्याला विचारलं—"होऽकारेऽ?—उद्यां मुंबईला राहायला जाणार आहेस तूं?—"

चालतां चालतां दचकून भानावर येऊन, जरा चौकसपणें आपले डोळे माझ्याकडे रोखून तो थबकला.—पण मग, त्याची नजर एकदम पालटत गेली; ती जरा रागाची, तुच्छतेची दिसूं लागली; नि शेवटीं, कांहीशा झिडकारणीच्या स्वरांतच तो मला एकदम म्हणाला—"हं हं!—अप्पांच्या पलीकडच्या घरांत रहाणाऱ्या मास्तरणीची पोर काय तूं?— आणि तुला ग कशाला हव्यात, या नाही त्या उठाठेवी?—"



ते भयंकर शब्द, कपाळावरच्या त्या आंठ्या; मी वरमलें; ..मला धक्काच बसला. हातांतली पुडी खालीं पडली; त्याचा राग आला; जिन्नस खालीं सांडले. आतशय गोंधळून मी रडूं लागलें; खालीं वांकून, पडलेलं सारं गोळा करत करत, मी वर पाहून त्याच्यावर उलटून ओरडलें—"कायरे केलं मी तुझं वाईट, मला असं एकदम टाकून बोलायला?—"

कसा कोण जाणें, त्याचा नूर एकदम पालटला. तो खालीं वांकला; मला पडलेलं सारं उचलून घेण्यांत मदत करीत, तो थोडं चांचरत चांचरतच म्हणाला—"एऽएऽ—माफ कर हं!...माझ्याच विचारांत होतों मी; कांहीं तरी बोललों झालं!—"

—शेवटीं, पिशवी माझ्या हातीं देत, तो हळुवार शब्दांत मला म्हणाला—"हो,..उद्यांच जाणार आहे बरं, मी!—बरंऽ.. येतों—"

आणि तो गेला; जातांना त्यानें क्षणभरच माझ्यकडे टक लावून पाहिलं; मी डोळे पुसले, हसलें; त्यावेळीं, त्याचे डोळे मला पूर्वीपेक्षां साफ निराळे दिसले;...त्यांत मिनिटापूर्वींचा माझ्याबद्दलचा तुच्छ भाव, बेफिकीरी मुळींच नव्हती; ते आतां तीक्ष्ण होते. गंभीर होते; पण अगदीं स्नेहाळ होते!—

तेच ते त्यावेळचे त्याचे डोळे!-त्यांच्यांतला तो त्या वेळचा सोज्वळ प्रेमळ भाव!—तोच माझ्या मनांत भरला; क्षणापूर्वींचा त्याच्यावरला राग मी विसरलें.

एवढीशी पोर होतें मी, त्यावेळीं!—पण, कां कोण जाणें, त्याचे ते त्यावेळचे डोळे, किती तरी दिवस, माझ्यासमोर उभे राहून, मला उगीचच बेचैन करायचे!—

९०

घरीं गेल्यावर, तें सारं आईला कळलं; तिला तें सांगावंच लागलं; त्यावर ती अतिशय रागावली. ती थरथरत्या ओठांनी म्हणाली—"त्या सरळ

मनाच्या पोरावरहि त्या श्रीमंत चांळाडाची सावली पडली !...माझ्याबद्दलच्या दुष्ट कंड्या अप्पांनी गांवभर पसरवल्याच आहेत !-त्या ओशाळ्या पोराला, आपला उपकारकर्ता इनामदारच शहाजोग--सभ्य वाटणार !-हं...माझंच नशीब असं फुटकं !—मला सूर्य सुद्धां काळोख देणार; पुनवेलाहि माझ्याभोंवतीं अमावस्या पसरणार !—"

हें असलंच कांहीसं, आई आपल्याशी मोठमोठ्यानें पुटपुटली; नि मग माझ्या पाठींत एक जोराचा धपाटा देऊन म्हणाली—"पण तुला मेलीला, सांगितलं होतं कोणी, त्याच्याशीं बोलायला आज?—काय कमी कां आहे तुला आपल्याकडे?-माणसानें कसं, आपलं घर बरं, कीं, आपण बरं, असावं !—"

आणि मग पुष्कळ जुन्या आठवणी काढून, आई पुष्कळ बोलली-रडली होती. सारं नीट समजत नव्हतं, तरी, आपलं कांही तरी चुकलं... त्यामुळें आईला दुःख झालं, तसं आपण करायला नको होतं, एवढंच सारखं सारखं वाटत होतं मला !—

आणि त्या जाणीवेनेंच, त्या दिवसापासून, मी अधिकाधिक गंभीर, आज्ञाधारक, अभ्यासू, नि कांहीशी एकलकोंडी होत गेलें. इतकी, कीं, अप्पांच्या पडवीतला तो मुलगा, गांव सोडून गेला केव्हां, तें मला समजलं देखील नाही !—

—त्या दिवशींचे, माझं हृदय ओढणारे त्याचे ते डोळे मात्र, माझ्या डाळ्यांपुढून कित्येक दिवस, कित्येक महिनें, हलले नाहीत !—

९१

मॅट्रिकनंतर, 'तूंच काय तें ठरव !—' असं आईनें म्हटलं; नि त्या आनंदांतच, मी पुढलीं स्वप्नं स्वतःशीं रचत होतें. त्यावेळीं, कां कोण जाणें, इतके दिवस मनांतल्या मनांत विस्मृत झालेला बालपणचा तो प्रसंग, पुन्हां एकदम माझ्यासमोर उभा राहिला;...त्यावेळची



माझ्या बालमनाची तारांबळ, धडपड, चलबिचल, चुटपुट, सारं सारं मला आठवलं; नकळतच, ते डोळे समोर येऊन, मनाला एक नवीच हुरहुर वाटली—"कुठं असेल आतां तो मुलगा?"

त्यापुढलं तर सारंच चमत्कारिक; एकेकदां वाटतं—"माझ्याच आयुष्यांत हें असं अद्भुत घडलं, कीं, सर्वांच्याच असेल तसं?"

हातांत घेतलेला अंक चाळतां चाळतां, समोरच्या एका फोटोकडे पाहून मी चपापलें; तिथले ते डोळे मला अगदीं परिचयाचे, पाहिल्या पाहिल्यासारखे, ओळखीओळखीचे वाटले.

मी अधीरतेनें, गोंधळल्या मनानें, त्या फोटोकडे फिरफिरून पाहिलं; खालचा छोटासा परिचय वाचला. नि मग तर अधिकच दचकलें मी!—त्या डोळ्यांमुळें झालेली माझ्या जिवाची ती चुटपुट सकारणच होती; इथलीं सारीं अत्युच्च यशं संपादून, इंग्लंड-व्हीएन्नाला जाणारा तो तरुण डॉक्टर, म्हणजे —तोच—मला आपल्या डोळ्यांनी चपापवणारा, आमच्या गांवचा—बोलक्या डोळ्यांचा गरीब मुलगाच होता !—

खालच्या त्या परिचयांत, आमच्या गांवचा, अप्पा इनामदारांचा, उल्लेख होता; त्यांतून त्याच्या यशाबरोबरच, त्याच्या मनच्या कृतज्ञतेचीहि, जाणीव होत होती.

तें वाचतां वाचतां, साऱ्या स्मृति जागृत होऊन, माझं सारं शरीरच थरारून आलं !—कारण, मी त्या वेळीं प्रथमच शोध लावला होता, कीं, आपल्या बालपणीं आपल्याला रस्त्यांत भेटलेला तो तऱ्हेवाईक मुलगा-म्हणजेच-हे आतां परदेशीं जात असलेले, 'डॉ. सुधीर !—'

९२

मग मला त्यांच्या त्या डोळ्यांची ओळख जास्त जास्तच पटत गेली; चेहरा बदलला, तरी ते डोळे तेच, तसेच होते अजून !—त्या अननुभूत

जाणीवेनें रोमांचित होऊन, मी स्वतःशीं पुटपुटलें–"विसरले असतील कां ते, त्यावेळीं त्यांना रस्त्यांत भेटलेली ती 'मास्तरणीची मुलगी ?–खात्रीनें–"

आणि मग, कसं कोण जाणें, त्या गोंधळलेल्या मनःस्थितींतच, माझ्या भावनाप्रधान जीवानें, पूर्वी कधीं नव्हती अशी उसळी मारली; एक स्वैर विचार एकदम डोक्यांत शिरला, ठाण देऊनच बसला—"आतां पुन्हां कधीं शिरूं शकेन का मी, सुधीरांच्या आयुष्यांत ?-कशी ?–केव्हां ?–कुठें ??—"

त्या अस्पष्ट सुखस्वप्नानें व पूर्व सुखद स्मृतीनें, मी दिवसभर भारून गेलें; आणि शेवटीं, एका न्याऱ्या महत्वकांक्षेनेंच मला आईकडे बोलायला लावलं—"आईऽगऽ!–ठरलंच माझं!–मी डॉक्टरीण होणार!!—"

हो!-त्यावेळीं सुधीरांचे डोळेच माझ्या समोर होते...

पुढें सुधीरांच्या 'जीवन–गंगे'त मी शिरलें, तेव्हांहि तेच डोळे माझ्या-पुढें लकाकले...

नि आज, याक्षणींहि, तेच माझ्या सुधीरांचे डोळे माझ्यापुढें आहेत!–ते त्यांच्या डोळ्यांचे दरवाजे!–त्यांतूनच मला वेळोवेळीं दिसत आलेलं व दिसणारं त्यांचं मन!!—

९३

(या आठवणी इथं हळूंच लिहून काढल्या; नि शेवटीं, आतांच एक गमतीचा विचार माझ्या मनांत तरळत गेला...तरळत आहे–माझ्या मानसमंदिरांत लपून बसलेल्या सुधीरांनाच ना, मी हें माझं सारं गुपीत, आतां सांगीतलं ? तेव्हां त्यांनाच पुढें हळूंच विचारावं...)

—"सुधीर, तुम्हाला मागमूस तरी आहे कां, या साऱ्या पूर्व घटनांचा!–या क्षुल्लक वाटणाऱ्या घटना...कीं, ज्यांच्या जोरामुळेंच, हिरीरीनें...पण यशस्वीपणें, शेवटीं, तुमच्या आयुष्यांत मी शिरलें,...आजहि आहे??–नाही,–नक्की नसणारच!!—पुरुषांना असल्या गोष्टींची दादहि नसायची;



पालाच म्हणायचं पुरुष!...पण मग,...हेंच बरं तें उत्कट स्त्री-प्रेम!–तेंहि असंच मुग्ध असायचं; तिच्याच मनाच्या,...प्रेमाच्या...मखमली पेटींत, तें खोल खोल दडलेलं असायचं!...स्त्रीच्या रसरशित मनाला बाहेर उघडणारे दरवाजेच नसतात!!—"

## हसत हसत त्याग!

९४

इंग्रजांच्या औपचारिकपणांतहि एक प्रकारची शिस्त असते, नाही?—ख्रिसमससारखे सामुदायिक नि लग्न–लग्नदिन, जन्म–जन्मदिन सारखे वैयक्तिक सण-साजरे करण्यांत औपचारिकपणा असेल; पण स्वतः असतील तिथून, नि असतील तिथल्या माणसाच्या असल्या सुख–दुःखांत–ते आठवण ठेऊन वांटेकरी होतील. शाब्दिक..औपचरिक कां होईना, असल्या कृत्रिम वाटणाऱ्या आस्थेंतहि हौस नि माणुसकी असते. त्यामुळेंच, त्यांच्या नि त्यांच्या भोंवतालच्या माणसांच्या आयुष्याला गोडवा येतो.

—नाही तर आम्ही!–कितीहि मोठ्या पदाला चढलें, तरी आम्हाला तें जमायचंच नाही, हेंच खरं!–जगांतच राहून,—'आहे काय जगांत?—' म्हणतच, आमचं सारं आयुष्य सरायचं!!—

डॉ. स्टोनचंच पहा ना!—लढाईपासून, ते गेलीं पांच वर्ष विलायतेंतच आहेत; 'व्हर्साय'नंतर, आतां महिन्याभरासाठीचं ते हिंदुस्थानांत आले आहेत. त्यांत, मुंबईत एकच दिवस राहून कराचीला जायचा त्यांनी कार्यक्रम आखलेला; तरी पण, तेवढ्यांतच, वेळांत वेळ काढून, त्यांनी सुधीरांना निरोप पाठवला; भेटीची इच्छा दर्शवली; त्याप्रमाणें आज सुधीर त्यांची धांवती भेट घेऊन आले.

म्हातारा मोठा प्रेमळ;...त्याच्या मर्जी-उत्तेजनामुळेंच सुधीर यशस्वी झाले; परदेशीं जाऊं शकले, शिकून आले; सुधीरांना डॉ. स्टोनबद्दल फार आदर; आपले गुरु मानतात त्या म्हाताऱ्याला, ते!—केवळ परीक्षक म्हणून कां होईना, माझाहि त्यांच्याशीं थोडा संबंध आला होता.

—माझी 'जीवन गंगे'त नेमणूक व्हावयाच्या वेळीं, मीं त्यांच्याच-कडून सुधीरांना चिठ्ठी आणली होती—

९५

दुपारीं सुधीर जे आले, ते हसतच म्हणाले—"म्हातारा मला पाहून फारच आनंदला; थरथरत्या हातांनीं माझे दोन्ही हात हलवीत, बोलतांबोलतां मला त्यानें विचारलन्...'मी पाठवलेली पोरगी आहे नारे तुझ्या हॉस्पिटलांत, अजून?...कशी काय आहे?'–मी त्यावर हसून म्हटलं–'फुकट गेली अगदीं ती! तिनें शेवटीं लग्न केलन्; आतां आई झालीय्. घरांत चुलीपाशीं बसते नि पाळण्याला झोपा घालते! बस्स—'

सुधीर हसूं लागले, म्हणून मीहि हंसत म्हणालें, "अशी बदनामी केलीत काय माझी त्यांच्याकडे?...बरेच आहांत कीं!"

पण अधीरपणें सुधीर पुढें म्हणाले—"पुढें ऐक तर खरं! म्हातारा अगदीं आहे तसाच गमत्या आहे. चुकचुक करीत त्यावर म्हणतो कसा? 'अर्र्–अगदींच घात केलान्, म्हणायचा!–कोण,...हा गाढव तरी कोण, तिला बिघडाविणारा? त्याला गोळीच घातली पाहिजे.'–तेव्हां मी हसून माझी छाती पुढें करीत म्हणालों–'मीच तो गुरुजी!'-त्यावर जरा कान-पिचक्या देऊन स्टोन मला म्हणाले–'आलं, आलं सारं माझ्या ध्यानांत आधींच मी ऐकलंय् तें सारं. पण कायरे भल्या गृहस्था, तुम्ही दोघंही अगदीं अशीं कशीं रे?-लग्नाच्यावेळीं या म्हाताऱ्याची आठवण तरी? बरं तुला नाहीं, तिला तरी आठवण,...बोटभर चिठ्ठी पाठवायची? पण नाहींच तें! तुम्ही हिंदी लोक हे असेच! अक्कल खूप असते तुम्हाला, पण पद्धतच नसते!"



"खरंच आहे त्यांच म्हणणं!" माझ्याहि मनाला तें लागून, मी सुधीरांना म्हणालें–"चुकलंच आपलं तें त्यावेळीं, एकूण!"

आणि त्यावरूनच मग क्षणभरानें सुधीर मला हळूंच म्हणाले—"त्यांचीच चिठ्ठी घेऊन तूं आलीस, नाही?.तो आपल्या पहिल्या भेटीचा प्रसंग!–आठवतो तुला, प्रेमा?—"

"चांगलाच आठवतोय्–" मी म्हणालें; अगदीं त्या प्रसंगांतला जो तपशील सुधीर आजपर्यंत विसरून गेले आहेत, त्याच्यासकटच आठवतोय् तो मला—

९६

त्यांच्या तो डोळ्यांचा जणूं मागोवा घेत, मी अहमहमिकेनें शिक्षण पुरं केलं; स्टोनसाहेबांच्या शिफारशीनें स्वतंत्र चांगली नोकरी मिळवली; पण सुधीरांच्या आयुष्यांत मला प्रवेश कसा मिळणार होता.?—ते अजून अविवाहित,... एवढ्याच केवळ समाधानांत मी होतें; तेवढ्यांत, 'जीवन गंगे'तल्या फीमेल वॉर्डची जाहिरात मी वाचली; ती सुवर्णसंधीच होती मला; ती नक्की करावी, म्हणूनच केवळ, मी डॉ. स्टोननां त्यावेळीं गडबडीनें भेटलें होतें; नि–ते विलायतेला निघण्याच्या बेतांत असतांहि—त्यांची एक शिफारस-चिठी हातीं घेऊन ठेवली होती.

म्हणून काय, माझा स्वाभिमान मेला नव्हता; 'जीवन—गंगे'त मला शिरायचं होतं,...तें सुधीरांच्या आयुष्यांत शिरण्याचं साधन म्हणून; पण तें त्यांचं किंवा कोणाचं मिंधं होऊन खासच नव्हे. मला आत्मविश्वास वाटत होता—"येथपर्यंत आलें, त्याच माझ्या स्वतंत्र कर्तबगारीच्या जोरावर, मी पुढला पल्ला गांठीन—सुधीरांनाहि गांठीन!—"

आणि म्हणूनच,'केवळ अनोळखी अर्जदार' या नात्यानें मी सुधीरां-पुढें उभी राहिलें. त्यांच्या चौफेर प्रश्नांच्या सरबत्तीला, धडधडल्या छातीनें तोंड दिलं; शेवटीं, अगदीं समाधान व्यक्त करूनच, सुधीरांनी माझी नेमणूक

झाल्याचं सांगितलं. तेव्हां मग सानंद, साभिमान उठतां उठतां, मी त्यांना हळूंच विचारलं... "आपल्याला डॉ. स्टोन असतील ठाऊक ?—"

तेच ते सुधीरांचे डोळे एकदम चमकले होते; ते त्यावेळीं म्हणाले होते— "वाः — मला अभिमान वाटतो सांगायला, ते तर माझे गुरु !"

"कां बरं ?" क्षणभरानें त्यांनी उलट विचारलं; तेव्हां मी मुकाट्यानेंच स्टोनसाहेबांची ती चिठी सुधीरांच्या हातीं दिली होती.

ती स्तुतीपर चिठी वाचून झाल्यावर, सुधीर आश्चर्यानें जागचे उठले होते; नि अगदीं आस्थेनें पुन्हा माझ्याशीं हस्तांदोलन करून, हसत हसत म्हणाले होते—"अस्सं ऽ !–पण मग कमालच आहे तुमची, म्हणायची ! — आतां दाखवतां काय ही चिठी ?–आधीं कां नाहीं दाखवलीत ?—आपल्या दोघांचा वेळ तरी वांचला असता !–"

त्यावेळीं, मी नुसती हंसलें त्यावर; त्याक्षणीं, स्वाभिमानानें मला अगदीं जग जिंकल्यासारखंच वाटलं होतं !

९७

पण सुधीर हें आजच विसरले आहेत, असं नाहीं. त्याचवेळीं ते विसरले होते, तें सारं !—पण त्यात कसलं आश्चर्य ?—माझ्या आयुष्यांत सुवर्णाक्षरांनीं लिहायचा तो प्रसंग ! पण त्यांच्या घालमेलीच्या आयुष्यांतली एक क्षुल्लक बाब होती ती—

—आणि तेव्हांच मी ओळखलं–'सुधीर आत्मकेंद्रित, आत्मनिष्ठ एकमार्गी आहेत, एकांडे शिलेदार आहेत.' 'जीवन गंगें 'त मी प्रवेश केला तरी त्यांच्या जीवन गंगेच्या क 'ावरच उभी होतें. ...प्रवाहाचं वळण नि खोली अजमावल्याशिवाय, घाईनें आंत उडी मारली तर बुडण्याचीच पाळी !

कधीं कधीं मी खिन्न होईं; अधीर होईं. पण फिरून मला आत्मविश्वास वाटे; आशा नि खात्री वाटे. त्यामुळेंच सुधीरांना 'आवडणारी त्रयस्थपणाची



कर्तव्यदक्ष भूमिका मी स्वीकारली. 'जीवन गंगें 'तहि माझं कर्तृत्व त्यांना दाखवलं—त्यामुळेंच, त्यांचा सहवास मला लाभला. त्या सहवासांतच मी त्यांच्या मनांत शिरकाव केला. केवळ माझ्याच नव्हे. त्यांच्याहि तीव्र इच्छेनें, त्यांना सुखावून, मानानेंच त्यांच्या आयुष्यांत मी शिरलें. ती माझी धिम्मी पण चिकाटीची वाटचाल होती.—पण अखेर, दूर दूर असलेले सुधीर माझे झाले होते !

स्टोनसाहेबांना किंवा सुधीरांना माझ्यांत जें असामान्य कर्तृत्व, जी तल्लख बुद्धिमत्ता दिसली... ती माझ्या रक्तांतली नव्हती. माझ्या मनांत खोल दडलेल्या, बळकट रुजलेल्या प्रभावी सोज्वळ भावनांनींच ती तयार केली होती.

—मला तर वाटतं, स्त्रीची प्रखर सद्भावना जगांत वाटेल तें करूं शकेल. माझ्या मधल्या आयुष्यांतील साऱ्या कर्तृत्वाचा, बुद्धीचा उगम माझ्या डोळ्यांत नव्हता; तो माझ्या जिवंत हृदयांत होता !—

—माणसाचं–पुरुषाचं...प्रेम असतं जीवनावर !—स्त्रीचं जीवनच असतं प्रेमावर ! !—

९८

नि म्हणूनच,...एकदां माझं साध्य मला तसं मानानें साध्य झाल्यावर,–सुधीरांनीं पुरुषसुलभ पद्धतीनें कां होईना, 'राजीनामा दे !' असं मला म्हणतांच, त्यांच्या सुखाच्या कल्पनेनें मी पटकन् त्या निर्णयाला तयार झालें.

...पण मग...तीच स्त्रीची नैसर्गिक पद्धत !

कल्पना करूं...साध्या साखरेचा, प्रयासानें...हुबेहूब ताजमहाल तयार करण्याची चिकाटी नि कलाकुसरी आपण एकदां दाखवली; हेतु एवढाच, कीं, तो आपल्या प्रिय माणसानें कौतुकानें आपल्या हातीं घ्यावा !...तर मग, सहज लीलेनें तयार केलेल्या त्या आकृतीवरहि आणखी आपला जीव गुंतविण्यांत काय अर्थ !–जोंपर्यंत त्याला वाटेल, तोंपर्यंतच त्या ताजमहालाकडे

तो पहात राहील. उलट, त्याला वाटेल तर, वाटेल त्यावेळीं, ती साखरेची कलाकृती मोडून, केवळ: साखर म्हणूनच, तो ती हंसत हसत खाऊन टाकील !–साखर ही खाण्याचीच गोष्ट; ती त्याला प्रिय;–पण त्याला ती आणखी आवडेल–आवडावी,...म्हणूनच ताजमहालच्या रूपानें ती आपण त्याच्या हातीं दिली !—एवढं एकच त्यावेळीं लक्षांत असलं,...म्हंणजे मग त्यानें कांही केलं तरी आपल्याला दुःख का व्हावं ?—

—सुधारांची पत्नी, लीनीची माता,...या गृहांतील गृहिणी,...म्हणूनहि, अगदी या क्षणापर्यंत, मी जी सुखीच आहे, ती यामुळेंच !—

—"हीच कां डॉ. प्रेमा ?" म्हणून सुधीरांच्या पुरुषी नजरेला त्याचं आश्चर्य वाटतं असलं, तर वाटो बिचारं !—पण शिकलेली असलें, तरी माझ्या स्त्री-दृष्टीला, स्त्रीमनाला यांत अद्भुत असं कांहींच वाटत नाही !—

—आम्हा स्त्रियांना निसर्गानें असंच बनवलेलं आहे !—कसलाहि त्याग आम्ही नेहमी असा हसत हसतच करतों !—

## समानतेची सुखद जाणीव !

९९

लीनी आतां पक्कीच खेळकर नि अवखळ झालीय्. रांगतां रांगतां तिला हल्लीं एवढं मोठं घरहि पुरत नाहीं...अगदीं धिंगाणा घालते घरभर...

कधीं कधीं, कुठं जाग नाहीं,..,तेव्हां गेली कुठं...म्हणून जरा गोंधळून इकडं तिकडं बघावं, तर शेवटीं कोचाखालीं नाहींतर मधल्या राउंड टेबलाखालीं ती..दिसणार; आपण शोधत असतांना, आपल्या पायांच्या होणाऱ्या हालचालींकडे बाईसाहेब बराच वेळ गपचुप दबा धरून पहात असाव्यात,



असाच त्यावेळचा तिचा चेहरा दिसणार ! मग ती चटकन गालांतल्या-गालांत मुरड घातलेलं मिस्कील हंसेल; लकुलकु डोळ्यांनीं आपल्याकडे त्या अपेक्षेनेंच पहात असेल. नि जरा लटक्या रागानें बोलून तिला उचलून घेतलं, कीं, 'कशी केली गंमत ?' अशा जाणिवेच्या थाटांत, ती अगदीं अंगांत आल्यासारखं गदगदां घुसळत, एकदम मोठमोठ्यानें हंसत सुटेल.

तो सुरवातीपासून शेवटापर्यंत तिला एक खेळच वाटतो, टवळीला !–कधीं कधीं तर बाल्कनींत शिरून कठड्याखालच्या जाळींतून ती हात बाहेर काढते नि समोरच्या समुद्राकडे पहात, जणूं त्याला उद्देशूनच, आपल्याच बोबड्या भाषेंतलं कसलंसं काव्ययन गाण्यांत बाईसाहेबांना गढलेल्या दिसतात. तें पाहिलं, कीं, तिचे मटमटां मुके घ्यावेतसं वाटतं !

...पण अशी मुलखावेगळी आहे टवळी–आपल्या झोंपायच्या वेळीं हटकून हिचा असला धांगडधिंगा चालणार; नि तिला घेऊन आपण संध्याकाळीं जरा बाहेर पडण्याचा विचार केलेला असावा–तर तोंपर्यंत खेळून खेळून दमून ही बया त्यावेळीं, अवेळींच हमखास झोंपी गेलेली असणार !—

निष्पाप बेफिकीर बाळांची ही खेळकर वृत्ती, किती जीव ओढून घेणारी असते ! आपण आपलं पुस्तकी ज्ञान, शिक्षण, मोठेपण,...सारं विसरून त्यांतच तल्लीन होतों पटकन् !—

हल्लीं सुधीरांची स्वारी थाऱ्यावर नाहीं; म्हणून त्यांची मोटर नाहीं जागेवर; मग गणू तरी कुठला सांपडायला घरांत ? बरं, स्वयंपाक्याच्या तर अंगावर लेंकराला टाकतां येत नाहीं !—तेव्हां एकेकदां, माझा सारा दिवसच्या दिवस असाच जातो, या लीनीमागल्या गोंधळांत—

१००

हल्लीं आणखी माझी प्रकृती तितकीशी बरी नाहीं आहे ! —जरा अशक्त अशक्त वाटतं; क्वचित् निरुत्साही वाटतं ! 'म्हणजे असं...जरा प्रौढपणीं बाळंतपण झालं ना,...कीं बायकांचं हें असंच असतं !' हें मला–या

डॉ. प्रेमाला-डॉ. सुधीरांनीं नको आहे कांहीं बजावून सांगायला !-तेवढंच कांहीं माझ्या या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामागें खासच नाहीं.---

असं तर नसेल ना ?—कीं-माझं लग्नापूर्वींचं दैनंदिन आयुष्य--सारख्या हालचालींचं, जबाबदारीचं होतं; हातांतल्या केसीस, त्यांच्या कमी-जास्त गंभीर परिस्थितीच्या चढ-उतारांत लागलेलं-गुंतलेलं शास्त्रीय दृष्टीचं लक्ष, त्याप्रकारें मन समरस झालेलं असल्यामुळें होणारा मनोभावनांचा चढउतार, त्या नोकरीजबाबदारीच्या आयुष्यांतील मनोवेधक प्रक्षोभकता—

तें आयुष्यच आतां एकदम बदललं...तें फारच बैठं झालं...मर्यादित झालं !-त्याचाच असेल का हा माझ्या प्रकृतीवरला अप्रत्यक्ष परिणाम ? –

दुसरं हेंहि खरंच;...नाहीं म्हटलं तरी, पूर्वीं—लीनीच्या जन्मापूर्वीं—आम्हीं दोघं जसं सकाळीं उठून, हँगिंग गार्डनपर्यंत स्वैरपणें फिरून यायचों;.. कधीं मिळून सिनेमा-नाटकाला जायचों; कधीं मोटारींतून जुहू-विहूला भटकायचों; लॅबवर्कमध्यें हसत खेळत एकत्र वेळ घालवायचों;...तसलं आमचं हल्लीं कांहींच उरलेलं नाहीं !—बहुतेक सगळंच हळूहळू कमी होत गेलंय्—

सुधीर हल्लीं असतातच कुठें हल्लीं जाग्यावर ? आधींच डॉक्टर म्हटला, कीं सदा कामांत गुंतलेला; बिन वेळापत्रकाचंच त्याचं आयुष्य. यांनी आणखी त्यांत सत्रा निर्वेतन जादा कामांची तळी उचलून धरलेली. कॉर्पोरेशनच्या निवडणुकीचे हे दिवस;...यावेळीं सुधीर मेयर होण्याचा बराच संभव आहे; त्यांना कीर्तीचा सोस आहे, असं नव्हे; पण मनांत सामाजिक कार्याची हौस--तेव्हां चार जणांच्या शब्दाला हे मान देतात, झालं;--त्यांचा फावला वेळ हा असाच जातो बाहेर बाहेर. !

मग एवढं सारं करून सुधीर कधीं घरीं येणार, तेव्हांच आपण घरीं नसलों;...किंवा ते घरांत येतांक्षणींच म्हणालों-" चला फिरायला जाऊंया आपण—"; तर मग त्यांना मौज ती कसली उरली ?-लीनीला प्रेमानें जवळ घेऊन, तिच्याबरोबर ते हसता-खिदळताहेत, तेवढ्यांत त्यांच्या थकल्या-



भागल्या जीवाला काय हवं नको तें पाहायचं;...ते खाताहेत, त्यावेळीं, नुसतं त्या दिवसांत काय काय झालं नि दुसऱ्या दिवशीं काय काय होणार, याची आस्थेवाईक विचारपूस करायची, एवढंच म्हटलं तरी वेळ पुरत नाहीं.

असं सारं होतं; तेव्हां प्रत्यक्ष कसलं दुःख नसलं, तरी अगदीं प्रत्यक्षांतल्या जड गोष्टींच्या मर्यादित रिंगणांत भिंगरी घातल्यासारखा, माझा प्रत्येक दिवसाचा कार्यक्रम चालला आहे.

१०१

पण ही तक्रार नव्हे; विवाहित जीवन जाणूनबुजूनच स्वीकारलंय् मी !...जें जें मी करतेंय्, तीं सारीं माझीं कर्तव्यंच; कुणी माझ्यावर लादलेलीं नाहींत तीं; नि पैसा टाकून तीं सारीं विकत घ्यायलाहि मला कमी नाहीं.—पण मलाच नाहीं तसलं पसंत !

तथापि, ज्या माझ्या स्त्री-मनाला हें पसंत नाहीं,...त्याचीच एक दुसरी बाजू आहे. आपण सुशिक्षित आहोंत; आपल्या ज्ञानाच्या विस्तृत उपयोगानें आपण बाह्य नि व्यापक क्षेत्रांतहि यशस्वी होऊं शकूं,... असल्या आपल्या कुवतीच्या जाणिवेची ती मनाची दुसरी बाजू !—ती जागी झाली, कीं, मन कित्येकदां उद्विग्न होतं; वाटतं, आपल्या आयुष्याचा असा फुकट नाश होतोय् !...

कल्पनेंतल्या अपेक्षा नि व्यापक भराऱ्या ! नि भोंवतालच्या प्रत्यक्ष वातावरणा—आयुष्यांतल्या अत्यावश्यक पण सापेक्षपणें क्षुल्लक, कायम ठशीव नि मर्यादित अशा हालचाली ! यांची परस्पर एक भयानक झुंज होते. ...आणि मग अशावेळीं वाटतं...आपलं प्रत्यक्ष जीवन आपल्या नैसर्गिक योग्यतेच्या पातळीखालचंच आहे!-या विचारानें तर,—इच्छा असो नसो—विफलतेचींच दाट अभ्रं माझ्या मनाला झांकळून टाकतात !

--मग फिरफिरून वाटतं, स्त्री विवाहित होणं हें नैसर्गिक असेल; ..ती सुशिक्षित होणं, हेंहि हितावह नि नैसर्गिक असेल;-पण कोणतीहि प्रामाणिक

सुशिक्षित विवाहित स्त्री-तिचं आयुष्य-बहुधा कृत्रिमच असतं!—तिची स्थिती अगदीं अर्धनारी नटेश्वरासारखीच होते. स्त्रीचं मन नि पुरुषाची महत्वाकांक्षा दोन्ही एकाचवेळीं, एकाच शरिरांत, झगडल्याशिवाय रहाणार तरी कशी ? यासाठींच, एक तर तिनें पुरुषासारखं पुरं स्वतंत्र तरी रहावं; नाहींतर शिक्षण विसरून पुरी गृहिणी तरी व्हावं!—तरच तिला नि सर्वांना सुख !

१०२

आणि मग वाटतं, हल्लीचा माझा प्रकृतीचा नबळेपणा, नि मनाचा खिन्नपणा-माझ्या असल्या मानसिक झगड्याचाच परिणाम असावा; पण त्याला मी काय करणार?- नि सुधीर तरी काय करणार?-आपले सारे व्याप संभाळूनहि, मला शक्य तों सुखी करण्याचा ते प्रयत्न करतात. म्हणूनच, माझ्या मनाला मी समजावीत असतें—परिस्थितीमुळें नव्हे, असलेंच तर, केवळ माझ्या असल्या मनःस्थितीमुळेंच, मी दुःखी आहें!—

आणि सुधीर-एकमार्गी, आत्मनिष्ठ, कर्तृत्वशील!—पुन्हां बराच काळ त्यांनी अविवाहित आयुष्य घालवलेलं!—शेवटीं, लग्न केलं, म्हणून माझ्या-सारख्या स्त्रीच्या तनमनाशीं, ते एकदम समरस तरी कसे बरं होऊं शकतील?-एखाद्या कादंबरींतल्या नायकासारखं, 'हनी!-मून!' करीत कायमचं राहणं,.. त्यांना कसं शक्य होणार?—आपल्या आयुष्यांत आलेली एक अभिनव, रोमहर्षक, सुखद घटना!...म्हणूनच ते लग्नानंतर सुरवातीला कांहीं काळ आनंदले; माझ्या सहवासाचा, सान्निध्याचा, स्पर्शाचा मोह—त्यानें ते सुखावले;—मीहि सुखावलें.—मला त्यांनी मानवी जीवनांतला अगदीं स्वर्गच दाखवला!—

पण तें तितकंच... सुधीर तेवढ्यांतच जीव गुंतवणारे नव्हत; तें त्यांना शक्य नाही. त्यांचं वैयक्तिक महत्व, त्यांचीं गगनभेदी महत्वाकांक्षी ध्येयंच त्यांना अधिक मोहवणार!—पण तेंच नैसर्गिक नव्हे का?—त्यामुळेंच मी



त्यांच्या निवांत सहवास-सान्निध्याला मुकतें!—पण तेंहि माझं भाग्यच नव्हे कां?-त्या सुखानेंच मी आनंदूं कां नये?—

घराबाहेरचं कर्तृत्व, मोठेपण,...यांची खेळती, मोहक, मादक हवा एकदां खाल्लेला माझा जीव!-मधूनच तो असा कधीं कधीं गोंधळतो-घुटमळतो! त्या कर्तृत्वाची अनुभवी जाणीव झाली असल्यामुळेंच, मला एकेकदां भास होतो-पुरुषसमान कर्तृत्वाच्या, यशस्वी मोठेपणाच्या शिखराच्या रस्त्यानें आपण झपझप पावलं टाकीत जात असतां, पाय घसरून एका कड्यावरून खालीं कोसळलों आहों... -लग्नानंतर आपण अगदीं आहों तिथंच; किंबहुना, निरुंद चौकटीच्या थडग्यांत-या चार भिंतींत-पडलों!-उलट, आपले सुधीर मात्र,...त्यांच्या बुद्धीची जोरदार चमक नि वैयक्तिक कर्तृत्वाची असामान्य वाढ दाखवीत, अगदीं प्रतिदिन,-वर वर,-कीर्तिशिखराकडे जाऊन पोहोंचत आहेत!—

१०३

मनांत दडलेली ही सुप्त तुलनात्मक जाणीवच, मला हल्लीं कधीं कधीं अत्यंत सुन्न, विषण्ण करते. अजाणतां होणारी प्रत्यक्ष प्रतिक्रिया म्हणूनच असेल, मला अतिशय प्रिय असलेल्या सुधीरांवर, मी मनांतल्या मनांत अगर प्रत्यक्षहि अकारण राग करतें! 'असं कां?' हें न समजून, तेहि कधीं कधीं गोंधळतात. क्वचित् माझ्यावर रागावतातहि !

—पण म्हणूनच झटकन् विचार करून, मी माझ्या असल्या मनोव्यापारांना ताब्यांत आणतें; कारण, मला पटलं, ते विचार तसेच बळावत गेले, तर असंच, अगदीं असंच...आमच्या संसारांतलं—आज आम्हाला मिळत असलेलं, हवं असलेलं—सुखहि विरत जाईल; विरल होईल !—

—असे हे विचार मनांत स्थिर झाले, म्हणजे जीवाला फार फार बरं वाटतं !—पतिपत्नींचा समान दर्जा, समान मानससंस्कृति,...वैवाहिक

जीवन सुखी व्हायला, आवश्यक, पोषक असतं म्हणतात; तें अशावेळीं मनाला एकदम पटतं !—

एकमेकांबद्दल वाटणाऱ्या प्रेमाबरोबरच, ही समानतेची स्वाभिमानी जाणीवहि मनांत असल्यामुळें, आपल्याला असले शाहणे विचार स्फुरतात. त्यामुळेंच, त्या जोड आयुष्यांत खळबळ उडवून द्यायला, मधून मधून येणाऱ्या प्रतिकूल मनःस्थिति—परिस्थितीला, सुविचारीपणें योग्य कलाटणी देतां येते. ती हवी तशी वांकवून—वळवून, तिच्यांतच आपल्याला स्वतःला समावून घेतां येतं. दोघांच्या एकत्र जीवनाच्या एकाच ताटांतून सुख वाढून घेतां येतं; सुसंस्कृत सुशिक्षित जोडप्याचं सुख, हें असंच सौम्य, सापेक्ष, पण स्थिर असतं; तें तसं होतं !—

१०४

क्षणाच्या असल्या पहिल्यावहिल्या घुटमळीनंतर, माझा जीव फिरून समाधान पावतो; सुधीरांच्या अफाट बाह्य कर्तृत्वाचे, त्यांच्या त्या जीवनाचे नवनवीन चकाकते पैलू पाहून, तो आनंदित होतो, तो यामुळेंच ! माझं व्यक्तिगत बाह्य कर्तृत्व संपलं... गेलं; आतां हें चार भिंतींतलं माझं सुधीरांचं घर, त्यांतलीं फुलं, त्यांनीच एकप्रकारें मर्यादित,...पण दुसऱ्या दृष्टीनें पुरुषाइतकंच अफाट नि व्यापक असं गृहकृत्य-कर्तृत्व— तेंच माझं जीवन !—त्या ओघाला धरून पुढें जाणं, हीच माझी जीवनगंगा !—असं मला मनापासून वाटतं !—

खरंच आहे तें ! प्रेमी जोडपं, म्हणजे—केवळ संसाराच्या झाडावर नुसती बसून राहिलेली, गुलगुलत्या बुलबुल पक्षांची जोडी नव्हे ! त्यांचं प्रेम,... म्हणजे घराच्या उतरत्या कौलावरल्या कबुतरांच्या जोडप्याचं स्वैर घुमणं नि डोळे मिटून जवळजवळ बसून राहाणं नव्हे !—समाजांतलं जोडपं समाजासाठींच असतं, नाहीं का ? –त्यांचं जीवनहि समाजाचं नि समाजासाठींच ! —याचीच पुरी जाणीव ठेवायची;...एकमेकांचे हळुवारपणें हात धरायचे;...



एकमेकांचं गुणग्रहण करायचं;...परस्पर धीर द्यायचा;...नि एकमेकांना व पर्यायानें आपल्या समाजाला प्रगत व्हायला मनापासून मदत करीत–सहप्रवास करीत–आयुष्य घालवायचं ! हें...करील तेंच खरं प्रेमी जोडपं !—

## 'जीवन-गंगें'तला अपघात !

१०५

आज संध्याकाळीं, सुधीर नि मी, आम्ही दोघं बसलों असतां, गणूला बोलावून, सुधीर म्हणाले–"अरे गणू, उद्यां सकाळीं ती मुलगी बिचारी बाहेर पडणार; तेव्हां तिला सारं सांगायचं, विचारायचं, तिच्या घरीं पोंचवायचं काम आहे !–तेवढं करशील ना तूं ?—"

गणूचा चेहरा पालटला; गोंधळून माझ्याकडे पहात तो म्हणाला—"पुरुषांचं नाही काम तें, नाना !–वयनींनाच चांगलं जमेल तें—"

" हो, खरंच हं !-" सुधीरांना ती कल्पना पटली; त्यांनी माझ्याकडे साभिप्राय पाहिलं.

मला तें अवघड वाटत असलं, तरी उत्सुकताहि वाटली; तें कोणी तरी करायला हवंच होतं. तेव्हां, मी संथपणें म्हणालें—"बरं बरं–गणू ! सकाळीं माझ्याचकडे तिला प्रथम पाठवायला सांग, सिस्टरना;—मग मीच तिला सांगेन–विचारेन सारं, म्हणावं—"

त्या माझ्या अभयामुळें गणूला हायसं वाटलं; माझा मात्र जीव अजूनहि खालींवर होतोय्, त्या दुर्दैवी पोरीच्या उद्यांच्या भेटीच्या कल्पनेनें—

१०७

मोठं त्रांगडंच आहे तें एक !–त्याचं असं झालंय्–परवां आम्ही दोघं, लीनीला मधें घेऊन, कौंचावर गप्पा मारीत बसलों होतों; तोंच,

एकाएकीं भयंकर गडबडीनें, मोठ्या आवाजा-ओरडीनें दचकून, आम्ही जागचें उठलों; नि बाल्कनीकडे धांवलों.-कावऱ्याबावऱ्या लीनीला जवळ घेऊन, मी खालीं रस्त्यावर पाहिलं; 'जीवन-गंगे'समोरच एक भयंकर अपघात झाला होता.

एका शेठजींच्या भरधांव सुटलेल्या मोटरीनें, रस्त्यानें चालणाऱ्या दोघांना ताडकन् लांब उडवलं होतं. मुंबई पहायला हौसेनें आलेलीं कोणी बापलेक होतीं तीं;...धांदरटपणें समुद्राकडे पहात, चालतां चालतां त्यांचं दुर्लक्ष होऊन, तो अपघात झाला होता.

ती मुलगी रस्त्याच्या कडेकडे होती. भरधांव मोटरीच्या धक्क्यानें हबकून ती उडाली. पण मामुली खरचटण्यावरच निभावलं. म्हातारा मात्र पुढल्या मडगार्डवर नि जवळच्या विजेच्या खांबावर जोरानें आपटला. डोकं फुटलं; मेंदू दुखावला; तो बेशुद्ध झाला. तोंपर्यंत, त्याच्या एका पायावरून मोटरचं चाकहि गेलं होतं.

ब्रेक लावल्याच्या नि कांचा फुटल्याचा कानठळ्या बसविणारा आवाज, त्या म्हाताऱ्याच्या व पोरीच्या भेसूर किंकाळ्या, यांनीं 'जीवन गंगें'तले शिपाई, म्हेतर, नर्स-साऱ्यांची धांवपळ गडबड उडाली.

गणोबा आमच्या मोटारजवळ साफसुफी करीत उभा होता. तें सारं समोर घडलेलं पाहून, तो साहाय्याला तिकडे धांवला. त्या दोघांना रक्तबंबाळ स्थितींतच स्ट्रेचरवर घालून, शिपायांच्या साह्यानें, त्यानें 'जीवन-गंगें'त् आणलं.

सुधीर ते सारं वरूनच पाहून हळहळले; नि अर्धवट मला उद्देशून व अर्धवट स्वतःशींच पुटपुटत ते म्हणाले,--" मोस्सली सेरेब्रा ॲन्ड स्पायनल कॉर्ड, प्रेमा ! द् मॅन् हॅझ् टु लूझ हिज् राइट लेग"—

तसेच, झटकन् ते बाहेर पडले; लिफ्टकडे न वळतां, भरभर जिना उतरूनच खालीं गेले.



गोंधळून रडणाऱ्या लीनीची मी समजूत घालीत होतें. प्रत्यक्षच पाहिलेल्या त्या अपघातानें, माझीं सारीं गात्रंच बधिर झाल्यासारखीं झालीं होतीं !

१०७

जवळजवळ तीन तास, सुधीर त्या आंगतुक ऑपरेशनमध्यें गढले होते. तें समक्ष पाहून आल्यावर, गणू मला सांगत होता--" म्हाताऱ्याचा पाय कापून काढावा लागला; नि मणका साफ मोडलाय् !-तिथं आतां त्या पायाच्या हाडाचा तुकडा कापून-कोरून फाइल मारून, बसवताहेत, नाना !— कमाल बा त्यांची, वयनी ! जसे काय मोटरचे लोखंडी पार्टसच बसवताहेत वर्कशॉपमध्यें ! कसं पण संथ चाललंय् नानाचं काम, ऑ. टेबलापाशीं"—

तें मला ऐकवतहि नव्हतं. मीं अधिरतेनें पुढें विचारलं-" अन् ती मुलगी रे ऽ ?"

" ती मात्र सुटली बा--भीतीनेंच बेशुद्ध झाली होती. 'बाबाचं बरं आहे' असं ऐकल्यावर आतां झोंप लागलीय् तिला; नुकतीच पाहून आलों मीं"- लिनीला माझ्याकडून घेत, पुन्हा खालच्या मजल्याकडे निघून जातां जातां, गणू म्हणाला.

कोणाची कोण ती; पण त्याच्या जिवाची कोण धडपड !—तो स्वभावच आहे आमच्या गणूचा ! समोर कोण असेल त्याच्याशीं, तसं निरपेक्षपणं समरस व्हायचं, नि त्याच्या सुखदुःखांत नकळतच मिसळून जायचं !...त्याच्या असल्याच वागणुकींमुळें तो आम्हांला घरांतला वाटतो.

त्या ऑपरेशनमध्यें सुधीरनींही कमाल केली होती; शस्त्रकलेची अद्भुत किमयाच होती ती ! म्हातारा 'मंजू मंजू' असं पुटपुटत, नऊ दहा तासांनी शुद्धीवर आला. शरिरावर एवढे भयंकर अत्याचार झालेले ! पण बाराचौदा तास शंभरावर टेंपरेचर नव्हतं; नाडी बरी;...एवढ्या रक्तस्रावानंतरहि डोळ्यांत हवी तशी चमक;-त्या असामान्य ऑपरेशनचं यश, अगदीं आपल्या हातांत आल्यासारखंच सुधीरांना वाटूं लागलं होतं.

पण चोवीस अठ्ठावीस तासांतच सारं पालटलं; पेशंटचं टेंपरेचर चढत चढत पांचावर गेलं; शुद्धी गेली; हार्ट बीट्स कमी झाले, क्षीण झाले;—नि शेवटीं, सुधीरांचा नाइलाज होऊन, तो आटोपला.

असलीं शेंकडों ऑपरेशन्स केलेले सुधीरहि त्यावेळीं चुटपुटले. मग गणू तर काय, जात्याच लेभाळू ! पुन्हा तो अपघात समोरच घडलेला,...त्यानें डोळ्यानें पाहिलेला. त्यानेंच उचलून आणलेला तो म्हातारा, शेवटीं तसा मेल्या-मुळें, गणूचा जीव हळहळला; तो बेचैन झाला.

त्यांतून एक पेंचप्रसंग मात्र उत्पन्न झालाय्; ती पोर मंजू-उद्यां डिश्चार्ज घेऊन, हॉस्पिटलमधून बाहेर पडायची आहे. अजून तिचा कोणी नातलग चौकशीला आलेला नाहीं. बाप मेल्याचंहि तिला अजून कळवलेलं नाहीं. पण तिला कळवायचं कसं ? कोणी ? कधीं ?–आणि पोचवायची कुठें आतां तिला ?—

मोठा प्रश्नच पडलाय्; नि तीच कडवट कामगिरी, गणूनें सुधीरांच्या मदतीनें माझ्यावर ढकललीय् आतां !

—खरंच ! माझ्या जीवनांतला हा अपघात न्यारा तर खराच !...

## लीनीची नवी मैत्रीण !

१०८

मंजू परवां सकाळीं ठरल्याप्रमाणें आली; मी तिला कोंचावर शेजारीं बसवून घेतलं. सडपातळ बांधा, मध्यम उंची; 'वॉर्डी'तलंच पांढरं नऊवारी पातळ नेसली होती. पण तें शोभून दिसत होतं तिला. कुंकू नसलेलं तें पांढरं कपाळ नि काळे मोठेसे डोळे; तिच्या चेहऱ्याला ते गांभीर्य आणीत होते. किंचित् पातळच ओठांची जिवणी; सरळ नाक, केतकी गौरवर्ण;...चेहरा एकूण निरोगी, आकर्षक नि प्रेमळ;–ती चांगलीच देखणी आहे !



काय नि कसं तिला सांगायचं तें न सुचून, मी तिची नुसती अशी पाहणी करतच राहिलें. तिला निम्मंअधिक अंदाजानें समजून, शेवटीं, रडव्या-भेदरल्या आवाजांत, तिनं विचारलं—"माझा बाबा?—"

मी तिला जवळ ओढून, निमूट डोळे मिटले. सारं समजून तिला हुंदका आला. ती ओक्साबोक्सी रडलीहि; पण शेवटीं, समजूतदारपणें लौकरच उमाळा आवरलान्; क्षणाच्या उसंतीनें मी तिला विचारलं–"कुठं जाणार आतां?–मुंबईत? बाहेरगांवीं ?–कुठें ?—"

"आहेत कोण नि जाणार कुठं?–" ती पिचक्या आवाजांत हळूंच म्हणाली—"मुंबईत कोणीच नाही; कोंकणांत घरीं तर सगळी भाऊबंदकी ! बाबा होता, तंवर त्याच्याच जिवावर, अशा कपाळानेंहि इतकीं वर्षे काढलीं; आतां एकटी बाईमाणूस मी—तिथल्या गोंधळांत जाऊन करुं काय?—"

मंजूला कोडं पडलं होतं;...पण मलाहि तें तितकंच पडूं लागलं होतं; ही एकटी पोर जाणार कुठं आतां?—

—आणि तेंच ती मला सारं सांगत होती.

१०९

स्वतः मेहनतीनें आपलं शेत कसणारा,–पण अब्रूदार मराठा घराण्यांतला तिचा बाप; मंजूची आई गेल्यापासून...तोच तिला एकटा, नि ती एकटीच त्याची लाडकी पोर...

तरी त्यानें कुळाचाराला धरून, बारातेराव्या वर्षांतच, माहितींतला मुलगा पाहून, तिचं लग्न केलं. जावयाचं घराणं लढवय्यांचं; तो चांगला धडधाकट, रुबाबदार; आपल्या कुळाच्या प्रथेप्रमाणेंच वीशीच्या आंत सैन्यांत भरती झाला होता.

लग्नावेळीं, तो जमादार नि नोकरीवर; पण मंजू लहान; तेव्हां आपल्या बापाकडेच ती राहिली. दोनदां रजा घेऊन, मध्यें तो कोकणांत आला; सासऱ्याकडेहि दोन दोन दिवस राहिला. बालिश अजाण मंजू!—त्यावेळींच, त्याच्याशीं ती चार शब्द बोलली असेल, एवढंच; पण लग्नाच्या सुखाची खरी कल्पना तिला कसली असायला ?.

तो पेशावरकडे ड्यूटीवर असतानांच, मंजू इकडे जाणती झाली; बापानें जांवयाला हौशेनें पत्र पाठवलं; आग्रहानें बोलावलं; सहा महिन्यांनंतर, त्याला एक महिन्याची रजा मिळणार होती; तेव्हांच परत येण्याचं त्यानें आश्वासन दिलं होतं; मंजूचा बाप उत्सुकतेनें वाट पहात होता...

पण तेवढ्यांत, मध्येंच जर्मन महायुद्ध सुरुं झालं; त्यांचं लष्कर हिंदुस्थानांतून परस्पर मेसापोटेमिआंत गेलं; कित्येक महिने त्यांची कसलीच बातमी नव्हती; गोऱ्यांना काळ्या सैनिकांची काय किंमत?—मंजूच्या बाबाची चिंता वाढत गेली;... "हें लग्न जमवण्यांत, माझंच चुकलं!" असं तो कळवळून पोरीला म्हणे;...तीच उलट त्याला धीर देई; आशा दाखवी... पण शेवटीं सरकारी पत्र आलं; थोडे पैसे आले; सरकारी पेन्शन आलं, दरमहाच सुरुं झालं; तिच्या पांढऱ्या कपाळावर तसा सरकारी शिक्कामोर्तब झाला.—त्या घटनेनें दोघंहि दुःखी झालीं, तिचा बाबा तर प्रथम अगदीं वेडापिसाच झाला; पण मग, पुढें हळूहळूं, मंजूनेंच त्याला व त्याच्या घराला धीरानें सावरून धरलं होतं.

१२०

मंजू हें सांगून, कांही वेळ गप्प झाली; पण पुन्हा आवेगानें म्हणाली... "असा माझ्या डोक्यावर बाबा होता; गांवांत त्याचा साऱ्यांवर दरारा होता; म्हणूनच, अशा नशिबानेंहि अब्रूनिशीं राहिलें; शेतांत नि घरीं, दिवसामागून दिवस खपायचें...कधीं कधीं कंटाळा येई. बाबाच एक दीवस म्हणाला—'तुझा जन्म असाच माझ्या घरांत, या खेड्यांत कुजत जाणार!...माझ्याचसाठीं



राबराब राबलीस...जन्मापासून; —कसली हौस म्हणूनहि नाही करतां आली तुझी मला"...बाबाच्या मनाला तें फार लागायचं...अन् मग पांचसा दिसापूर्वी तोच म्हणाला एकदम...'चल पोरी, तुला मी मुंबई दाखवतों!—' पण आतां...अशी पाहिली मी मुंबई!...बाबा मात्र एकटाच, वर उडून गेला,...स्वरग पाह्यला देवाकडे..."

कितीतरी वेळ मंजूला आपले हुंदके आवरत नव्हते; मलाहि प्रश्न पडला होता-'तिला जा कुठं, कर काय, म्हणून आतां सुचवायचं?'...

मी गप्पच राहिलें; ती हळू हळू शांत झाली.

तोंच, गणूनें लीनीला आणून माझ्या हातीं दिलं; मंजूचं लक्ष तिकडे गेलं; तिनेंहि क्षणभर तिच्याकडे टवकारून पाहून, तिच्याकडे जायला हात काढले. तत्काळ, स्वतःचं दुःख विसरून, मंजूनें हंसत हंसत लीनीला जवळ घेतलं त्या दोघी, क्षणभरांतच, एकमेकींशीं अगदीं आपुलकीनें हसूं खेळूं लागल्या.

लिनी इतकीच मंजूचीहि गंमत वाटली मला, त्यावेळीं;... स्त्रिया त्या स्त्रियाच; चिमुकल्यांशीं क्षणांत समरस होणार; त्यांत त्यांचं आपपर नसतं!

१२१

परवां सकाळीं शेवटीं मंजू आमच्याकडेच जेवली. मग थोडा वेळ जमिनीवर अंग टाकलन्. 'आतां दुपारीं पुढं तिचं काय करायचं?' याबद्दल मीहि पडल्या पडल्या विचार करीत होतें. तोंच, थोड्या वेळानें, मंजू हळूच माझ्याकडे उठून आली; नि जरा लाजत लाजतच मला म्हणाली, "ताई, एखाद्या सख्ख्या बहिणीसारखं, सगळं प्रेमानं केलंत मला तुम्ही! किती धीर आलाय् आतां मला! पण ताई, तुम्हाला...तुम्हाला आतां सोडून जाऊंच नये कुठं,...असं वाटतंय्! राहूं मी,...तुमच्याच आसऱ्याला, ताई? माझे थोडे पैसे आहेत पोस्टांत —आणि..."

तिची ती विनंति मला अनपेक्षित होती. मी चमकलें, नि आश्चर्यानें तिला विचारलं, "पण करणार काय तूं मंजू, इथं?"

‘ मी ? ’…तिचे आशावंत डोळे अभिमानानें चमकले; माझ्याकडे निःसंकोच टक लावून ती म्हणाली “ काय वाटेल तें, पडेल तें करीन !… –बाबाच्या घरीं आजवर करीत आलें, तसंच आतां यापुढं ताईंच्या घरीं ! …लीनीबाळीला सांभाळीन;…घरांतलं सारं पाहीन;…मला सैंपाकसुद्धां छान येतो हो करतां, ताईऽ !,’

ती भाबडी पोर, आशेनें त्याक्षणीं भांबावून, माझ्यापुढं आपली सारीं अलिखित प्रशस्तिपत्रकं टाकत होती. त्यामुळेंच मी एकदम विरघळलें होतें.

शेवटीं, तिच्या खांद्यावर प्रेमानें थोपटून, मी तिला धीर देण्यासाठीं म्हणालें, “ बरं बरं… तें सारं मग पुढचं पुढं पाहूं ! तूं सध्यां तर रहा,… दहा पंधरा दिवस इथं, विश्रांति घ्यायला…”

तिचा आकर्षक देखणा चेहरा, किती एकदम प्रफुल्लित झाला, त्या माझ्या अभयानें !—

११२

—आणि आतां गेले दोन दिवस, मी सूक्ष्मपणें पाहातें आहे;…लीनी-मंजूची अगदीं गट्टी जमली आहे. लीनी खूप असते तिच्याकडे; नि तीहि त्या लबाडीला, आपुलकीनें जीव लावून, सारं सारं आस्थेनें करते;… अगदीं मीं करीत नसेन, केलं नसेन,…इतकं !—

वाईटांतून कधीं कधीं चांगलं घडतं, म्हणतात; तसंच झालंय् हें;–त्या दुःखद अपघातांतूनच, आमच्या घरांत एक गोड अपघात होऊन, माझ्या लीनीला, अगदीं अचानक, तिला आवडणारी नवी मैत्रीण मिळालीय् ही आतां !—

पण मग, दुसरंहि एक मनात पटकन् येतंय्…या वाइटांतून आज हें असं चांगलं घडलं; तसंच,…या आजच्या चांगल्यातून पुढं कधीं कांही वाईट तर नाही ना घडणार ?—



मनाच्या या गोंधळांत, मी अधिक शिरत नाही; तरी पण, हा विचार, ही चिंता, ही अकारण हूरहूर, जी माझ्या मनांत डोकावली,…ती माझ्या शिक्षणामुळें मला आलेल्या दूरदृष्टीमुळें कां ?—कीं, मी एक स्त्रीच आहे, म्हणून–त्या माझ्या केवळ नैसर्गिक स्त्रीदृष्टीमुळेंच ? ?—

—याक्षणीं तरी, या प्रश्नाचं मला नक्की उत्तर देतां येत नाही आहे !…

## शरीर नि मन–

११३

एकेकदां वाटतं, आपण एकूण दांभिकच ! विशेषतः, शिकलेलीं स्त्रीपुरुष;…चारचौघांत वागतांना, बोलतां–लिहितांना !…नाहींतर, प्रेम म्हटलं, कीं, दिव्य, स्वर्गीय,…अशीं विशेषणं कां लावावींत आम्हीं त्याला ?…स्त्रीपुरुषांचं परस्पर आकर्षण म्हटलं, कीं, हरदासी तद्रूप्रमाणं, पावित्र्याची कल्पना त्याला चिकटवलीच आम्हीं !–अजून लग्नपत्रिकेंत कित्येकदां छापतात,…तो ‘शरीरसंबंध’हा शद्बहि, हल्लीं आम्हाला कसासाच वाटूं लागलाय्…

पण या गोष्टींचीच, मुख्यतः, नसते का अपेक्षा तरुण जोडप्याला ?… —मानवी प्रेमाची वरची पायरी मलाहि समजते; तरी पण, त्याचा पाया पार्थिवच ना ?–प्रेमाची प्रत्येक अभिव्यक्ति शरिराच्याच हालचालींमध्यें ना सामावलेली असते ?–मग लाज का वाटावी त्याची ?–कां लपवून ठेवावं आपण तें दुसऱ्यांपासून ?…

निदान, स्वतः माझ्यापासूनहि लपवून ठेवण्याइतकी तरी,…अप्रामाणिक, दांभिक नाही झालेलें मी, अजून !–आम्ही अलीकडलीं शिकलेलीं जोडपीं,

लग्नामधून फारच आदर्श गोष्टींची अपेक्षा करतों. मोठ्या अगम्य, अप्रत्यक्ष दिव्यत्वाची काल्पनिक जाळीं, मनानेंच लग्नाभोंवतीं उभीं करतों; नि त्या स्वतःच्या जाळ्यांतच, कोळ्याप्रमाणें स्वतःला गुरफटवून टाकतों !—एका दृष्टीनें, हाच आमचा मोठेपणा; पण अनेक दृष्टींनी तोच आमचा खोटेपणा !—

वास्तविक, नेत्रमीलन, स्पर्श, सहवास आलिंगन, शरीरमिलन, यांतल्या प्रत्येक पार्थिव गोष्टींतच प्रेम असतं; नि तें प्रत्येक स्त्रीला वा पुरुषाला हवंहवंसंच वाटतं !–पण तें सर्व वाटेल त्या व्यक्तीचं मात्र नव्हे; आपल्याला अतिशय आवडणाऱ्या विशिष्ट स्त्रीचं किंवा पुरुषांचं ! हें मला तरी पटतं; सुधीरांच्या डोळ्यांनीच मी प्रथम भारली गेलें; त्यामुळेंच, माझ्या पूर्वायुष्यांत, मी मनानें इतकी महत्वाकांक्षी बनलें; लग्नापूर्वी व लग्नानंतर, सुधीरांचं सान्निध्य, त्यांचा सहवास, स्पर्श, एकांत...सर्वच मला हवंहवंसं, प्रिय वाटलं !— अगदीं लीनीच्या जन्मापूर्वीपर्यंत, मी सर्व प्रकारें सुखांतच होतें...

## ११४

पण अलीकडे अलीकडे एकदम काय बदललंय्, कोण जाणें ! त्या सगळ्याचा मला अप्रत्यक्षपणें तिटकाराच वाटतो. नि मग मला आश्चर्य वाटतं–"मला प्रिय अशा माझ्या सुधीरांच्या जीवन-संयोगासाठींच, मी माझ्या जीवाचा एवढा आटापिटा केला; नि तेंच सारं आतां हस्तगत असतां, आतांच मला हें असं कां वाटतं ? बिघडतंय् काय ? कोणाचं ?"

एकदां वाटतं, आपली प्रकृति बिघडलीय्; हो, लिनीच्या जन्मावेळच्या त्रासानें माझी प्रकृति ढांसळली ती ढांसळलीच !—पण तेवढं शारीरिक कारणच नाहीं पटत मनाला ! कां बरं ढांसळली प्रकृति ? –माझ्या आमूलाग्र बदललेल्या जीवनक्रमाचाच का हा परिणाम ?—त्यामुळें मनांत दाटलेल्या उदासीनतेच्या विषण्णतेच्या अभ्रांचाच का हा परिणाम ?—पण तसं तरी कां व्हावं ?...



सुधीरांशीं एकांतांत असतांना होणाऱ्या, त्या सर्व तारुण्यसुलभ गोष्टींनी, पूर्वी माझं शरीर पुलकित व्हायचं; मन कसं बहरून जायचं; त्यांच्या नुसत्या स्पर्शानेंहि मला बावरल्यासारखं व्हायचं; पण आतां ?...आतां मीलनानेंहि माझ्या मनातला निर्विकारपणा, विषण्णपणा लोपत नाहीं ! त्यांतल्या त्या 'तोच-तीचपणा' मुळेंच मला त्या सगळ्याचा वीट वाटतो.

आधीं सुधीरांना हल्लीं, त्यांच्या नाना व्यापांमुळें, फारसा एकांत मिळतच नाहीं. त्यांत पुन्हा ते जात्याच स्वयंनिष्ठ, महत्वाकांक्षी, ध्येयशाली; आहे कुठं त्यांना वैवाहिक निवांत जीवनाला वेळ ? मला तर एकेकदां वाटतं, त्या कतर्व्यशील माणसाच्या आयुष्यांत, हें वैवाहिक जीवन केवळ अपघातानेंच आलं आहे.

एकांतांत मला सुखी करण्याचा, ते अजूनहि खूप प्रयत्न करतात. पण त्यानें ते स्वतः सुखी झाल्याचं मला दिसत नाहीं ! माझीच काळजी त्यांना फार; त्यामुळें माझ्यासाठीं आपल्यावर नि पर्यायानें माझ्यावर, ते नाना बंधनं घालतात !...ते मोठे शास्त्रज्ञ आहेत, हें आमच्या एकांतांतहि, ते हल्लीं विसरत नाहींत–माझ्या ढांसळलेल्या प्रकृतीकडे पाहून ते मला हल्लीं वारंवार म्हणतात, "तुझी प्रकृति हल्लीं अगदीं तोळा मासा झालीयु, प्रेमा ! आतां पुन्हा लवकर माता होऊन उपयोगी नाहीं, तूं !"

तें त्यांचं म्हणणं खरं...अगदीं सोळा आणे खरं, असेल; पण त्यामुळेंच, आम्हाला ओझरत्या मिळणाऱ्या एकांतांतहि, एकप्रकारची सारी कृत्रिमता आली आहे !–या शास्त्रीय भूमिकेनें नि या विचारी कृत्रिमतेनेंच, आमचं भावशील नैसर्गिक वैवाहिक जीवन, हळूं हळूं लोपत चाललंय् !–त्यामुळेंच, घराच्या चौकटींत वावरणारं माझं मन, अधिकच विषण्ण होत जातंय्; त्याच्याच परिणामीं, माझी थोडी फार ढांसळलेली प्रकृति, सद अधिकाधिक कुरकुरी होऊन ढांसळतेय् !—

असं,...अगदीं अस्संच,...हें कारणपरंपरेचं घातकीं वर्तुळ गरगर फिरत आहे !—

११५

पण सुधीरांचं आजचं हें बहुविध जीवन,...हा त्यांचा पुरुषार्थच नव्हे कां ?...इतर सामान्य रानटी पुरुषासारखे न वागतां, आपल्या पत्नीची... तिच्या प्रकृतीची, ते उलट काळजी घेतात; हें त्यांना भूषणास्पदच नव्हे कां ?...हो, याची जाणीव आहे मला; तरी पण, माझ्या मनाचं खरं समाधान कशानेंच होत नाही !...नि मग, मला सारखा सारखा भास होत राहतो... मोठ्या प्रयासानें, बाह्यतः तरी, मी पूर्ण जिंकल्यासारखे वाटणारे माझे सुधीर, माझ्यापासून, प्रतिदिन, अगदीं लांब लांब चालले आहेत...

दिवसांतले उरले सुरले कांहीं पळते क्षणच कां होईनात, आम्ही लीनीमुळें एकत्र येत होतों; तिच्या दोन्ही बाजूला कोचावर बसून, तिच्याबरोबर नि एकमेकांबरोबर, लाडीक लाडीक गप्पा मारीत होतों ! पण आतां तिलाहि पाय फुटले; मंजूबरोबराबर ती इकडे तिकडे भटकेल; नाहींतर 'नाना ! –नाना !' करीत त्यांच्याचबरोबर मोटारींतून 'भुर्रर' निघून जाईल.—आणि लिनी तर्शी बरोबरच असली, म्हणजे घरीं यायला सुधीरांना दहा मिनिटं उशीरच होणार हटकून, हा हल्लींचा अनुभवच आहे माझा !

हल्लीं हल्लीं तर, लीनीलाही आपल्या नानांचंच फार वेड लागलयं; आणि कुठं बाहेर जातांना, बरोबर लीनी नसली, तर सुधीरांनाहि अगदीं चुकल्याचुकल्यासारखंच वाटतं; तिची घरीं दोन मिनिटं स्थिर जाणार नाहीत; पण नानांची वाट पाहात, ती तास तास रस्त्यांतच कुठें तरी बसून राहायला कंटाळणारा नाही !—

आणि..."तुझ्या नानांना वेळ लागेल फार; तूं आईबरोबर गप्पा मार; नाही तर मंजूबरोबर खेळ...जा..." अशी कधीं सुधारांनीच तिची समजूत घातली, तर ती ऐकेल त्यांचं; पण ते बाहेर जातां क्षणींच, 'भुर्रर चल'



म्हणून सारखी मंजूच्याच मागें लागेल...बरं, मंजूहि तिला अगदीं जीवप्राण करते; छानच खेळवते; तिला गोडगोड गोष्टी सांगते; तेव्हां लीनीच्या तसल्या हट्टामुळें, मंजू तिला घेऊन जाऊं लागली, कीं, लिनी आपल्यापाशींच असावी, असं मनातून वाटत असूनहि, मला मंजूला नको म्हणवत नाहीं !—असं शेवटीं, मला एकटीलाच बसून राहावं लागतं घरांत—

नाना–मंजू–गणूंकडला माझ्या लीनीचा हा हल्लींचा ओढा पाहिला, कीं, केव्हां केव्हां मला वाटतं—'मी कोणीच नाही का या पोरीची ?—तिची मी प्रत्यक्ष आई !-पण मीच हल्लीं अशी परकी झालेयं, तिला !'—

पूर्वी, केवळ लीनीभोंवतींच माझा सारा दिवस जात असे, म्हणून—नि आतां, घरांत अगदीं एकटंच राहावं लागतं, म्हणून,...एकूण...माझ्या मनांतली...आंत आंतली बेचैनी वाढतेच आहे !—

## तारुण्य नि वैधव्य !

११६

मंजू इथं राहायला आल्याला आतां सहासात महिने झाले.

मोठी उत्साही, विनयशील नि कामसू आहे. कमी बोलायची नाहीं, जास्ती बोलायची नाहीं; अगदीं जिथच्या तिथं, जेवढ्यास तेवढं.

पण कमलिनी मात्र तिच्याबाबतीतला एकच एक अपवाद !—तिच्याशीं सारखी बडबड बडबड करत राहाणार मंजू; नि लीनीहि तिच्याशीं मनमोकळं हसणार–खिदळणार;...त्यांना तसं मागं उभं राहून, खेळतांना पाहायलाहि गंमत वाटते !—

आपण पुढं झालं, कीं खुदकन् हसून, मंजू कौतुकानें म्हणेल-"बघितलंत, ताई! पोर कशी चुणचुणतीय् तें?...मोठी लाघवी आहे!—गळेपडू आहे!—कोणालाहि भुरळ घालील नि जिंकून घेईल!—अशा पोरीचं आई होणं, हें सुद्धा भाग्यच मोठं!—"

तिच्या त्या तसल्या शब्दांत प्रेम ओतप्रत भरलेलं असतं; पण, तिच्या मनांतली खोलखोल दडलेली हुरहुरहि त्यांत प्रतिबिंबित झालेली दिसल्यावांचून राहात नाही.

खरंच!-हें ऐन तारुण्य मंजूचं!...तिचं सगळं ठीक असतं, तर तिला नसतं का हें सुख,...हें 'भाग्य'...भोगतां आलं?...दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहात,...दुसऱ्यांचीं मुलं खेळवत,...नि त्यांचंच कौतुक करत,...कशाला बसली असती ती?...दुर्दैवी बिचारी!—

कमलिनी हल्लीं सुधीरांबरोबर फार भटकायला शिकली आहे. ती बाहेर गेली कीं मी नि मंजूच घरांत...

मंजू अशिक्षित असली, तरी मला तशी फारच आवडते; तिनें माझ्याजवळ बसावं, मी तिच्याबरोबर मोकळं मोकळं बोलावं,...असं मला फार फार वाटतं!-पण ती आपलं स्थान विसरायची नाही कधीं; घरांतली साफसूफ, निवडण-टिपण,... आपणहूनच सारं काढून करत बसेल!—

ती तशी एकटीच काम करत तिकडे स्वयंपाकघरांत, नि मी कधीं कधीं इकडे एकटीच निरुपयोगी, हॉलमध्यें; म्हणून मी तिकडे जाऊन, तिच्याबरोबर निवडायला बसूं लागूं लागलें, तर तेंहि तिला पटायचं नाही!-तिच्या-माझ्यांतलं अंतर...तिला सारखं सारखं दिसत असावं, मनांतल्या मनांत!-लागलींच, मला आग्रही स्वरांत हळूच जरा रागावून, ती म्हणेल-"असं काय हें, ताई?...हें कां तुमचं काम? मग घरांत मी कशाला आहे?-होईल कीं सारं;... तुम्ही जा तिकडे निवांत वाचायला"—



असं अगदीं कसलं म्हणून घरांतलं कामच पडूं देत नाही ती मला!—पाहून पाहून, जरा मस्तवाल झालेल्या आमच्या स्वयंपाक्याला, तिनेंच गणोबाला सांगून, काढून टाकलाय् अलीकडे;...नि स्वयंपाकखोलीचाहि आतां स्वतःकडेच चार्ज घेतलाहेन्!...स्वयंपाक असा पक्कड करते, कीं, त्यामुळेंच मी चार घांस जास्त जेवते; एखाद्या नव्या पदार्थाचं नांव ऐकलंन्, पाहिलान्, कीं, एकदांच काय ती विचारपूस करून तो शिकून घेणार!-पुन्हां सांगायला नको तिला!—

दुसऱ्या स्त्रीचा...माझा संसार, मंजू अशिक्षित असूनहि, असा इतक्या योजकतेनें, तत्परतेनें,...आस्थेनें, चालवते;...तर मग, तिनें स्वतःचा किती छान चालवला असतान्?

—फार फार वाईट वाटतं, असा विचार मनांत आला म्हणजे!...-पण त्याला आपला काय इलाज?

११७

असंच सहज एकदां मनांत आलं माझ्या...मंजूचं लग्न झालं पुन्हा तर?

नि मग, कसं कोण जाणें—एकदम गणू माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. खरंच, गणू आम्हाला अगदीं आपलासाच वाटतो;...तो नोकर,...पण मला 'वैनी' म्हणतो; नि मलाहि, जणूं तो आपला धाकटा अशिक्षित भावोजीच असल्यासारखा वाटतो! आहेतच गुण त्याच्या अंगांत तसे! तो तरुण आहे, निर्व्यसनी आहे, रुबाबदार आहे, खानदान आहे! तसं म्हटलं, तर तें एक रत्नच आहे.

पण तो तिरशिंगराव कुस्तीबहाद्दर! तो काय असं सुकासुकी लग्न लावायला का इतके दिवस असा राहिलाय्? त्याला आमची मंजू छान आहे! ...पण विचारायच कोणी त्याला?

नि मंजूला तरी कोणत्या तोंडानें नि कसं विचारूं हें मी ? असली कांही कल्पना अगदीं सुधीरांपुढें उच्चारायचीहि छाती होत नाहीं माझी !... तर मग, मंजूला नि गणूला मी काय विचारणार ?

बोलण्यावरून बोलणं निघालं एकदां; तेव्हां अगदीं लांबून लांबून उडत प्रश्न म्हणून विचारला मी तिला–"तुमच्यांत पुन्हां लग्न करतात का ग ?"

ती त्यावेळीं किंचित् चपापली; पण मग ती, वाटप वाटतां वाटतां, मला म्हणाली–"हो, करतात कीं, कोणी कोणी !–झालीयंत् देखील अशीं लग्नं !–पण तें आमच्यांत, ताईऽ, कमीपणाचंच समजतात !—"

तिनें माझं तसं तोंडच झटकन् बंद केलं होतंन् !–किती चाणक्ष पोर !—

पण तिचं आयुष्य आतां हें असंच जायचं !–दुसऱ्यांच्या घरीं, दुसऱ्यांचे संसार सजवीत–चालवीत ? ?—

तरी पण, म्हणूनच,...एकेकदां मला आपल्या पाठच्या बहिणीसारखी मंजूबद्दल चिंताहि वाटते !—

वाटतं—इतकं तारुण्य, असलं रूप,...असले गुण नि असली परिस्थिती, म्हणजे,...एक दारुचं भयंकर कोठारच !—चुकून कधीं, कोठें, कुठून, ठिणगी पडली,...तर भडकाच नाही का उडायचा ?—

[माझ्या घरासमोर मंजू आली योगायोगानेंच ! तो तिच्या बाबाच्या आयुष्यांतला शेवटचा दिवस !–तिचा अपशकुनचाच !–पण ती आमच्या घरांत तरी शुभ शकुनावरच शिरली !–तिच्यामुळें...मला, लीनीला नि पर्यायानें सुधीरांना सुखच लाभतंय्; ..माझ्या जराः एकमार्गी मळमळित झालेल्या आयुष्याला, मंजूनें तर एकंदरीत अशी सुंदर फोडणीच दिलीन् ! ..बिचारी गोड मंजू ! !—]



## पुरुष ते पुरुषच !

११८

मध्यें कित्येक दिवस, मी या ' मखमली पेटी 'ला हातच लावला नाहीं; कांहीं लिहूं नयेसं मला वाटे. कारण ? अलीकडे, गेले दोन तीन महिने माझ्या मनाला एक सुप्त वणवाच लागला आहे.

याच अवधींत, इलेक्शनची गडबड उडाली; सुधीर यशस्वी झाले; त्यांचा गौरव झाला. एका नवीन हॉस्पिटलच्या उद्घाटन्‌समारंभाला सुधीर सन्मान्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

असल्या प्रत्येक वेळीं, त्यांच्याबरोबर लीनी नटून थटून जाते. तिला सजवायचं काम मंजू करते; आणि जातांना माझ्याकडे पाहून, सुधीर सस्मित म्हणतात,—" तुला नाहीं ना प्रेमा यायला जमायचं ?... बरं चल लीनी ! कर पाहूं आईला... ' टाऽ टाऽ !' "

ती चिमुरडीहि आतां सरावानें ठसक्यांत हात हलवते; ' टाऽटाऽ ' उभी करून लुटलुटत सुधीरांच्या पुढें जाते; नि लिफ्टमध्यें त्यांची वाट पहात राहते.

––त्यावेळीं, सुधीर माझ्याकडे पाहून, स्मित करतात; मीहि त्यावेळीं लिनीकडे कौतुकानें पहाते...

तरी पण, आंतून मात्र मला नेहमीं एक भास होतो; वाटतं, ती पोर मला जातां जातां हिणवूनच म्हणतेय् "—तुला नाऽहीऽ...नानाबरोबर यायला ! टाऽ टाऽ, आई ऽ! "

—अस्सा मग राग–राग होतो मनाचा!..

११९

पण मला यायला जमायचं नाहीं, हें सुधीर तरी कशावरून गृहीत धरतात ? हं, आठवलं;...मींच एकदां तसं म्हणालें होतें खरं...पण मग

तें नेहमींचच, असं कां ठरवलंय् त्यांनीं ?...तसं मी म्हणालें त्यावेळीं नि त्यानंतरहि प्रत्येकवेळीं, मनांत मला एक आशा वाटे—सुधीरच उत्सुकता दाखवतील.—म्हणतील 'अग चल प्रेमा...मोटारींतून तर जायचं-यायचं !'

पण तसं कधींच घडलं नाहीं. बरं, 'येतेस का ?' असं तरी सरळ आस्थेनें कां विचारीत नाहींत ते ? त्यांच्या गौरवांत मी वाटेकरी होऊं नये, असं का वाटतंय् मला ?—कीं, आतां आतां त्यांनाच तसं वाटूं लागलंय्-असं मी समजूं ?- कांहींहि असों; आतां मला तरी खात्रीच वाटूं लागलीय्-मी त्यांच्याबरोबर समाजांत वांवरूं नये, असंच हल्लीं हल्लीं सुधीरना वाटूं लागलंय् ;...आतां तर त्यांची लीनी आहे त्यांना बरोबर !—मग मी कशाला आणखी अडगळ ?—तेव्हां तिलाच बरोबर घेऊन फिरतात, ते—

लीनीच्या जन्मानंतरच त्यांच्यांत हा असला फरक पडलाय्. तिच्या लहानपणींच, ते माझ्याकडे सारखी बडबड करायचे तिच्याबद्दल; आतां ती मोठी झाल्यावर तर, त्यांच्या आकर्षणाचं तीच केन्द्रच झालीय् ; आपण स्वतः, आपले गौरवदायक विविध व्याप, आणि उरला सुरला वेळ लीनी नि तिचं कौतुक!... जशी काय, आतां मी त्यांची कोणीच नाहीं !

मग वाटतं, आधींच मी अशीतशी; नि लिनीनंतर, थोडंफार रूप होतं, तेंहि ओसरत गेलंय् ; कदाचित् , मंजू घरांत दृष्टीसमोर वावरूं लागल्यावर, त्या विरोधामुळेंच, माझ्यांतलं तें वैगुण्य सुधीरांच्या डोळ्यांत भरत असेल. सुधीरांना मी आतां माझ्याकडे आकर्षू शकत नाहीं, याची मला अशी जाणीव होते; मन विषण्ण होतं. आणि...

...कोणाला सांगितलं तर खरंहि वाटणार नाहीं,...लीनी अशी जिथें तिथें सुधीरांबरोबर मिरवतांना पाहून—त्या माझ्या पोटच्या गोळ्याचाच-मला मनस्वी राग येतो. आंत आंत कुठं तरी जळजळत जातं; एक अज्ञात प्रखर भावना मनांत पेटते; तें संतापनें उद्विग्न होतं !—



१२०

सुधीर आज मेडिकल कॉलेजचे सन्मान्य अध्यक्ष म्हणून जायचे होते; तिथल्या किती तरी, डॉक्टरांची माझी व्यक्तिगत ओळख; हल्लीं मला थोडं अधिक अशक्त वाटतं;—पण निदान आज तरी सुधीर मला 'येतेस कां ?—' म्हणून आपणहून विचारतील, अशी मोठी आशा होती माझी !—

तरी शेवटीं, नेहमींसारखंच झालं; सुधीर लीनीसह निघून गेले.

एक अगदीं पिसाट कल्पना माझ्या मनांत आली. टॅक्सी करून, मी लागलीच त्यांच्या मागोमाग तिकडे पोहोंचलें. विद्यार्थीच्या त्या गर्दींत, मी मागून हळूच घुसलें;—नि तिथूनच, पाय उंच करून, व्यास पीठावर पाहिलं...

—सुधीर तिथें बसले होते; गळ्यांत मोठा थोरला हार नि हातांत तुरा घेऊन, माझी लुकलुक डोळ्याची चिमुरडीहि, त्यांच्याजवळच हसतमुखानें बसली होती.

समोरचा तो देखावा, वास्तविक, माझ्या गौरवाचाच होता;...माझ्या डोळ्यांतून नकळतच अश्रूहि ओघळले. त्यांत आनंदच होता; तरी पण, फार वेळ मला तें दृश्य पाहवेना.

—जणूं काय, माझीच जागा कोणीतरी माझ्याकडून हिसकावून घेत-ल्याचा, मला प्रबळ भास झाला !

मी पटकन् बाहेर पडलें; गेलें तशीच मी टॅक्सीनें घरीं परतलें. त्यावेळीं, मला गुदमरल्यासारखं वाटत होतं; या क्षणींहि वाटतंय् ! नि म्हणूनच, लीनीसह सुधीर परत येईपर्यंत, माझं मन सांवरून, तें फिरून ठिकाणावर आणायला— हें असं माझं पेन घेऊन, भरकटत सुटलेंय् मी...

सुधीर ! सुधीर...तुम्हीहि इतर पुरुषांसारखेच !...माझा आयुष्य-भराचा त्याग, माझं तुमच्याविषयींचं मुग्ध उत्कट प्रेम, तुम्हाला कधीं समजलंच नाहीं. ...आपला गौरव, आपलं सुख, आपलं महत्त्व तवेढंच

समजतं तुम्हाला... त्या सर्वांत मीहि वांटेकरी आहें—असावं, असं तुमच्या मनांत कधीं येतच नाहीं का ?

म्हणजे—शेवटीं पुरुष ते पुरुषच !

## संसारांतलं संशय-पिशाच !

### १२१

गेल्या सहा महिन्यांमध्यें, माझ्या संसाराला, माझ्या प्रेमाला, माझ्या मनांतल्या सान्याच—इतके दिवस जोपासलेल्या--भावनांना, गुंतागुंतीचे नि दुःखद फांटे फुटले आहेत...त्या सगळ्यांची जाणीव होऊन, जीवाचा अगदीं कोंडमारा होतो. वाटतं, कुणाला--कुणाला हें सांगूं ? नि कसं सांगूं ?

नाहींतरी, त्या संमेलनांतून टॅक्सीनें परतल्यानंतर, आठ पंधरा दिवसांतच, मला एक दाट संशय येऊं लागलाच होता... मोठा प्रश्न पडे मनाला, कधीं कधीं घरांत सुधीर नाहींत, लिनी नाहीं...नि मंजू पण नसायची ! दोन दोन तीन तीन तास पत्ताच नसायचा घरांत, त्या तिघांचा ! असं घडलं कितीदां तरी; पण पुन्हा आल्यावर, तिघांपैकीं कोणालाच समक्ष विचारण्याची चोरीच मला, शेवटीं ! -मनांतल्या मनांत धुसपुसण्याशिवाय दुसरं कांहीं गत्यंतरच नसे !—

मागून कधीं लीनीला खेळतां खेळतां विचारावं; तर ती म्हणे-'मंजूला घेऊन गणोबा बरोबर मी भुर्रर्र गेलें होतें !-' आणि...कधीं गणोबाला विचारलं; तर तो सांगे—" नाना चालले होते मला घेऊन, मोटरनें, कामाला ! लिनीनें हट्ट केला; परतायला आम्हांला लागणार होता वेळ ! ...गाडी खालीं



उभी करून, मलाहि मध्यें नानांचं काम करून यायचं होतं; तेव्हां मग नानाच म्हणाले— ' बरं घे लीनीला; नि मंजूलाहि येऊं दे बरोबर'—"

—असल्या त्यांच्या गोंधळांतून, मला पुरा बोध कधींच होत नसे. माझ्या डोळ्यांपुढें नानातऱ्हेचीं विचित्र चित्रंच मात्र उभीं रहायचीं;... नि जिवाचा राग राग व्हायचा !

—एकदां नि दोनदां नव्हे, असं हें कितीदां तरी झालं—

### १२२

कालचीच गोष्ट ! सुधीरांच्या कामासाठीं, गणू लोणावळ्याच्या हॉस्पिटल-मध्यें गेला होता रेल्वेनें; तरी पुन्हां तसंच ! तेंच घडलं !

शेवटीं, तिघंहि मोटरींतून परतलीं. मी दारांतच उभी होतें. मला पहातांच, मोठ्यानें खेळकरपणें हसून, लीनी म्हणाली— " आईऽ गऽ ! आज ना ऽ आम्ही जुहूला गेलों होतों ! गणोबा नव्हता; मग नानांनींच चालवली आज जोरानें मोटर ! मग आम्ही समुद्रावर खूपखूप धांवलों; खूप —खूप खूप हसलों खेळलों—"

लीनी तें बोलली अगदीं सहजच; पण आंत शिरतांच, सुधीर मात्र एकदम चपापल्यासारखे झाले !-नि मंजूहि, अतिशय गोंधळून, त्याचक्षणीं, त्याच पावलीं, तडख स्वयंपाकखोलींत निघून गेली.

मला मनस्वी संताप आला होता; विशेषतः, सुधीर-मंजूचा !-तरी मी प्रयासानें मनावर ताबा मिळवला; नि संथपणेंच, जणूं लीनीला उद्देशून, पण टोमण्यानें म्हणालें-"जाऽगऽबाईऽतुम्ही कुठेंहि !-नि करा तुम्हाला काय वाटेल तें !—शेवटीं तरी आठवण ठेवतां या घराची, हेंच भाग्य माझं !!—"

त्यावर कोणीच कांहीं बोललं नाहीं; रात्रींहि सुधीर अगदीं गपचूप गपचूप होते; मंजूहि कांहीं न बोलतांच घरांतलीं कामं करीत होती.

मी मनांतल्या मनांत खूप चिडले होतें; पण शेवटीं, कोणाकडे कांहीं न बोलतांच, झोंपलेल्या लीनीजवळ जाऊन मीहि झोंपलें.

—आपल्या पलंगावर पडल्या पडल्या, बेडलाइट खालीं, सुधीर कसलंस पुस्तक वाचल्याचं नाटक करीत होते; त्यांची सारखी चुळबुळ चालली हीती.

—आणि पडल्या पडल्या, काल रात्रीं, मला तरी स्पष्टच दिसत होतं... "माझ्याच संसाराचं तें सारं नाटक होतंय्,... त्याचा शेवट एकच ठरलेला—शोकांत !—"

## [ उन्माद ! ]

१२३

[ त्या जुहूच्या प्रसंगाचा, डायरींत ओझरता उल्लेख आल्यामुळें, सुप्तावस्थेतेल्या साऱ्या प्रबळ भावना एकदम जाग्रत होऊन, वाचतां वाचतां सुधीर दचकून भानावर आले. बऱ्याच वेळच्या वाचनानें शिणलेल्या डोळ्यांना व जडावलेल्या जीवाला विसांवण्यासाठीं, त्यांनी आपली मान मागें टाकली; टीपायवर पडलेला पाईप उचलून शिलगावला,...नि क्षणभर उसंत घेत, ते धुराचीं वलयं सोडूं लागले—

त्या सिंहावलोकनात्मक मनोवृत्तींत, आपल्या तरुणपणीं घडलेला तो प्रसंग, त्या वलयांच्यां सांखळींत, जसा घडला तसाच,...सुधीरांसमोर प्रत्यक्ष उभा राहात होता...

१२४

तें झालं होतं असं—त्या दिवशीं, सुधीरनी कामानिमित्त गणूला मुंबईबाहेर पाठवला होता; म्हणून तेच स्वतः दिवसभर मोटार फिरवीत होते.



असेच कोठूनसे परतून, त्यांनी गाडी 'जीवनगंगे'कडे वळवली; तोंच, फुटपाथच्या कडेला, फ्रॉक घातलेली लीनी चालतांना दिसली; मोटरचं चाक सुधीरांच्या हातांत पाहून, त्या नवलाईनें आश्चर्यितच होऊन, मोटरबरोबर धांवत धांवत ती ओरडली—"अय्याऽ–, तुम्ही चालवतां ?–नानाऽ मला न्याऽ"

तेव्हां हसत हसत, मोटर थांबवून, सुधीरनी दरवाज उघडला; पुटकन् उडी मारून, ती त्यांच्याजवळ जाऊन बसत म्हणाली— "मंजू-तूं ये ना गऽ—"

लीनीचे त्यावेळचे हातवारे, तो आग्रही स्वर, नि फुटपाथवर घुटमळून उभी असलेली तिच्याबरोबरची मंजू–सुधीरना गंमतच वाटली. मंजू लाजून, 'जावं न जावं' अशा चेहऱ्यानें मोटरकडे गोंधळून पाहात होती; प्रथम सुधीरांचाहि गोंधळच झाला;...पण मग ते तिला म्हणाले—"लीनी बोलावते आहे ना ?-ये कीं—"

तेवढ्यांत, लीनीनें पुन्हां खालीं उडी मारली; मंजूला ओढून आणलं व आपल्या जवळ फ्रंटसीटवरच बसवलं. मंजू ओशाळली; सुधीरहि किंचित् चमकले....पण लागलीच लीनीकडे वळून, ते तिचे लाड करण्यासाठीं सस्मित म्हणाले—"हं...लीनी ! आतां कुठं, बाईसाहेब ?–घरींच ना ?—"

"अँ ऽ... भूर्रर ...भुर्रर ज्यायचं आपण—"

"अगऽ पोरी ! बरीच आहेस कीं; .. पण भुर्रर कुठं ?"

"जुहुला जाऊं या ना, नाना !"

आपल्या पोरीच्या त्या अनपेक्षित आग्रहानं, सुधीर क्षणभरच गोंधळले. पण मग गाडी चालू करून, ती वळवून घेत ते हसून म्हणाले,—"जुहु ! बरं बरं... जाऊंया जूहुला ! चल् —"

आणि एकदम उत्साहाचं भरतंच आल्यासारखी, सुधीरांनी मग मोटर जोरांत सोडली होती. लीनीची सारखी बडबड चालली होती; सुधीर तिला

उत्तरं देत होते. मंजू तेवढी बिचारी त्या अनपेक्षित परिस्थितीनें, भांबावून अंग चोरून, गप्पच बसली होती.

१२५

सुधीरांचं मंजुशीं नेहमीं तसं जेवढ्यास तेवढंच संकोची वागणं! पण घरांत काम करतांना, लीनीला संभाळतांना तिची ती आस्था, त्यांच्या नजरेंतून सुटली नव्हती. कित्येकदां मंजूच्या परावलंबी दुर्दैवी जीवनाबद्दल त्यांना मनांत हळहळहि वाटे. मात्र कधीं कांहीं बोलून न दाखविण्याचाच त्यांचा स्वभाव. आज मात्र केवळ योगायोगानेंच, लीनीपलीकडे, त्यांच्या इतक्या सन्निध मंजू बसली होती.

मंजूहि प्रथम बावरली; पण त्या जोरानें धांवणाऱ्या सुंदर मोटारीच्या गादीवर, तिचं शरीर स्प्रिंगप्रमाणं वरखालीं उसळी मारूं लागलं; तेव्हां त्या अनपेक्षित वैभवाच्या जाणीवेनें, क्षणभरानें ती एकदम आनंदली तिच्या मनाचं फूल तिला नकळत फुललं; त्या अननुभूत सुखद भावनेनं बावरून, तिनें मधून मधून कितीदां तरी, तिरक्या नजरेनें सुधीरांकडे हळूंच पाहिलं.

—आणि लीनीला उत्तर देतां देतां, चारपांचदां सुधीरांचीहि दृष्टी मंजूच्या प्रफुल्लित चेहऱ्यावर पडली. त्यांनाहि एकदम एक अननुभूत रोमहर्षक जाणीव झाली! 'आपण मंजूसारख्या एका सुंदर स्त्रीच्या अगदीं निकट बसून मोटर भरधाव चालवीत आहोंत!' त्यामुळेंच त्यांचा खेळकरपणा, उत्साह वाढत गेला होता. त्यांना आपण अगदीं हवेंत उडत असल्यासारखा भास होत होता, त्याक्षणीं.

—शेवटीं जुहूला पोंहोचल्यावर, तो समोरचा विस्तीर्ण दर्याकिनारा पाहून तर, त्यांच्या उत्साह-सागराला एकदम अफाटच भरती आली होती.



गाडी थांबवून, त्यांनी लीनीला झटकन् उचललं; तिच्यासह वाळूंतून ते एकदम धांवत सुटले; नि धावतां धावतां तिला हसत म्हणाले—"चल् लीनी!...पाण्यांत पाय बुडवून, आपण खूप खूप नाचूं या आज!–"

—ते तसे दबदबा धांवत होते; नि त्यांना हातांचा विळखा घालून, लीनीहि खदखदां हसत होती!—दुपारच्या प्रहरच्या त्या निर्जन किनाऱ्यावर, मंजू मात्र, त्यांच्यापासून लांब,—एकटीच,...अगदीं आदबीनें-विनयानें उभी होती!

पण तें क्षणभरच!–मंजूहि त्या दोघांच्या आनंदाच्या दर्शनानें, आकर्षित झाली. आणि नकळतच, आपल्या पायाखालच्या भुसभुशित वाळूंत, तिनें आपलं पहिलं उत्साही पाऊल टाकलं; ती हळूंच हसली...आणि मग, तिचींहि पावलं, त्या दर्याच्या बाजूस झप झप पडत गेलीं...

१२६

तोंच,...लांबूनच, आपले चिमुकले हात हलवत, लीनीनें तिला हांका मारल्या—"मंजू...एऽ मंजूऽ!-तूं पण येना ऽग इकडे..."

लीनीच्या हास्याचा तो खेळकर स्वैर ध्वनी!–मंजूच्या कानावर तो पडला मात्र; साऱ्याच नाविन्यानें फुललेलं तिचं मन;...त्यांत एकदम, कसा कोण जाणें, एक न्यारा अफाट उत्साहच उचंबळून आला!...आणि मग मात्र ..त्या भुसभुशित वाळूंतून...पटकन्...एकसारखी दबादबा धावतच सुटली, मंजू!—

लीनीला घेऊन, सुधीर आंत आंत गेले होते; ते आतां अगदीं फेसाळल्या लाटांत शिरून, किनाऱ्याकडे तोंड करून, हसत उभे होते.

—मंजू जी धांवत सुटली,...ती त्यांच्याच रोखानें; त्यांच्याच जवळ जवळ जात होती.

एखाद्या हरिणीसारखी ती चपळतेनें तुरतुरत होती; तिचा पदर, वाऱ्यावरच्या शिडासारखा फडफडत होता; आणि तिचं तें वक्षाच्छादन,

।तिला नकळच, जागेवरून ढळून, त्याक्षणीं बाजूला उतरलं होतं; तिच्या काळ्याभोर केसांच्या बटा, घोंघावत्या वाऱ्यावर भुरभुरत होत्या; एका हातानें तिनें लुगडं थोडं वर आवरून धरल्यामुळें, तिच्या मोहक, केतकी गौरवर्ण पोटऱ्या आकर्षकपणें हलत होत्या !—शेवटीं, ती जवळ आली; तेव्हां आपली गति मंद करीत ती थांबली; ती मनापासून गोड हंसली; तिचे बारके बारके दांत हिरकण्यांसारखे चकाकले. धांवण्याच्या श्रमांनी, तिच्या सरकल्या पदराजवळचं तिचं तरुण वक्षस्थळ, त्यावेळीं मोहकपणें वरखालीं हलत होतं. तिचा गौर रेखीव चेहरा आरक्त-प्रफुल्ल दिसत होता. तिचे काळे डोळे उत्साहानें नाचत होते; नाकपुड्यांचीं टोकं सूक्ष्मपणें फुरफुरत होतीं.

—तेवढ्यांत, त्या गडबडींतच, तिचा एक पाय पाण्यांत पडला; नि थोडंसं खारट पाणी तिच्या नि सुधीरांच्या अंगातोंडावर उडालं.

त्या गोड अपघातानें, मंजू खुदकन् हंसली. अभावितपणें तिच्यावर क्षणभर दृष्टी खिळून, सुधीरहि हंसले.

१२७

आपल्या साऱ्या आयुष्यांत, इतकं स्वैर बेछुट धावणं मंजूनें कधींच -अगदीं कधींच-अनुभवलं नसावं ! इतका अमर्याद उत्साह तिला कधींच वाटला नसावा; त्यामुळेंच, त्या निर्जन...अफाट दर्या-किनाऱ्यावर,...तिला वर आकाश,...खालीं वाळू...नि समोर फक्त सुधीर-एकटे सुधीरच-दिसत होते, त्याक्षणीं !-तिच्यामागलं जग नि त्यांच्यामागला अफाट दर्या !—तिच्या दृष्टीसमोरून सारं अस्पष्टच होत गेलं;...आणि मग, आपण व सुधीर यांच्यांतलं नेहमीचं औपचारिक अंतर, त्याक्षणीं ती एकदम विसरली; त्यांच्याच शेजारीं, त्यांच्या अगदीं निकट,...त्या फेसाळत्या नाचत्या नवख्या लाटांतच, मंजू आज उभी होती.

—तेवढ्यांत, सुधीर अगदीं मनापासून हसले; त्यांच्या हातांतली लीनीहि आपल्याच आनंदानं रंगांत येऊन खदखदली !-पण सुधीरांचं



तिकडे लक्ष नव्हतं; त्यांची बावरलेली दृष्टी, त्या क्षणींच्या-कधीं नव्हत्या इतक्या-मंजूच्या मोहक मुखाकडे खिळली होती !—अगदीं त्याचवेळीं, 'मंजू-मंजू-' करीत, जवळच उभ्या असलेल्या मंजूच्या अंगाकडे,...लीनीनें आपला झोंक टाकला; नि एका हातानें, तिनें मंजूच्या गळ्यालाच जोराच विळखा घातला.

अगदीं अनपेक्षितपणें, लीनीच्या भारानें, सुधीर-मंजू एकमेकांकडे तशी एकदम खेंचलीं गेलीं, आणि त्या धक्क्यांतच, लीनीला उचलून धरणारा सुधीरांचा कोंपरांत दुमडलेला डावा हात-मंजूच्या दोन्ही स्तनांवर क्षणभरच जोरानें दाबला गेला—

केवढ्यानें एकदम दचकली मंजू!—सुधीरहि गोंधळले—भांबावले; तिचीं तीं टचटचीत स्तनाग्रं आपल्या उघड्या कोंपरा-मनगटाला टोंचल्याची, त्यांना निमिषांत रोमांचक जाणीव झाली; आणि त्याच बेचैन वृत्तीनें, त्यांनी पुन्हां मंजूकडे हळूंच एक बांवरा दृष्टिक्षेप टाकला.

मंजूचा नेहमीचा प्रशांत गंभीर चेहरा, त्याक्षणीं, साफच पालटला होता; तिचं सारं शरीरच रोमांचित झालं होतं; तिच्या डोळ्यांत उन्माद, विकार, प्रचंड विलासेच्छा,...एकदम उसळी मारून, धांगडधिंगा घालायला आलेली दिसत होती. तिची ओंठाची पातळ जिवणी पुढें-मागें होऊन, कांही तरी-कसं तरी -सुधीरांना सांगायला थरथरत होती !—

—आणि शेवटीं, कोठून हांक आली, कोठून धैर्य आलं तिला,... कोण जाणें; अगदीं मोहक हळुवार स्वरांत नि भारणाऱ्या व भारावल्या डोळ्यांनी पाहात,-आपल्या मानेचा सारा झोक...हळूंच जरा सुधीरांकडे वळवून, मंजू एकदम अस्पष्ट कांपऱ्या आवाजांत म्हणाली-"नानाऽनानाऽ... अगदीं कुण्णी नाहीं आहे हं, इंथं !—"

आपोआप इतक्या जवळ आलेल्या मंजूच्या त्या देखण्या मोहक विलासी चेहऱ्यानें, तिच्यां थरथरत्या ओंठांनी, त्या शद्बांनी, नि त्या अभिनव

स्पर्शनें, सुधीरहि एकदम मोहित झाले, विरघळले; नि आपला उजवा हात तिच्या खांद्या-मानेवर आधारासाठीं टाकून, त्यांनी आपले ओठ, तिच्या पुढें आलेल्या मोहक ओठांवर जोरानें टेंकले !—

मंजूनें कधींच नसेल...पण तो त्याक्षणींचा तसला अभिनव प्रबळ उन्मादानंद...सुधीरांनीहि आपल्या आयुष्यांत कधींच अनुभवला नव्हता !—

१२८

दोघंहि क्षणभर देहभान विसरलीं होतीं; पण त्यावेळच्या त्या अपरिचित गडबडीनें आनंदून, सुधीरांच्या हातांतली लीनी मोठमोठ्यानें हसतच सुटली; तिच्या त्या हास्यानें मात्र सुधीर भानावर आले; चटकन् मागें सरले;...मंजूहि पटकन् शुद्धीवर येऊन लाजली; नि कांहीं न बोलतांच किनाऱ्याकडे तोंड करून—मागें एकदांहि वळून न पाहतां...दबदबा धांवत सुटली.

क्षणापूर्वीची सुधीरांची ती सारी स्वैरवृत्तीच एकदम पार मावळली होती. मनाला कांही तरी आंतल्याआंत सलल्यासारखं त्यांना वाटलं होतं; लीनीला खालीं उतरवून, तिच्या मागूनच, खालीं मान घालून, ते हळूं हळूं चालत येत होते.—"तिथल्या एकांतांत, स्वैरपणांत, मोहक उन्मादाच्या त्या क्षणिक ताडमाड लाटेंत, आपण नकळतच गळ्यापर्यंत बुडालों !—होऊं नये असं कांही तरी आपल्या हातून झालं !—" अशी सारखी तीव्र चुटपुट त्यांच्या मनाला लागली होती !—

मंजू मागून लीनी धांवत धांवत पुढें येऊन पोहोंचली होती; तिला घेऊन, मंजूहि गपचूप गाडीत शिरली होती; नि आधींच मागल्या बाजूला जाऊन बसली होती.

सुधीर मंद चालत मोटरपाशीं पोहोंचले; चाकजवळच्या पुढल्या गादीवर बसण्यासाठीं, दरवाजा उघडून ते वांकले.

—तोंच, त्यांच्याकडे न पाहतांच, त्यांना उद्देशून, मंजू हळूच कुजबुजली—"क्षमा करा हं मला !—फार फार चुकलं माझं..."



दरवाजा बंद करून, गाडी स्टार्ट करतां करतां, मागें वळूनहि न पाहतांच, सुधीर मंजूला म्हणाले—"चुकलं दोघांचं !—क्षमा करायची दोघांनी !—"

—मग, गाडी मुंबईकडे परततांना, लीनी तेवढीच बोल बोल बोलत होती दोघांशीं;...पण, केव्हां एकदां घर येईल, असंच मंजू-सुधीरांना झालं होतं !—

१२९

भूतकाळांतल्या त्या रोमहर्षक अननुभूत अनुभवाची ती प्रबळ स्मृति;—त्यानंतरचं तें वादळ !—एक सूक्ष्म हुंकार नि दीर्घ निश्वास टाकून, सुधीरांनी छातीवर उपडी टाकलेली आपल्या प्रेमाची डायरी, उत्सुकतेनें पुढें वाचायला सुरवात केली— ]

## पाणी वळणावरच जायचं—

१३०

माझ्या घरांत सारं सारं विपरीतच घडूं लागलंय्, अलीकडे...

मंजू हल्लीं कधीं घराबाहेर फारशी पडलीच नाहीं; मग मनाचा संताप कमी होऊन, मला वाटलं होतं—"तिला आतां पश्चाताप झाला; हाडाची ती चांगली;...उघड्या डोळ्यांनी, माझ्या संसारांत ती विष कालवणार नाही !—आपलंच हृदय नाहक संशयानें जळलं; नि नाहीं नाहीं ते भास आपल्याला झाले !—"

पण आतां त्यालाहि तीन साडेतीन महिने झाले आहेत नाहीत, तोंच...पुन्हां संशयपिशाच्च धिंगाणा घालूं लागलंय्, माझ्या मनांत... माझ्या घरांत !—

अलीकडे मंजूचा पूर्वीचा उत्साहच मावळलाय्;...ती फारच कमी बोलते; तिच्यांत धांदरटपणा आलाय्;...कामांत खरं लक्षच नसतं तिचं;... गेल्या महिन्यांत, तीनं चार तरी कप फुटले तिच्या हातून; दूध सत्रादां ऊतू गेलं; अनेकदां भाजी-भात करपून खापऱ्या झाल्या!...कधीं कधीं तर काम करतां करतां हळूच हुंदके देते; खाल्लं तर खाल्लं, नाही तर नाही; कधीं कधीं तर अंगाची मुटकुळी करून, दुपारीं दोन दोन तास कोंपऱ्यांत झोंपूनच राहते.

...आम्हा बायकांना नेहमींच अधिक दिसतं; शेवटीं, मला एक दाट संशय येऊं लागला; तिला चालतांना मी अनेकदां निरखून पाहिलं; नि मग माझ्या स्त्री-दृष्टीला नि डॉक्टर-दृष्टीला खात्रीच पटली; मला हें लिहितांनाहि इंगळ्या डसल्यासारखं होत आहे!-मंजूला दिवस गेले आहेत!—

—केवढा धक्का बसला मला, त्या वेळीं!...साऱ्या पुरुष जातीबद्दलच मला मनस्वी तिटकारा वाटला; त्या भाबड्या, मूर्ख, चंचल, तरुण स्त्रीबद्दल कींव वाटली;—पण झाल्या प्रकाराबद्दल उद्वेगहि वाटला!...

सुधीरांचा तर मला अतोनात संताप आला; केवढी थोर कल्पना होती माझी, त्यांच्याविषयींची!...पण शेवटीं, तेहि एक अगदीं सामान्य पुरुषच ठरले!...पुरुष ते पुरुषच;-स्त्री-देहाच्या सुंदर सोनेरी पिंजऱ्यांत, ते अधःपतित होऊन पडायचेच!-स्त्री-मनाची त्यांना काय कल्पना?-वरवरच्या रूपालाच ते भाळणार!...त्यावेळीं, मला माझ्या आयुष्याच्या एकूण विफलतेची खरीखुरी जाणीव झाली!...वाटलं..."मी कल्पनेंत जोपासलेलं गृहसौख्य कायमचं गमावलं!-स्वातंत्र्यहि गमावलं!...आतां त्रिशंकूसारखं मध्येंच लोंबकळण्याचंच हें माझं विधिलिखित!—"

तरी पण, मी बोललें नाही; मंजूशीं नाही नि सुधीरांशीं तर नाहीच नाही!-जें जें होईल तें तें पाहायचं ठरवलं; मनांतल्या मनांत मी खूप जळलें; तशीच आणखी जळत राहीन, अजूनहि!-पण त्याबाबत एक चकारहि



काढणार नाही!-त्या दोघांचं तें निर्लज्ज पशुत्व;... मीच कां म्हणून तोंड फोडूं त्याला?-मीच कां तो वाईटपणा घेऊं पदरांत?—

१३१

आतां कालपासून तर मंजू आणखी अंथरुणावरच पडून राहिलीय्; तरीहि मी तिची कोणत्याच शब्दांत विचारपूस केलेली नाही!-कां करूं?-कां करूं??—

या माझ्या गोंधळी हालचालींमुळें, नि अबोल वातावरणानें, गणूची चुळबुळ वाढलीय्; मला कसलं तरी दुःख होतंय्, त्याची त्याला जाणीव आहे; ...त्यामुळेंच तो कधीं कधीं केविलवाणा होतो!-पण आश्चर्य असं, कीं, सुधीरांना याची दादहि नसल्यासारखं ते दाखवतात!-माणसानं जाणून बुजून सारे धरबंधच सोडायचं ठरवलं, तर तें आणखी कसं वागणार??—

...पण काल, मीच स्वतः स्वयंपाक करीत असलेली पाहून, सुधीर दारांत थबकून आंत डोकावत म्हणाले—"म्हणजे?...हें काय?-तूंऽऽशी?.. मग मंजू कुठं आहे?—"

संताप संताप झाला माझ्या जीवाचा, त्यांचा तो बेफिकीर बेडर मान-भावीपणा पाहून;...मी रागांतच म्हटलं-"मला कशाला विचारतां, आतां?-तुम्हाला नाही स्वतः पाहातां येत?—याऽ जा ना पाहून तिला, एकदां!-तुम्ही डॉक्टर आहांत!—"

"म्हणजे?—बरं नाही तिला?...आजारी बिजारी कां आहे ती?"

"जा! तिलाच काय तें विचारा!-नाही तर विचारा स्वतःला!!"

"अग पण होतंय् काय तिला?—"

"तें तुम्हांला माहीत!... मला हो काय माहीत??-तिचे डॉक्टर कोण? तुम्ही, कीं मी?"

तेवढ्यांत, मंजू उठून स्वयंपाकघरांत आली. नि माझ्या हातून लाटणं-पोळपाट काढून घेऊं लागली. त्यामुळें मात्र, मी अधिकच संतापलें नि तिच्यावर ओरडलें -" कांहीं नको हा देखावा करायला ! तूं आतां जाऽ बाई; ...मला येतं बरं माझं घर संभाळतां !"

त्यामुळें मंजू निमूट बाजूला झाली नि ओक्साबोक्सी रडूं लागली.

तोंच सुधीर रागारागानें पुढें होऊन, माझ्यावर एकदम ओरडले, " तूं माणूस आहेस कीं कोण ? अशी काय वागतेस तिच्याशीं—"

मी पण रागानेंच उलटून ओरडलें—" तर मग कशी वागूं म्हणतां ? तिला जवळ घेऊन बसूं ? तुमचे हे चाळे निमूट पाहात बसूं,...या घरांत ?"

" चूप ! एकदम चूप ! " सुधीर माझ्यावर कडाडले; नि मंजूजवळ जाऊन उभे रहात ते मला पुढें म्हणाले,—" कशाला उगीच असलं बोलून दाखवते आहेस ? कां घाबरणार तुला मी ? -- काय करायचं तें मी राजरोस करीन !—मंजूची नि माझी इच्छा असली तर...अगदीं तुझ्या-समोरहि तिला मी अशी मिठी मारीन ! "

...नि सुधीरनीं माझ्यासमोर मंजूला खरोखरच मिठी मारली ! तिनेंच लाजून पटकन् स्वतःला सोडवून घेतलं नि पळ काढला, म्हणून बरं—

मग मात्र मला रडूं कोसळलं;...वाटलं...' काय पुरुषी बेडर निर्लज्जपणा हा !'—

त्यावेळीं, लीनीला घेऊन गणोबा कुठं बाहेर गेला होता, म्हणून बरं ! ...नाहीं तर-नाही तर— '

१३२

तसा तो काल सकाळचा प्रसंग; नि संध्याकाळचा हा—



सुधीर कुठं बाहेर जाऊं लागले;-म्हणून नेहमीप्रमाणें, लीनीहि जायला निघाली;-पण जातां जातां सुधीर तिला म्हणाले—" आज नको हं !-घरींच रहा तूं !—"

ते गेल्यावर लीनी हट्टालाच पेटली; दारांत लोळण घेऊं लागली; मी तिला उचलून घेतली;-तर तिचा कांगावा अधिकच वाढला ! ती सारखं सारखं ओरडत होती-" तूं नको जाऽ ! मला नाना पाहिजेत—मंजू पाहिजे !"

तें ऐकून तर माझी संतापाची तिडिक एकदम मस्तकाला जाऊन भिडली;...वाटलं, " मग मी कोण हिची ?—प्रत्यक्ष आईनें हिला उचललं, तर ती हांका मारतेय् तिच्या नानांना !—तिला पाहिजेय् परकी मंजू !"

...त्याच रागामधें मी तिला एक चांगला धपाटा दिला; नि ओढत ओढत तिला आंत नेऊं लागलें; ती रडतच होती !—

...तेवढ्यांत, मंजू उठून पुढें आली, नि तिला जवळ ओढूं-लागली; त्यानें अधिकच संतापून, मी मंजूवर ओरडलें—" बाईऽ...गऽ, तूं आपली आराम कर जा !—कांही नको तुला इथं उठून यायला !—मी समर्थ आहें बरंऽ, माझ्या मुलीला संभाळायला ! जा...तुझ्या प्रकृतीला नाही हें झेंपायचं आतां !!"—

मंजू बाजूस होतांच, लीनीनें आणखीच मोठ्यानें भोकांड पसरलं; ती हातपायहि झाडूं लागली !...तेव्हां रागारागानेंच, मी तिला आमच्या निजाय-च्या खोलींत नेऊन टाकलं; दाराला बाहेरून कडी घातली; नि हॉलमधल्या कोंचावर जाऊन बसलें.

लीनी आंतल्या आंत दबदबा धांवत होती; रागारागानें दारावर धडाके मारत होती; नि तोंडानें हांका मारत होती-" नानाऽ ! मंजूऽ ! !"...रडून रडून तिचा आवाज घोगरा होत होता; क्षणभरच, त्या घोगऱ्या दीन आवाजानें, मला विरघळल्यासारखं वाटलं; पण तरी मन घट्ट करून, हट्टानेंच, मी तशी बसल्या जागीं बसून राहिलें !—

त्यावेळीं, माझ्या डोळ्यांपुढून...माझ्या बाळपणाचा, लांबच लांब विद्यार्थीदशेचा, नव्या संसार मांडणीचा,...तोपर्यंतच्या साऱ्या संसाराचा नि आयुष्याचाच चित्रपट फडफडत होता !–माझी ती सारी धडपड, माझा त्याग, माझं प्रेम, माझा संसार,...माझा सारा जन्मच विफल...निर्जीव झाल्यासारखं, मला त्याक्षणीं वाटत होतं !!...

१३३

तसा किती वेळ गेला, कोण जाणें; शेवटीं, खोलीच्या दाराची कडी खाडकन् काढल्याच्या आवाजानें, मी भानावर आलें; सुधीरांच्या बुटांचा खाडखाड आवाज नि त्यांनीं माझ्या अंगावर खेंकसलेले शब्द माझ्या कानावर आदळले..." मूर्ख !–दुष्ट !–कसाब..."

त्यांनी दार उघडलं, तेव्हां, दाराशीं जमिनीवरच, रडून रडून थकून, लीनी पडलेली दिसत होती !–तिचे डोळे सुजले होते; ते लाल झाले होते; ती मुसमुसत मोठमोठे हुंदके देत होती...

तें पाहून, मला एकदम भोंवळ आल्यासारखं झालं; पोरीकडे जीव ओढला गेला; तिच्याबद्दल मला एकाएकीं पान्हा फुटला; स्वतःला नकळतच मी पुढें गेलें...

पण सुधीरांनी मला एकदम रागानें खसकन् बाजूला ढकललं; लीनीला उचलून, त्यांनी चटकन् आपल्या पोटाशीं घट्ट धरलं; नि कांही एक न बोलतांच, ते लिफ्टमध्यें शिरून, तिच्यासह खालीं उतरले !—

[...सुधीरांनी, आजपर्यंत, माझा एवढा मोठा अपमान कधींच केला नव्हता; संतापाच्या भरांत, माझ्या हातून झालेली ती चूक,–माझ्या या आईच्याच मनाला–आतां कळून नव्हती कां आली ?—

सुधीरांचा तो पुरुषी तोरा पाहून, मला सारखं सारखं वाटलं–" माझी ही चूक तेवढी त्यांना दिसली !...पण त्यांची स्वतःची ती चूक...भयंकर



घोडचूक ? ? तो त्यांचा पाशवी मूर्खपणा ??...कृतघ्नपणा ? त्यांचा व्यभिचार?? ...अधःपात— ? ?" ]

## धडाका !

१३४

मंजू घरांतून एकदम नाहींशी झाली; सारा गुपचूप शोध चालला होता. पण सुधीरांच्याच कामासाठीं, गणूहि लोणावळ्याला दोन दिवस गेलेला;... मग तिला शोधायचं कोणी नि कुठं ? बरं, तो आपल्याच अब्रूचा प्रश्न ! एकदम पोलिसांत कळवणंहि चमत्कारिक नि मूर्खपणाचं ! सुधीरहि बावरले ; पण माझ्या मनाचा तर अगदीं कोंडमाराच होत होता—

कांहीं झालं तरी मंजू एक असहाय गोड पोर ! तिचं एकाएकीं नाहींसं होणं, नि त्या मागली एकूण पार्श्वभूमी;...मला अगदीं असह्यच दुःख झालं ! स्त्रिया...बिचाऱ्या स्त्रिया ! बिचारी मंजू ! पुरुष काय, क्षणाच्या स्वार्थी सुखा-नंतर युगान्तापर्यंत नामानिराळे ! मला सुधीरांबद्दल तर अतोनातच चीड आली; बोलायचं तरी काय, नि कोणाला ? आपलेच ओठ नि आपलेच दांत !—

—मनाचा असा गोंधळ उडाला होता, दोन दिवस...

१३५

गणू आला; ती बातमी ऐकून, तो आधीं गोंधळला; नि तसाच शोधायला बाहेर पडला....काल रात्रीं घरीं आलाच नाहीं.

शेवटीं, आज सकाळीं तो घाबऱ्या घाबऱ्या परतला, नि मला अडखळत्या शब्दांत म्हणाला–" वयनी, चला...आत्तांच्या आत्तां चला माझ्याबरोबर—मंजू प्राणसंकटांत आहे. तिनेंच तुम्हांला बोलावलंय्."

तें ऐकून माझ्या जीवांत चर्र झालं मंजूशीं त्यावेळीं कठोर होणं शक्यच नव्हतं ! सुधीर हॉस्पिटलमध्यें व्हिजिटर्सरूममध्यें होते; तिकडे तांतडीनें लीनीला सोडलं, त्यांना चिठ्ठीहि दिली. अगदीं कठोरच लिहिलं होतं मी—" गाडी घेऊन, गणूबरोबर मंजूचं निस्तरायला चाललें आहें मी !– साहजिकच आहे—पुरुषानें करावं, स्त्रीनं निस्तरावं ! !"

गणूचा चेहरा उदास नि भांबावलेला दिसत होता; सर्व औषधांची, शस्त्रांची, नि मिडवाइफरीचीं साधनं त्यानें बरोबर घेतलीं होतीं. त्याला सारं कांहीं बरंच ठाऊक होतं, वाटतं—

पारल्याला, गांवाबाहेरच्या एका छोट्या बंगल्यासमोर, त्यानें मोटर नेऊन थांबवली.

केवढा धक्का बसला मला—तिथल्या त्या स्थितींत मंजूला पाहून!—तिथें गेल्यावर, तिनें वेड्या उतांवीळपणें कसलंसं औषध घेतलं होतं; नि त्याच्या जालीम परिणामानें तिची स्थिती भयंकर झाली होती. रात्रींपासूनच सारखा स्राव सुरूं झाला होता.

घाईघाईनें जेवढं जमेल तें सर्व मी करून पाहिलं; सुचलं त्याप्रमाणें, जवळ होतीं तीं सारीं इन्जक्शनं दिलीं;...बाह्योपचारहि केले. पण कांहींच उपयोग होईना; दुसरा कसलाच उपाय उरला नव्हता...फार उशीर झाला होता—

शेवटीं, योगायोगानें आमच्या घरांत आलेली मंजू-अशी निघून गेली—ती भाबडी प्रेमळ गरीब पोर !—तिला सुख मिळालं नाहीं; ...प्रेम लाभलं नाहीं—क्षणिक प्रबळ विकाराला बळी पडून ती गेली—कायमची गेली.

सौंदर्य, तारुण्य नि वैधव्याचं तें भयंकर कोंढार !—असं एका क्षणिक क्षुल्लक ठिणगीनेंहि धडाका उडून, तें उडालं !!—



## त्यांचं गुपित–

१३६

मंजू आमच्या छोट्या जगांतून उठून गेल्याला चार दिवस होऊन गेले. तिच्या जाण्यांतून उत्पन्न झालेल्या कायद्याच्या कचाट्यांतून वाट काढतांना, हजार लटपटी कराव्या लागल्या. पण शेवटीं, सारं एकदांचं बिनबोभाट पार पडलं !

मंजू गेली; पण तिची मूर्ति मात्र अजून डोळ्यांसमोर उभी रहाते... शेवटच्या क्षणापर्यंत, ती अश्रू ढाळत माझ्याशीं बोलत होती. गणूहि ओक्साबोक्सी रडत होता.

त्यावेळीं, त्या दोघांच्या बोलण्यांतून मला समजलेल्या नवीन माहितीनें, माझीं गात्रं तर प्रथम बधिरच झालीं होतीं ! इतके दिवस, सुधीरांबद्दलच्या रागानं पेटलेलं...धुमसणारं माझं मन...एकदम अगदीं दुभंगून गेल्याचाच मला क्षणभर भास झाला;...नि मी मग कितीतरी तळमळ तळमळ तळमळलें. सुधीर ! माझे सुधीर !! मी...माझं स्त्रीचं मन ! त्या माझ्या मनाचेच... केवळ अजाणतां झालेले ते प्रभावी बेफाम खेळ !–

—ती कल्पनाहि सहन होत नाहीं आतां मला !—

१३७

मंजूच्या अंतकाळीं, मला ज्याची पुरी जाणीव झाली होती, तें त्यांचं गुपित किती विस्मयकारक होतं ? जणूं, कावीळ झालेल्या माझ्या कल्पनाशक्तीला, त्याचा कधीं हासभासहि लागला नव्हता !

आमच्या घरांतल्या मंजूच्या आगमनापासूनच, भाबडा गणू तिच्यावर बेहद्द खूष झाला होता. पण त्याच्या संकोची स्वभावामुळें, तिच्याशीं खाजगी बोलायचा त्याला धीरच होत नसे. घरांतला स्वयंपाकी गेल्यावर मात्र, त्या निःसंकोच वातावरणांत, दोघांचा परिचय वाढला.

लीनीच्या केन्द्राभोंवतालचा आमचा संसार अष्टौप्रहर पाहून, मंजीच्या तरुण मनाचीहि चलबिचल होई. पण घरंदाजपणा, कुळाचार यांची कांहींशी वेडी प्रबळ भावना, तिच्या उराशीं संतत होती. कधीं लीनीबरोबर तिला गणोबाच्या मोटारींतून फिरण्याची पाळी येई. अशावेळीं मात्र, तिचं तरुण मन...त्या अनायासं लाभणाऱ्या वैभवाच्या सुखानें, विद्ध... विव्हल होई —पण ती तें प्रयत्नानें दडपी.

अशाच एका निवांत फेरफटक्यांत, गणूनें तिला आपला परिचय करून देऊन, लाजतच तिला मागणी घातली होती; पण तिनें त्याला तत्काळ बाजूस धुडकावून लावलं होतं. त्यामुळें खिन्न होऊन, त्याबाबतींत मध्यस्ती करण्याचं काम माझ्यावर सोंपवण्याची, गणूला इच्छा झाली होती. पण शेवटीं, त्याला तशी छातीच झाली नव्हती !–तो मनांतल्या मनांत मात्र झुरत गेला होता.

असेच दिवस गेले होते;...मग जूहूला सुधीरांबरोबर जाण्याचा मंजूला आलेला तो योग !–त्यावेळचा तिला आलेला तो प्रबळ तारुण्योन्मादाचा नवखा हुरहुर लावणारा अननुभूत अनुभव !–त्यानेंच तिचं मन पुढें कित्येक दिवस पेटलं होतं.

सुधीरांबद्दल नव्हे,...पण आपल्याच दर्जाच्या गणोबाबद्दल मात्र, मंजूला प्रथमपासून मनांत उत्कट प्रेम होतं. त्याच्या उमद्या स्वभावामुळें त्याच्याबद्दल तिला आंतून ओढ वाटत होती. त्यामुळेंच, त्यानंतर ती गणोबाबरोबर नेहमीं मोकळं नि सलगीनें वागत आली होती. तरी पण, तिचं वेडं मन, कुळाचाराची कल्पना सोडायला मात्र तयार नव्हतं;...लग्नाची गोष्ट तिला पटत नव्हती;...सुधीरनां नि मला–तिच्या आश्रयदात्यांना-त्याबद्दल काय वाटेल, याचीच तिला...नि थोडी फार गणोबालाहि, मनांत भीती !

पण असल्या परस्परविरोधी विचारभावनांच्या ओढाताणींतच, त्या दोघांच्या दाट परिचयाला, त्यांना नकळतच, लपतछपत कायम स्वरुप आलं होतं;–नि त्या भावविवशतेंतच, दोघांच्या दडपल्या प्रबळ विकारांनी,



विलासेच्छेनें, त्याना शेवटीं फसवलं होतं;—त्यांचं पुढलं—सामाजिक दृष्टीनें—वांकडं पाऊल पडलं होतं !—

त्यानंतरहि कांही दिवस लोटले होते; नि मग, समोर आलेल्या साऱ्या चमत्कारिक परिस्थितीनें, लग्नासारख्या त्या एका सरळ गोष्टीचीच, दोघांनाहि अधिकाधिक चोरी वाटत गेली होती ! तरीहि, अजून संधि मिळतांच, गुपचूप बाहेर कुठं तरी जाऊन, दोघांनी झटपट लग्न उरकायचं, ही कल्पना गणूनें मंजूच्या मनांत हळु हळू रुजवत आणली होती. पण तशी अनुकूल संधि मात्र,—सुधीरांचीं सारखीं कामं करतां करतां–गणूला अलीकडे मिळालीच नव्हती !

आणि तेवढ्यांतच, तें मंजूचं गुपित माझ्या दृष्टीस पडलं होतं !—मग घरांत एकच गहजब उडाला होता; साऱ्यांच्याच संशयी मनांनी, भयंकर वांकडींतिकडीं वळणं घेऊन, तो वाढत गेला होता.

योगायोगानें, आपण ज्या सुखी संसाराच्या आसऱ्याला येऊन पडलों त्यांतच, आपल्यामुळें सगळं दुःख सांडलं...याची मंजूला चुटपुट लागली. माझ्या अकारण रागानेंच, मंजू अर्धमेली झाली. पण तरीहि, तिला धीर देऊन, लग्नासाठीं करायच्या गुप्त प्रयाणाचं सगळं, गणोबानें जुळवून आणलं होतं...

तेवढ्यांत, गणू लोणावळ्याला कामानिमित्त गेला; तो परतल्यावर, तें सारं तीं दोघं उरकणार होतीं. पण दरम्यान, त्या भावनाप्रधान पोरीनें; गोंधळ उडवला होता; विलास–सुख, अब्रूचं फुटलेलं भांडं,...मनांतला जाज्वल्य कुलाभिमान, असल्या मिश्र भावनांचा, तिच्या पश्चात्त उपरत मनांत, भयंकर झगडा झाला—गणूनें ठरवलेल्या पारल्याच्या बंगल्यांत, हळूंच पळून जातांच, तिला मिळालेल्या स्वतंत्र एकाकीपणांत,...तिनें अविचारानेंच,...तिला माहीत असलेलं-ऐकलेलं एक खेडवळ जालिम औषध घेतलं !—त्यावेळीं, तिला वाटलं होतं,...‘आपण आयुष्यांत एकदांच केलेल्या या पापी लबाडीनें, आपला माथा पुन्हां उजळ होईल !–’

—पण…पण…ती त्यांतच शेवटीं आपला जीव गमावून बसली !—

१३८

गेली बिचारी !-जातां जातां, डोळ्यांतल्या अखंड ओसरणाऱ्या अश्रूं-बरोबरच, ती सारखी बोलत होती-“ ताई…नाना लाख माणूस आहेत !-माझ्या सारखी अनाथ देखणी पोर त्यांच्या घरांत;…ते तसे नसते, तर…माझ्या आयुष्याचे केव्हांच हवे ते धिंडवडे निघाले असते !-त्यांना त्या दिवशीं उगीच दुखवलंत तुम्ही !-हो, मला एकदां मोह झाला…तरुण शरीर माझं!-क्षमा करा…पण त्यांतून नानांनीच मला चटकन् वेळींच मागं ओढलं !—आपला नि माझा दोघांचा कडेलोट थांबवला !—”

ते तिचे शद्ब माझ्या कानांत अजूनहि घुमताहेत !-नि मग ती म्हणाली होती-“ खरंच…पण मला लाभलेलीं तुम्ही सारींच माणसं चांगलीं !—मीच मेली दुर्दैवी !-या गणोबांनीं नसतं का मला सुखी केलं ?-पण मीच वेडी !—आधीं त्यांचं ऐकलं नाही-नि मग आम्ही दोघंहि चुकलों;—शेवटीं हें असं झालं !-ताई…माझ्या दुःखातून मी इकडे आलें…माझ्या दुःखासह तुमच्या घरांत शिरलें…तुम्ही साऱ्यांनी मला जें काय दिलंत तें सुखच होतं सारं !—पण उलट, माझ्यामुळें मात्र, तुमच्या घरांत आतां दुःख भरलं !-क्षमा कराल ना, ताई ?-जातें मी !-मग तरी सुखी व्हा !—लीनी…ती माझी लीनी !—”

—अशी माझी गोड मंजू गेली !—लीनीची लाडकी मंजू गेली—गणूची…गणूची मंजू गेली ?—

१३९

जसजसं माझं मन थंड होतंय्, तसतशी त्या प्रकाराबद्दल माझी मलाच लाज वाटतेय् !—वाटतं—“ कसलं आमचं शिक्षण ?—आम्ही स्त्रिया त्या स्त्रियाच !—” खरंच—मत्सरानें कित्येकदां स्त्री किती संशयी, अविचारी, बेफाम नि वेडी होते पहा !—



अशिक्षित असली तरी,…मंजू आपल्या अनेक गुणांनी, माझ्या सुधीरांना आपल्याकडे खेंचूं शकणारी होती; ती जणूं माझ्याच योग्यतेची, बरोबरीची !—असंच, माझ्या मनाला आंत आंत वाटत गेलं होतं—ह्यां-इतके दिवस माझ्या मनांत खोल दडलेल्या-सत्याची, मला तशी नकळतच जाणीव झाली !—

मग वाटलं-‘ माणसं किती दांभिक नि दोलायमान मती असतात पहा !-जें थोडंफार चांगलं आम्ही-स्वार्थी वा निःस्वार्थीपणें मनांत योजतों-जोपासतों तेंहि आम्हाला—धैर्य नि आत्मविश्वास नसल्यामुळें—प्रत्यक्षांत घडवून आणतां येत नाहीं, हेंच खरं !’

—हेंच पहा—मंजू-गणूंचा संबंध-संयोग, गणूला प्रिय होता; मंजूला प्रिय होता; मलाहि प्रिय होता…तिघांच्याहि मनांत,…तो सुखी विवाह, –कल्पनेंत कां होईना–अव्याहत वसत होता !

पण तसं तें सरळ मात्र कधीं घडलंच नाहीं;…साऱ्यांच्याच संशयी दुबळेपणामुळें, त्या एका सरळ सरळ गोष्टींत…संशय, पाप, दुःख,…सारं वाईट वाईट तेवढंच कालवलं गेलं !—हाच ना आमचा मानवी सुखाचा शोध ?

पण त्या गडबडींत,…आमची मंजू मात्र, आम्ही अशी अगदीं वेड्यासारखी गमावून बसलों !

…किती विषण्ण वाटतंय् मला—या क्षणीं !—वाटतं,…आम्ही माणसं—स्त्री, पुरुष, बालकं,…सारींच आंधळ्यांची एक लांबच लांब माळ आहों ! एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला…शहाणा–वेडा, पुण्यवान्–पापी, चांगलं–वाईट म्हणतो, नि केवळ आत्मगौरव मानतों, एवढंच !—

—त्यांतूनहि, सुखी विचारांचा एकच एक सोनेरी किरण याक्षणीं दिसतो आहे मला;…तीच ती सुखद जाणीव;—कीं, माझे सुधीर, माझ्या अनुभवांइतके नि कल्पनेइतकेच मोठे आहेत ! त्या त्यांच्या डोळ्यांमधूनच,

मी त्यांच्या ज्या शीलाचं प्रथम संशोधन केलं,...ग्रहण केलं,...तें अजूनहि तिथं...त्यांच्यामध्यें कायम आहे !

—सुधीर, सुधीर! मी तुम्हाला उगीचच दुखवलं,...क्षमा करा मला... कराल ना आतां खरीखुरी क्षमा ? ?...

## मी,...नि माझे सुधीर–

१४०

वेळोवेळीं मनांत येईल तें, येईल तसं स्वैरपणें लिहून टाकायच्या या वहीला, मी 'मखमली पेटी' म्हटलं;..आज ती गंमतींतच, सुरवातीपासून फिरून वाचतांनाहि, मला तें नांव आवडलं!...निदान माझ्यासारख्या स्त्रीचं मन हें तरी तसंच असतं !...यांत मी लिहिलंय् त्याच्या अनेकपट दुसरं... अव्यक्तपणेंचं, माझ्या मनांतल्या मनांत, विरून गेलंय्...

मला एकेकदां पुरुष-मनाचं गुंतागुंतीचं कोडंहि उलगडण्यासारखं वाटतं; वाटतं–त्याचं स्त्री–प्रेम हेंच त्याचं सर्वस्व नव्हे, हेंच खरं !–त्याच्या दृष्टीनें, –त्याच्या आयुष्यांत अगदीं यदृच्छया येणारी, राहणारी, जाणारी–ती एक गौण मामुली अशीच गोष्ट !

मंजू नाही कां सुधीरांच्या आयुष्यांत योगायोगानें शिरली ? ती समोर होती, तोंपर्यंत, अप्रत्यक्षपणेंच कां होईना, ते तिच्याकडे आकर्षिले गेले होते. ते कबूल करोत न करोत, पण त्यांचं तिच्यावर अनुकंपायुक्त पण मोहांधक असं सुप्त प्रेम खासच होतं! ... ते जबाबदार, प्रतिष्ठित; त्यांनी आपल्या भोंवतालची सामाजिक बाह्य बंधनं कधींच झुगारून दिलीं नाहींत !...पण मंजूबद्दलची त्यांच्या अंतर्मनाची प्रबळ ओढ नि अंतःसंस्कारांची ती गुंतागुंत, यांची एक अव्याहत रस्सीखेंच झाली !–माझ्याबरोबरच्या त्यांच्या बाह्यवर्तनांतहि ती प्रत्यक्षाप्रत्यक्ष मला दिसली. वरवर ते पूर्वीसारखेच वागत; पण माझ्याबरोबरच्य



त्यांच्या बोलण्या–वागण्यांत, त्यांच्या सहवासांत, त्यांच्या एकांतांतल्या स्पर्शांत, ...प्रत्येक ठिकाणीं, ...तो फरक, तो अभाव,...मला तीव्रतेनें जाणवे !—

आतां मंजू त्यांच्या पुढून गेली; कायमची गेली. याची त्यांना जाणीव झाली. त्या परिस्थितीमागल्या दुःखद घटनांनी, त्यांचं मन रंजीसहि झालं !— ...तरी पण, आतां त्यांच्यांत झपाट्यानें पालट पडत असल्याचाच,...मला प्रतिदिन,.. प्रतिक्षण प्रत्यय येत आहे.

मंजू गेल्यानंतर,...माझ्यांतहि किती फरक पडलाय् पुन्हां ?–गेले दोन-तीन महिने, कित्येक वर्षे नव्हती इतकी...माझी प्रकृति सुधारली आहे !—मंजू काय वैरीण का होती माझी ?–मला तर ती फार फार आवडायची. तसं तिनें मला बिंदुमात्रहि दुःख दिलं नाही; दिलं तें सारं सुख, समाधान, विश्रांतिच ! ती इथं असतांना, शेवटीं शेवटीं, मला दुःख झालं !–मी मनांत खूप खूप जळलें !–पण मग,...तें दुःख तिनें दिलेलं नव्हे; तें माझं,...माझ्या मनानेंच माझ्यासाठीं·तयार केलेलं ! !—

खरं म्हणजे, मंजू दृष्टीआड होतांच, मी स्वतःच आतां बदललें आहे, ...त्यामुळेंच, सुधीर देखील पालटले आहेत; तें पुन्हां माझ्याशीं प्रेमानें वागूं लागले आहेत; त्यामुळेंच, आमचं मधलं दुःख गेलंय्...हुरहुर उरलेली नाही !–पुन्हां एकदां,...सुधीरांच्या सहवासांत,...त्यांच्या बोलण्यांतून,स्पर्शांतून माझ्या मनाचा भावसागर हेलावून टाकणारं न्यारचं सुख...मला लाभूं लागलंय् !... आयुष्यांत नवीनवाई उगवते आहे !...

१४१

अशावेळीं वाटतं, याचं कारण एकच !–केवळ बाह्यपरिस्थितींत नव्हे, आपल्याच मनःस्थितींत,...आपल्या उत्कट भावनासाम्राज्यांतच,...स्त्री जगत असते !...पुरुषाबद्दल तिला वाटणारं प्रेम,...हेंच तिला आपलं प्रत्यक्ष जीवन वाटतं; त्या केंद्राभोंवतींच, ती आपल्या भावनांचा पसारा करतें; तोच तिच्या चैतन्याचा उगम !–तो झराच तिच्या जीवनगंगेला भरती आणतो; तो सुकला, कीं...ती आटते !—

माझ्या सुधीरांबद्दलचं माझं प्रेम असंच आहे, नाही का ?—तें त्यांच्या गुणांवर...कर्तृत्वावर आहे; त्यांच्या मनावर आहे. ते माझ्याहून वयानें, बुद्धीनें, कर्तृत्वानें, यशानें, प्रतिष्ठेनें मोठे आहेत, यांतच मला समाधान वाटतं !—त्यामुळेंच, गृहाच्या या चार भिंतींत शिरतांनाहि, मला सुखच वाटलं. त्यांच्या सहवासांत, शरीर-स्पर्शांत मला सुख वाटे; पण तें त्यांच्या रुबाबदारपणामुळें नव्हे; चेहरा तरतरित, नांक उंच मोठं, बोलणं हळुवार गोड, डोळे भावपूर्ण;...हें सारं मला आवडे व आवडतं,..तें त्यांचं मन आवडतं, म्हणूनच; त्या मनाचाच पुरा कबजा घेण्याची माझी इच्छा होती व आहे !...यालाच मीं त्यांच्याबद्दलचं माझं प्रेम म्हणतें; तेंच मी माझं सुखी जीवन समजतें !—

मला एकदां वाटलं...माझ्या लीनीनें त्यांना माझ्यापासून हिरावून नेलं; तें डळमळविलं !—नि माझी पोटची पोर असूनहि, त्यावेळीं मग, मला नकळतच, तिचा अस्पष्ट पण तीव्र दुस्वास वाटला ! मंजूच्या वेळीं, केद्दासारखा धरणकिंप माझ्या मनांत झाला,...तोहि त्यामुळेंच !—एकट्या माझेच सुधीर मला हवे होते...हवे आहेत !—त्यांच्या त्या मनांत खोल अवगाहन करायला... मला ज्या गोष्टी साहाय्यभूत झाल्या, तें त्यांचं बोलणं, त्यांचा सहवास, सान्निध्य, स्पर्श-आलिंगन...साऱ्यांनी मला सुखावलं, याचं कारण तेंच !—ज्या डोळ्यांमधून प्रवेश करून,...मी सुधीरांना आपलंसं केलं, ते माझ्या स्मृतीतले छोट्या सुधीरांचे डोळे !—पुन्हा माझ्यासमोर तेंच मूर्तस्वरुपांत उभे रहावेत, ते माझे व्हावेत,...या प्रमाथी भावनेनेंच, लीनीच्या वेळीं,...'मुलगा व्हावा' ...अशी मला तीव्र आकांक्षा वाटली;...(आजहि चुटपुट वाटतेय् !—) माझ्यासारख्याचा दिसणाऱ्या लीनीची आई होण्यापेक्षां, 'छोट्या सुधीरां'चीच आई व्हावंसं मला त्यावेळीं वाटलं;...तें या सुप्त भावनेनेंच—

१४२

माझ्या मनाचं हें गौडबंगाल सुधीरांना समजणार नाहीं;...पटणार नाहीं. पण लिनीच्या जन्मानें त्यांना झालेला आनंद ? ती वाढत गेली,



तसतशी त्यांच्या मनाची तिच्याकडेच गेलेली झांप ? ती त्यांना साहाजिक नैसर्गिक अशीच वाटली असेल ना ?—तशी ती आहेहि !—पण कां ?

कदाचित् त्यांच्याहि अंतर्मनांत, त्या खोल खोल कप्प्यांत, असंच एकादं प्रभावी दृश्य लपलेलं असेल ! नाहीं कोणी म्हणावं ? माझ्या नि त्यांच्या बालपणीं, मी त्यांना रस्त्यांत भेटलें, त्यावेळची माझी मूर्तीच त्यांच्या घुम्या मनानें अजाणतां टिपून घेतली असेल; वाढत्याखेळत्या, लीनीच्या रूपानें, तीच फिरून प्रत्यक्ष लाभल्याचा भास त्यांना झाला असेल; त्यानेंच नकळत, तिच्याकडे ते अधिकाधिक आकर्षिले गेले असतील; त्यामुळेंच, प्रत्यक्ष इच्छा नसूनहि, ते मला क्षणकाळ विसरत गेले असतील !—आतां यापुढें,...वाढत्या वयाबरोबर... लीनीच्या अवस्था पालटतील; मग त्यांना...पुन्हां पुन्हां तशी भुरळ पडत जाईल का ? हो, मला तरी वाटतं तसं ! आणि लीनीच्या अगदीं लहानपणींच, मला क्षणकाळ तिचा तीव्र दुस्वास वाटला;...सुधीरांनाहि कधीं तरी, कोणाचा तरी...तसा वाटेल कां ?—

हो, वाटेलहि !—केव्हां ?... लीनी मोठी झाली...वयांत आली... लग्नाला योग्य झाली...म्हणजे ! ! कोणाचा ?...तिचा तो रुबाबदार सुयोग्य पती,... तिचा हात धरून, सुधीरांपासून तिला कायमची दूरदूर घेऊन जाऊं लागला ना, म्हणजे ! !—त्यावेळीं, त्यांना तो तीव्र दुस्वास वाटेल !...हो, त्या त्यांच्या जामताचा ! !—

१४३

मला तरी आतां पटतं,...स्त्रीपुरुषांच्या मनाचे हे खेळ,...असे अतिशय गुंतागुंतीचे,...अगम्य, अगाध, अफाट, अतिशय गूढ गूढ असेच असतात !...ते त्यांना उकलून दुसऱ्याला सांगतां येणार नाहीत. किंबहुना, स्वतःचं स्वतःलाहि ते समजवून घेणं, त्यांना अशक्य...केवळ अशक्य आहे !—फक्त त्या प्रबळ भावना, त्याला नकळच, हवं तसं त्याला हलवतात-डुलवतात !...

...इतकं असूनहि मनाला वाटतं,...वाढत्या, मोठ्या झालेल्या, तरुण लीनीकडे पाहातच सुखावून, तिच्या आईला—आपल्या प्रेमळ पत्नीला —सुधीरांनी हळूं हळूं विसरावं;...आपण स्वतःहि विलीन व्हावं;—हेंच मानवी नैसर्गिक जीवन !-नि...आपल्यापोटीं आलेल्या सुधीरांकडे...त्या वाढत्या, तरुण, रुबाबदार, युवक सुधीराकडे पाहातच, मी आपल्या पतींना... या सुधीरांना विसरावं;...आपणहि, शेवटीं विलीन व्हावं;...हेंच मला योग्य! हेंच मानवी जोडण्याचं,...मातृ-पितृ-वात्सल्याचं नैसर्गिक जीवन ! तेंच, मानवी जीवनांतलं, जगांतलं एकमेव कार्य !-त्यामुळेंच, जग पुढें पुढें चाललंय्; . तें उन्नत-प्रगत होतंय् !...

१४४

असल्या या विचारांनी, याक्षणीं माझं मन कसं भारून जातंय्;... आजपर्यंतच्या विविध लहान मोठ्या दुःख-संकटांची मला अगदीं विस्मृतीच होतेय् ...

खरंच ! तोकडंच असलं,...तरी मानवी जीवन कसं अगदीं अमृतानं तुडुंब भरलेलं आहे ! त्याचं दिव्यत्व असं मनाला पटकन् पटतं;...नि वाटतं,...जगावं, जगावं,...जेवढं जमेल तेवढा काळ या जगांत जगावं !

उद्यांचं कुणी सागावं ? आज जें जें जसं जसं उत्कटतेनें वाटतंय्...तेंच असं इथं लिहून ठेवतेंय् मी --

पण कुणासाठीं ? कुणासाठीं बरं ? ?...फक्त माझ्यासाठीं ! किंवा... माझ्यासाठीं नव्हे, ...हें लिहितां लिहितां मला लाभत असलेल्या आनंदासाठीं !— हो, सुधीरांच्या प्रेमानेंच,...मला पुन्हा नव्यानें लाभत असलेल्या ...माझ्या हृदयांत भरून उरलेल्या आनंदासाठीं !—आनंद ! माझा 'आनंद' ! ...याक्षणीं माझ्या पोटांत फिरणाऱ्या आनंदासाठीं—हो... जगांत अवतार घेणार असलेल्या माझ्या 'छोट्या सुधीर'साठीं—

**४ जीवन—गंगा ४**

**- स्वल्पविराम -**

## जीवन—गंगा

## [ काहूर ]

## ५

# जीवनाची जाणीव—

## जीवन–गंगा ५ जीवनाची जाणीव–

१४५

इथं ती डायरी संपली; तेव्हां पुढल्या कोऱ्या पानानें, सुधीर एकदम भानावर आले. त्यांनी शेवटच्चीं तीं वाक्यं अधीरतेनें पुन्हा एकदां वाचून, एक निश्वास टाकला. त्यांच्या मनांत आलं—"प्रेमाचं जीवन तोकडंच; तें अमृतानं तुडुंब भरलेलं असंच; तिचं दिव्यत्व पुरं पटतं; त्यानं मन भारून जातं !"...

शेवटीं शेवटीं, प्रेमा एका न्याऱ्या जिव्हाळ्यानें, नव्या उत्साहानें, आशावंत मनानें वागली होती, या जाणीवेनें, सुधीरांचं आजचं वृद्ध शरीरहि पुलकित झालं !–पण–त्यानंतर सहा सात महिन्यांतच, लीनीला मागें टाकून–ती एकाएकीं निघून गेली होती. त्यापुढें मग सुधीरांच्या वांट्याला–कायमची हुरहुर.. कायमचं काहूर...

जाण्यापूर्वी, प्रेमाला 'छोटा सुधीर' मात्र लाभला होता; आनंदून, तिनें त्याचं नांव 'आनंद' ठेवलं होतं; पण त्यांचा तो आनंद,...त्यांना फार काळ लाभला नव्हता; प्रेमाचं मन आशावंत, लढाऊ खरं; पण शरीर मात्र खचत गेलं होतं; त्या दुसऱ्या मातृत्वानंतर तर तें पुरंच ढांसळलं होतं. तरीहि आपलं ती नेहमीं म्हणायची--"झालंय् काय मला ?-थोडी अशक्तता आहे, एवढंच !" —मात्र, औषधं–टॉनिकं–इन्जक्शनं–हजारांतला एकहि उपचार लागूं पडला नव्हता. शेवटीं, त्यांत आणखी ॲपेन्डिक्शचं निमित्त झालं; स्वतः नाहीं, आपल्या एका कुशल सर्जन स्नेह्याकडूनच सुधीरांनीं ते ऑपरेशन करवलं; तें यशस्वी होऊन त्यांची आशा वाढली होती..पण तरी अखेर ती गेलीच !–जणूं तिला वाटलं– "सारे सुखद...सारे मिश्र अनुभव,...संसारांतलीं सारीं सुख-दुःखं, भोगलीं;



बस्स झालं हें जीवन ! इथल्या जगण्यांत अजून कांहीं राम आहे, मौज वाटतेय् ...त्याचवेळीं उठून जाण्यांत खरा अर्थ !!–"

त्या पुढल्या कोऱ्या गुलाबी पानांत, सुधीरांना आजहि हेंच सारं दिसत होतं;...म्हणूनच, तींहि एकदां फर्रकन् चाळून, त्यांनी डायरीच्या सोनेरी कडांकडे नि मखमली बाइंडिंगकडे पाहात, ती आपल्या छातीवर ठेवली; आणि कांहीं काळ ते स्वस्थच पडून राहिले.

१४६

या 'मखमली पेटी'च्या प्रथम–दर्शनावेळीं, सुधीरांच्या मनांत प्रचंड झंझावात उसळला होता; त्या गरगरणाऱ्या भोंवऱ्याच्या मध्यावरच्या कांटकीप्रमाणें, आपण आंत आंत गेल्यासारखं, त्यांना त्यावेळीं वाटलं होतं.

तोंपर्यंत त्यांना अव्यक्त अशा कांहीं खोल खोल चोरकप्प्यांची ती मखमली पेटी ! प्रथम, प्रेमाच्या सहवासाइतकीच, ती त्यांना सुखद वाटली; तरी पण, आपल्याबद्दलच्या तिच्या त्यांतल्या कांहीं उद्गारांनीं, कांहीं कयासांनी,–त्यांना त्याक्षणापासून, राहून राहून बेचैनच केलं होतं, एकूण !—

"मोठमोठ्या महत्वाकांक्षाच्या ओढींनी, यशासाठीं करावयाच्या अविश्रांस झुजींमध्येंच जाणारं, आपलं धोपटमार्गी लढाऊ आयुष्य!... त्या रांगड्या जीवनांत, प्रेमा स्वखुषीनेंच शिरली; तिनें आपल्याला सुखावलं खरं; पण शिपाई बाण्याची आपली नाकासमोरची लढवय्येगिरी,...त्या वातावरणांतहि, तशीच पुढें चालूं राहिली;–मग लीनीचं आगमन,...तिच्या सान्निध्याचा आनंद ! तें प्रेमाचं पहिलंवहिलं फूल म्हणूनच,—आपलं धांवपळीचं आयुष्य जगत असतां-आपण तिला घेऊन स्वैर फिरलों;... उलट, प्रेमाची प्रकृति नाजुक झालेली; तिला कसली दगदग सोसणार नाही, या कल्पनेनेंच, आपण तिला बरोबर नेत नसूं...आणि पुन्हां, आपल्या प्रेमाचं लौकीक प्रदर्शन करण्याची, स्वभावतःच नावड; आपलं प्रेम व्यक्तिगत;

तिचं-आपलं, मनांत जाणून घ्यायचं; केवळ आपल्या खाजगी आयुष्यांतल्या वागणुकींत प्रतिबिंबित व्हायची ती गुप्त बाब,-किंबहुना, मानवी तोकड्या शब्दांत, प्रत्यक्ष प्रेमाकडेहि व्यक्त करण्याची ती गोष्ट नव्हे !-जगांत जगतांना, पुरुषाला-नाही म्हटलं तरी-कमीजास्त दांभिक व्हावं लागतं, वागावं लागतं. पण त्याची झळ आपल्या वैयक्तिक गृह-जीवनाला कां लागावी ?!"

असल्या प्रामाणिक भावनांमुळेंच, त्यावेळच्या त्यांच्या घालमेलीच्या आयुष्यांतल्या त्या त्या गोष्टी, त्यांच्या हातून घडत गेल्या. पण त्यांतूनच, प्रेमानें शोधलेली 'ती तिच्याबद्दलची त्यांची पुरुषी बेफिकीरी'; 'लीनी बद्दलच्या विविध भावनांचं तें पृथःकरण'; सुधीरांना तें पटलंच नाही. त्या गोष्टींचंच त्यांना अव्याहत मनस्वी दुःख झालं होतं. त्यांना वाटलं होतं— "प्रेमाचं एवढंसंच वैवाहिक जीवन !—पण त्यांतहि, लीनी-मजूंमुळें,-आपली इच्छाहि नसतां, बरीच गुंतगुंत झाली. मंजूबद्दल आपल्याला क्षणकाळ पार्थिव आकर्षण झालं खरं! पण,...आपल्या मनाचा तोल आपण कुठं ढळूं दिला?...प्रेमाबद्दलचं आपलं प्रेमच न्यारं !...इतकं असूनहि, तिला हवं तें सुख-समाधान मात्र आपल्याकडून तिला मिळूं शकलं नाही—"

आणि या सुन्न मनःस्थितीनें झालेल्या हुरहुर-तळमळींतच, त्यांच्या हातून पुढलं सारं घडलं होतं—जणूं प्रेमाला आव्हान देण्याच्याच विचारानें, त्यावेळीं,...तिला उद्देशून ते स्वतःशीं म्हणाले होते—"बरं तर, पाहूंच या आपण-लीनीच्या सहवासाशिवाय मला यापुढें जगतां येईल कीं नाही, तें !-तिच्यामुळं मला तुझा विसर कधींच पडला नाही; पडणारहि नाही;... केवळ एक कार्यव्यग्र, बुद्धिजीवी शिपाईगडी मी !-विवाहापूर्वी घालवलं, तसंच,...यापुढेंहि-तुझ्या चिरवियोगामध्येंहि-मी माझं एकाकी जबाबदार सामाजिक आयुष्य जगूं शकेन !—कोणाच्याहि—अगदीं लीनीच्याहि सहवासाशिवाय, स्वयंपूर्णपणें जगूं शकेन मी !—पहाच तूं, प्रेमा—"

—आणि त्यांच्या त्या विचारमालिकेंतूनच, शेवटीं लिनीची कल-कत्त्याला नीलादेवींकडे उचलबांगडी झाली;... त्यानंतर ते मनांत अनेकदां



चुटपुटले खरे;...पण त्यांच्या बाह्य जीवनावर, त्यांच्या सामाजिक कार्यक्षेमतवर;...त्या घटनेचा किंञ्चिन्मात्रहि दृश्य परिणाम झाला नाहीं.

आज सकाळीं, त्या अनोळखी मुलीचं ऑपरेशन करतां करतां घडलेल्या प्रसंगापर्यंत, त्यांच्या मनांत, एवढं मोठं काहूर कधींच माजलं नव्हतं ! 'जीवन गंगें'तच त्यांची एकाएकी व्यक्तिगत जीवनगंगा विलीन झाली होती !

## १४७

—आणि सकाळीं, 'जीवन-गंगे'च्या ऑ. हॉलमध्यें, सुधीरांचा, जीवन-कल्लोळ उडायचं मुख्य कारण तें हेंच ! त्या मुलीच्या दर्शनानें त्यांच्यापुढें त्यांची लिनी उभी राहिली. त्या तरुणाचं गुपित ऐकून, लिनीच्याच भावी लग्नाबद्दलच्या विचारांनी त्यांचं मन भरलं; समोरच्या त्या ॲपेन्डिक्सच्या ऑपरेशनमुळें, प्रेमा-लीनी यांच्या भूतकाळांतल्या ऑपरेशन्सची त्यांना आठवण झाली. आणि त्याच विचारशृंखलेमुळें, प्रेमानें डायरींत लिहिलेल्या विचारांचीहि त्यांना सणकन् आठवण व्हावी;...त्या मानसिक झुंजीमुळें,...ते क्षणकाळ देहभान विसरावेत; नि आपल्या जबाबदारीच्या कर्तव्याची त्यांना संपूर्ण विस्मृती व्हावी, यांत आश्चर्य तें कसलं !...

—त्याक्षणीं, एकाएकीं आपला पेशा विसरून, सुधीर एक सामान्य माणूस झाले. आपल्या खाजगी आयुष्यांत, त्यांनी घेतलेल्या, ते जगलेल्या... साऱ्या भूमिका—प्रेमळ प्रियकर; एकाकी विधूर, जबाबदार वत्सल पिता— मनांत उत्कटतेनें जाग्या झाल्या; नि ते जगाचं, देहाचं, कर्तव्याचं भानच विसरले —आठच दिवसांपूर्वी, लिनीचं त्यांना एक मनमोकळं पत्र आलं होतं. त्यांत तिनें आपलं एकमेव गुह्य ...गुपित उघडं केलं होतं !—तेंच त्यांच्या मनांत दडलं होतं !

त्या ऑपरेशनच्यावेळीं उडालेल्या सकाळच्या गोंधळामागें,...अशी सारी गुह्य कारणपरंपरा होती—तो एकच एक, सुप्त मनाचा खेळ होता !

१४८

सुधीरांची लीनी ! ती त्यांच्यापासून दूर दूर नीलादेवींकडे राहिली; —त्यांच्या सहवासानें संस्कारांनी, शिकवणीनें, आजपर्यंतचं सारं आयुष्य तिनें जबाबदारीनेंच घालवलं होतं. पहिले दुसरे वर्ग मिळवत मिळवतच, आतां ती पदवीधर झाली होती. भावपूर्ण, अस्खलित वक्तृत्वाबद्दल नि यशस्वी युक्तिवाद–कौशल्याबद्दल, लीनीनें आपल्या साऱ्या विद्यार्थीदशेंतच, आंतरविश्वविद्यालयीन नि इतर लहान मोठीं पारितोषिकं–प्रशस्तीपत्रकं मिळवलीं होती. अलीकडे तर प्रथम श्रेणीच्या अनेक हिंदी बंगाली नियतकालिकांतहि, तिचं वाङ्मय प्रसिद्ध होत असे. बंगाली ओजस्वी राष्ट्रीय वाङ्मयांत, तिच्या एका भावगीत-पुस्तकाला, चांगलंच स्थान मिळालं होतं. त्या भागांतल्या विद्यार्थी चळवळींची तर ती आतां आघाडीवरची नायिकाच झाली होती !—

बेचाळीस सालीं ती पदवीधर झाली. तेव्हां नीलादेवींनी सुधीरांना लिहिलेल्या विस्तृत पत्रांत म्हटलं होतं—

"आपल्याच कार्यव्यग्रतेच्या सबबी सांगून, दरवर्षी, तुम्ही लीनीला नि आम्हाला भेटायला यायचं टाळतां !—असला स्वार्थीपणा या वर्षी तरी चालूं देणार नाही बरं का आम्ही !—

"लीनी तर काय ?—वर्षभर अभ्यास म्हणून, लांब लांब सुट्या पडल्या, कीं–त्यांत तिनें आंखलेले–खेड्यांतील प्रौढ साक्षरतेचे, आपल्या लेखन–वाचनाचे, नि इतर हजारों 'भानगडीं'चे—आराखडे यशस्वी करून दाखवायचे असतात, म्हणून,–मिळून एकूण काय, आपल्या साऱ्या कार्यव्यापांचं हें मध्यकेंद्र, चारआठ दिवसांसाठींहि सोडायला ती तयार नसते !—



"त्या पोरीच्या असल्या कार्यशक्तीची नि असामान्य उत्साहाची मात्र मला मोठी गंमत वाटते. मोठ्या विश्वासानें, माझ्या हातीं वीस वर्षांपूर्वी तुम्हीं दिलेली तुमची ती छकुली,...आतां ही अशी झाली आहे. पदवीधर, बोलकी, लेखिका, फेलो; तिचं हें सारं यश नि त्या तिच्या ध्येयवादी चळवळी ! माझं मलाच एकप्रकारें कृतार्थ वाटतं; तें सारं माझंच जणूं यश,...असं मला वाटतं...

"गेलीं दोन तपं, मी शिक्षणशास्त्रांत अविश्रांत तपश्चर्या केली. माझे अनेक प्रयोग झाले. त्यांतला एक कल्पनातीत यशस्वी झालेला प्रयोग या दृष्टीनें, मी तुमच्या लीनीकडे पाहूं लागलें, कीं, मला अनेकदां अननुभूत समाधानच लाभतं !...तेव्हां विनन्ति अशी, कीं, मला अगर आपल्या मुलीला भेटायला म्हणून यायला वेळ नसेल,...तर निदान आमच्या आश्रमांत घडलेला, लीनीरूपाचा हा यशस्वी मूर्त प्रयोग पाहायला तरी–वेळांत वेळ काढून– या वर्षी याच !–नाहीं म्हणूं नका;–केव्हां येतां ?–बोला ? "

—पण तरी सुधीर त्यावर्षी गेले नाहींत; लीनीला त्या नव्या स्वरूपांत पाहण्याची तीव्र इच्छा त्यांना झाली होती; पण–'नको तो मोह !–ती दूर आहे तेंच बरं !–' असं म्हणून,...त्यानीं शेवटीं तें जाणं टाळलंच होतं.

१४९

मग राष्ट्र-व्यापी ऑगस्ट–आंदोलन आलं; पंधरवड्यांत, लीनी गुप्त झाली. ती बातमी कळवतांना, नीलादेवींनी सुधारांना कळवलं होतं—

"तुमची लीनी परवां भूमिगत झाली आहे; कुठं गेली, कुठं आहे, हें मला, तुम्हाला,...कोणालाच माहीत नाहीं. प्रथम तुम्ही कदाचित् गोंधळाल; मला याची कल्पना आहे. माझा मुलगा सुभाष हाही असाच गुप्त झाला आहे, आठ दिवसांपूर्वी !–तेव्हां गोंधळण्यांत अर्थ नाहीं; तो आपल्याला अधिकार नाहीं. आमचं आयुष्य संपलं; त्यांचीं आयुष्यं तीं तयार करताहेत !—

"हीं तरुण पोरं आतां आपल्या हातीं राहिलेलीं नाहींत, सुधीर!-तशीं तीं नाहींत, यांत आश्चर्यहि नाहीं; आपण त्यांना अटकाव करण्यांत अर्थहि नाहीं. व्यर्थ आपल्या मनाला त्रास, चिंता, हुरहुर, दुःख,..एवढंच—

"त्यांना आपण वेडीं म्हणण्यांतहि अर्थ नाहीं; काळच बदलला आहे, बदलत आहे; तो तसा बदलावा, हीं आपलीहि इच्छा आहे. तेव्हां त्या काल-प्रवाहाला धरूनच आपण वागलं पाहिजे!-जिथं तो महान् म्हातारहि आज वेडा झाला आहे, बंडखोर झाला आहे, तिथं,...हीं सळसळत्या रक्ताचीं पोरं... स्वातंत्र्यवेडी, ध्येयवेडी, बंडखोर झालीं...तर आश्चर्य कसलं?-उलट, तशीं ती वेडीं झालेली बाणेदार जिवंत पोरं आपलींच आहेत,... ती आपण आपल्या जिवंतपणींच पाहूं शकतों, या जाणीवेंतच आनंद मानण्याचे आजचे हे दिवस आहेत!...तुम्हालाहि नाहीं वाटत असं?..."

—नीलदेवींची ती विचारसरणी, सुधीरांनाहि पटली होती. आणि त्यामुळेंच, त्या घटनेंत त्यांना शेवटीं एक प्रकारचा सात्विक आनंद, गुप्त समाधानच लाभलं होतं!—

१५०

त्यानंतर जानेवारींतलीच गोष्ट—

दडपशाहीचं विसाट नोकरशाही सत्र सत्ता गाजवीत असूनहि,-देशभरच सर्वत्र नि मुंबईतहि ठिकठिकाणीं-स्वातंत्र्य-दिन साजरा झाला होता. सर्व पुढारी तुरुंगाच्या भिंतीआड; कांहीं बुरख्याआड;...त्या दिवशीं, अनेक ठिकाणीं गोंधळ उडाले; सभा उधळल्या गेल्या; कोठेकोठे गोळीबारहि झाले.

मुंबईत चौपाटीवर तशाच एक सभेतल्या गोळीबाराच्या गोंधळात, एक जरठसा रागडा म्हातारा खांद्याला गोळी लागून खालीं पडला; पण प्रयासानें घाई करून उठून, त्या पांगापांगींत तो बाजूस सटकला; नि शेवटीं, हळूंहळूं पावलं टाकत, तो "जीवन-गंगे"च्या दाराशीं पोहोंचला.



तिथें लिफ्टजवळ गणू भेटतांच, त्याच्याकडे त्यानें डॉ. सुधीरनांच समक्ष भेटण्याची इच्छा दर्शविली; आणि ते भेटतांच, तो एकदम अस्खलित इंग्रजीत म्हणाला-"तुम्हीं मला ओळखणार नाहीं!-तरी पण, मी तुमच्या ओळखींतला आहे, डॉ.!-याक्षणीं, मी जखमी आहे. माझ्या खांद्यांत गोळी घुसली आहे. उपचार कराल म्हणून आलोंय्...पण कराल तर एका अटी-वर!-बरा होईपर्यंत मी आपल्याच घरांत राहीन;-अगदीं कोणालाहि कळतां उपयोगी नाहीं!-हा माझ्या जीवाचा नि कार्याचा प्रश्न आहे!-हवं तर आश्वासन देतों...जाण्यापूर्वी मी आपल्याला ओळख देईन!-"

तें सारंच अनपेक्षित चमत्कारिक होतं;... त्या म्हाताऱ्याचा आवाजहि तडफदार होता. किंचित् चमकून सुधीर आपल्याशींच म्हणाले होते-"हा कोण बुवा आपल्या ओळखीचा म्हातारा?--"

पण इतक्या विश्वासानें आपल्यादारीं आलेल्याला, त्याच्या तशा स्थितींत दार बंद करणं, त्यांना शक्य वाटलं नाहीं. लगबगीनें त्याला घरांत घेऊन, त्यांनीं गणूच्या साहाय्यानें, आपल्या छोट्या लॅबमध्येंच, त्याचं छोटं ऑपरेशन गपचूप केलं; आपल्याच खोलींत, आपल्याच कॉटवर त्याला झोपवलं;...ग्लानीनें तो जेव्हां झोपला, तेव्हां त्यांना पडलेलं तें कोडं सारखं सारखं भंडावत होत त्यांना.

१५१

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, तो हुशार होऊन उठला; सा[illegible] सातच्या सुमाराला सुधीर फिरून येतांच, पडल्यापडल्याच तो सुधीरांना [illegible]ला-"डॉक्टर! तुमचा रेडिओ जरा लावतां का, चाळीस मीटरवर!..."

"ही कसली याची चमत्कारिक मागणी?" या दृष्टीनें एकदां त्याच्या-कडे पाहात, सुधीरांनीं दारांतल्या आपल्या रेडिओग्रामची स्विच दाबली नि चाळीस मीटर स्थिर करीत म्हटलं-"कुठलं स्टेशन!-"

Scanned with CamScanner

"हीं तरुण पोरं आतां आपल्या हातीं राहिलेलीं नाहींत, सुधीर !- तशीं तीं नाहींत, यांत आश्चर्यहि नाहीं; आपण त्यांना अटकाव करण्यांत अर्थहि नाहीं. व्यर्थ आपल्या मनाला त्रास, चिंता, हुरहुर, दुःख,..एवढंच—

"त्यांना आपण वेडीं म्हणण्यांतहि अर्थ नाहीं; काळच बदलला आहे, बदलत आहे; तो तसा बदलावा, हीं आपलीहि इच्छा आहे. तेव्हां त्या काल-प्रवाहाला धरूनच आपण वागलं पाहिजे !–जिथं तो महान् म्हाताराहि आज वेडा झाला आहे, बंडखोर झाला आहे, तिथं,...हीं सळसळत्या रक्ताचीं पोरं... स्वातंत्र्यवेडी, ध्येयवेडी, बंडखोर झालीं...तर आश्चर्य कसलं ?–उलट, तशीं ती वेडीं झालेली बाणेदार जिवंत पोरं आपलींच आहेत,... ती आपण आपल्या जिवंतपणींच पाहूं शकतों, या जाणीवेंतच आनंद मानण्याचे आजचे हे दिवस आहेत !...तुम्हालाहि नाहीं वाटत असं ?..."

—नीलादेवींची ती विचारसरणी, सुधीरांनाहि पटली होती. आणि त्यामुळेंच, त्या घटनेंत त्यांना शेवटीं एक प्रकारचा सात्विक आनंद, गुप्त समाधानच लाभलं होतं !—

१५०

त्यानंतर जानेवारींतलीच गोष्ट—

दडपशाहीचं पिसाट नोकरशाही सत्र सत्ता गाजवीत असूनहि,–देशभरच सर्वत्र नि मुंबईंतहि ठिकठिकाणीं–स्वातंत्र्य-दिन साजरा झाला होता. सर्व पुढारी तुरुंगाच्या भिंतीआड; कांहीं बुरख्याआड;...त्या दिवशीं, अनेक ठिकाणीं गोंधळ उडाले; सभा उधळल्या गेल्या; कोठेकोठे गोळीबारहि झाले.

मुंबईंत चौपाटीवर तशाच एक सभेतल्या गोळीबाराच्या गोंधळांत, एक जख्खड रागडा म्हातारा खांद्याला गोळी लागून खालीं पडला; पण प्रयासानें घाई करून उठून, त्या पांगापांगींत तो बाजूस सटकला; नि शेवटीं, हळूंहळूं पावलं टाकत, तो "जीवन–गंगे"च्या दाराशीं पोहोंचला.



तिथें लिफ्टजवळ गणू भेटतांच, त्याच्याकडे त्यानें डॉ. सुधीरनांच समक्ष भेटण्याची इच्छा दर्शविली; आणि ते भेटतांच, तो एकदम अस्खलित इंग्रजींत म्हणाला–"तुम्हीं मला ओळखणार नाहीं !–तरी पण, मी तुमच्या ओळखींतला आहें, डॉ. !–याक्षणीं, मी जखमी आहे. माझ्या खांद्यांत गोळी घुसली आहे. उपचार कराल म्हणून आलोंय्...पण कराल तर एका अटी-वर !–बरा होईपर्यंत मी आपल्याच घरांत राहीन;–अगदीं कोणालाहि कळतां उपयोगी नाहीं !–हा माझ्या जीवाचा नि कार्याचा प्रश्न आहे !–हवं तर आश्वासन देतों...जाण्यापूर्वी मी आपल्याला ओळख देईन !–"

तें सारंच अनपेक्षित चमत्कारिक होतं;... त्या म्हाताऱ्याचा आवाजहि तडफदार होता. किंचित् चमकून सुधीर आपल्याशींच म्हणाले होते–"हा कोण बुवा आपल्या ओळखीचा म्हातारा ?––"

पण इतक्या विश्वासानें आपल्यादारीं आलेल्याला, त्याच्या तशा स्थितींत दार बंद करणं, त्यांना शक्य वाटलं नाहीं. लगबगीनें त्याला घरांत घेऊन, त्यांनीं गणूच्या साहाय्यानें, आपल्या छोट्या लॅबमध्येंच, त्याचं छोटं ऑपरेशन गपचूप केलं; आपल्याच खोलींत, आपल्याच कॉटवर त्याला झोपवलं;...ग्लानीनें तो जेव्हां झोपला, तेव्हां त्यांना पडलेलं तें कोडं सारखं सारखं भंडावत होतं त्यांना.

१५१

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, तो हुशार होऊन उठला; सा[illegible] सातच्या सुमाराला सुधीर फिरून येतांच, पडल्यापडल्याच तो सुधीरांना म्हणाला–"डॉक्टर ! तुमचा रेडिओ जरा लावतां का, चाळीस मीटरवर !..."

"ही कसली याची चमत्कारिक मागणी ?" या दृष्टीनें एकदां त्याच्याकडे पाहात, सुधीरांनीं दारांतल्या आपल्या रेडिओमधली स्विच दाबली नि चाळीस मीटर स्थिर करीत म्हटलं–"कुठलं स्टेशन !–"

तेवढ्यांत रेडिआच्या साध्या हुंकारांतून आवाज उमटला-" हलो हलो हलोऽ-धिस् इज् द् सीक्रेट रेडिओ सेंटर ऑफ फ्री इंडिआ...कॉलिंग ऑल् पॅट्रिअट्स,-आल् ओव्हर इंडिआ,...मदर इंडिआ..."

केवढ्यानें दचकले सुधीर!...तो रेडिओंतून येणारा आवाज त्यांना अगदीं परिचित व्यक्तीचा वाटत होता;...तोंच 'वंदे मातरम्' सुरूं झालं;...जीवाचे कान करून, ते पुढें ऐकूं लागले....देशभरच्या स्वातंत्र्य-दिन प्रदर्शनाच्या बातम्यांचा वृत्तांत सुरु झाला होता. मुंबईत, एका म्हाताऱ्या भूमिगत कार्यकर्त्याला गोळी लागल्याची बातमीहि त्यांत होता; तो आतां अगदीं सुरक्षित ठिकाणीं आहे, अशी पुढें पुस्तीहि जोडण्यांत आली.

डॉ. पुन्हा दचकले. तीं गुप्त आकाशवाणी, त्याच चुटपुट लावणाऱ्या आवाजांत, आतां तर त्यांच्या घरांत, त्याक्षणीं त्यांच्या समोर पडलेल्या त्या म्हाताऱ्या जखमी कार्यकर्त्यापर्यंत येऊन पोहोंचली होती-आणि...मोठ्यांत मोठं आश्चर्य म्हणजे...तो 'फ्री इंडिआ रेडिओ'चा जनानी आवाज, अगदीं हुबेहूब त्यांच्या पत्नीच्या-प्रेमाच्या-आवाजासारखा होता!—'केवळ भास!' अशी मनाची समजूत करून, त्यांनी समोरच कॉटवर पडलेल्या त्या अपरिचित पाहुण्याकडे पाहिलं; पण तो तर त्यांच्याचकडे स्मित करीत पाहात होता...

अतिशय तीव्र कुतूहलानें त्याच्याजवळ जाऊन, त्याच्याकडे टवकारून पाहात, सुधीर म्हणाले—" काल ऑपरेशनच्या वेळींच माझ्या ध्यानीं आलंय्;...मेकअप् चांगलाच साधलाय् तुम्हाला!-तरी पण तुम्ही नक्की म्हातारे नव्हत!—खरे कोण तुम्ही?—"

तो संथपणें हसून म्हणाला—" आतां आपल्याकडून लपवून नाहीं ठेवत मीः...मी बंगाल्यांतला...मी सुभाष—"

" सुभाष??" सुधीर चमकून म्हणाले...



" हो!—" तो हसला..." नीलीदेवी चौधरींचा मुलगा मी!—"

" आणि...आणि...या रेडिओंत बोलताहेत त्या..."

" ती? ती-कमलिनी!...तुमची मुलगी!-" सुभाष प्रसन्न हसला.

" काय? खरंऽच??-" सुधीर चांचरत उद्गारले; लीनीला त्यांनी मोठेपणीं कधींच पाहिली नव्हती; ऐकलंहि नव्हतं!—तिच्या त्या आवाजानें, क्षणभरापूर्वी झालेल्या त्या भासाची, त्यांना मनांत गंमतच वाटली. त्यांचं अंग क्षणभर शहारल्यासारखं झालं!—

१५२

त्यानंतर, त्याच दिवशीं, त्यांनीं रुबाबदार सुभाषला त्याच्या प्रत्यक्ष स्वरूपांत पहिलं होतं; चार पांच दिवस तो त्यांच्याकडेच होता. त्याच्या बरोबर ते बोलले होते;...दोघांचा विविध प्रकारचा वादविवादहि झाला होता.

आपण स्वतः, लीनी, यांचासारखे छोटे छोटे भूमिगत कार्यकर्ते, ठिकठिकाणीं सर्व साधारण संघटना कशी करत आहों; त्यामुळें, देशभर, सामान्य माणसाच्या मनांत, नवा आत्मविश्वास, नवी अशा कशी निर्माण होऊं शकेल, वगैरे सांगून, शेवटीं, सुभाष म्हणाला होता—" मला तरी वाटतं, आजच्या परिस्थितींत आमचा हा मिश्र मार्गच योग्य!—आम्हाला हिंसा नकोय्; पण ही आमची अहिंसाहि नाही;...यांत शंभर टक्के सत्यहि नाही!-पण तें अपेक्षितच नाही! आतां कोणी सांगावं?—आम्ही कदाचित् या मार्गानें अयशस्वीहि होऊं!—पण...पण...एकदां देशभर झालेला हा उठाव,...ही जिवंतपणाची आग,...मध्यें क्षणभर धुमसत जरी राहिली, तरी... पुन्हा जरा अनुकूल वेळ येतांच,...क्षणाच्याहि विलंबाविना, पुन्हां देशभर ती पेट घेऊन उठेल; हजार पटींनी अधिक मोठा भडका उडेल;...नि त्यांतून होणाऱ्या क्रांतींतच,...माय देश खराखुरा स्वतंत्र होईल!—"

त्यावेळीं चमकलेले सुभाषचे रुबाबदार डोळे, नि त्याच्या आकर्षक चेहऱ्यावर पडलेलं तें स्वाभिमानी आशेचं प्रतिबिंब!—सुधीरांना अत्यंत आकर्षकच वाटलं होतं तें!...

लीनीबद्दल बोलताना सुभाष म्हणाला होता—"सध्यां ती मुंबईत आली आहे. तुम्हाला भेटायचीहि तिची फार फार इच्छा आहे. पण या चळवळीचा एकदां सोक्षमोक्ष होईपर्यंत,—निदान राजरोसपणें समक्ष भेटायची वेळ येईपर्यंत तरी-ती तुम्हाला मुद्दाम होऊन भेटणार नाही!-"

आणि झालंहि होतं तसंच; लीनी सुधीरांना आजपर्यंतहि भेटली नव्हती.

१५३

मधल्या दोनएक वर्षांच्या काळांत, लीनीनें आपल्या नानांना कांहीं पत्रं पाठवलीं होतीं. आपल्या मनाच्या अनेक गगनभेदी आकांक्षा-भराऱ्या, तिनें त्यांत आपल्या पित्यासमोर चित्रित केल्या होत्या.

तो बंगाली दुष्काळ...कीं, ज्यांत माणसांतली माणुसकी नाहींशी झाली होती; कीं, ज्यांत जिवंत जीवांच्या हाडामांसाला, स्वतःच्या डोळ्यांदेखत सुकवून-कुजवून, कित्येक समाजद्रोह्यांनीं आपल्या मनाच्या काळेपणाचा बाजार करून, लिलांव करून, हजारांच्या हजारों नोटा पिकवल्या होत्या; कीं, ज्याच्या हेतुपुरस्सर निर्मितीनेंच केवळ, स्वातंत्र्यहितेच्छु हिंदवासीयांना नरम करायचं नि आपलं साम्राज्यशाहीचं डळमळतं-ढळलेलं, जुनाट पोखरलेलं बूड टिकवून धरायचं, असलं मळमळित नि खोटं समाधानच, चर्चिलप्रभृति प्रभूंना क्षणकाळ लाभलं होतं; कीं ज्यांत-हिंदुसभा-कॉंग्रेस-मुस्लीम लीग असली कुठलीच पक्षपाती तरफदारी न करतां, साऱ्याच हिंदवी दरिद्र्यांचे हाडांचे सांपळे, मृत्युदेवानें,...वखवखलेल्या गिधाडांच्या नि भुकेलेल्या कुत्र्यामांजरांच्या मेजवानीसाठीं, शहरांतल्या भररस्त्यां-रस्त्यांत ओढून आणले होते;... कीं, ज्यांत श्रीमंत अधिक श्रीमंत झाले होते नि दरिद्री केवळ हाडं-मातीच झाले होते—

...त्या भयानक दुष्काळांत, गुप्तपणेंहि, लीनीनें शक्य ती सारी सामाजिक कामगिरी केली होती; त्याचाच हृदयस्पर्शी वृत्तांत तिनें आपल्या नानांना सादर केला होता.



पुढल्या एका पत्रांत, लीनीनें सुभाषबद्दलचा आपला दाट स्नेहादर स्पष्ट शब्दांत व्यक्त केला होता; बंगालमधील एका संपूर्ण जिल्ह्यांत, त्यानें प्रतिसरकाराचं यशस्वी प्रभावी जाळं उभं करून, तोंवर ढेकर देत पडलेल्या झोंपाळू नोकरशाहीला, कसं सळो-कीं-पळो करून सोडलं होतं; त्यावेळीं तेथला प्रत्येक लहान मोठा समाजघटक कसा स्वावलंबी, स्वाभिमानी नि समर्थ झाला होता; याचं विवेचक वर्णन केलं होतं!-पण तरी शेवटीं, एका दे. भ. म्हणवणाऱ्या प्रतिष्ठित 'सूर्याजी पिसाळा'च्या ऐन विश्वासघातानें फशीं पडून, बेसावध स्थितींत सुभाष गिरफदार कसा झाला होता; शेवटचं एक वर्ष, त्याला तुरुंगवास नि शब्दातीत छळ कसा सहन करावा लागला होता, इत्यादि हकीकत, त्याच ओघांत तिनें सुधीरांना कळवली होती. आणि शेवटीं लिहिलं होतं-"आतां सुभाष तुरुंगांतून बाहेर पडला आहे; पण बराच अशक्त झाला आहे. त्याबद्दल अम्मांना फार फार काळजी वाटते—"

तसल्या अप्रत्यक्ष उल्लेखामुळें,, सुधीरांच्या चाणाक्ष मनांत, एक संशयहि हळूच डोकावून गेला होता.

१५४

आणि आठवड्यापूर्वीच्या लीनीच्या त्या पत्रांत तर तिनें त्यांना स्पष्टच सारं कळवून टाकलं होतं;—तिनें लिहिलं होतं—

"नाना! आईच्या अंतानंतर-माझं पद्धतशीर शिक्षण, माझं एकूण कल्याण व्हावं,...या हेतूनेंच-तुम्ही मला दूर दूर नीलादेवींकडे ठेवलंत; त्यांच्या घरांतच जणूं पुन्हा एकदां मी रुजलें, वाढलें. वास्तविक, जन्मानें मी महाराष्ट्रीय; पण वाढी—वृत्तीनें मी बंगाली बनलें. अम्मांनी मला जें जें कांही चांगलं,-तें तें सारं दिलं—आतां मला पूर्ण आत्मविश्वास वाटतो —नीलादेवींच्या शिक्षणाला-विश्वासाला नि पित्याच्या नांवा-दर्जाला, मी आजपर्यंत किंचित् देखील खालीं पडूं दिलेलं नाही; तसंच यापुढेंही देणार नाही!—

"तथापि, माझी तुम्हां दोघांकडे, आज एक उघड उघड, पण नम्र नि आग्रहाची मागणी आहे-नीलादेवींनी मला आजपर्यंत दिलेल्या साऱ्या चांगल्यांत, आणखी एका चांगल्याची भर घातली पाहिजे—तें म्हणजे त्यांचं एकुलतं एक पुत्ररत्न-सुभाष-यांनी मला दिलं पाहिजे! आणि नाना, तुम्हीहि मला कांही दिलं पाहिजे; तें म्हणजे...आपली संमति, आपला मनापासूनचा आशीर्वाद!—डोळे पूर्ण उघडे ठेऊनच, महाराष्ट्र असा उत्स्फूर्त मनानें, बंगालांत जात आहे!-त्यांतून कांही तरी चांगलंच होईल. या सुयोगाला, शुभ गोष्टीला आपली दोघांची संमति हवी आहे. मिळेल ना ती?"

१५५

त्या लाघवी बुद्धिमान् पोरीच्या त्या 'मागणी'च्या पत्रापासूनच, सुधीरांचा मनस्वी गोंधळ उडाला होता. स्वतःच्याच घरीं चारपांच दिवस असतांना, त्यांनी सुभाषला अगदीं जवळून पाहिलं होतं. त्याची तडफ, कर्तृत्व, त्याचे विचार, आचार, नि अकांक्षा, त्याचं चारित्र्यशील, यांची सुधीरांना चांगलीच कल्पना आली होती. पण त्यावेळीं, सहजासहजीं त्याना आकर्षित करणारा तो एक कर्तबगार जवान! तोच त्यांना आवडलेला सुभाष...आता त्यांचा जांवई होऊं पाहात होता;-त्यात नवं तें काय होतं?

तरी पण, त्या पत्रानंतर, सुधीर मनांत भांबावले, हादरले होते.

"लीनी इतक्या दूर कायमची कशी राहील?—" "तारुण्यांत उतावीळपणें वाटतं; पण दोन भिन्न प्रांतांच्या व्यवहार-संस्कृति-प्रकृति भिन्न, स्थायी भावभावना भिन्न!—तेव्हां..." "हीं तडफदार, स्वतंत्र बाण्याची महत्वाकांक्षी पोरं, या लग्नानें एकमेकांना सुखी करतील कां?" "अजून अजाण आहे लीनी; तिनें याबाबतींत आणखी कांही काळ विचार केला तर नाही कां चालणार?"—"आणखी दुसरं असं पहा..."

असं आपल्या मनाला ते समजावूं पाहात; निर्णय पुढें ढकलीत.



पण पुन्हा ते स्वतःची कानउघडणी करीत—"शुद्ध लबाडी आहे ही तुझी, सुधीर!-हे सगळे त्या दोघांचे प्रश्न!—तो तुझा अधिकारच नव्हे; त्यांच्या चुका ते निस्तरतील, हव्यात तर!...लग्न हा कांहीं असा बेरीज-वजाबाकीचा सरळ-व्याजाचा प्रश्न नव्हे;-तुझा हा केवळ दुबळा युक्तिवाद आहे;-साऱ्या सबबी लंगड्या आहेत, तुझ्या!—या विचारांनीं तूं तुलाच फसवण्याचा प्रयत्न करीत असलास, तरी तीं दोघं बधणार नाहींत"

—आणि मग त्यांना वाटे—"आपण लीनीला वर्षानुवर्ष दूर ठेवलं, तरी अखेर आपल्या नि आपल्या प्रेमाच्याच रक्तामांसाची पोर, ती!—एवढ्या बुद्धया वियोगानंतरहि,... ती आपली आहे, हें आपण विसरलेलों नाहीं!-आतां सुभाष तर आपल्याकडून तिला हक्कानें कायमचीच जणूं पळवून नेत आहे! म्हणूनच, आपण असे विचलि झालों आहों. ती दूर होती, तरी...आजपर्यंत,'ती आपलीच', ही आपली प्रबळ भावना!...आतां मात्र ती कायमची अंतरणार!—हें सारं कांही, नैसर्गिक, योग्य, सुखावहच होत आहे; तरी—लीनीला आपल्याकडे खेंचून, तिला आपल्या घरीं कायमचीच घेऊन जाणारा हा सुभाष!-त्याचाच आपल्याला सारखा सारखा प्रखर मत्सर वाटत आहे. हेंच आपल्या या गोंधळामागचं खरं गुह्य!—"

जीवनाची ती नवी कटु जाणीव! सुधीरनां त्यानेंच आज दचकल्या सारखं झालं!—प्रेमाच्या डायरीतल्या त्या शद्बांची...त्यांना ताडकन् आठवण झाली; ते अधिकच चपापले!—

—समोरच तिचा फोटो होता. तिच्याकडे पाहून, स्वतःशींच खिन्न हसत सुधीर म्हणाले—"हो, प्रेमा!—तुझंच खरं होतं!-हें आज पटतंय् मला!—या अज्ञात, सुप्त, प्रखर मत्सर-भावनेनेंच—आज कित्येक दिवस नि विशेषतः आज सकाळीं-माझ्या मनांत हाः हाः कार माजवला. सुभाष मला आवडतो; तीं दोघंहि मला आवडतात; तीं दोघं एकमेकांनाहि आवडतात!—मग?...नाही!—मला दिलीच पाहिजे त्या दोघांना, आनंदानें चटकन् समंति!...त्यांचं मनापासूनचं सुख, तेंच माझं!—बस्स्...यापुढं मी फिरून अगदीं एकटा!.. अगदीं जन्मवेळेइतका एकटा..."

१५६

त्या जाणीवेच्या निश्चयानें निश्वास टाकीत, सुधीर स्वतःशींच पुटपुटले —"प्रेमा आली...प्रेमा गेली; लीनीला दूर सारली—आतां ती दूर दूरहि निघून चालली ! दूर दूर.. सारीं दूर !—"

—पण तेवळ्यांत, अगदीं त्यांच्या प्रेमाचेच शद्ब त्यांच्या कानावर आदळले—"काय ? आतां तरी येऊं ना मी आंत ?—केव्हांची उभी आहे मी दाराशीं—"

त्यामुळेंच सुधीर दचकून भानावर आले.

...त्यांनी समोर सहज पाहिलं; हॉलचा दरवाजा उघडला गेला होता;...नि दारांत-भयंकर आश्चर्य !-पांढरं शुभ्र पातळ नेसलेली प्रेमा उभी !—अगदीं प्रथमच, या त्यांच्या हॉलच्या उंबरठ्याशीं उभी राहून, तिनें जसं त्यांच्याकडे त्यांच्या तारुण्यांत पाहिलं होतं,...त्याच अगदीं त्याच बोलक्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहात, ती हास्यमुख उभी होती !—

त्यांनी पुन्हा तिकडे दचकत दचकतच पाहिलं; तरी ती होती तिथेंच उभी होती. "छे ! भास आहे हा !" अशा विचारानें, ते जागचे उठले; त्यांनी जोरजोरानें आपल्या डोंळ्यांची कितीदां तरी उघडझांप केली. पुन्हा तिकडे निरखून पाहिलं—

—पण तरी ती तिथंच उभी ! तिथूनच, त्यांच्याकडे पाहून ती अगदीं गोड हसत होती !—

...त्या अद्भूत अनुभवानें चकित होऊन, त्यांचं काळीज धडधडलं; वर खालीं होणाऱ्या छातीनें, ते समोर टवकारून टवकारून पाहात राहिले.

शेवटीं,...चांचरल्या आवाजांत ते मोठ्यानें उद्गारले..."काय ? — कोण—म्हणजे ?—कोण प्रेमा ? ?—प्रेमा ? ? ?—छेः ! अशक्य..."

**५ जीवन-गंगा ५**

**– स्वल्पविराम –**

# जीवन-गंगा

## [ काहूर ]

## ६

# गंगाकांठची हिरवळ !—

## जीवन–गंगा–६ –गंगाकांठची हिरवळ !–

१५७

" असं काय करतां ?...कसला एवढा विचार चाललाहे इतका वेळ ?- ...मी लीनी नव्हे का तुमची, नाना ?–वाट तरी किती वेळ पाहायची आम्ही, तुमच्या बाहेर येण्याची ?—" दारांतून ती म्हणाली.

तें एकतां एकतांच, परिस्थितीची जाणीव होऊन, सुधीर फिरून दचकले; तोंपर्यंत, दारांतून आंत येऊन, लीनी त्यांच्याजवळ उभी राहिली होती; त्यांचा हात हातीं घेऊन, ती अधीरपणें भरभर पुढेंहि बोलत होती.

...आतां कुठं त्या दिवसभरच्या भयंकर तंद्रीतून सुधीर खरे भानावर आले. लीनीकडे खालपासून वरपर्यंत अगदीं निरखून निरखून पाहात, किंचित् उसंत घेऊन, शेवटीं ते म्हणाले—" लीनी ?–हो, तूं लीनीच !... किती पण झपाट्यानें तूं वाढलीस ग सहा वर्षांत ?––थेट तुझ्या आईसारखीच दिसतेस तूं आतां !–पण अशी मध्येंच कुठून आलीस ?–केव्हां ?-अशी एका-एकी कां ?–आधीं कळवायचं तरी ?"—

" वाऽ वाऽ !–हें आणखी वर कां ?–पाठवलेली तार सकाळीं पोंचली नाहीं वाटतं ?–" तक्रारी स्वरांत लीनी लाडीकपणें म्हणाली–" गणोबानें दोन अडीच तास व्हिजिटर्स रूममध्यें बसवलंन्: स्टेशनवर आलां नाहीतच; इथंहि नाही दिसला. आधीं गणोबा म्हणाला–' नाना बाहेर गेले आहेत कामाला–; मग म्हणाला...' नुकतेच आले आहेत...येतील इतक्यांतच—; शेवटीं, मी त्याच्याशीं भांडलेंच. तेव्हां कुठं मला एकटीलाच पुढं आणून, तो लिफ्ट-जवळ मला हळूंच म्हणाला—' ताई, आतां तुम्हीच चला . नि आंत शिरून नानांना जागे करा !–सकाळपासून एकटच बसलं आहेत हॉलमध्यें !–' अस्सा



प्रथम राग आला त्याचा; खोटं खोटं बोलून इतका वेळ बाहेरच्या बाहेर त्यानें डांबून ठेवलंन् आम्हाला लबाडानें–"

आपल्या छांदिष्टपणाबरोबरच, गणोबाच्या आज्ञाधारक योजकतेचीहि सुधीरना मनांतल्या मनांत गंमतच वाटली; पण तेवढ्यांत एकदम लक्षांत येऊन, लीनीच्या खांद्यावर हात ठेऊन, दारापर्यंत हळूं हळूं तिच्याबरोबर चालत येत, त्यांनी तिला विचारलं-" काय म्हणालीस ?–आम्ही ?–म्हणजे कोण ग लीनी ?—' आम्ही उभयतां ' ? "

त्या थट्टेनें लीनी खुदकन् तोंडभर हसली...नि म्हणाली–" नाही,... दोघंच नाहीं; आम्माहि आल्या आहेत..."

" काय ?...नीलादेवी आल्या आहेत ?–" अगदीं समाधानी स्वरांत सुधीर म्हणाले; तीं सारीं सुखरूप आहेत, या प्रत्यक्ष जाणीवेनें, सकाळीं वाचलेल्या बातमींनें बेचैन झालेल्या सुधीरांच्या जीवाला हायसंच वाटलं.

तेवढ्यांत–पुढल्या त्रिकोणी हॉलचा दरवाजा उघडून, दोन बॅगा दोन हातांत घेतलेला गणोबा आंत शिरला;...त्यामागून, नेहरू शर्ट-जॅकेट घातलेला सुभाष आला; नि त्याच्या पाठोपाठ, केसांना तुरळक रुपेरी छटा आलेल्या नीलादेवी,' नमस्ते, सुधीर !–' म्हणत, आंत शिरली.

आणि मग, इतका वेळ इतकीं वर्षं, अगदीं निःशब्द असलेल्या त्या हॉलच्या भिंती, पुढलीं पांच मिनीटं दणाणून गेल्या; जणूं, त्या निर्जीव भिंतींनाहि, तो अपूर्व देखावा:पाहून, त्या क्षणीं, खूपखूप बोलून घ्यावंसं वाटलं !—

१५८

चहा वगैरे सर्व झाल्यावर, किंचित् स्तब्धतेची संधि साधून, नीलादेवी सुधीरना गंभीरपणें म्हणाल्या–" सुधीर...आमच्या बंगाल्यांत,...जातीयतेचीं भयंकर हलाहल विषं पेरून, अगदीं या क्षणीं, कांहीं लोक,...त्रयस्तपणाचं

नाटक करत गंमत पाहाताहेत !...एकाच हिंदमातेच्या लेकरांच्या रक्ताचे अशे पूर सांडतांहेत;-दुर्दैव राष्ट्राचं !-हा वणवा आतां चौफर पसरणार ! त्या कल्पनेनेंच हृदय पिळवटतं !...हीं दोन पोरं तरुण तडफदार आहेत;..पण उतावीळहि आहेत !-आतांपर्यंतत्यांना मी संभाळलीं,...लहानाचीं मोठीं केलीं; पण याक्षणीं मी हतबल झालें...आपल्या ध्येयवादी वृत्तीनें,...पण जरा अर्धवट विचारानें, हीं दोघं... भोवतीं सारं शांत करायला...तिथं पुन्हां परस्पर प्रेम निर्माण करायला, त्या अक्राळविक्राळ वणव्यांतच परवां उडी घ्यायच्या बेतांत होतीं ! सुधीर !-तुम्हीच आतां त्यांना सांगा !—मला तर वाटतं...तें काम या कच्च्याबच्च्यांचं नव्हे !...तें एखाद्या महात्म्याचंच !"

सुधीर स्मित करून क्षणभरानें गंभीरपणें म्हणाले—"खरं आहे !-परस्पर द्वेष निर्माण करणं...वाढवणं...कोणत्याहि क्षुद्राला,... केव्हांहि जमतं; पण प्रेम निर्माण करणं ? तें एखाद्या महात्म्यालाहि महाप्रयासानें जमणार नाही !...द्वेषाच्या, सूडाच्या, रक्ताच्या खाईनें एकदां माखलेल्या त्या वंग-भूमींत तर...तें प्रेम निर्माण करणं...म्हणजे खपुष्पाला हात घालणंच...लेच्यापेच्या अननुभवी माणसानं तसा प्रयत्न करणं...म्हणजे आत्मघातच !—"

"पण मग तेंच करायला हीं दोघं उद्युक्त झालीं होतीं !-" नीलादेवी निःश्वास टाकून म्हणाल्या—"तेव्हां मग त्यांना माझी शपथ घातली मी; नि आतां त्यांना असं तुमच्यासमोर धरून आणलंय् हें !...तुम्हाला काय योग्य, यांच्या हिताचं वाटेल.. तें सांगा त्यांना आतां !—"

सुभाष लीनी दोघंहि, सुधीरांकडे नि एकमेकांकडे एकदां नजर फिरवून खालीं पाहूं लागलीं.

त्यांच्याकडे पहात सुधीरांनीं मुग्धपणेंच स्मित केलं; नि क्षणभरानें ते म्हणाले, "मीं निराळं तें काय सांगणार ?—आपण सारींच शिकलेलीं, शहाणीं, विचारीं आहोंत !—ध्येयाच्या तात्कालिक तडफेमुळें परिस्थिति अनुकूल, सुखद होण्याऐवजीं,...कदाचित सर्वनाशहि होतो. अशावेळीं धिम्मेपणा धारण करणं,...ध्येयाच्या सरळ शीघ्र वाटणाऱ्या मार्गाला जरा



वळसा देणं...तडजोड करणं उतावीळपणापेक्षां थोडी वाट पहाणं—हें चांगलं नाहीं कां ?"

" माझंहि म्हणणं तेंच..." नीलादेवी संथपणें म्हणाल्या..."चार दोन व्यक्तींचं काम नव्हे हें ! समाजाचं... सामुदायिक मनच बदललं पाहिजे ! तें कसं होणार चुटकीसरसं ?"

सुधीर सस्मित चेहऱ्यानें सुभाष—लीनीकडे पाहून म्हणाले,—"म्हणूनच आम्हीं वृद्धांनीं जसं...शक्य तितकं पुढं जायला, उतावीळ व्हायला शिकलं पाहिजे,...तसंच आजच्या तरुणांनीहि थोडी वाट पहायला शिकलं पाहिजे !... खाजगी...सामाजिक, कुठल्याहि बाबतींत हेंच ! हीच तडजोड,... हीच समजूत हवी तिथं !..."

१५९

क्षणभर कोणीच कांहीं बोललं नाहीं; पण मग नीलादेवीच पुन्हां म्हणाल्या—"माझ्या सुभाषला मी तेंच सांगितलं ! तुम्हीच पहा सुधीर, कॉलेजांतली लेक्चररशीप सोडून, तो आतां गेल्या वर्षापासून किसान-मजुरांचा पुढारी झालाय् ; वृत्तव्यवसायांत शिरलाय्; नि मला तरी फार फार समाधानच वाटतं, त्याच्या या नव्या उत्साही, कार्यव्यग्र, व्यापक जीवनाचं ! आपल्या मनांत उफाळणारीं ध्येयं, आपल्या डोळ्यांपुढं सारखीं सारखीं नाचत राहाणारीं भव्य सुखस्वप्नं, त्यानं आपल्या हातांतल्या लेखणीला जोडावींत; समाजावर तिचाच प्रखर मारा करावा; आपल्याभोंवतीं उदात्त विचार-भावनांचींच प्रचंड दंगल उडवून द्यावी ! कधींहि आकलन न होणारं, आपल्या भोंवतालच्या समाजाच तसलं सामुदायिक मन जाणून,...त्यालाच जोरजोरानें धक्के द्यावेत; ते झोंपीं गेलेलं असलं...तर त्याला खडबडून जागं करावं,...चैतन्य आणावं—"

"खरं आहे, नीलादेवी, तुमचं !-तसं तें समाज-मन एकदां खऱ्या क्रांतीला पुरेपूर अभिमुख झालं...कीं, त्यानंतरच्या प्रत्यक्ष क्रान्तीत, यांनीं आपलं

शीर, आपला जीव, आपलं सर्वस्व घेऊन खुशाल उडी घ्यावी! मग, त्यावेळीं मात्र, तरवार हातांत घेऊन दुसऱ्यांच्या रक्ताचा क्षुद्र स्वार्थासाठीं सडा शिंपडणारे...आजच्या जगांतल्या राक्षसांचे त्याकाळचे भाईबंद, खात्रीनें लटपटतील! त्यांच्या हातांतल्या तरवारीच गळून पडतील. त्यावेळीं प्रत्येक जण घाबरून पळण्याऐवजीं छाती पुढं काढेल; आत्मविश्वासानें, धैर्यानें चालेल. त्यामुळेंच, त्याच्या छातींत सुरा-तरवार खुपसण्याची, त्या क्षुद्र, भ्याड, स्वार्थी राक्षसाचीहि छातीच होणार नाहीं!..."

"आणि सुधीर, अशावेळीं जर या नव्या पिढीनें, आपल्या लेखण्या सरसावून त्यांच्यावर चाल केली, वार केले,.. त्या लेखण्याच अत्यंत चिकाटीनें, धैर्यानें,..त्यांच्या हृदयांत घुसवून, तीं भावनांनी विव्हळ केलीं,..तर मला वाटतं, ते क्षुद्र राक्षसहि आपली दुसऱ्याच्या रक्ताची तृष्णा टाकून, पुन्हा हळुवार माणूस होतील! सारं जगच माणुसकीनें आकंठ भरून राहिल्याचं तें सुखद, मनोहर दृश्यच, शेवटीं जगांत दिसेल!...आणि तें पाहायला, हीं आजचीं तरुण मंडळीच शेवटीं राहतील; आम्ही मातींतहि मिळून जाऊं तोंपर्यंत!"

—नीलादेवी तसं संथ हळुवार बोलून, सर्वांच्याच—विशेषतः सुधीरांच्या—हृदयाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करीत होत्या.

१६०

तेवढ्यांत-इतका वेळचं मौन टाकून, सुभाष एकदम तिरमिरीनें म्हणाला—"त्यावेळीं तें होईल नि तसं होईल!-पण मग आज?... आज काय करायचं आम्ही, अम्मा?-भोंवतीं सारीं घरं पेटताहेत!-कोंवळ्या पोरांचे तुकडे उडताहेत!"—

"तें अगदीं सोपं आहे, सुभाष!-स्वतःची कातडी बचावायची; उघड्या डोळ्यांनी तें हत्याकांड आम्ही पाहायचं; कदाचित् त्यांत आम्ही हत व्हायचं, भ्रष्ट व्हायचं!...प्रतिकाराचा हातहि न उचलतां...किंवा आग शमवण्याचा प्रयत्नहि न करतां, पळून जायचं;...दुसऱ्यांच्या



घरांत...दुसऱ्यांच्या पाठीशीं लपून बसायचं,... परागंदा व्हायचं; दुबळ्या अनाथाचं मरण मरायचं!—आपल्याच म्हणावयाच्या लोकांकडून,...त्यांनी आपल्याला दिलेले दोष, शिव्या नि उरल्या सुरल्या तेजाचा भंग निमूट सहन करायचा!-" लीनी उतावीळपणें पटपट बोलत होती;...तिच्या चमकत्या तरुण डोळ्यांतील त्याक्षणींचा तो तीक्ष्ण द्वेष, उद्वेग, संताप. उपहास—सुधीरांना फारच गमतीचा वाटला—

क्षणभरानें ते मंद स्मित करून, त्यावर संथ आवाजांत म्हणाले—"चुकते आहेस तूं, लीनी!-स्वस्थ बसायचं किंवा दुबळ्या आनाथांचं मरण मरायचं,...असं कोणीच सांगणार नाही!-आपला दोष नसतां, आपली इच्छा नसतां, आपल्यावर उगारलेली तरवार-सुरी आपल्यासमोर आली,..तर तिचे नि ती धारण करणाऱ्याचे तुकडेच करायचे! तरवार-सुरीचा तरवार-सुरीनेंच प्रतिकार करायचा!-भेकडपणें पळून जाण्यापेक्षां तेंच रास्त!...आपल्या हातीं तरवार नसेल, तर मरणापूर्वी, केवळ उघड्या हातानेंहि,..तिचा मरेपर्यंत प्रतिकार नक्कीच करायचा!—तेव्हां स्वस्थ बसायचं नाही—पण तसंच, प्रथम तरवार उचलून सूड घेण्याचं क्षुद्र कर्महि नाहीं करायचं!..."

"याचा अर्थ असा नव्हे कां, सुधीर, कीं, जिथं राक्षसी नि क्षुद्र हातांतल्या तरवारींचा पाशवी रक्ताळ नाच चालला आहे.... तिथं आपल्या लेखणी-वाणीवर भिस्त ठेवून उडी घ्यायचा नाहीं! आपल्या हातच्या प्रभावी लेखणीच्या नि आपल्या हाताच्या, आपल्या भ्रातृभावपूर्ण वाणीच्या नि आपल्या गद्गद गळ्याच्या, आपल्या प्रेममय माणुसकीच्या भावनांच्या नि आपल्या प्रेमपूर्ण हृदयाच्या, त्या राक्षसी धुमश्चक्रींत खांडोळ्या करून घ्यावयाच्या नाहींत, आपण!"

"हो, तें या अननुभवी चिमुकल्यांचं काम नव्हे, नीलादेवी!— त काम आयुष्यभर थोर तपश्चर्या केलेल्या थोर महात्म्यांचं! तीच,...तसलीच थोर तपश्चर्या आधीं तुम्ही धिम्मेपणानें करा; महात्मे व्हा!-या दृष्टीनेंच,

क्षणिक त्वेषोद्वेगानें भडकून न जातां स्वस्थ असा ! विचार करा; आपलं स्वतःचं आजचं आयुष्य धीरानें जगा. सामाजिक विधायक कार्य...विविध, व्यापक नि लहानमोठ्या कक्षेंतलं असतं; तें आधीं हाताळा !-उतावीळ कां होतां ?--नीलादेवींचं हेंच म्हणणं...हो ना हो ?"

१६१

स्वतः पाहिलेलीं तीं भयानक दृश्यं व त्याबद्दलच त्यावेळीं चाललेले विचार यांनीं इतका वेळ भारून गेलेलीं लीनी–सुभाषांचीं मनं—' स्वतःचं आजचं आयुष्य ' म्हणतांच भानावर येऊन चपापलीं. त्यांनीं एकमेकांकडे दृष्टी लावून मग सुधीर–नीलादेवींकडे ओझरतं पाहिलं ! सुधीरं–नीलादेवींनीहि एकमेकांकडे पाहून, परस्परांच्या बाळांकडे दृष्टिक्षेप टाकीत प्रशांत स्मित केलं.

सुधीरांनीं साभिप्राय मौन स्वीकारलं; नि सर्वच स्तब्ध बसलीं असतां, नीलादेवी क्षणभरानें सुधीरांकडे सस्मित पहात म्हणाल्या,—" आणखी दुसराहि एक हेतु मनांत ठेवून, आज तुमच्याकडे आलें आहे मी, सुधीर ! माझ्या सुभाषसाठीं मी तुमच्या लीनीची मागणी घालायला आलें आहे !"...

नीलादेवींच्या त्या स्पष्ट शब्दांतल्या पृच्छेनें सुधीरांना काय वाटलं, तें पाहण्यासाठीं, सुभाष–लीनींनी उतावीळ उत्सुकतेनें त्यांच्या चेहऱ्याकडे दृष्टी वळवली. तो प्रथम थोडा पालटला. मग तिथं मिश्र भावना उमटल्या. पण शेवटीं, त्यावर सौम्य स्मित झळकून,...तेंच तिथं कायम राहिलं !—त्या दोघांनीं मुग्धपणें हळूच एकमेकांकडे समाधानानं पाहिलं.

तेवढ्यांत, नीलादेवींना सुधीर म्हणाले—" तुमचं...या दोघांचं... ठरलं असेल, तर मग माझंहि ठरलंच ! नाहींतरी आजपर्यंतहि लीनी तुमच्याच-कडे; आतां तिथं ती यापुढेंहि कायमचीच राहणार; हक्कानें राहणार, इतकंच !—कधीं तरी ती इथं राहायला येईल, हीच माझी आशा होती. आतां हीं दोघंहि अधूनमधून माझ्या सान्निध्यांत राहून, मला म्हाताऱ्याला सुख देतील कीं ..!-अधिकास्याधिकम् फलम्—"



त्यावेळीं, नकळतच, सुधीरांचे डोळे भरले होते; त्यांच्या त्या संमतीनें, नीलादेवी तोंडभर हसल्या; सुभाष-लीनींचे कान सुखानें न्हाले—आपलीं समाधानीं आनंदीं हृदयं प्रतिबिंबित करणारे हासरे डोळे, त्या तरुण प्रेमी युगलानें एकमेकांकडेच स्थिर केले.

१६२

मग आपल्या पित्याकडे प्रेम भरल्या डोळ्यांनीं पहात, लीनी गद्गदित स्वरांत म्हणाली " नाना...नाना...किती चांगले आहांत तुम्हीं—"

" तुम्हींहि दोघं चांगलींच आहांत ना, पोरी !—" हसून त्या दोघांच्या खांद्यावर थोपटत सुधीर म्हणाले—" आणि तशींच चांगलीं रहा मात्र !—एकत्र जीवन जगायचं,...तर आपल्याला व्यक्तिगत ध्येयाकांक्षांना, प्रबळ भावनांना,...एकमेकांसाठीं...मुरड घालायला शिकलं पाहिजे. लीनी,...तुझी तर जबाबदारी फार आहे. स्त्रीला ती संभाळतां आली तरच तिला आपलं घर संभाळतां येईल !...पुरुषाला संभाळतां येईल !—पोरी,...मग तुमचं वैवाहिक जीवन,...खात्रीनेंच सुखाचं, प्रगतीचं, समाजाच्या अंतिम हिताचंच होणार !-नीलादेवींचा, माझा,..तुम्हाला मनापासूनचा आशीर्वादच आहे !-"

त्यांचा आवाज बोलतां बोलतां गद्गदित होत गेला होता; हळूच खांकरून तो साफ करीत, सुधीर शेवटीं एकदम हसून म्हणाले—" जा आतां;...अधिक डांबून नाही ठेवत आम्ही तुम्हाला !...पळा...गुलगुल गोष्टी करायच्या असतील ना तुम्हाला ?...जा,...तुम्हाला रस्ता फुटेल तिकडे पळा..."

सहास्य मुद्रेनें लाजत पाहात, तीं दोघं दाराकडे वळून लगबगीनें चालूं लागलीं; तें पाहून, नीलादेवी हसत हसत म्हणाल्या —" पण फार लांब लांब जाऊं नका रे, बाबांनो !—सुधीरांनी सांगितलं, त्यांचं ठीक !...ते पुरुष आहेत ! पण मला तरी तुमच्याचबरोबर थोडा पल्ला चालून जायचंय् अजून !—आलं ना ध्यानांत ?--"

सुधीरांनी नीलादेवींकडे, सुभाष-लीनींनी एकमेकांकडे नि त्या दोघांकडे,.. आणि नीलादेवींनी सर्वांकडे पाहिलं. आणि मग सारींच एकदम एकाच वेळीं सौम्यपणें हसली.

१६३

सुभाष-लिनी दोघं पाठमोरीं होऊन, एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून दाराबाहेर जात होतीं; कोचावर बसल्या बसल्या, सुधीर टक लावून त्यांच्याकडे पाहात होते...साऱ्या आयुष्यांतला अननुभूत असा भयंकर कल्लोळ त्यांच्या मनांत त्यावेळीं होत होता.

तथापि, 'आपण एकटेच बसलेलें नाहीं' याची पटकन् जाणीव होऊन, जवळच कोंचावर बसलेल्या नीलादेवींकडे त्यांनीं वळून पाहिलं;...त्यांचेहि डोळे पाण्यानें तुडुंब भरले होते;...त्या स्तब्ध होत्या.... सुधीर आपल्याकडे वळून पाहात आहेत हें लक्षांत येऊन, त्यांनीं त्यांच्या बाजूस आपली मान वळवली.... पापण्यांच्या नकळत उघडझांपीमुळें, नीलादेवींच्या डोळ्यांतून खळकन् गालावर पाणी ओघळलं. पण तें पुसून टाकण्याचा जरा देखील दांभिक प्रयत्न न करतां, त्या सस्मित चेहरा करून, सुधीरना म्हणाल्या—"हा सर्वांत सुखाचा दिवस माझ्या आयुष्यांतला, सुधीर!"

"आय् कॅन् वेल् अंडरस्टँड्..." सुधीरहि गद्गद स्वरांत हळूच म्हणाले.

मग आपले डोळे हळू हळू पुसून नीलादेवी म्हणाल्या— "माझे मृणाल विलायतेला जायला बोटींत बसले...त्यावेळचा त्यांचाच चेहरा पाहिल्याचा मघां मला क्षणभर भास झाला! नि आजच मला खरीखुरी जाणीव झाली, कीं सुभाष माझा नाहीं आतां..लीनीचा!–पण मग पुन्हा वाटलं..आपण आपलं कर्तव्य केलं. झालं;...संपलं! आपण काय, सुधीर काय, आतां यापुढें असंच पार्श्वभूमींत पडायचं!...हळू हळू विरून जायचं—"

त्यांच्या त्या प्रबळ भावनेशीं समरस होऊन, त्या जाणिवेनेंच सुधीरहि सौम्य हसले.



१६३

त्यानंतर, त्या दोघांच्या चांगल्या तासभर सुखदुःखाच्या मोकळ्या गप्पा झाल्या होत्या. मग सुभाष-लीनी परतून, आपल्याबरोबर नीलादेवींना घेऊन बाहेर गेलीं होतीं.—पुन्हा सुधीर एकटेच त्या आपल्या हॉलमध्यें उरले होते.

भोंवतालच्या चार भिंतीकडे, त्यांनी विविध भावनांनी भरलेल्या डोळ्यांनी पाहिलं; त्या हॉलमध्यें...आजवर वेळोवेळीं कितीतरी माणसं आलीं होतीं, वावरलीं–राहिलीं होतीं. गणू, डॉ. प्रेमा, गृहिणी प्रेमा, चिमुकली लीनी, मंजू, नीलादेवी, 'म्हातारा सुभाष', तरुण लीनी, जामात सुभाष–त्याची माता नीलादेवी—

नीलादेवीतर सर्वांत शेवटीं, नुकत्याच तेथून उठून गेल्या होत्या. तो हॉल आतां पुन्हा रिकामा...नि त्यांत सुधीर एकटे, अगदीं एकटे उरले होते!—ती एकटेपणाची जाणीव त्यांना त्याक्षणीं तीव्रतेनें होत होती.

—तेवढ्यांत, चहाचा ट्रे घेऊन, गणू आंत शिरला. त्याला पाहून सुधीर प्रशांत हंसले. तोहि त्या सर्व जाणिवेनेंच जणूं सौम्यपणें हसला. कांहीं वेळ दोघेही कांहींच बोलले नाहीत. कपांत चहा ओतून, गणूनें तो सुधीरांच्या हातीं दिला—

"लीनीताई, सुभाष, नीलादेवी,...सारीं उद्यांच जाणार कां?–काय ठरलं, शेवटीं?" गणोबानें हळूच सूचक प्रश्न केला;..त्याला तें घर, आणखी कांहीं दिवस तरी तसंच गजबजलेलं हवं होतं—

"हो, जाणार उद्यांच!...पण जाऊं दे कीं त्यांना!..."–गंभीरपणें पण किंचित् कडवट भावना आंतल्या आंत दडपत, सुधीर क्षणभरानें त्याला पुढें म्हणाले–"तेव्हां आतां तूं नि मी, आपण पुन्हा दोघेच इथं, गणू—"

गणू खिन्न हसला; पण कांही बोलला नाही.

१६५

तेवढ्यांतच, पुढल्या त्रिकोणी हॉलमध्यें, टेलीफोनचा लांब घंटानाद झाला. लगबगीनें गणू तिकडे गेला; त्यानें जातां जातां, दाराजवळचं बटन 'कटकन्' दाबलं; हॉलमधलं दिव्यांचं झुंबर चौफेर दुधाळ प्रकाश पाडूं लागलं.

सुधीरांनी गोंधळून बाल्कनीतून बाहेर दूरवर पाहिलं; सळसळत्या समुद्राची अव्याहत हालचाल चालूंच होती; सांजेचा प्रकाश चौफेर पसरला होता; त्या लांबलचक लांबवर पसरलेल्या देखाव्यांत, मधूनच पट् पट् पट् दिवे लागत होते—

"काय पण वेडा झालों होतों मी, आज ?...सारा दिवसच्या दिवस या चार भिंतींत, कांही एक न करतां, बसूनच्या बसून काढला मी !"— स्वतःशींच हसून सुधीर म्हणाले.

"काहीं एक न करतां ?—छेः...माझं सारं आयुष्यच फिरून जगत होतों मी ! —हो...अगदीं सुरवातीपासून शेवटापर्यंत !...पण जसं सुरवातीला,.. तसंच अगदीं शेवटींहि,...आतां व्यक्तिगत जीवनांत तरी मी अगदीं पुरा एकाएकी !—माझं जीवन !—वरवर निर्विकार...पण तरी अगदीं विविध घटना–गजबजींनी तुडुंब भरलेलं !—जणूं काय...पूर्वी एकदां कांठोकांठ भरलेली असल्याची जाणीव देणारी...आज रिकामी असलेली माझी दारूची रिकामी निरुपद्रवी बाटलीच..."

बदललेल्या तसल्या विचार-मालिकेनें सुधीरांना खूपच समाधान लाभलं—

१६६

गणू तेवढ्यांत लगबगीनें परतून म्हणाला—"फोन आहे जनरल वॉर्डकडचा !-डॉ. सारंग बोलत होते- म्हणताहेत, ती सकाळची मुलगी... सारखं सारखं तुम्हाला भेटायचंय्,... म्हणतेय् ..."



"सकाळची मुलगी ?–कोण ?–हं हं...ती कां ?...मला भेटायचंय् ?– कां ?–कांही कमी जास्त ??–" आपल्या वैयक्तिक जीवनांत खोल शिरलेल्या–गुंगलेल्या सुधीरांना, त्या साऱ्या गोष्टींचं प्रथम भानच उरलं नव्हतं–'जीवन-गंगा' क्षणकाळ ते विसरले होते. आपल्या साऱ्या जाबाबदाऱ्यांची, तसं बोलतां बोलतांच जाणीव होऊन, डॉक्टर लगबगीनें पुढे होत म्हणाले..."हं हं...आलं ध्यानांत !—बरं बरं... आतां लागलीच पाहातों हं मी सारं;...हा आलोंच म्हणावं !... सारा दिवस असा बेजबाबदारपणें गेला; गेलंच...गेलंच पाहिजे मला आतां !—"

१६७

सुधीर इतका वेळ वेड्यासारखे स्वतःला कोंडून बसले होते; आतां त्या पेशंटच्या बोलावण्याच्या नव्या ओढीनें,—तत्काळ आपली वैयक्तिक जीवनगंगा विसरून-डॉ. पुन्हा आपल्या 'जीवन-गंगे'त लगबगी-लगबगीनें शिरत होते.—

त्यांची जातांनाची ती तारांबळ !–गणूलाहि ती मौजेची वाटली, आणि हजारों मिश्र भावनांनी आपल्याशीच मंद हसून, तो टेलिफोनस्टूल–जवळच्या कोचावर ऐसपैस बसला.

बसल्या बसल्या, नाना नुकतेच निघून गेलेल्या त्या उघड्या दाराकडे नि रिकाम्या रिकाम्या खोल्यांकडे चौफेर पाहात, गणू स्वतःशींच म्हणाला—"हेंच...हें...बरं...माझ्या नानांचं घर..."

१६८

तोंच...जवळच्या टेलिफोनवर 'कर्रक् कर्र, कर्रक् कर्र' असा फिरून घंटा नाद झाला; कुठला तरी मेन लाइनचा फोन कोकलत होता...कोणी तरी रोगी,..सुप्रसिद्ध सर्जन डॉ. सुधीरांचा,...आशावंत मनानें तसा धांवा

करीत होता. त्याच्यां जीवन-मरणाचाच तो झगडा होता; सुधीरांच्या तटा या आधारांनेंच त्याची जीवन गंगा पुढें सुरळीत चालू होणार होती!...

आपल्याच मनांतल्या विचारांत गढल्या गढल्या, यांत्रिकपणें अगदीं संथ हालचाल करीत, गणूनें रिसीव्हर कानाला लावला;...नि जागच्या जागीं बसल्या बसल्याच, अगदीं जड स्वरांत नानांचा गणू म्हणाला—"हल्लोऽ... हल्लोऽ!...हं...हो!ऽ...हीच...हीच डॉ. सुधीरांची 'जीवन-गंगा'!—"

## ६ जीवन-गंगा ६

**- पूर्णविराम -**

[कै. जगन्नाथ आ. सामंत बी.ए., एलएल.बी. (ठाणें) यांच्या स्मरणार्थ]

पारिजात प्रकाशन तर्फें—

**'जगन्नाथ-पारिजात'**

**—पुरस्कार पारितोषिक—**

प्रतिवार्षिक वाङ्मयीन पारितोषिकाची योजना लौकरच जाहीर होईल.

२०-४-४७

[ अमर ज्योति वाङ्मय ]

## कुमार–किशोरांसाठीं

आम्ही खडबळ माणसं !
भावना नि जीवन
(शब्दचित्रें)
शहरचे भाई ,,
स्त्रिया नि आया ,,
मृगजळांतलीं बादळं
( कथा )
उघडी कवाडं
( लघुनिबंध )
तें आमचं
स्वराज्य-साम्राज्य
गोऱ्यांचं काळं राज्य
दास्याचे पहिले वैरी
१-२-३
स्वराज्याचे सेवक
१-२-३

कुतूहल
१ घरांत
२ आंवतीं-भौंवतीं
३ चौफेर
४ नभांत
५ अंतरिक्षांत
६ भूपृष्ठावर
७ भू-गर्भांत
८ सागरावर
९ सागरापोटीं